जर्मन महाकवि गटे

यांचे

फाउस्ट

[भाग पहिला]

भाषांतरकार

विंदा करंदीकर

साहित्य अकादमी, नवी दिल्ली

Faust : Marathi translation by Vinda Karandikar of Goethe's *Faust*, *Part I*. Sahitya Akademi, New Delhi, 1980

प्रथम आवृत्ती १९६५
द्वितीय आवृत्ती १९८०

प्रकाशक :
साहित्य अकादमी,
रवींद्र भवन,
३५, फिरोजशाह रोड,
नवी दिल्ली ११० ००१

मुद्रक :
नाना बेंगळे
साधना प्रेस,
४३०–३१ शनिवार पेठ,
पुणे ४११ ०३०

SAHITYA AKADEMI
REVISED PRICE Rs. 20-00

निवेदन (१)

जर्मन महाकवी गटेच्या फाउस्ट ह्या विख्यात नाट्यकाव्यातील पहिल्या भागाचे हे मराठी भाषांतर मी फिलिप वेनच्या इंग्रजी भाषांतरावरून केलेले आहे. फिलिप वेनचे फाउस्टचे भाषांतर हे इंग्रजी भाषेतील त्या ग्रंथाचे सव्विसावे भाषांतर आहे. ते भाषांतर करताना फिलिप वेनला पूर्वीच्या इंग्रजी भाषांतरांचाही बऱ्याच प्रमाणात उपयोग करून घेणे शक्य झाले. मराठीतील हे पहिलेच भाषांतर असल्याने तशा स्वरूपाचे साहाय्य मला उपलब्ध नव्हते. शिवाय जर्मन भाषेचे अज्ञान हीसुद्धा फार मोठी उणीव होती. अशा परिस्थितीत हे भाषांतर निर्दोष आहे असे म्हणण्याचे धाडस मी करणार नाही.

पण प्राप्त परिस्थितीत ते जितके निर्दोष करणे शक्य होते तितके करण्यासाठी मी गेली चार वर्षे परिश्रमांची पराकाष्ठा केली असे म्हणण्यात मला बिलकूल संकोच वाटत नाही. फिलिप वेनची शब्दयोजना जिथे संदिग्ध वाटली तिथे अर्थनिश्चितीसाठी मी इतर इंग्रजी भाषांतरांचा उपयोग केला; स्वतःच्या काव्यात पूर्वी अनेकदा वापरलेला आघातानुसारी मुक्तछंद या नाट्यकाव्यातील आशयाशी एकरूप होईल अशा पद्धतीने कार्यप्रवण केला; अपरिहार्य वाटले तिथे मुक्तछंदात्मक लयीला यमकांचा आधार दिला; आणि शक्य झाले तिथे मुळातील वृत्तबद्ध गीत-रचना वृत्तबद्ध स्वरूपातच मराठीत आणली. ह्या सर्व प्रयत्नामध्ये अभिव्यक्ती आशयसन्मुख ठेवणे हे एकच सूत्र मी सतत डोळ्यांपुढे ठेवले होते.

हा बिकट ग्रंथ मराठीत आणण्याचे साहस मी ज्या श्रद्धेच्या जोरावर केले त्या श्रद्धेचा उच्चार या ठिकाणी केला तर ते अप्रस्तुत ठरणार नाही : मराठीतील प्रत्येक सुशिक्षित लेखकाने जागतिक वाङ्मयातील निदान दोन ग्रंथ तरी आपल्या भाषेमध्ये आणणे हे त्याचे कर्तव्य आहे असे मी मानीत आलो आहे. या पूर्व-तयारीशिवाय मराठीला शैक्षणिक व सांस्कृतिक जीवनातील तिचे नवे कार्य करता येणार नाही. या श्रद्धेनुसार माझ्या हातून एका वैचारिक व एका सृजनशील अशा दोन ग्रंथांचे मराठीत भाषांतर व्हावे अशी माझी मनीषा होती. ॲरिस्टॉटलच्या काव्यशास्त्राचे मराठी भाषांतर मी ज्या श्रद्धेतून केले त्याच श्रद्धेतून गटेच्या फाउस्टचे हे भाषांतरही मी केलेले आहे. ते मातृभाषेच्या पायांपुढे ठेवताना मला आज एक प्रकारची कृतार्थता वाटते.

कृतार्थतेच्या या क्षणी राजाराम कॉलेजातील माझे प्राध्यापक डॉ. माधवराव पटवर्धन (ऊर्फ कवी माधव ज्यूलियन) यांची मला प्रकर्षाने आठवण होते.

वाङ्मयामध्ये मी जे थोडेफार कार्य केले, विशेषतः अशा प्रकारच्या भाषांतरासाठी जी जिद्द पणाला लावली, त्याची पहिली स्फूर्ती मला त्यांच्याकडूनच मिळाली. फाउस्टचे हे मराठी भाषांतर मी अत्यंत भक्तिभावाने त्यांच्या स्मृतीला अर्पण करतो.

प्रस्तुत भाषांतराचे तीन वेळा पुनर्लेखन व संस्करण करूनही त्यात पुष्कळ त्रुटी राहून गेल्या. छापखान्याची गैरसोय किती होईल याचा विचार न करता मी मुद्रिते तपासतानाही चौथे संस्करण केले. पण विमा छापखान्याने हे सर्व आनंदाने सहन केले. साहित्य अकादेमीनेही हे काम माझ्यावर सोपवून मला माझा एक संकल्प पुरा करण्याची संधी दिली. त्या दोन्ही संस्थांचा मी अत्यंत आभारी आहे.

बेडेकर सदन नं. ७
माहीम, मुंबई– १६
२१ जानेवारी १९६५

विंदा करंदीकर

निवेदन (२)

प्रस्तुत भाषांतराच्या द्वितियावृत्तीचा योग आला याचे श्रेय मुख्यतः गटेचे, त्याच्या महाराष्ट्रीय रसिकांचे, व साहित्य अकादेमीचे.

या संधीचा फायदा घेऊन काही ठिकाणी चुकांची दुरुस्ती व काही ठिकाणी अन्य सुधारणा करता आल्या याचा मला आनंद वाटतो.

७ आनंदवन, साहित्य सहवास,
वान्द्रे (पूर्व); मुंबई– ५१
१४ एप्रिल १९८०

विंदा करंदीकर

प्रस्तावना

गटेचे फाउस्ट प्रसिद्ध झाल्यानंतर लौकरच त्या ग्रंथाची बहुतेक सर्व युरोपियन भाषांमध्ये भाषांतरे झाली. फाउस्टचे यथातथ्य आकलन होण्यासाठी कोणालाही तत्कालीन युरोपियन संस्कृतीची आणि विशेषतः तत्कालीन जर्मन संस्कृतीची थोडी-फार ओळख असणे आवश्यक आहे. फाउस्टमधील प्रमुख भूमिका ही एका स्खलन-शील व्यक्तीची आहे; तरीही त्यातील पात्रांचा रसरशीतपणा, प्रसंगांचे रंगवैचित्र्य आणि आशयाची सघनता यामुळे अनेक वाचक त्याकडे आकर्षित झाले आहेत. आपल्या अधिक परिपक्व अवस्थेत स्वतः गटे मात्र फाउस्टच्या व्यक्तिरेखेपासून दूर सरला होता आणि आपल्या अन्य कलाकृतींमध्ये फाउस्टच्या व्यक्तिरेखेत न आढळणाऱ्या इतर स्वभाववैशिष्ट्यांवर अधिकाधिक भर देत होता, ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. एक शास्त्रज्ञ, एक सनदी नोकर आणि अनेक अर्थांनी अठराव्या शतकाच्या अखेरीस आढळणाऱ्या युरोपियन संस्कृतीचा एक प्रतिनिधी या विविध भूमिकांत वावरणाऱ्या या कवीच्या अनेक कलाकृतींतील एक कृती म्हणजे फाउस्ट.

गटेचा जन्म इ. स. १७४९ च्या ऑगस्टमध्ये दि. २८ ला व्यापाराकरिता प्रसिद्ध असलेल्या फ्रँकफुर्ट ऑन–द–मेन या शहरात झाला. याचे पहिले शिक्षण वडिलांच्या घरीच खाजगीरीत्या झाले, आणि पुढे लिपझिग व स्ट्रासबर्ग या विश्वविद्यालयांमध्ये त्याने कायद्याचे विशेष अध्ययन केले. पण त्याच वेळी त्याला निसर्गविषयक शास्त्रे, वाङ्मय व धर्मशास्त्र या विषयांतही आत्यंतिक रस निर्माण झाला होता. म्हणूनच यच्चयावत ज्ञानशाखांचे अवगाहन करण्याचा फाउस्टचा ध्यास हा गटेच्या स्वतःच्या तारुण्याचेच एक प्रतीक आहे असे मानावेसे वाटते.

गटेचा चरित्रपट हा अर्वाचीन विज्ञानाची बलद् वाटचाल आणि त्या पाठोपाठ झालेला १९ व्या शतकातील औद्योगिक विकास यांच्याशी समांतर आहे. या कालखंडात मानवाला निसर्गाचे अधिकाधिक तपशीलवार ज्ञान होत गेले खरे, पण या सर्व फापटपसाऱ्यात निसर्गाचे मूलस्वरूप त्याच्या दृष्टिआड झाले. एक एकात्म सबंध म्हणून निसर्गाची अनुभूती घेणे हेच गटेचे प्रधान लक्ष्य होते.

गटेचे 'फाउस्ट' या अभिजात जर्मन ग्रंथाच्या भारतीय भाषांतरासाठी आमच्या विनंतीला मान देऊन प्रस्तावना लिहिल्याबद्दल मुख्यतः डॉ. एरिक ट्रुंझ यांचे, तिचे इंग्रजीत भाषांतर करून दिल्याबद्दल डॉ. एन. क्लेन यांचे, आणि त्यावरून नजर फिरवल्याबद्दल डॉ. आबिद हुसेन यांचे आम्ही आभारी आहो. — संपादक

गटेच्या प्रतिभेची झलक दाखवणाऱ्या काही सुरुवातीच्या कलाकृतींनी, विशेषतः 'बर्लिकिंगचा गोट्झ' हे नाटक व 'तरुण वर्थरची दुःखे' ही कादंबरी यांनी, लेखक म्हणून त्याची कीर्ती प्रस्थापित केली. एका लहानशा संस्थानाचा अधिपती असलेल्या वेमरच्या ड्यूकने इ. सन १७७५ साली त्याला आपल्या दरबारात पाचारण केले आणि त्या ठिकाणीच गटेने आपले उर्वरित सर्व आयुष्य घालवले. सुमारे अकरा वर्षे खाणी, रस्त्यांचे बांधकाम, वाचनालये आणि कलासंग्रह या कामावरील प्रमुख अधिकारी म्हणून त्याने काम केले. या स्थानावरून निवृत्त झाल्यानंतर त्याने सुमारे दोन वर्षे इटलीमध्ये प्रवास करण्यात घालवली, आणि परत आल्यानंतर राष्ट्रीय सांस्कृतिक संस्थांचा — नाट्यगृहे, कलाभवने, पुस्तकालये, संग्रहालये वगैरे संस्थांचा — परिवेक्षक या हुद्यावर त्याची नेमणूक झाली. या नव्या स्थानामुळे त्याला स्वतःच्या वाङ्मयीन कार्यासाठी अधिक वेळ उपलब्ध होऊ लागला.

वृद्धापकाळी गटेची कीर्ती सर्व युरोपभर पसरली होती. त्याला भेटण्यासाठी अनेक देशांतील लोक येत असत. त्याच्या चाहात्यांपैकी काही लोकांनी त्याच्या संभाषणाची टिपणे ठेवलेली आहेत. १८२७ ते १८३० या कालावधीत त्याचे समग्र लिखाण चाळीस खंडांमध्ये प्रसिद्ध झाले. २२ मार्च १८३२ ला तो वारला तेव्हा त्याच्या कागदपत्रांत त्या वेळेपर्यंत अप्रसिद्ध असलेले आणखी बरेच लिखाण उपलब्ध झाले.

प्रत्येक वाङ्मयीन कलाकृतीसाठी गटेला भरपूर कालावधी लागत असे. तो म्हणायचा, 'कलाकृती ही वाढत गेली पाहिजे.' फाउस्टच्या पहिल्या विभागातील पुष्कळसा भाग १७७६ सालाइतका अगोदर लिहिला गेला होता; आणि तरीही १८०८ पूर्वी तो विभाग पुरा होऊ शकला नाही. 'फाउस्ट'चा दुसरा विभाग हा १८३१ मध्ये पुरा झाला; आणि तो स्वतःच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध करण्यात यावा असे गटेने ठरवून टाकले.

गटेची प्रतिभा ही सर्व क्षेत्रांत संचार करणारी होती. निसर्गाने त्याला जीवनाचे सूक्ष्म निरीक्षण करण्याच्या शक्तीबरोबरच शास्त्रीय संशोधन करणारी प्रज्ञाही बहाल केली होती. जवळजवळ सर्व आयुष्यभर एकाच वेळी शास्त्र व वाङ्मय या दोहोंचाही मागोवा तो घेत आला होता; फार तर कधी एकाकडे जास्त लक्ष दिले गेले असेल तर कधी दुसऱ्याकडे. याशिवाय त्याने विविध क्षेत्रांमध्ये संचार करणारा असा इतिहासाचा व्यासंगही सतत सुरू ठेवला होता. निरनिराळ्या मूळ प्रवाहांतून उद्भव पावणाऱ्या जर्मन संस्कृतीच्या उत्क्रांतीचा अभ्यास त्याने केलेला होता. काव्यामध्ये आणि इतर ललितकलांमध्ये ग्रीक आणि रोमन लोकांचा आध्यात्मिक वारसा हा त्याला अत्यंत मोलाचा वाटत असे; फाउस्टच्या दुसऱ्या विभागात प्राचीन ग्रीक जीवनाचे सापडणारे सुस्पष्ट चित्र हे या दृष्टिकोनाचाच परिपाक होय.

ख्रिस्ती धर्माच्या तत्त्वप्रणालीशीही गटेचा चांगला परिचय होता. मार्गरिटा ही ख्रिस्ती ध्येयवादाशी सुसंगत असेच जीवन जगते असते; विशेषतः पहिल्या विभागातील तुरुंगाच्या प्रवेशात, आणि नाटकाच्या दुसऱ्या विभागाच्या शेवटीही पुन्हा ख्रिस्ती मूल्यांचेच दर्शन घडते.

तथापि गटेची वैचारिक दृष्टी ही जर्मन, प्राचीन ग्रीक आणि ख्रिस्ती परंपरा यांनीच मर्यादित झालेली नव्हती. त्याच्या जीवनाचा कालखंड हा एक असा कालखंड होता की, ज्या वेळी सर्व युरोपभर आणि विशेषतः जर्मनीमध्ये लोकांनी दूरदूरच्या देशातील वाङ्मयाचे संशोधन करण्याची आणि त्या वाङ्मयाचे आपल्या भाषेत भाषांतर करण्याची सुरुवात केली होती. गटे स्वतःच असे म्हणायचा की त्याचा कालखंड हा 'जागतिक वाङ्मयाच्या उदयाचा कालखंड आहे.' म्हातारपणी तो फारशी वाङ्मयात गढलेला होता, विशेषतः हाफीझमध्ये; आणि पार्शियाशी संबद्ध असलेले 'वेस्ट ईस्टर्न दिवान' (१८१९) असे एक भावकाव्यही त्याने लिहिले होते. भारताशी त्याचा परिचय झाला तो प्रवासवर्णनांमार्फत. १७९१ साली जॉर्ज फार्स्टरने कालिदासाच्या 'शाकुंतल'चे जर्मन भाषांतर प्रसिद्ध केले. या नाटकाचा प्रभाव पडूनच गटेने आपल्या फाउस्टसाठी 'नाट्यगृहामधील प्रारंभक' लिहिला. त्या वेळेपर्यंतच्या जर्मन नाट्याला असले प्रारंभक अज्ञात होते. यानंतर भारतीय वाङ्मयातून भाषांतरित होणाऱ्या प्रत्येक गोष्टीत त्याला रस वाटू लागला. १८२० नंतर जर्मनीतील भारतीय प्राच्यविद्येची झपाट्याने प्रगती होत गेली. त्याचे प्रधान श्रेय विल्हेल्म श्लेगेल आणि फ्रिडिक रूकर्ट यांच्यासारख्या विख्यात पंडितांच्या परिश्रमांना आहे.

जे काही थोडे फार चिनी वाङ्मय युरोपियन भाषांमध्ये भाषांतरित झाले होते, त्याच्याकडेही गटे आकर्षित झाला होता. अशाप्रकारे आपल्या आयुष्याचा उत्तरार्ध त्याने 'जागतिक वाङ्मयाला' वाहिलेला होता. त्याची अशी दृढ श्रद्धा होती की, युरोपियन समाजाशिवाय इतर समाजाजवळही चिरंतन मूल्य असलेल्या महान कलाकृती अस्तित्वात आहेत; अशा जागतिक वाङ्मयाचा अभ्यास सर्व समाजांना परस्परांचा परिचय करून देण्यासाठी उपयोगी पडतो; आणि परस्परांचा अधिक चांगला परिचय घडल्यामुळे त्यांचा परस्परांकडे पाहण्याचा दृष्टिकोन शांततेला पोषक रहातो.

फाउस्ट (भाग पहिला)

फाउस्ट हे नाटक ज्या व्यक्तीच्या जीवनाबद्दल लिहिलेले आहे ती व्यक्ती सोळाव्या शतकात प्रत्यक्ष हयात होती असा समज प्रचलित होता. त्यावेळी जर्मनीमध्ये फाउस्ट नावाचा एक माणूस लोकविलक्षण प्रयोग करीत सर्व देशभर फिरत असे; आणि आपण स्वतः महापंडित असल्याचा दबदबाही त्याने निर्माण केला होता.

त्याच्याविषयी फारच थोडे लिखाण उपलब्ध आहे. त्याच्या मृत्यूनंतर जादुगार आणि सैतान यांच्यामधील कराराच्या अनेक चमत्कारिक कथा त्याच्या नावाशी निगडित करण्यात आल्या. त्या विषयावर गद्यामध्ये गोष्टी लिहिल्या गेल्या आणि त्याचप्रमाणे कठपुतळीवाल्यांसाठी लहानलहान नाटकेही लिहिली गेली. या जुन्या विषयावरच गटेने आपल्या फाउस्टचा पहिला भाग आधारलेला आहे.

मध्यान्हीच्या सुमाराला फाउस्ट आपल्या अभ्यासिकेमध्ये जीवनाचा अंतिम अर्थ आणि या विश्वाचा आद्य हेतू या विषयावर चिंतन करीत बसलेला आहे. विश्वविद्यालयाच्या ज्ञानमंडित शाखोपशाखांतील प्रगाढ अवगाहनानेही त्याला त्या प्रश्नाचे उत्तर मिळालेले नसते. जादूची शक्ती हेच आता त्याचे शेवटचे आशा-स्थान बनते. तो विश्वयंत्राचे दर्शन घेतो. आणि त्यामुळे त्याला विश्वातील संवाद-शील सुसंगतीचे ज्ञान होते. पण तेवढ्याने समाधान न होऊन तो पृथ्वीच्या चैतन्य-तत्त्वाला आवाहन करतो. ते त्याला सृजनशील निसर्गाशी तुलना करता मानवी व्यक्तीचे जीवन किती कःपदार्थ आहे हे सांगते. त्याच्या हाताखालील सहाय्यक वॅग्नर हा उपस्थित झाल्यामुळे फाउस्टच्या या महान चिंतनिकेत खंड पडतो. आपल्या या संघर्षातून विमुक्त होण्यासाठी फाउस्ट विषप्राशन करण्याचा प्रयत्न करतो. पण हा मानसिक निर्णय घेत असतानाच ईस्टरचा घंटानाद त्याच्या काना-वर पडतो. "घडले ख्रिस्ताचे उत्थान." फाउस्टच्या व्यक्तित्वात श्रद्धेला फार गौण स्थान असूनसुद्धा, जसजसे तिकडे ख्रिस्ताच्या पुनरुत्थानातून मानवाचे विमोचन साजरे केले जाते तसतसा तो आपल्या निराशेतून बाहेर पडतो.

आपला दुय्यम सहकारी वॅग्नर याला बरोबर घेऊन फाउस्ट 'ईस्टरचा फेरफटका' करायला बाहेर पडतो. नगराच्या प्रवेशद्वाराबाहेर ते दोघे उत्सवा-निमित्त जमलेल्या मेळाव्यात सहभागी होतात. फ़ाउस्टची नजर सूर्यास्तावर खिळते, आणि त्याबरोबर सर्वसामान्य लोकांच्या आनंदोत्सवातून प्राप्त झालेले त्याचे समाधान नाहिसे होते; आधिभौतिक विचार पुन्हा त्याला पछाडू लागतात. "दोन आत्मे राहतात माझ्या एकाच छातीमध्ये; आणि प्रत्येकाला आपल्या भावापासून हवे असते वेगळे व्हायला." एक कुत्रे त्याचा पाठपुरावा करते आणि त्याच्यासह तो आपल्या अभ्यासिकेत प्रवेश करतो. सेंट जॉनचे ख्रिस्तदर्शन भाषां-तरित करण्याच्या उद्योगाला तो सुरुवात करतो. ते कुत्रे अस्वस्थ होऊ लागते; आणि शेवटी त्याच्यामधून मेफिस्टॉफलीझ प्रकट होतो. "मी आहे नाकारित जाणारे एक चैतन्यतत्व, एक भाग त्या शक्तीचा जी पापाची निर्मिती करतानाच घडवते पुण्यही." त्या दोघांमध्ये करार होतो : इथे भूलोकात मेफिस्टॉफलीझने आपल्या जादूचा उपयोग करून फाउस्टची सेवा करायची आणि त्याच्या बदली परलोकामध्ये फाउस्टने मेफिस्टॉफलीझचे दास्य स्वीकारायचे.

फाउस्टचे हे नवे जीवनपर्व प्रथम त्याला लिपझिगमधील आरबाखचे

तळघराकडे नेते. तिथे मोठ्या प्रमाणात दारू फस्त होत असते, असभ्य भाषेचा वापर होत असतो आणि अश्लील गाणी गायली जात असतात. नंतर मेफिस्टॉफलीझ त्याला चेटकिणीच्या पाकशाळेत नेतो. तिथे आधी मेफिस्टॉफलीझला किंचाळणाऱ्या माकडिणी आणि डरे यांना शिस्तीवर आणावे लागते. तिथेच फाउस्टला आरशामध्ये एका रूपवती स्त्रीचे प्रतिबिंब दिसते आणि अमर्याद विषयवासनेने तो भारावून जातो. कायाकल्प करणारे एक पेय चेटकीण तयार करते आणि मग ह्या वृद्ध प्राध्यापकाचे एका छकड्या तरुणात रूपांतर होते.

कायाकल्प झालेल्या या फाउस्टची मार्गरिटा नावाच्या एका मुलीशी गाठ पडते; तो तिच्या प्रेमात पडतो, आणि उत्कट प्रियाराधन सुरू होते. त्यांना वरचेवर एकत्र येता येईल याची काळजी मेफिस्टॉफलीझ घेतो. मार्गरिटाची शेजारीण मर्था श्वेर्टलिन हिला तिच्याच बागेमध्ये मेफिस्टॉफलीझ पुष्कळ दिवसापूर्वी इटलीत वारलेल्या तिच्या नवऱ्याची अंतिम इच्छा विदित करतो. त्या वेळी फाउस्ट उपस्थित असतो; आणि या संधीचा तो मार्गरिटाशी बातचीत करण्यासाठी उपयोग करून घेतो. मार्गरिटा त्याला आपल्या खोलीवर नेते आणि तिथे ती दोघे पुष्कळ वेळा एकांत अनुभवतात. फाउस्टने दिलेल्या एका पेयामुळे मार्गरिटाची आई गाढ झोपलेली असते. नंतर पुढे मार्गरिटचा भाऊ व्हॅलेंटाईन हा फाउस्टला आव्हान देतो, मेफिस्टॉफलीझ आपल्या जादूच्या सामर्थ्याने त्याचा हात लुळा पाडतो आणि त्यामुळे तो मारला जातो.

मार्गरिटा आई होते. एका भयानक पश्चात्तापाच्या भावनेने ती पछाडली जाते. आणि त्या अवस्थेत प्रार्थना आणि चर्च हीसुद्धा तिला विरंगुळा देऊ शकत नाहीत.

मध्यंतरी मेफिस्टॉफलीझने फाउस्टला वाल्पर्गाच्या रात्री भरणाऱ्या चेटकिणींच्या उत्सवामध्ये नेलेले असते. विरूप भुताखेतांच्या त्या दुनियेमध्ये फाउस्टला एक जादूचे दृश्य दिसते—मार्गरिटा तुरुंगात आहे असे दाखवणारे एक कल्पित मूकदृश्य.

आपल्या अपत्याचा खून केल्याबद्दल तिला तुरुंगात टाकलेली असते. आता तिचा नुसता भाऊच गेलेला नसतो, तर झोपेच्या औषधामुळे आईही मेलेली असते. फाउस्ट तुरुंगामध्ये जातो आणि तिथे त्याला मार्गरिटा वेडी झालेली दिसते. ती परमेश्वरी दयेची याचना करते. "वरून येणारा" एक आवाज 'तिचा उद्धार झाला आहे' असे अभिवचन देतो.

पूर्वीच्या गद्य पुस्तकातील आणि कठपुतळी नाटकातील फाउस्टच्या कथेमध्ये गटेने ज्या तपशिलांची विशेष भर टाकली आहे अशामध्ये 'स्वर्गामधील प्रारंभक' या प्रस्तावनात्मक भागाचा अंतर्भाव होतो. या प्रारंभकामुळे पुढे घडणाऱ्या सर्व प्रसंगांमध्ये एक प्रकारची आधिभौतिक सुसंगती प्रस्थापित केली जाते. परमेश्वर

आणि मेफिस्टॉफलीझ यांच्यामधील संवादात परमेश्वर हा सैतानाला 'मानवी चैतन्यशक्तीला (फाउस्टला) तिच्या मूलस्रोतापासून खंडित करण्याचे' स्वातंत्र्य देतो; मात्र 'तो मानव भूलोकावर वास्तव्य करीत आहे तोपर्यंत.' परमेश्वर मेफिस्टॉफलीझचा उल्लेख 'एक बदमाश' असा करतो. गटेच्या भाषेमध्ये 'बदमाश' याचा अर्थ एक चतुर शून्यवादी, एक हुषार विदुषक, असा होता. हीच भूमिका मेफिस्टॉफलीझ संबंध नाटकमध्ये वठवीत असतो, आणि या भूमिकेचा एक भाग म्हणूनच तो पैजेची भाषा करतो. पण परमेश्वर एका कनिष्ठ चैतन्यशक्तीशी, विश्वातील एका क्षुल्लक अणूशी, पैज मारण्याचे नाकारतो.

फाउस्टला जे जे करावेसे वाटते ते ते मेफिस्टॉफलीझ अगदी टोकाला नेतो. फाउस्टचा हेतू मार्गरिटाच्या आईला झोपेचे औषध द्यावे हा असतो तथापि मेफिस्टॉफलीझ त्यात प्राणघातक विष घालतो. फाउस्टचे व्हॅलेंटाइनशी नुसते भांडण होते; मेफिस्टॉफलीझ त्याचा खून करतो. पण जेव्हा जेव्हा मेफिस्टॉफलीझ हा आपली पैज जिंकण्याच्या बेतात असतो आणि फाउस्ट हा पापाला शरण जाण्याच्या काठावर असतो, तेव्हा तेव्हा सर्व गोष्टींना एकदम अनुकूल अशी कलाटणी मिळालेली दिसते. ज्यामुळे फाउस्टला जीवनात सुखोपभोग मिळण्याची अभिलाषा राहील असा प्रसंग मेफिस्टॉफलीझला हवा असतो, तरीही फाउस्ट मात्र आपण स्वतः ज्यामुळे पुण्याच्या ध्यासात राहू अशा पद्धतीने त्या प्रसंगाचे स्वरूप बदलून देतो. मेफिस्टॉफलीझची इच्छा फाउस्टचे निव्वळ विषयोपभोगात अधःपतन घडवावे ही असते, फाउस्ट त्याचे प्रीतीमध्ये रूपांतर करतो. अशा प्रकारे फाउस्टला जे जे हवे असते त्याचा विपर्यास करण्यात मेफिस्टॉफलीझ गढलेला असतो; आणि मेफिस्टॉफलीझला जे जे हवे असते त्याचा कायापालट फाउस्ट करीत असतो. एका शक्तीचा दुसऱ्या शक्तीशी चालणारा संघर्ष हेच या संबंध नाटकाचे स्वभाववैशिष्ट्य आहे.

मेफिस्टॉफलीझ हे काही निव्वळ पापाचेच प्रतीक नव्हे; ते एक व्यक्तित्वपूर्ण स्वभावचित्र आहे. तो एक वैशिष्ट्यपूर्ण असा निशाचर आहे, तथापि फाउस्टची आधिभौतिक आकांक्षा, ज्याचे स्वतः परमेश्वर "रापणारी सहजबुद्धी" असे वर्णन करतो, ती मात्र त्याच्या पलीकडची असते. "कशी येऊ शकेल तुला कल्पना मानवी आत्म्यांना हेलावणाऱ्या आकांक्षांची!" असे फाउस्ट त्याला म्हणतो ते यथायोग्यच आहे. याच आकांक्षाची परिणती मेफिस्टॉफलीझ व फाउस्ट यांच्यामधील करारात होते; आणि फाउस्टपुरते या आकांक्षा हेच प्रधान उद्दिष्ट राहते.

फाउस्टशिवाय नाटकामध्ये दुसऱ्या दोन समांतर व्यक्तिरेखा दृष्टोत्पत्तीस येतात. पुस्तकातील सत्याचे संशोधन करण्याचा ज्याचा बौद्धिक ध्यास शेवटी तपशीलाच्या भाराखाली खलास होतो असा वॅग्नर, आणि ज्याला अनुभव हवा असतो पण ज्याची संभ्रमित बुद्धी ही जीवन व शास्त्र यांचा संबंध जोडायला

असमर्थ असते असा विद्यार्थी. फाउस्टला हवा असतो तो मानवी जीवनाच्या सर्व अंगांचा संपूर्ण अनुभव. नाटकाच्या दुहेरी कथानकामागील खरी प्रेरणा हीच आहे. सुरुवातीला फाउस्टच्या आकांक्षाचे लक्ष्य शास्त्र हे असते, त्याचा ध्यास सर्व विश्वाचे ज्ञान मिळवावे हा असतो; पण त्याचा परिपाक मात्र त्याला स्वतःच्या ज्ञानाच्या मर्यादा समजण्यात होतो. त्याच्या दुसऱ्या आकांक्षांचे क्षेत्र प्रेम हे असते; त्यांची सुरुवात प्रामाणिक प्रीतीतून होऊन शेवट मात्र गंभीर गुन्हेगारीत होतो. संयमाच्या अभावामुळे फाउस्टची आकांक्षा ही नेहमीच विपरीत वळण घेते, आणि शेवटी विफल ठरते. या सर्व बाबतीत दुसरा भाग हा पहिल्या भागाचाच पाठपुरावा करतो. तिथेही प्रधान पात्रे फाउस्ट आणि मेफिस्टॉफलीझ हीच आहेत. तिथेसुद्धा लक्ष्य भिन्न असले तरी फाउस्टची आंतरिक अस्वस्थता सतत प्रत्ययाला येते. सुरुवातीच्या 'स्वर्गामधील प्रारंभका'प्रमाणेच नाटकाचा शेवटसुद्धा या पृथ्वी-तलाच्या पलीकडे जातो. अशा प्रकारे प्रारंभक आणि शेवट ही दोन्हीही नाटकाला त्याची विशिष्ट चौकट प्राप्त करून देतात. फाउस्टचा पहिला भाग हा या सबंधाचा एक घटक आहे; आणि म्हणूनच दुसऱ्या भागात काय घडते याचे थोडक्यात दिग्दर्शन करणे व त्यामधील शेवटचा प्रसंग हा नुसता त्या भागालाच नव्हे तर संपूर्ण नाटकालाच कशी गोलाई देतो हे पाहणे आवश्यक आहे.

फाउस्ट (भाग दुसरा)

फाउस्टला अजूनही जगायला हवे असते; अनुभव घेण्यासाठी आणि कार्य करण्यासाठी त्याची आकांक्षा पुन्हा जागृत होते. मेफिस्टॉफलीझच्या साहाय्याने कागदी चलनाचा शोध लावून प्रथम तो एका कर्जबाजारी सम्राटाला साहाय्य करतो. नंतर तो हेलन व पॅरिस या प्राचीन ग्रीसमधील सर्वोत्कृष्ट सौंदर्यशाली व्यक्तींना सम्राटाच्या दरबारात आवाहन करतो. हेलनचे सौंदर्य पाहिल्यावर फाउस्टला ती हवीशी वाटते, पण तिला स्पर्श करण्याचा प्रयत्न करीत असतानाच तो बेशुद्ध होतो.

फाउस्टचा पूर्वीचा सहकारी वॅग्नर याने मध्यंतरी आपल्या अभ्यासिकेमध्ये एक चिन्मानव तयार केलेला असतो. या चिन्मानवाजवळील ज्ञानाला स्थल-कालाच्या मर्यादा नसतात. हा चिन्मानव म्हणजे बौद्धिक जगताच्या कृत्रिमतेचेच एक प्रतीक असते.

हा चिन्मानव हेलनच्या सौंदर्यासाठी झुरणाऱ्या फाउस्टला ग्रीसमध्ये जाऊन तेथील 'विदग्ध वालपर्गीची रात्र' पाहण्याचा सल्ला देतो. स्पार्टामधील पुरातन ठिकाणाजवळ फाउस्ट एका किल्ल्यामध्ये वास्तव्य करतो. दुःखीकष्टी हेलन त्याच्या-जवळ आश्रयाला येते. तथापि तिची ही उपस्थिती कोणत्याही विशिष्ट ऐतिहासिक कालखंडाशी निगडित झालेली दिसत नाही. तिला स्वतःलाही आपण कोणत्या कालखंडात वावरत आहो याची जाणीव नसते.

फाउस्ट आणि हेलन यांना यूफोरिअन नावाचा मुलगा होतो. आपल्या पित्याप्रमाणेच तोही सर्वस्वी अनिर्बंध असतो. आणि लौकरच त्याचा अंत होतो. त्याच्या पाठोपाठ हेलन पाताळात जाते.

फाउस्टची आकांक्षा ही सतत अतिरिक्तच राहते. सम्राटाने फाउस्टला एक किनारपट्टी बहाल केलेली असते. तिथे तो बंधारे घालतो आणि सागर हटवून नवी भूमी निर्माण करू लागतो. पण या कामाची प्रगती पुरेशा वेगाने होत नसल्यामुळे पुन्हा मेफिस्टॉफलीझ त्याच्या मदतीला येतो, आणि पुन्हा त्या सर्वांचा परिपाक पापकर्मात होतो. व्यापाराऐवजी दर्यावरील लूटमारीला सुरुवात होते. फाउस्टला अस्वस्थ करणाऱ्या राजवाड्याजवळील दोन वृद्ध माणसांचे पुनर्वसन करण्याऐवजी मेफिस्टॉफलीझ त्यांचा खून करतो. या घटनेमुळे फाउस्ट संशयचित्त होतो. भविष्यामध्ये जादूची मदत न घेण्याचा तो निर्णय घेतो आणि यानंतर तो मेफिस्टॉफलीझला कधीही पाचारण करीत नाही. तथापि त्याचा अंतकाळ आता समीप आलेला असतो, आणि तरीही त्याच्या योजना सुरूच असतात.

शेवटच्या प्रसंगात फाउस्ट चैतन्यशक्तीच्या प्रदेशात प्रवेश करताना दिसतो. आजपर्यंत जो नेहमी इतक्या आत्मविश्वासात वावरला त्याला आता निशब्द बनावे लागते. देवदूत त्याला उचलून वर नेतात; दूर अंतरावर येशूख्रिस्ताची आई सेंट मेरी दृग्गोचर होऊ लागते. मार्गरिटाला तिने क्षमा करावी म्हणून अनेक जोगिणी तिची प्रार्थना करतात, आणि मार्गरिटा मात्र फाउस्टसाठी प्रार्थना करीत असते. अशाप्रकारे फाउस्ट आता एका वेगळ्या लोकामध्ये प्रवेश करतो; जिथे एक दुसऱ्यासाठी प्रार्थना करतो, जिथे एकाची मदत दुसऱ्याला असते. ज्या अहंभावाने आणि विकारवशतेने फाउस्टच्या जीवनावर अधिसत्ता चालवलेली असते त्यांचा आता मागमूसही शिल्लक नसतो. इथे आता त्याला शिकायचे असते, बदलायचे असते. जो स्वतःमध्ये बदल घडवतो आणि परमेश्वरावर प्रेम करतो, त्याला परमेश्वरी प्रेम आपल्याइतक्या उंच पातळीवर नेऊन सोडते. नाटकाच्या शेवटच्या प्रसंगामध्ये पूर्वी कधीही न पाहिलेल्या अशा विश्वाशी फाउस्टचा परिचय घडतो. इथे होणारा विकास संथ आणि शांत असतो. इथे एक दुसऱ्याला साहाय्य करतो, इथे आदर आणि भक्ती यांना स्वतःचे स्थान लाभते. त्याच्या पूर्वीच्या ऐहिक जीवनामध्ये या सर्व गोष्टींवर त्याच्या त्या अस्वस्थतेचेच दडपण पडलेले असते.

फाउस्टच्या पहिल्या व दुसऱ्या भागांचा अर्थवेध

फाउस्ट हा आपल्या धडपडीमध्ये स्वतःशी एकनिष्ठ असतो. पहिल्या भागामध्ये दिसतो तो ध्यास–ती धडपड–ही एका जिज्ञासूची व एका प्रेमिकाची आहे; दुसऱ्या भागामध्ये दिसतो तो ध्यास प्राचीन ग्रीक सौंदर्य आत्मसात करू पाहणाऱ्या व सत्ता गाजवू इच्छिणाऱ्या व्यक्तीचा आहे.

या सबंध नाटकामध्ये फाउस्ट एखाद्या महान एकाकी माणसासारखा वाटतो. माणसाला जे जे अनुभवणे शक्य आहे ते ते सर्व त्याला अनुभवायचे आहे असे तो स्वतःच म्हणताना दिसतो :

"पण माझ्या या अंतरात्म्यात मी आहे भोगणार, जाणणार
जे जे असेल लिहून ठेवलेले माणसाच्या प्राक्तनात इथे इहलोकी !
मी आहे चढणार शिखरावर आणि वाळणार उडी गर्तेमध्ये,
रचणार रास माझ्या छातीवर माणसांच्या दुःखाची आणि बेहोषीची."

फाउस्टला मानवी जीवनातील सर्व व्यथा आणि निर्भरता यांचा स्वीकार करायचा असतो, सर्व व्यथांचासुद्धा. तरीपण कोणतीही दुःखदायक गोष्ट जेव्हा त्याच्याजवळ येऊ लागते तेव्हा मात्र तिचा तो स्वीकार करीत नाही, तर तिला दूर ढकलतो. त्याला फार फार हवे असते आणि आपली उद्दिष्टे ऐहिक साधनांनी प्राप्त करून घेणे त्याला शक्य होत नाही.

परमेश्वराच्या अनुज्ञेनेच मेफिस्टॉफलीझ हा फाउस्टचा सहचर बनतो. सबंध नाटकातील त्याचे हे स्थान 'स्वर्गामधील प्रारंभकानेच' निश्चित केलेले आहे.

एक विनाशक शक्ती असलेल्या, पुण्याला शह देणाऱ्या किंवा आलंकारिक भाषेत अंधारमय अशा पापाच्या परिवारातच त्याची गणना होते. अस्तित्वाच्या विरुद्ध झगडणारी अशी ती एक शक्ती आहे, पण हा झगडा ती मानवी अस्तित्वाच्या पातळीवरच करीत असते. दिवस आणि रात्र, प्रकाश आणि अंधार यांच्या सीमारेषेवर माणूस उभा असतो. म्हणूनच पाप–आणि त्याच्याच बरोबर मेफिस्टॉफलीझ–ही परमेश्वराच्या आधिपत्याखाली व मार्गदर्शनाखाली चालणाऱ्या या विश्वामध्ये एक आवश्यक शक्ती आहे. मेफिस्टॉफलीझने घडवून आणलेले मार्गरिटाच्या संबंधातील फाउस्टचे पाप हे तिच्या नाशाला कारणीभूत होते, पण त्याचबरोबर, ते तिच्या आंतरिक शुद्धीकरणाचे व परमेश्वरी कृपाप्रसादाचेही कारण असते.

गटे हा त्या दोघांपैकी कोणाशीही सहमत नसतो. मेफिस्टॉफलीझला फाउस्टचा ध्यास समजू शकत नाही; उलटपक्षी फाउस्टलाही मेफिस्टॉफलीझने सूचित केलेल्या मानवी स्वभावाच्या मर्यादांचे आकलन झालेले नसते. मेफिस्टॉफलीझ जे परमेश्वर, सैतान व मानव यांच्याविषयी म्हणतो ते बरोबर असते.

"तुला पाहिजे आमच्यापैकी कुणीतरी पटवायला : हे सर्व
आहे निर्मिलेले फक्त एका परमेश्वरासाठीच !
तिथे चिरंतन अशा प्रकाशात ती वठवतो आपली भूमिका !
बाहेरच्या अंधारात आपणाला आहे हद्दपार केलेले :
तुमच्याच आयुष्यांना पडते मर्यादा दिवसाची, रात्रीची.

मानवाचे मर्यादित स्थान फाउस्टच्या लक्षात येत नाही. सैतानाशी सहजीवन करणाऱ्या या असामान्य फाउस्टची व्यक्तिरेखा आणि साधेसुधे सामान्य जीवन जगणाऱ्या नाटकातील इतर लोकांच्या व्यक्तिरेखा यांमध्ये एक प्रकारचा विरोध आहे. त्या लोकांचे मर्यादित जीवन, त्यांचे व्यक्तित्व आणि त्यांचे विचार यांचे एक सुस्पष्ट चित्र त्यांतील विविध बारकाव्यांसह नाटकामध्ये रंगवलेले आहे. त्या सर्व लोकांच्या पार्श्वभूमीवर मार्गारिटाचे स्वभावचित्र हे विशेष उठून दिसते; पुष्कळ बाबतीत ती इतर मुलींसारखीच एक मुलगी असते, पण तिच्यातील धर्मभावनेमुळे तिच्यात काहीतरी अधिक जाणवते. फाउस्टविषयी तिला वाटणारे प्रेम हे प्रभावी असले तरी परमेश्वरी धर्माविषयी तिला वाटणारा आदर हा शेवटी अधिक प्रभावी ठरतो. तुरुंगाच्या प्रवेशामध्ये ती, फाउस्ट आणि मेफिस्टॉफलीस यांच्यापासून दूर सरते आणि "परमेश्वरी न्यायाला" शरण जाते, आणि म्हणूनच मानवनिर्मिती न्यायासनालाही. कर्तव्यपालन कठीण असूनही शेवटी ती अंतःकरणात स्वतःला जाणवलेल्या कर्तव्यपालनाचीच निवड करते. तिचे हे कर्म प्रत्यक्ष धर्माशीच निगडित असते. स्वर्लोकामध्ये घडून येणाऱ्या नाटकाच्या शेवटच्या प्रवेशामध्ये मार्गारिटा वेगळ्या स्वरूपात पुन्हा का प्रकट होते याचे स्पष्टीकरण या गोष्टीमुळे मिळू शकते.

सुरुवातीला फाउस्ट हा एक मोठा माणूस भासतो आणि मार्गारिटा ही त्याच्याकडे आदराने पाहत असते. सरतेशेवटी मात्र तोच तिच्याकडे आदराने पाहात असतो; कारण आता ती त्याच्याहून उन्नत अवस्थेत असते. सुरुवातीला दैवी गोष्टीविषयी तिच्यापेक्षा त्यालाच जास्ती कळते असे वाटते; पण शेवटी असे आढळून येते की त्या गोष्टीविषयी तिलाच जास्त कळते आणि शिवाय त्या ज्ञानाचा उपयोग कसा करावा हेही फाउस्टपेक्षा तिलाच अधिक चांगले ठाऊक असते. परस्परांना पूरक होणारी तत्त्वे या अर्थाने दोघेही परस्पराशी संबंधित असतात: पुरुष व स्त्री, जाणीव व नेणीव, एकाकी व समाजसंबद्ध, संस्काराधिष्ठित व बालसदृश, सैतानाचा सोबती व देवभोळी अबला.

फाउस्टवर प्रत्यक्ष भाष्य असे गटेने कधीच लिहिले नव्हते; पण त्याच्या मनामध्ये कोणता अर्थ अभिप्रेत होता हे दाखविणारे अनेक उल्लेख त्याने केलेले आहेत. शूबार्थ नावाच्या आपल्या तरुण चाहत्याला तो १८२० साली लिहितो, "सत्य आणि कल्पित अशा दोन्ही प्रकारच्या चुकांमधून फाउस्टला आपली वाट काढीत जावे लागते." १८२६ साली तो फाउस्टचा उल्लेख, "सामान्य ऐहिक जीवनाच्या मर्यादांनी अस्वस्थ व अधीर झालेला, सर्वश्रेष्ठ ज्ञान आणि सर्वोत्तम सौंदर्य यांच्या प्राप्तीनेही आपली जीवनाकांक्षा तृप्त करू न शकणारा, आणि सर्व दिशांमध्ये परिभ्रमण करूनही पुन्हा अधिक असमाधानी अवस्थेत परत येणारा असा एक तळमळणारा आत्मा" असा करतो; आणि याला तो पुढे पुस्ती जोडतो ती अशी: "हा

दृष्टिकोन अर्वाचीन दृष्टिकोनाशी जुळणारा आहे." गटेची अर्वाचीन संस्कृतीवरील टीकाही या शब्दांमध्ये प्रकट होते; आयुष्याच्या उत्तरार्धात हा विचार तो पुन्हा पुन्हा मांडीत असे.

ज्यातील प्रवेश सामान्य माणसांच्या दैनंदिन जीवनापासून तो तहत स्वर्गलोकापर्यंत पसरलेले आहेत असे हे नाटक वृत्तामध्ये लिहिलेले आहे. ती वृत्ते अनेक प्रकारची आहेत आणि प्रत्यक्ष त्यांच्या ध्वनीमधूनही त्या विशिष्ट प्रसंगांमधील भावशक्ती प्रकट करू शकणारी आहेत. म्हणूनच एखादे भाषांतर हे ह्या ध्वनिचित्रांतील विविधता एका विशिष्ट मर्यादेपर्यंतच प्रकट करू शकेल. भाषांतरकर्त्याच्या दृष्टीने फाउस्टमधील आशय हाच आधी पुरेसा कठीण असतो, आणि त्याची अभिव्यक्ती ही त्याहूनही कठीण.

गटेच्या इतर कलाकृतींशी फाउस्टचा संबंध

मानवी स्वभावाच्या मर्यादा, संन्यासवृत्तीची आवश्यकता, नैतिक दंडक, धर्माचरण, यासारख्या फाउस्टमध्ये स्पर्श केलेल्या पुष्कळ प्रश्नांचा सांगोपांग ऊहापोह गटेच्या इतर ग्रंथांमध्ये केलेला आढळतो. म्हणून या सर्व ग्रंथांमध्ये फाउस्टला काय स्थान आहे याचे दिग्दर्शन करणे हे उपकारक ठरणारे आहे. 'सूत्रे आणि सुविचार' या आपल्या महान् सुभाषित संग्रहामध्ये गटेने मर्यादेची आवश्यकता पुन्हा पुन्हा प्रतिपादलेली आहे : उदाहरणार्थ–"या मर्यादित जगामध्ये अमर्यादाचा ध्यास असणे हेच सर्वात करुणास्पद दृश्य होय." या सुभाषित संग्रहामध्ये जे तात्त्विक स्वरूपांत मांडलेले आहे तेच जिवंत व्यक्तिचित्रांच्या साहाय्याने गटेने आपल्या "विल्हेल्म मिस्टेरची भ्रमंती" या कादंबरीत प्रकट केले आहे. त्यामधील माणसे, एका मर्यादित वर्तुळात काही उपयुक्त गोष्टी करता याव्या म्हणून आपल्या दुसऱ्या अनेक आकांक्षांचा परित्याग करतात. आपण संवेदनेमध्ये, प्रीतीमध्ये आणि कृतीमध्ये स्वतःला मर्यादा घालून घेतली पाहिजे हे त्यांना समजलेले असते; कारण तसे केल्याशिवाय कोणतीही गोष्ट साध्य करणे त्यांना शक्य नसते.

नीती आणि परित्याग याबद्दलच्या विचाराला 'इफिजीनिया' या नाटकामध्येही महत्त्वाचे स्थान आहे. तिथे नाटकाची नायिका ही स्वतःच्या अंतःकरणात जाणवणाऱ्या नैतिक दंडकानुसारच वर्तन करते; कारण दैवी प्रेरणेचे आवाहन तिला त्या ठिकाणीच जागवू शकते. त्या कृतीचा संभाव्य परिपाक कितीही भयानक असला तरी ती चिंता करीत नाही. नैतिक दंडकाचा साक्षात प्रत्यय घेणे आणि सत्कृत्याचा आदर्श मानला जाईल अशा रीतीने आपल्या इवल्याशा दुनियेला आकार देणे ही गोष्ट माणसाला किती कठीण जाते याची जाणीव गटेला आहे. गटेच्या शिक्षणविषयक विचारांची परिणती परमादराच्या कल्पनेमध्ये

होते. निसर्गामध्ये, नैतिक दंडकामध्ये, प्रीतीमध्ये एक प्रकारची दैवी शक्ती वावरत असते हीच गोष्ट माणसाने ओळखायची असते. गटेच्या कवितांमध्ये निसर्गदृश्ये आणि फुले यांच्याकडे पाहाणारा एक नीरव दृष्टिकोन आणि हे सर्व एका दैवी हाताने घडवलेले आहे ही जाणीव या दोन्ही गोष्टी आपल्याला एकदम आढळू शकतात. तिथे माणूस निसर्गातले आपले स्थान अत्यंत आत्मविश्वासाने स्वीकारीत असतो. निसर्ग त्याचे हृदय निरोगी करतो; आणि हे सर्व जग सुसंगती व नियम यांच्यावर आधारलेले आहे हे सर्व सुंदर आहे, ही गोष्ट त्याच्या प्रत्ययाला आणतो.

गटेनंतरच्या वाङ्मयातील फाउस्ट

फाउस्टचे आधुनिक टीकाकार असे म्हणतील की, या नाटकातून काही शिकवावे किंवा उद्बोधन करावे असा मुळी गटेचा हेतूच नव्हता. तरीही एका महान् एकाकी माणसाचे प्रतीक असलेली फाउस्टची व्यक्तिरेखा ही आपल्यावर काही तरी संस्कार केल्याशिवाय रहात नाही. त्यांपैकी पुष्कळ टीकाकारांना फाउस्ट हा त्याच्या अस्वस्थ वृत्तीमुळे पुष्कळ बाबतीत पाश्चात्य माणसांच्या अकारात्मक व विशेषतः नकारात्मक वैशिष्टयाचा प्रतिनिधी वाटतो. त्यामुळे पुष्कळ तत्त्ववेत्तेसुद्धा फाउस्टकडे आकर्षित होतात. ऑस्वल्ड स्पेंग्लर या जर्मन संस्कृतिवेत्त्याच्या मताप्रमाणे आधुनिक युरोपाच्या आत्म्याचा फाउस्ट हा प्रतिनिधी आहे. जॉर्ज आगस्टिन निकोलस द सान्तायना हा अमेरिकन तत्त्वज्ञ 'तीन तत्त्वचिंतनात्मक कविता' या आपल्या ग्रंथामध्ये गटेच्या फाउस्ट ह्या ग्रंथाला अर्वाचीन वैश्विक दृष्टिकोनाचा प्रतिनिधी मानतो; ज्या अर्थाने ल्युक्रेटिअसचा ग्रंथ हा प्राचीन कालखंडाच्या वैश्विक दृष्टिकोनाचा किंवा डान्टेचा ग्रंथ हा मध्ययुगीन वैश्विक दृष्टिकोनाचा प्रतिनिधी, त्या अर्थानेच.

फाउस्टमधील आशयाच्या सघनतेने जसे तत्त्ववेत्यांना आकर्षित केले तसेच त्यातील प्रसंगांच्या सुस्पष्टतेमुळे कोरीव काम करणाऱ्यांनाही हे नाटक आकृतिबद्ध करण्याचा मोह झाला. यूजिन डेलेक्रॉ या फ्रेंच चित्रकाराने कोरलेल्या आकृती विशेष प्रसिद्ध आहेत. चार्लस गोनॉ या फ्रेंच संगीतरचनाकाराने फाउस्टच्या पहिल्या भागाचे एका गीतनाट्यामध्ये रूपांतर केले आणि मार्गेरिटाला केंद्रस्थानी कल्पिल्यामुळे आपल्या रचनेला 'मार्गेरेत' असे नाव ठेवले. नंतर पुढे फाउस्टचा विषय हा इतर लेखकांनीही हाताळला. पॉल व्हलेरि या फ्रेंच कवीने फाउस्टचे रूपांतर एका आधुनिक माणसात केले, आणि त्याला स्वतःच्या आत्मिक सामर्थ्यामध्ये समाधानी ठेवून सैतानाचा विरोधक बनविले. रशियन कवी ॲनॅटोलिज ल्यूनात्शार्स्किज् याने गटेच्या नाटकाच्या दुसऱ्या भागाचा विषय पुढे सुरू ठेवला. समुद्रापासून हस्तगत केलेल्या भूमीचा फाउस्टला झालेला साक्षात्कार हा त्याने समाजवादाच्या दृष्टिकोनातून विशद करून मांडला आणि फाउस्टला कामकरी

समाजामध्ये प्रविष्ट करून एकाच नव्या हेतुगर्भतेची जोड दिली. टॉमस मॅनने ' डॉक्टर फॉस्टस ' या आपल्या कादंबरीमध्ये त्याला एक आधुनिक गायक बनविले. आपल्या कार्यासाठी धडपडत असतानाच एका आजाराचा अटळ परिपाक म्हणून त्याला एक अतिमानवी व सैतानी अवस्था प्राप्त होते, तो पापपुरुषाला शरण जातो; आणि शेवटी त्याचे सर्व आयुष्य विफल होते.

गटे हयात असल्यापासूनच नट सुद्धा फाउस्टकडे आकर्षित झालेले दिसतात; आणि युरोपियन नाट्यगृहांमध्ये त्याचे प्रयोगही वरचेवर होत असतात. पहिल्या भागाचा प्रयोग करणे हे कमी कठीण; तरी पण दुसरा भागसुद्धा दृश्यात्मक परिणामांच्या विपुलतेमुळे रंगमंचावर येत असतो. पण या कलाकृतीचे आकलन होण्याच्या दृष्टीने ती रंगमंचावर पाहणे हे पुरेसे नाही; ती वाचली पाहिजे आणि तिच्यातला प्रत्येक तपशील विचारात घेऊन तिच्यावर चिंतन केले पाहिजे.

पुन्हा पुन्हा तत्ववेत्ते चित्रकार, लेखक, गायक आणि नट हे गटेच्या फाउस्टमध्ये गढून जातात ही गोष्ट त्या ग्रंथाच्या अंगभूत समृद्धतेची द्योतक आहे. या संबंधात भाष्यकारांचा उल्लेखही आम्हांला करावा लागेल. शंभर वर्षांपूर्वीपासूनच गटेच्या फाउस्टची गणना ज्या ग्रंथांवर पुन्हा पुन्हा आणि सर्वेकषपणे भाष्य केले जाते अशा ग्रंथांमध्ये होत आली आहे. याचे कारण हेच की, जे जे त्याच्या कल्पनाशक्तीला आत्मसात करता आले ते ते गटेने अत्यंत मोकळेपणाने चित्रित केले आहे, मग ते त्याच्या वाचकांना समजो वा न समजो. पुष्कळ गोष्टींचे आकलन हे फक्त तत्कालीन सांस्कृतिक व वाङ्मयीन परिस्थितीच्या संदर्भातच शक्य आहे; तर काही गोष्टींचे मध्ययुगीन संदर्भात. म्हणून एखाद्या आधुनिक वाचकाला— जर्मनीत सुद्धा—एखाद्या भाष्याची मदत घेणे सोयीचे वाटते. काही पुस्तकांमध्ये या ग्रंथाचा साकल्याने अर्थवेध घेतलेला आहे, संदर्भग्रंथ म्हणून लिहिलेल्या काही भाष्यांमध्ये तपशीलाचे स्पष्टीकरण केलेले आहे, आणि शेवटी काही पुस्तकांमध्ये या दोन्ही गोष्टी एकत्र आणलेल्या आहेत. यांपैकी ज्यांचा विशेष उल्लेख केला पाहिजे अशा पुस्तकात स्टुअर्ट पी. आटकिन्स या अमेरिकनाच्या, डी. जे. एनराइट या इंग्रजाच्या व अर्न्स्ट ब्यूटलर या जर्मनाच्या ग्रंथांचा अंतर्भाव करावा लागेल. बेयार्ड टेलर, डब्ल्यू. एच. व्हाडेर सिमसेन, जी एम. प्रीस्ट, आणि लुई मॅक्नीस यांच्या भाषांतराची गणना इंग्रजीतील उत्तम भाषांतरांमध्ये केली जाते.

या नाटकाच्या भारतीय भाषांतरासाठी प्रस्तावना लिहिण्याचा हा बहुमान मला देण्यात आला याचे कारण मी स्वतःच गटेच्या फाउस्टवर एक भाष्य लिहिलेले आहे हे असावे. ह्या प्रस्तावनेत फाउस्टचा मी लावीत असलेला अर्थ प्रकट करणे एवढेच मला शक्य आहे. म्हणून, या ठिकाणी एका जर्मनाला घडलेले या ग्रंथाचे दर्शन एवढेच अभिव्यक्त झाले आहे, आणि तेही जवळून घेतलेले. भारतातून घेतलेले—म्हणजेच दुरून घेतलेले—दर्शन हे, ज्यांची उत्तरे मी दिलेली नसतील

किंवा ज्यांचे अस्तित्व कदाचित् मला जाणवलेही नसेल, असे पुष्कळ प्रश्न उपस्थित करू शकेल. कारण पुष्कळदा एखाद्या गोष्टीकडे दुरून पाहणे हे त्या गोष्टीतील अभिनवता व संपूर्णता यांचा वेध घेताना अधिक उपकारक ठरते. भारतीय लेखकासाठी ह्यामुळे एक नवे क्षेत्र खुले होत आहे. जर्मनीमध्येही गेली शंभर वर्षे अभ्यासू आणि लेखक महत्त्वाचे भारतीय ग्रंथ भाषांतरित करण्यामध्ये आणि भारतीय संस्कृतीची कामगिरी व मूल्ये जर्मन लोकांना विशद करून सांगण्यामध्ये गुंतलेले आहेत. निरनिराळ्या लोकांची एकमेकाशी होणारी अशा प्रकारची देवाण घेवाण ही गटेच्या विचारप्रणालीशी सुसंगत आहे. म्हातारपणी पुष्कळ वेळा त्याने ही गोष्ट आपली एक इच्छा व आपले एक कार्य या अर्थाने प्रतिपादली होती; आणि त्याकरिता एक नवा जर्मन शब्दही त्याने निर्माण केला होता : " जागतिक वाङ्मय. "

—एरिक ट्रूंझ

अनुक्रम

फाउस्ट

स म र्प ण

पुन्हा एकदा तुम्ही भिरभिरता माझ्या आसमंतात, आकारांनो, चेहऱ्यांनो,
ज्यांच्यावर खिळले होते माझे अस्वस्थ तरुण डोळे, फार वर्षांपूर्वी.
आणि या वेळी मला येईल का तुम्हाला पकडता, येतील का रंगवता
ते अवशेष, अजूनही निसटणारे, त्या मन्त्रमुग्ध दिवसांमधील ?
तुम्ही येता आहा अधिकाधिक जवळ, बसा अधिकारानुसार;
मला द्या हुकूम, त्या अंधारातून आणि धूसरतेतून वर येता येता;
माझे हृदय येते उचंबळून, जागृत, गीतोत्सुक,
तुमच्या समूहामधून झळाळत येणाऱ्या जादूने भारल्यागत

तुम्ही आणता आहा आपल्या बरोबर सुखी दिवसांचा एक आरसा.
लागतात उठायला जिवलग आभास, आवडत्या आठवणी;
तो स्नेहभाव, ती पहिली प्रीती, येतात माझ्या डोळ्यासमोर
एखाद्या पुरातन पुराणकथेतील प्रतिध्वनीप्रमाणे.
जुन्या व्यथा होतात जागृत; पुन्हा लागतात जखमा वाहायला,
पुन्हा पसरतो जीवनाचा चक्रव्यूह माझ्या नजरेसमोर,
घडवीत दर्शन आवडत्या माणसांचे, ज्यांना दुर्दैवामुळे
लागले जावे आपल्या वाटेने, प्रीतीवाचून, प्रकाशाशिवाय.

ज्यांनी ऐकले होते माझ्या पहिल्यावहिल्या गाण्याचे सूर,
ते नाही आता ऐकू शकणार उशिरा आळवलेले हे गीत :
गेली निघून प्रीतीने भारावलेली ती मंडळी,
आणि संपली त्यांनी वाहिलेली संवादशील आदरांजली.
ही माझी शोकात्म कथावस्तु आहे झंकारत अपरिचित लोकांसाठी,
अपरिचित टाळ्यांसाठी, ज्या मलाहि काळिजा भिववतात.

आणि उरलेले, ज्यांना वाटायचे माझे गीत गोड, मूल्यगर्भ,
ते आता आहेत जगभर विखुरलेले, किंवा नष्ट झालेले.

आता आहे मला वाटू लागली ती उत्कंठा, दीर्घकाळ विसरलेली,
या चैतन्यशक्तींच्या प्रशांत आणि प्रगूढ संकेतस्थळाबद्दल.
मला जाणवतात येणाऱ्या गीताचे थरथरते शब्द,
सुकोमलपणाने वीणेच्या तारांवरून ओघळणाऱ्या लहरींसारखे.
कठीण अंतःकरण लागते द्रवायला विसरते गर्व,
एक शिरशिरी जाते माझ्यामधून, आणि येते मला रडायला.
सगळे मिळवलेले राहाते उभे दूर माझ्यापासून;
सगळे गमावलेले वाटते सत्य, मार्गदर्शक ताऱ्याप्रमाणे.

नाट्यगृहामधील प्रारंभक

[दिग्दर्शक. कवी. विदूषक]

दिग्दर्शक तुम्ही दोघे होतात माझे प्रमुख आधारस्तंभ
बादळी उद्रेकांच्या अनेक प्रसंगांमध्ये; तुम्हीच सांगा,
आज कशाची आहे जरुरी आपल्या नाट्यसृष्टीला,
आणि यशाचा कितपत दिसतो आहे आपणाला योग !
मी निवड केलेल्या त्या माझ्या पूर्वीच्या प्रेक्षकांसाठी
—जे जगतात आणि जगू देतात—मी करणार आहे पुन्हा प्रयत्न.
हे रंगपीठ आहे मजबूत, हा प्रेक्षामंच आहे बांधला गेला,
आणि डोळे उघडून लोक आहेत वाट पाहत बसलेले,
आता एखाद्या वेगळ्या नाट्यकृतीची आहे अपेक्षा :
ते आहेत धरून चाललेले ते असणार काहीतरी असामान्य.
मी ओळखतो माझ्या प्रेक्षकवृंदाला, कशाने त्यांच्यावर परिणाम होतो ते,
पण तरीहि, पाहिजे कबूल केले, माझी आशा दुरावू लागल्याचे;
कारण जरी ते उत्कृष्ट असे क्वचितच पाहत असले
तरी चांगले लोक असतात करीत पुष्कळसे वाचन
त्यांना कसे चाखवणार आपण काहीतरी नेटके व नवीन,
जे नुसते चटकदार नसून, असेल बोधप्रदहि.
कारण, खरे म्हणजे, मला होत असते सर्वात समाधान
गर्दीच्या दर्शनाने, जेव्हा लागते ती ओतायला
दारामागून लाटांनी, या आमच्या निरुंद दरवाजातून,
साडेतीन किंवा चारच्या सुमाराला, सूर्याच्या प्रकाशात,
किंवा ज्या वेळी ती करू लागते रेटारेट व हाणामारी
पिसाट धुसफुशीनंतर, संतप्त चेहऱ्यांनिशी, त्या फाटकाजवळ,
आणि घेते आपली डोकी फोडून, तिकिट मिळवण्यासाठी,
रोटीवाल्याच्या दुकानापुढील बुभुक्षित भिकाऱ्याप्रमाणे.
एवढा दांडगा चमत्कार करण्यासाठी असावी निःसंशय
तुम्ही कवीच असता समर्थ, मग जावा त्या कवीपाशी.

कवी नका काढू माझ्यासमोर शब्द चित्रविचित्र गर्दीविषयी,
जिचे दर्शन असते असह्य, कोणत्याहि प्रतिभेला.
वाचवा माझ्यासारख्याला या उद्रेकापासून, या गलबल्यापासून,
जो आपणाला ओढतो अगतिकपणे ग्राम्य प्रवाहामधे,
त्याच्या ऐवजी मला चला घेऊन स्वर्गाच्या काठावर
जिथे फुलू शकतो कवीचा आनंद, प्रसन्न व प्रशांत,
जिथे घडत असते स्नेहभावनेचे प्रीतीशी मीलन,
सचेतन करणाऱ्या, साफल्य देणाऱ्या, देवसदृश मिश्रणासारखे.
एका क्षणाची ही हिंसकता टाकील ग्रासून
अत्यंत सखोलशा भावनेच्या स्पंदनाला,
गुणगुणणाऱ्या ओठावरील थरथरणाऱ्या विचारांना,
कवीच्या दर्यावरील नाजूक मालमसाल्याला.
कारण, या जगामध्ये पूर्णत्वाचा साक्षात्कार घडविण्यासाठी
कलेला लागत असतात अनेक वर्षे सच्च्या साधनेची.
नेत्रदीपक वाटणारे जाते विरून, सकाळच्या दवासारखे,
सत्य तेवढेच राहते टिकून, अजून न जमलेल्या अनेक युगांसाठी.

विदूषक मी सांगतो, ते न जन्मलेले युग ठेवून दे तू आपल्यापाशीच,
किंवा, आपणाला जर त्याबद्दल बोलायचेच असेल तर,
सांग कुणी करावे आपल्या सध्याच्या युगाचे मनोरंजन,
जे मागते आपली करमणूक आणि नाही राहणार त्याच्याशिवाय.
या सुरेख हाडामांसाच्या तरुण गृहस्थाची
या इथे करमणूक करणे हे नाही तुच्छ समजण्यासारखे.
ज्या माणसाजवळ ते करण्याची असते सहजशक्ती
तो नाही देत लोकाभिरुचीला दोष, तो राहतो ऐषआरामामध्ये.
ज्याच्या कलेमुळे चेतावले जातात माणसांचे विचार,
तो खूष असतो वर वळलेल्या चेहऱ्यांचा दर्या पाहण्यात.
मग, मित्रहो, धरा धैर्य, दाखवा त्यांना आपला सिद्धहस्त;
कल्पनाशक्तीला मारू दे भरारी आपल्या सगळ्या भव्य सौंदर्यनिधी;
भरा खच्चून सारा शहाणपणा, सारी कोमलता आणि भावोत्कटता,
पण एक मात्र, चांगल्या विदुषकीवर नका टाकू कधीहि बहिष्कार.

दिग्दर्शक या सर्वाहूनहि, तुमचे हे नाटक असू दे कृतिप्रधान भरपूर प्रमाणात :
लोकांना हवी असते एक दृश्य-वस्तू, मग चला करा त्यांचे समाधान.

त्यात पाहिजे पुष्कळसे घडले, अगदी प्रत्यक्ष त्यांच्या डोळ्यासमोर,
ज्या योगाने सगळा प्रेक्षकवर्ग तोंड वासून बसेल पाहात.
ज्याने तुम्हाला मिळेल निश्चिती लोकप्रिय पारितोषिकाची,
तुमचे भाग्य येईल उदयाला, तिकडे टाळ्यांचा कडकडाट होतानाच,
तुम्हाला लागेल भरगच्च मसाला गर्दीवरती पकड ठेवण्यासाठी;
मग प्रत्येक भल्यामाणसाला सापडते काहीतरी स्वतःला आवडण्यासारखे,
पुष्कळ दिले की अनेक खूष : मग टाळ्यांचा होतो गजर,
आणि प्रत्येक जण घरी जाताना म्हणतो आहे प्रयोग प्रभावी.
आरामसे खिलवलेली, लहरीनुसार हलकी फुलकी,
अशी मटण-मिसळ; मिश्रणाला असते सगळे महत्त्व;
तुम्ही त्यांना एकाच प्रयोगात द्या डझन प्रयोग.
तुमच्या त्या एकात्म संबंधाला फक्त लाभेल अल्पजीवी आयुष्य :
लोकांची अभिरुची त्याचा टाकील करून चक्काचूर.

कवी पण तुम्हाला दिसत नाही का असली निर्मिती किती वाईट असते ते,
आणि कलावंताला असला उपदेश किती खटकतो ते !
प्रत्येक डोकेबाज क्षुद्र मूर्खाने घातलेला गोंधळ
हा एकच तुम्ही मानता आहा कलात्मक दंडक.

दिग्दर्शक असल्या अधिक्षेपाने मी नाही होत मुळीच विचलित.
आणि मूर्खाविषयी तू म्हणालास त्याबद्दल बोलायचे तर
एक लक्षात ठेव, तुझी गाठ आहे गाठाळ लाकडाशी,
तेव्हा तुला पाहिजेत निवडली योग्य तीच हत्यारे.
आणि कोणासाठी आपण लिहितो आहो याचाही विचार कर !
काही येत असतात त्यांना रात्र कंटाळवाणी वाटते म्हणून,
त्यांना आपल्यात दिसतात फक्त मुखवटे व माकडचेष्टा.
काही मिळवीत असतात कुतूहलाचे उत्तेजन;
काही येत असतात अतिरिक्त भोजनानंतर,
किंवा, त्याहूनही वाईट म्हणजे वृत्तपत्रे वाचून.
बायका आमच्यासाठी मरवतात आपल्या फॅशनचे प्रदर्शन
आणि करतात आपापली कामे पगार न घेता.
काय रहाणार तू स्वप्ने पाहत काव्याच्या शिखरावर
की हे नाटक पैसा ओढणार या विवंचनेत !
जर असेल सत्यच शोधायचे तर आश्रयदात्यांचे कर निरीक्षण :
त्यातील एक जात असते संवेदनाशून्य, आणि दुसरे असते अपरिपक्व;

नाटक संपल्यानंतर, एकाला हवे असतात फक्त पत्ते कुटायला,
दुसऱ्याला हवी असते पोरीच्या छातीवरील धुंदावलेली रात्र.
काय यांच्या साठी तू राबवणार आपली स्वर्गपरायणता
किंवा स्फूर्तीदेवतांचे किटवणार कान आपल्या आवाहनांनी ?
मी सांगतो तुला, आपले नाटक भर ठेचठेचून,
आणि हे केलेस तर, नाही होणार तुझी फसगत.
लिही लोकांकरता फक्त त्यांना संभ्रमात टाकण्यासाठी :
त्यांचे समाधान करणे हे असते केव्हाही निरर्थकच.
का, कशाने बरे झालास अस्वस्थ ? आनंदाने की व्यथेने ?

कवी हो चालता, आणि आपल्यासाठी शोध एखादा दुसरा गुलाम.
कोणता कवी राहील तृप्त असल्या व्यथेमध्ये
स्वतःच्या ईश्वरदत्त कवित्वशक्तीचा अधःपात होत असताना ?
काय माणसाच्या सर्वश्रेष्ठ सामर्थ्याची
करावी उधळमाधळ या तुझ्या क्षणजीवी संकल्पासाठी ?
कुठून प्राप्त होते कवीला सनद, प्रत्येक हृदयाला आवाहन करणारी,
प्रत्यक्ष निसर्गतत्त्वावर अधिसत्ता चालवणारी ?
दुसऱ्या कुठून, या टोक्यापासूनच, आत्म्यामध्ये प्रथम सुरू होणाऱ्या,
विश्वासघातकी जगाचा स्वरमेळ साधण्यासाठी;
जेव्हा निसर्गशक्तीचा तो धागा, तो न संपणारा असा तंतू,
चरकीवरती असतो गुंडाळला जात अगदी भावशून्यपणे,
जेव्हा मीलनानुकूल स्वभाव नसलेल्या असंबद्ध वस्तू
निर्मितात आवाज, त्रस्त, अस्वस्थ आणि कर्णकर्कश,
तेव्हा कोण देतो श्रुतिमधुर आणि तालबद्ध रचना,
नियमबद्ध लय, आत्मा उत्तेजित वा निवांत करण्यासाठी ?
कोण उभारतो त्रुटित तुकड्यांमधून अप्रतिम संगीत,
विधिप्रवण, विश्वात्मक, आणि एकसंध ?
कोण होतो स्वार भावनेच्या पूरावर, तिच्या उत्कटावस्थेत ?
कोण रंगवतो संध्येचा रक्तिमा, मधुर धीरगंभीर ?
कोण उधळतो वासंतिक आनंदाच्या आवडत्या माला
आपल्या प्रियतमेच्या पावलाखालील पाकळ्यांच्या वाटेवर ?
कोण करीत असतो वीरांच्या दारावरील तोरणांची गुंफण ?
कोण देऊ शकतो क्षुद्र पानांनाही बोलक्या बिभा ?
कोण देऊ शकतो ऑलिंपसला विश्वास आणि देवतांना एकता ?

हे करू शकते कवीमध्ये प्रकटलेले मानवी सामर्थ्य.

विदूषक मग ठीक, त्या आपल्या अद्‌भुत प्रतिभेचा करा उपयोग,
आणि एकदम करा सुरुवात आपल्या कामाला.
तुम्ही माना ते एखाद्या प्रेमप्रकरणाप्रमाणे.
तुमची भेट होते, तुम्ही भारावून जाता, आणि तिथेच राहता रेंगाळत,
मग हळूहळू तुम्हाला वाटते मंत्रमुग्ध झाल्यासारखे.
प्रथम असतो तुमचा भाग्यकाळ, मग लागतात अडथळे यायला;
सुरुवातीला असता हवेवर चालत, आणि सरतेशेवटी कोसळता कर्दमात;
आणि अशाप्रकारे तुम्हाला दिसते तुमची प्रणयकथा पुरी झालेली
आपले नाटक रंजक करण्यासाठी हवा असतो असलाच मालमसाला;
घाला उडी प्रत्यक्ष जीवनामध्ये, द्या त्यांना मानवी नाट्य.
कृती असते तशी सर्वसामान्यच, पण तसेच नसते संवेदन;
म्हणून ते पकडा, मग तुमचे कथानक ठरेल चित्तथरारक.
घाला प्रसंग रंगीबेरंगी, जरी आशय अंधुक बनला तरी;
प्रमादांची एक साखळी, आणि सत्याची एक झलक,
हे वाटते सगळ्यांना उत्साहवर्धक; हेच ते तुमचे पेय
सगळ्या जगाला उत्तेजित करणारे, आमच्यामधून आरपार पाहणारे;
मग यौवनाचा सगळा फुलोरा जमतो तुमच्या भोवती;
मग येतात सुकोमल अंतःकरणे या भोजनासाठी;
ही येतात नाटकातील गूढार्थ आत्मसात करण्यासाठी;
ती करतात नाटकातील विषण्णतेचे आकंठ प्राशन;
एकाला वाटते हे परिणामकारक, दुसऱ्याला वाटते ते यथायोग्य;
प्रत्येकाला आवडते नाटक आपल्या बरोबर आणलेल्या कारणासाठी.
तरुण होतात लगोलग आधीन सुखाच्या वा शोकाच्या,
जातात भुलून शैलीच्या दिमाखाने, वरवरच्या चमत्कृतींनी.
विकसित मनाची पकड घेताना तुमचे होतील टाके ढिले;
तुम्हाला लाभतील सहज धन्यवाद विकासोत्सुक अंतःकरणाकडून.

कवी द्या आणून मला ते स्वप्नाळू दिवस,
जेव्हा मी होतो अजून घडत घडत,
जेव्हा गीते होती माझ्यात उंचबळून येत
आणि सुरेख कल्पना होत्या गर्दी करीत.
सारी धूसर दुनिया होती माझ्यापुढे;
होते प्रत्येक कळीत नवे नवे आश्वासन,

आणि प्रत्येक दरी मलाच सुखविण्यासाठी,
होती मोहोरून बात मी गात असताना.
काहीहि जवळ नव्हते, तरीहि गरीब नव्हतो;
सत्याचा अंकुश होता, कल्पनेचे वेड होते.
द्या मला ते दिवस हृदयामधल्या बंडाचे,
दुःखाला स्पर्श करणाऱ्या आनंदाच्या उत्कटतेचे,
द्वेषामधील शक्तीचे, प्रेमामधील अशांतीचे—
द्या, द्या पुन्हा मला फिरून माझे तारुण्य !

विदूषक तुझ्या तारुण्याची, माझ्या मित्रा, तुला जरूर असते
युद्धाच्या प्रसंगी शत्रूच्या हल्ल्याला तोंड देत असताना,
किंवा एखाद्या सुंदर पोरीच्या उत्कट आलिंगनाकरता,
जी तुझ्या गळ्यात टाकते हात शृंगारसुखासाठी;
किंवा तारुण्य तुला देऊ शकेल शर्यतीतली कीर्ती,
दुरून दिसणारे ते लक्ष्य, ती विजयमाला.
किंवा तारुण्यामुळे शकशील नाचू कदाचित उजाडेपर्यंत,
राहशील उमदा उगवत्या सूर्याचे अभीष्ट चिंतन करण्यासाठी.
पण सुपरिचित अशा तारा कौशल्याने छेडण्यासाठी,
योजनेबरहुकूम प्रत्येक हृदय धडधडू लावण्यासाठी,
आणि वाटेल तेव्हा ठरवलेले लक्ष्य आत्मसात करण्यासाठी,
अहो महाशय, असते जरूरी परिपक्व पारंगतांची.
तुला जमल्यास अधिकच प्रशंसनीय—नको राग मानू ;
आपले म्हातारपण नसते करीत बाल्यपणाची पुनरावृत्ती;
म्हातारपण असते फक्त दाखवीत आपण किती बालिश राहतो ते.

दिग्दर्शक शब्द पुरे झाले, कारण स्पष्टच बोलायचे म्हणजे,
मला पाहिजे आहे सुरुवात व्हायला काही कामाची.
ही सगळी सुंदर भाषेची फेकाफेक करण्याऐवजी
आपण करू शकतो दुसरे काहीतरी अधिक उपयुक्त.
कशाला बोलायचे काव्यात्म मनःस्थितीविषयी, दैवी स्फूर्तीविषयी,
जी नाही होत कधीहि उपलब्ध विश्रामशून्य माणसांना !
जर तुम्हाला पाहिजे असेल कवींची प्रतिष्ठा
तर महाशय गाजवा माझ्यासाठी काव्यावर हुकमत !
तुम्हाला समजल्या आहेत आमच्या गरजा; आम्हाला पाहिजे आहे
एक मद्य ज्यात काहीतरी दमदार असेल असे.

सृजनाची प्रक्रिया आहे वाट पहात, मग उठा, करा सुरुवात!
जे नाही आज होऊ शकणार ते राहील उद्याहि न झालेले.
नका फुकट घालवू एकहि दिवस, लागा तयारीला,
आणि पकडा ही संधी निर्धारशील विश्वासाने,
उठवा आधी पुरेपूर फायदा आलेल्या प्रसंगाचा,
कारण या प्रकरणात एकदा तुमचे हात गुंतल्यावर
तुम्ही चालू ठेवाल आपला उद्योग, गत नसल्यामुळे.
जर्मन रंगभूमीची असते परवानगी प्रत्येक माणसाला झेपेल ते करायची;
मग माझीहि नका पर्वा करू, या आपल्या खास दिनविशेषी,
नेपथ्य ठरवताना, उपकरणे वापरताना.
वापरा सजावट तुम्हाला वाटेल ती, सूर्य नि चंद्र.
आणि इतर ग्रहांची करा उधळण सढळ हाताने:
द्या त्यांना बेहोष करणारा ताऱ्यांचा प्रकाश,
पाणी व कडेकपारी, कल्पनारम्य मालमसाला,
पशू व पक्षी, आम्हाला नाही होणार कशाचाहि अतिरेक;
अशा प्रकारे या आमच्या निरुंद रंगपीठावर दाखवा उलगडून
संपूर्ण सृष्टीचा गतिशील देखावा, विराट व विशाल,
आणि जाणीवपूर्वक करा प्रवास मनाच्या वेगाने
स्वर्गापासून सुरू होणारा, पृथ्वीमधून जाणारा, नरकापर्यंत पोहोचणारा.

स्वर्गामधील प्रारंभ

[परमेश्वर, स्वर्गातील देवदूत आणि नंतर मेफिस्टॉफलीज. तीन प्रधान देवदूत पुढे सरतात.]

रॅफेएल हा सूर्यतारा, पूर्वीइतकाच मधुघोष करणारा,
आहे चाललेला, त्या आपल्या पूर्वनिश्चित मार्गाने,
आणि मेघगर्जनेचे आहे अवगुंठण त्याच्या मार्गाला,
सहोदर ग्रहगोल होताहेत सहभागी सवत्या गीतामध्ये.
अशा दृश्यामुळे लाभते देवदूतांना नवीन सामर्थ्य
जरी कुणालाच नाही उलगडत अनंताचे कोडे,
आणि जणू काय आदिप्रकाशात दिसावी तितकीच रमणीय
ही पृथ्वीवरची भव्य निर्मिती पडते दृष्टीला.

गॅब्रिअल वेगाने, वेगाने, कल्पनातीत वेगाने,
पृथ्वीचे ऐश्वर्य फिरते स्वतःभोवती,
आणि स्वर्गीय तेजाची दृश्ये
असतात पालटत गहन रात्रीच्या भयानकतेबरोबर;
फेसाळ सामर्थ्यानिशी दर्याचा महापूर
घुसळतो कड्यांना थरारणाऱ्या पायथ्याशी.
आणि ग्रहांच्या कक्षेमध्ये फेकलेले
पर्वत व कडे होतात परिभ्रमणशील.

मायकेल वादळे संघर्षतात जोमाने घुमणारी
समुद्रापासून जमिनीपर्यंत, जमिनीपासून समुद्रापर्यंत,
बनवितात साखळी प्रक्षुब्ध सामर्थ्यांची
आपल्या स्वतःच्या प्रभंजनी भव्यतेमधून
तेजस्वी संहाराची ही अग्निशिखा
आता उजळते आहे वज्राच्या मार्गी.
पण देवदूत, हे परमेश्वरा, अनन्यभक्तीने
करतात लालन तुझ्या दिवसाच्या मधुर गतीचे.

तिघे — या दृश्यामुळे नवीन सामर्थ्य लाभते देवदूतांना
तुझ्या अनंतत्वाने स्तिमित झालेल्या;
आणि आदिप्रकाशात जशी असावी तशी सुंदर
तुझी भव्योदात्त ही निर्मिती दिसते पुनर्नूतन.

मेफिस्टॉफलीस — हे परमेश्वरा, तू आला आहेस पुन्हा आमच्यामध्ये
आमचे कसे काय चालले आहे ते विचारण्यासाठी,
आणि माझ्यावर तू अजूनपर्यंत दाखविलास कृपालोभ,
म्हणून मला वाटले आपणही व्हावे घरकामात सामील.
मला क्षमा कर, माझी शैली गावंढळ वाटली तर,
इथे उच्चस्थानी माझे वक्तृत्व वाटेल तिरस्करणीय,
माझ्या भावोत्कटतेमुळे तुला येईल फक्त हसायला,
जर हास्यावर तू नसशील बहिष्कार टाकलेला.
आहेत ती तुझी सूर्य नि विश्व माझ्या टप्प्यापलीकडील,
माझ्या दृष्टीला फक्त दिसते मानवाची दुर्दशा.
अजून आहे इवलासा पृथ्वीदेव तितकाच बावळट
जितका होता तो पहिल्या दिवशी, आदिप्रकाश असताना.
गरीब बिचारा, त्याचे जीवन झाले असते कमी त्रासाचे
ती तुझी स्वर्गीय प्रकाशाची देणगी नसती तर;
तो तिला म्हणतो विचारशक्ती, आणि वापरतो
त्या दैवी प्रकाशाला पशूंना पशुतेत मागे टाकण्यासाठी.
आपल्याविषयी आदर बाळगूनही, मला तो वाटतो
एक प्रकारचा टोळ, त्याच जागेभोवती टुणटुण फिरणारा,
उडत्या उड्या मारणारा लंबाचवड्या पायावर,
आणि नंतर गवतात कोसळताना तेच पुराणे गाणे गाणारा,
पण गवतामध्ये विश्रांती घेण्यात संतोष नसल्यामुळे
हा फिरत असतो आपले नाक घाणीमध्ये खुपसीत.

परमेश्वर — नाही तुझ्याजवळ याहून दुसरे मला सांगण्यासारखे ?
काय तुला असते निकड फक्त तक्रारी करण्याची ?
नाही का होत तुझे समाधान पृथ्वीवरच्या कोणत्याही गोष्टीने ?

मेफिस्टॉफलीस — नाही, परमेश्वरा, मी सांगतो आहे सत्य परिस्थिती.
ती वाईट आहे, माणसे आहेत त्यांना दिवसा रात्रीच्या पापात बुडालेली.
बिचारे पामर, त्यांना छळणे मलासुद्धा वाटते कंटाळवाणे.

परमेश्वर — तू ओळखतोस का कुणा एका फाउस्टला ?

मेफिस्टॉफलीझ — तो पंडित का ?

परमेश्वर — होय, तोच, माझा सेवक.

मेफिस्टॉफलीझ — परमेश्वरा, अगदी बरोबर, एक चमत्कारिक निष्ठावंत सेवक :
तो स्वतःला ठेवतो दूर पार्थिव खाद्यापासून,
त्याचा भावज्वर त्याला पिटाळतो उदात्त पातळीवर.
जे थोडेफार त्यालाही उमगते अशा वेडामुळे
तो हपापतो स्वर्गामधील उत्तमोत्तम ताऱ्यासाठी,
पृथ्वीकडून करतो अपेक्षा फक्त निवडकशा आनंदाची, कलेची,
आणि दूरचे व जवळचे, जे आनंद देते, जे वधून घेते,
ते अजूनही ठरते असमर्थ त्याच्या अस्वस्थ हृदयाचे समाधान करायला

परमेश्वर — जरी सध्या तो करीत आहे माझी सेवा भ्रांत मार्गांनी
तरी माझा प्रकाश लौकरच त्याला दाखवील मार्ग त्या निराशेमधून.
झाड वाढवणाऱ्याला नसतात का दिसत पानांच्या दिवसातच
आपल्या रोपट्यांची, फुलांची आणि फळांची वर्षे ?

मेफिस्टॉफलीझ — कशाची लावशील तू पैज त्याला न गमावण्यावर ?
मात्र मी त्याला मला वाटेल त्या मार्गाला नेल्याबद्दल
तुझी केव्हाही तक्रार नसेल असे समजूनच.

परमेश्वर — तुला आहे सवलत जसे आवडेल तसे करण्याची,
जोपर्यंत पृथ्वीवर असेल त्याचे मर्त्य वसतिस्थान.
कारण राहिले पाहिजे मानवाने प्रयत्नशील आणि प्रयत्न करताना
पाहिजे चुकलेही.

मेफिस्टॉफलीझ — मी मानतो त्याबद्दल आभार, कारण, परमेश्वरा,
स्पष्टच बोलायचे तर मृताशी एकसारखी गाठ असणे हे वाटते किळसवाणे;
मला वाटतो रसरशीत गाल एखाद्या मेजवानीसारखा.
मला नाही वाटत काही स्वारस्य माझ्या घरातल्या त्या प्रेतामध्ये :
उंदराबरोबर खेळणाऱ्या मांजरासारखे माझ्यामध्येही आहे काही तरी.

परमेश्वर — मग ठीक आहे, तुला आहे दिलेली शक्ती
जी वळवू शकेल या आत्म्याचे स्खलन सन्मार्गापासून
आणि ओढू शकेल जी तुझ्याबरोबर त्यालाही खाली

जर तू त्याला अगदी पूर्णपणे शकलास वळवू, आपल्या सामर्थ्यानुसार
पण शरमिंदासा राहशील उभा कबुलीजबाबासाठी पाचारण केल्यावर :
चांगला मनुष्य आपल्या अंधारमय भ्रांत परिक्रमणेतही
नाही विसरणार सदाचरणांचा आपला मार्ग.

मेफिस्टॉफलीझ मग ठरले तर, माझे उद्दिष्ट आहे सहजसाध्य,
आणि मला नाही तिळमात्र संशय माझ्या यशाबद्दल.
पण जर का मी जिंकलो, तर मान्य करा माझी महत्ता,
काढा माझी यथायोग्य मिरवणूक, तुताऱ्यांसहवर्तमान.
मग त्याने पाहिजे चाटायला माती मनःपूर्वक
त्या सुप्रसिद्ध माझ्या चुलतभावाप्रमाणे, त्या सापाप्रमाणे.

परमेश्वर त्या संबंधातसुद्धा आहे तुझ्यापाशी एक अभिवचन.
कधीही नाही लाभला तुझ्या बांधवांना माझा द्वेष किंवा तिरस्कार :
नकाराच्या यच्चयावत चैतन्यशक्तींपैकी
या बदमाषाचेच वाटते ओझे कमीतकमी त्रासाचे.
मानवाची प्रयत्नशीलता जाते घसरून विहित पातळीखाली,
आणि लागतो तो शोधायला निरंकुश स्वास्थ्य,
एवढ्याकरता मी पाठवतो या गृहस्थाला सैतान असला तरी,
त्याने टोचणी लावून आणि त्रास देऊन सृष्टीची सेवा करावी म्हणून
पणण तुम्हाला स्वर्गाच्या सुपुत्रांना, वाटतो आनंद
जिवंत सौंदर्याच्या संपूर्ण ऐश्वर्याचे दर्शन घडल्यामुळे.
चिरंतन विकासशीलता व निश्चित साफल्य
ही लपेटतात प्रीतीची अमरबळे तुमच्या मनाभोवती,
आणि जीवनाजवळ ज्याचे दिसतात तरंगते आभास
ते सर्व पावते अढळपद अमर विचारामधे.

(स्वर्ग अंतर्धान पावतो. प्रधान, देवदूत निघून जातात.)

मेफिस्टॉफलीझ (एकांतात)
मला आवडत असते या म्हाताऱ्याला अधूनमधून भेटणे,
आणि काळजी घेणे, त्याच्याबरोबर सभ्य असे संबंध ठेवण्यासाठी.
सभ्य गृहस्थांमधील या आदी पुरुषाचा पाहिजे मानला हा शिष्टाचारच
इतक्या मित्रत्वाने असे बोलणे, प्रत्यक्ष सैतानाबरोबर.

शो का त्मि का

रात्र : फाउस्टची अभ्यासिका (१)

[उंच कमान असलेल्या एका निरुंद मध्ययुगीन ओरीमध्ये फाउस्ट आपल्या मेजाजवळ अस्वस्थ अवस्थेत दृष्टीस पडतो.]

फाउस्ट तत्वज्ञान आहे पचवले मी
समस्त कायदेशास्त्र आणि वैद्यक,
केली हस्तगत शास्त्रांची गुह्ये,
आणि, अरेरे, परमार्थविद्या सुद्धा.
बिचारा पढतमूर्ख सगळ्या या तपस्येने
नाही बनलो पूर्वीहून शहाणा.
आचार्य आणि पंडित अशी माझी बिरुदे;
गेली दहा वर्षे, न घेता विश्रांती,
आहेत दिली मी विद्वत्प्रचुर प्रवचने
आणि वळवले मदिच्छेप्रमाणे माझे विद्यार्थी.
वक्र किंवा सरळ वाटेवर आम्ही फिरतो फक्त वाटोळे,
आणि आहे उमजलो पुरे, अज्ञान हेच आमचे प्राक्तन,
याचीच आहे मला चीड.
एवढे मान्य, सगळ्या इतरेजनांना मी आहे टाकले मागे,
पंडितांना, पढितांना, धर्माधिकाऱ्यांना आणि मतस्थांना;
शमवितो सर्व संशयाची व्याधी, पापाचे किंतु,
नाही उरली सैतानाची भीती अथवा नरकाची,
आणि त्यामुळेच नाही उरला कोणता आनंदही,
उमजले कसे सर्वस्वी फसवते ज्ञान आम्हाला,
कसे आहे मानवाचे परिवर्तन माझ्या शक्तीपलीकडील,
कसे आहे जे जे शिकवतो ते ते अर्थहीन.
आणि इकडे मीही जगतो अशा विपन्नावस्थेत,
नाही येत लौकिक मानसन्मान माझ्या वाट्याला.
श्वानही नाही रेंगाळत राहणार अशा प्रकारे,

आणि म्हणूनच मी वळत आहे गहन गर्तेकडे
काळ्या मंत्रविद्येच्या, करीत आहे प्रयत्न
ज्याने इंद्रजाल होईल बोलके किंवा उठेल निशाचर शक्ती,
माझ्या सेवेस्तव, आणि प्रगटवील
निसर्गाच्या गुप्त मोहोरेखालील वस्तुमात्र,
आणि अज्ञानामधील आग्रही प्रतिपादनाच्या
थकलेल्या नृत्यापासून वाचवील मलाही.
तेव्हाच दिसेल माझ्या सुस्पष्ट दृष्टीला,
कसे घडते अज्ञात घटकांचे एकत्रीकरण,
आणि कशाने बांधले जाते अवघे विश्व,
आणि मग सुटेल सारी शब्दांची घासाघीस.
हे रात्रीच्या रुपेरी सम्राटा,
हे चंद्रा, नको पाहू आता ही माझी दैना,
तुझ्यावर होते माझे डोळे कित्येकदा खिळलेले,
ऐन मध्यरात्रीला, जेव्हा संथसा आणि सदय,
तू ओलांडायचास माझे कागदपत्र व माझे ग्रंथ
स्नेहार्द्र आणि विषण्ण मुद्रेने.
जर करू शकता माझा आत्मा निवांत भ्रमण
चांदण्यात भिजलेल्या गिरिकंदरातील वाटेवरून
भुताळ सावल्यांबरोबर, गुहांच्या बाजूबाजूने,
किंवा ओवीत जाता कुरणावरील चांदी,
पंडिती विद्वत्तेच्या धुरकट भट्टीतून विमुक्त झालेला
स्वतःला धुवण्यासाठी चांदण्यातील दवांमध्ये.
पण, अरेरे, माझा आत्मा असा तुरुंगाधीन
याच नरकवत्, कोंदटलेल्या खबदाडात,
जिथे स्वर्गीचा लाडका प्रकाशही असतो जात
होऊन विषण्ण रंगवलेल्या काचेतून.
मी आहे कोंडला गेलेला ग्रंथांच्या ढिगांनी,
ज्यांच्या घाणीत आहे सुरू कसरीचा उद्योग,
आणि कमानीच्या छतापर्यंत अगदी उंच
आहेत चुरगटलेल्या कागदांच्या रांगा;
चकपात्रे व कुंभ यांची अडचण माझ्या कडताळ्यांत
अन् उपकरणांची, आणि त्याहून अधिक नीरस
परंपरागत अडगळीची ओझ्यावर ओझी

आणि ह्यालाच ह्यालाच म्हणायचे माझे विश्व.
कसले आश्चर्य, जर असेल माझे हृदय
झाले लंगडे आणि मेदरले छातीतल्या छातीत,
जर जीवनाचे सगळे झरे खळखळा वाहणारे
गेले गुदमरून आणि दडपून विचित्र पद्धतीने !
जीवनात मावतील तितक्या एकूण एक
निसर्गाच्या स्वैर, ईश्वरदत्त निश्वसितांऐवजी
मी घेतला माझ्या मिठीत धूर आणि गंधा,
सांगाड्यांचा, आणि धुळीचा आणि मरणाचा.
ऊठ आणि चल दूर ! एक अज्ञात जग
पाहते आहे माझी वाट ह्या गूढ ग्रंथामध्ये
प्रत्यक्ष नॉस्ट्रॅडॅमसने स्वहस्ते लिहिलेल्या,
नाही मिळणार याहून चांगला मला मार्गदर्शक.
आता उलगडतील मला सारी ताऱ्यांची रहस्ये;
निसर्गाच्या प्रज्ञेमध्ये काढीन हुडकून, आणि येईल
कळून मला, उन्नत होणाऱ्या आत्मिक सामर्थ्यामुळे,
कशी बोलते एक चैतन्यशक्ती दुसऱ्या चैतन्यशक्तीशी.
नाही उलगडणार मातटलेल्या कोणत्याही तर्कशास्त्राला
पवित्र सिद्धियंत्रामध्ये दडलेला अर्थ.
अद्‌भुत चैतन्यशक्तींनो आसमंतात संचारणाऱ्या,
जर आता असाल ऐकत, द्या प्रत्युत्तर !

(ग्रंथ उघडतो आणि विश्वयंत्र दृष्टीला पडते.)

अहाहा, अकल्पितपणे लागली येऊ आनंदाची लाट,
शिरली माझ्या समस्त इंद्रियांतून, अवलोकन करताच :
दर्शनमात्रेच स्रवू लागला रसरसलेला पवित्र जीवनानंद,
आणि पेटले रक्त साऱ्या धमन्यांच्या शाखाशाखांतून.
होता का देव तो, ज्याने निर्मिला हा गूढलेख,
माझ्या आत्म्याचा प्रक्षोभ शमविण्यासाठी,
भरण्यासाठी माझे दुःखित हृदय उल्हसित भावनेने.
आणि आणण्यासाठी माझ्या आत्म्यापुढे गुप्त कला
ज्यातून प्रगटते निसर्गाच्या शक्तीमागील अज्ञात प्रेरणा !
मी स्वतः एक देवच !—चपळ अशा हालीच्या झेपीने
मी उलगडतो आहे या प्रतीकांचे कूट प्रश्न, ऐकतो आहे

निसर्गशक्तीच्या न झोपणाऱ्या मार्गांचा ध्वनी
आणि जाणतो आहे, द्रष्टयाने बोललेल्या उक्तींचा आशय :
"नाही आहे चैतन्यसृष्टीचे दार बंद केलेले;
आहे तुझेच हृदय मेलेले, आहेत तुझीच इंद्रिये पडदानशील.
हे जिज्ञासू, बन उल्हासमय आणि निरोगी,
भिजव आपला पार्थिव ऊर गुलाबी उषेच्या प्रवाहांमध्ये."

(त्या यंत्राविषयी चिंतन करीत)

पाहा, सुट्या वस्तू एकमेकांत गुंफवलेल्या, आणि मिसळविलेल्या,
आहेत जगत परस्परांचे अवयव बनून,
या संबंधाशी एकरूप होऊन कार्यान्वित होण्यासाठी.
आकाशस्थ देवता, ज्यांची चालते सतत देवघेव
सुवर्णकुंभांची स्वर्गामधल्या जिवंत सोपानावर,
ज्यांचे पंख असतात गंधित स्वतःजवळील परमानंदाने,
व्यापतात सर्व, करतात एकरूप स्वर्ग आणि पृथ्वी,
आणि संगीताने अवघ्या विश्वाला करतात सुप्रतिष्ठित.
किती अपार दृश्य ! पण तरीही फक्त दृश्यच,
एक देखावा, जो वेडावतो माझ्या स्पर्शाला, पकडीला, इच्छेला !
कुठे आहेत ती स्तनाग्रे, निसर्गाचे ते मूळ स्रोत,
कुठे आहे विश्वाला पाजणारे सजीव उगमस्थान ?
गूढ उपमाते, मलाही पाजतेस फुटलेला पान्हा,
आणि तरीही माझा आत्मा आहे विशीर्ण निराशेमध्ये.

(अस्वस्थपणे पाने परततो; पृथ्वीच्या महाभूताचे यंत्र उमगताच त्याची नजर स्थिर होते.)

आहे विचित्र बदल होत माझ्यामध्ये या यंत्रामुळे :
हे पृथ्वीच्या समधर्मी निशाचरा, तू भासतोस विलक्षण जवळ,
जणू एखाद्या उत्तेजक मद्याने उद्दीपित झाल्याप्रमाणे,
माझी चेतना आहे तरारली, आहे जोरावली माझी शक्ती :
आहे धमक धोका स्वीकारण्याची जगाशी भिडताना,
दैवाला ओलांडणारे माझे मानवी भाग्य मिरवण्याची,
आणि वादळाला धडक देण्याची, सुखदुःखाने न हेलावता

न गोंधळता जरी चिरडलो नौकाभंगाच्या दाढेत.
  आहेत शिरावर दाटले मेघ
आणि आहे लपला चंद्र :
आहे विझून चालला दीप.
उद्‌भवते आहे एक धुके – आरक्त विजा
करतात भ्रमण माझ्या डोक्याभवती––उतरतो खाली
एक भयकंप घुमटाच्या छपरातून,
पछाडतो मला !
आहे समजलो, मीच निमंत्रिलेल्या भयानक निशाचरा, तूच आहेस तो
पुढे ये, उघडपणे !
बापरे, कसे आहे चरकले हे माझे काळीज !
भावनांच्या कल्लोळात
आहे दुभंगले माझे मन, आहेत झिंगली माझी इंद्रिये;
मी आहे तुला शरण, नाही मला अधःपाताची तमा;
पाहिजेच घडली ही गोष्ट, जरी लागली द्यावी किंमत जीवन सर्वस्वाची .

(ग्रंथ पकडतो आणि गूढ निशाचरी यंत्राचा उच्चार करतो.
एक आरक्त अग्नी ज्योत एकदम निर्माण होते. आणि तिच्यामध्ये
निशाचर प्रगट होतो.)

निशाचर कोण आहे मला बोलावते ?

फाउस्ट (चेहरा दूर वळून) किती भयंकर रूप !

निशाचर सरते शेवटी
इथे यायला पाडलेस भाग, तुझी शक्ती
माझ्या मंडळाशी होती झुंजत प्रदीर्घ काळ,
आणि आता––

फाउस्ट मी थरकापतो : नको जवळ येऊ.

निशाचर मला पाहण्यासाठी तूच केलेस दुर्दम्य प्रयत्न,
ऐकण्यासाठी माझा आवाज, मला भेटण्यासाठी समोरासमोर
होते प्रबळ तुझे आवाहन ज्याच्या उत्कटतेने आणला दाब
आणि आलो मी इथे !––कोणत्या भीतीने आहे आता
पळविला रंग तुझ्या ओठांचा, माझ्या अतिमानवा ?

कुठे आहे ती आत्म्याची हाक ! ती जिगीषा
जगाला घडवायची, वाहायची, वाढवायची !
ते धगधगणारे हृदय, भव्य उत्कटतेने उजळलेले,
अपार्थिव चैतन्यसृष्टीला सहधर्मी समजणारे !
तूच आहेस का तो फाऊस्ट ज्याचे आव्हान आदळले कानावर
ज्याने मारली माझ्यापर्यंत धडक, केली जाहीर स्वतःची मृत्युघंटा,
आणि जो आहे आता थरकापत माझ्या सामर्थ्यापुढे,
आहे वळवळत समर्थ श्वासापुढे, भेदरलेल्या जंतूप्रमाणे !

फाउस्ट आणि डरेन की काय अटळ परिपाकाला, ज्योतीतल्या जळमटा,
माझेच नाव आहे फाऊस्ट, प्रत्येक बाबतीत तुझ्याशी तुल्य.

निशाचर मी असतो खेळवीत लाटेवर
जीवनाच्या महापुरात, कर्माच्या वादळामध्ये,
जनन आणि मरण
घोऱ्याच्या गतीने;
एक अमर्याद असा महासागर
असतो निर्मित कधीही न खळता
जीवनाचे सणंग,
अनंत रूपाचे
प्रकाशमय, एकात्म.
ती विणीत असतो या काळाच्या गुणगुणणाऱ्या मागावर,
उदात्त ईश्वरशक्तीला मढवणारे महावस्त्र.

फाउस्ट हे शीघ्रगती निशाचरा, अनंत आहेत तुझे संकल्प,
किती सहजातीय आहेत आपल्या दोघांचे स्वभाव !

निशाचर तुला आकलन होणाऱ्या निशाचराशीच तुझी बरोबरी,
नव्हे माझ्याशी. (अदृश्य होतो.)

फाउस्ट (खचल्यासा होऊन) नव्हे तुझ्याशी !
कोणाशी तर मग !
मी तर आहे ईश्वराच्या रूपानुरूप बनविलेली प्रतिकृती
आणि तरीही नाही आहे तुझ्याशी तुल्य !

(दार वाजल्याचा आवाज)

काय नष्टचर्य, हा असणार माझा सहकारीच !
माझ्या महान् अशा आशेचा उडाला धुव्वा :
त्याने बिघडवले निशाचरसृष्टीचे घडणारे दर्शन
माझ्या दारापुढच्या या एका पंडिती लाळचाट्याने.
(पायघोळ अंगरखा आणि कानटोपी घातलेला वॅग्नर हातात दिवा घेऊन प्रवेश करतो, फाउस्ट अनिच्छेने त्याच्याकडे वळतो.)

वॅग्नर माफ करा हं, मी ऐकले तुम्हीच म्हणताना
कसली तरी शोकांतिका, खात्रीने असावी ग्रीकच—
मी आहे तीच महानकला शिकण्याच्या प्रयत्नात,
कारण लोकांवर पडतो प्रभाव, जेव्हा पंडित करतात भाषणे.
अर्थात आहे असेही ऐकले, नाटकही करते शिक्षकाचे काम,
आणि नटाकडून लाभते स्फूर्ती प्रत्यक्ष धर्मोपदेशकाला.

फाउस्ट अगदी निर्विवाद, जर धर्मोपदेशक असेल दांभिक—
जी गोष्ट आपल्याला आढळतेच अधूनमधून.

वॅग्नर पण, आचार्य, जर अध्ययनात पडलो अडकून तिन्ही त्रिकाळ
आणि अनध्याय केला क्वचित्, पाहिली माणसे
जणू काचेतून, अशी दूरस्थ आणि अस्पष्ट,
तर कसा करील आपला उपदेश मानवाचे मार्गदर्शन ?

फाउस्ट जर भावनेचा नसेल आधार, व्यर्थ जातील तुमचे श्रम;
आणि अर्थहीन ठरेल योजना, जर तुमची कला
नसेल उद्भवली तुमच्या आत्म्यातून दुर्दम्य जोषाने
गाजवीत अधिसत्ता श्रवण करणाऱ्या प्रत्येक हृदयावर.
ठीक, ठीक, चालू दे उद्योगः वापरा कात्र्या आणि डिंक,
बनवा मिसळ इतर लोकांच्या उष्ट्या तुकड्यांची,
आणि जर का ही वस्तू नसेल लागत गरम व चविष्ट,
फुलवा विस्तव आपल्या राखेच्या लहानशा पुंजीतूनः
सापडतील तुम्हाला काही मर्कटे आणि मुले प्रशंसा करणारी
जर प्रशंसा हीच असेल प्रधान इच्छा;

परंतु जेवढे हृदयाने उच्चारलेले, तेवढेच फक्त
आणील जिंकून इतरांची हृदये तुमच्या हृदयाकडे.

वॅग्नर तरी पण शैलीमुळे वक्ता जातो विजयाच्या जवळ
हे आहे मला समजलेले, आणि आहे मी त्यातच मागासलेला.

फाउस्ट ठेव विश्वास प्रामाणिकपणावर, यश मिळविण्यासाठी
नको होऊ अनुप्रासजीवी वाचाळ विदूषक
चांगला आशय आणि सद्भावना यांना महाशय,
नियमानुसार बोलण्याची असते जरुरी फारच अल्प.
आणि तुमचे मन जर जडले असेल अपरिहार्य सत्यावर
कशी भासेल तुम्हाला गरज विशेषणांना धुंडीत बसण्याची ?
नाही, तुम्ही करता त्या तसल्या घोटीव भाषणांनी,
मानवजातीला उष्ट्या कागदांचे चिटोरे चारणाऱ्या,
नाही होत आमचे पोषण, त्या वाऱ्याप्रमाणे
विशीर्ण पर्णांना हालवणाऱ्या, शिशिरामधील धुके पिंजणाऱ्या.

वॅग्नर खरोखर, आचार्य, किती प्रदीर्घ आहे कला;
तथापि आहे आपले आयुष्य किती तोकडे
आणि पुष्कळदा, मी अभ्यासात निमग्न असतानाच
एका भयंकर भीतीने थरारते माझे डोके आणि हृदय.
किती अवघड आत्मसात करणे सगळ्या साधनांना
ज्यांच्यामुळे मानव पोहोचेल मूळ प्रवाहापर्यंत !
आणि अर्ध्यावर पोहोचण्यापूर्वीच येते त्याला दैव आडवेः
गरीब बिचारा हेहि जाणण्यापूर्वीच जातो मरून.

फाउस्ट मग, चर्मपत्र हेच की काय आहे उगमस्थान जिवंत पाण्याचे,
ज्याच्या प्राशनाने पिणारा होतो पुन्हा सबंध ?
नको समजू त्या परिसरात होईल तुझ्या तहानेचा उपशम
व्यर्थ असतो तो प्रवाह ज्याचा उगम नसतो आत्म्यातून.

वॅग्नर माफ करा तुम्ही, आहे श्रेष्ठ तोहि आनंद
भूतकाळाच्या अंतरंगामध्ये स्वतःचे मन झोकून देण्याचा,
शहाण्या माणसांच्या जुन्या कल्पनांचा वेध घेण्याचा
आणि पाहाण्याचा आपण गाठलेली अद्भुत उंची.

फाउस्ट आपण गाठलेली अत्यंत अद्भुत अगदी तारा मंडळापर्यंत !

माझ्या मित्रवर्या, आपल्यासाठी मोहक भूतकाळ
म्हणजे आहे सातदा सील केलेला एक ग्रंथ.
आणि ज्याला तू म्हणतोस युगांचे अंतरंग
ते आहे फक्त अंतरंग, त्या तुमच्या विद्वान प्रज्ञावंतांचे;
ज्यांचा आदर्श ही आहे एक अगदी बिचारी बाब,
मानवजाती टाळते त्याला एकाच दृष्टिक्षेपानंतर,
बुरसटलेली ती कचरापेटी, अडगळीचा एक पोटमाळा,
किंवा फारतर एक हाणामारीवर आधारलेले नाटक,
शब्दजंजाळ व व्यावहारिक सुभाषितांनी गच्च भरलेले
या भुश्याच्या भावल्यासाठी अगदी यथायोग्य.

वॅग्नर आणि तरीही हे जग, हे मानवाचे हृदय व मन —
ह्या गोष्टी जाणणे हेच असले पाहिजे आपले लक्ष.

फाउस्ट हे ‘ जाणणे–’ आणि कशी करणार त्याची व्याख्या ?
कोण देऊ शकेल अनुरूप नाव या अर्भकाला ?
अपूर्व दृष्टीचे वरदान असलेल्या ज्या जाणत्यांनी
नाही लपवले आपले हृदय या कळपापासून,
ज्या खुळ्यांनी केला प्रयत्न आपल्या भावना उघड करण्याचा,
त्यांना माणसांनी आहे नेहमीच जाळले, सुळी दिले.
मित्रा, माफ कर, रात्र आहे बरीच वाढली,
आता पाहिजे केला विचार हे संभाषण तहकूब करण्याचा.

वॅग्नर मी आणखीही असतो थांबलो मोठ्या आनंदाने
आपल्या व्युत्पन्न चर्चेमध्ये सहभागी होण्यासाठी.
पण, आचार्य, उद्याच येत आहे ईस्टरचा दिवस,
तेव्हाच विचारीन आणखी प्रश्न, परवानगी असेल तर,
मी आहे शिकलो बरेचसे पुस्तकांनाच मानले माझे खाद्यपेय,
पण नाही मिळणार शांति हे ज्ञान परिपूर्ण झाल्यावाचून.

(जातो)

फाउस्ट किती विचित्र, जो चिकटून राहातो उथळ गोष्टींना
त्याला येते आपली आशा राखता जिवंत रित्या शब्दांवर,
लोभीपणाने खणतो जमीन मौल्यवान लुटीसाठी
आणि मिळवतो आपले समाधान उकरून गांडुळे!

कसे धजले ह्याच्या आवाजाचे मानवी बेंबटणे इथे येऊ
जिथे चैतन्यसृष्टीचा आहे संचार अंतर्भव शक्तीमध्ये ?
आणि तरीही या सृजनहीन, निर्जीव माणसाचे
मानले पाहिजेत मी आभार त्या आत्यंतिक धोक्याच्या क्षणी.
त्यानेच काढले मला बाहेर दारुण मत्सरातून
माझे स्वतःचे डोके फिरवणाऱ्या, घात करवणाऱ्या.
होता झेपावला तो निशाचर अशा उंचीप्रत
माझा आत्मा बनला ठेंगू माझ्यामध्येच, विमनस्कपणाने.
परमेश्वराचेच एक प्रतिरूप असा मी होतो भासलो
सनातन सत्याच्या आदर्श स्वरूपाशी जवळिक करणारा,
जड देहाचे विसर्जन करण्याची शक्ती कमावलेला,
आणि रंगलेला आत्मिक स्वरूपाच्या स्वर्गीय प्रकाशात;
मी होते मानले स्वतःला, देवदूतावर सामर्थ्यामध्ये
मात करणारा, निसर्गाच्या धमन्यांतून वाहणारा;
सृजनशील दुःखांच्या देवसदृश आनंदात,
फार उंचावरून केली दौड आणि आता शोकही सखोल :
एका शब्दगर्जनेने घेतला हिसकून माझा लगाम माझ्या हातातून.
हे चैतन्यशक्त्ये, तुझ्या कोटीमध्ये नाही गणीत मी स्वतःला :
कारण जरी होती मला शक्ती तुला बोलावण्याची
तरी नव्हते मला सामर्थ्य तुला बांधण्याचे किंवा थांबवण्याचे.
भयानक आणि अद्भुत अशा त्या क्षणी
जेव्हा मी, इतका ठेंगणा, झालो एकदम इतका मोठा,
तू एका गरजत्या हुकुमाने ढकललेस मला
पुन्हा एकदा मर्त्य मानवाच्या अनिश्चित अवस्थेत.
कोण आहे माझा मार्गदर्शक ? काय करू मी वर्ज्य ?
किंवा कोणत्या अढळ प्रेरणेला मी अनुसरू ?
नसतात, फक्त दुःखे तेवढीच, केलेली कर्मेही
येतात आपल्याबरोबर, आपल्या पायवाटेला कुंपण घालण्यासाठी.
आत्मांत उमललेले चैतन्याचे सौंदर्यवैभव
असते एका विपरीत द्रव्याने नेहमीच गुदमरलेले.
महान मूल्ये, ह्या जगातील चांगल्या गोष्टींसह
वेडावीत वेडावीत सरतात मागे, आणि भासतात पोकळ बुडबुडे.
आणि आपल्या उमद्या प्रवृत्ती, ते जीवनाचे खरे झरे,

जातात घुसमटून पार्थिव वस्तूंच्या अपार धुळीने.
काय उपयोग जरी कल्पनाशक्तीने पसरले पंख
बालिश आशेमध्ये सनातन गोष्टींच्या शोधा प्रीत्यर्थ !
झाले आहे आता आकुंचित ते तिचे विस्तीर्ण साम्राज्य
दैनंदिन पराभवामुळे, नाश व निराशा यांनी ओढवलेल्या.
सखोल हृदयामध्ये अगदी लौकरच काळजी करते
आपले घर, आणि पसरते दुःखाचा बिछाना,
अगदी न कळत झुलवते स्वतःला, टाकते बिघडवून
आनंद व आराम, घेत इच्छेनुसार नवे नवे आकार,
भिरभिरत्या भीतीचे, घरादाराच्या अथवा मुलाबाळांच्या,
विषप्रयोगाच्या, प्रलयाच्या, अरिष्टांच्या विचाराचे
कारण न ओलांडलेल्या पुलाच्या जवळ माणूस थरकापणारच
करणार शोक कधीच न गमावलेल्या वस्तूंचा सुद्धा.
मग बसेन का मी देवांच्या पंक्तीला ? जाणवते मला
गांडूळाशी असलेले माझे नाते जे बसते उकरीत जमीन
जे जगते खाऊन धूळ, कुणा भटक्याच्या टाचेखाली
स्वतःच्या काळजीला आणि श्रमाला मूठमाती मिळेपर्यंत.
धूळच नव्हे का ही माझ्या शंभर कपाटात भरलेली
जिने कोंडले आहे मला एखाद्या ग्रंथजीवी मजुराप्रमाणे ?
उडत्या माशीचा नि उकरत्या किड्याचा एक सहचर
असा मी ओढतो जीवन पंडिती अडगळीमधून.
कसे सापडेल माझ्या जवळ नसलेले मला या इथे,
आणि कसे समजेल अनंत ग्रंथांचे अध्ययन करून
कशी माणसे बहुतांशी जगतात विपत्तींच्या पीडाचक्रावर
कसा आनंद असतो माहीत फक्त थोड्यांनाच ?
हे पोकळ कवट्ये काय अर्थ असेल तुझ्या हास्याचा ?
फक्त एवढाच की एक मर्त्य मेंदू, विपत्तीवर हेलकावलेला,
होता पूर्वी एकदा जीवनानंद शोधीत, माझ्याप्रमाणेच,
धडपडला सत्यासाठी, आणि हरवला संध्याकाळच्या अंधारात.
हे उपकरणांनो तुम्ही आहा मला वेडावीत अगदी तोंडावर
या चाकामधून, घोड्यामधून, दंडगोलामधून, दातांमधून;
तुमच्याच किल्लीने होतो उघडणार अज्ञात कोठारे:
किल्लीचे आटे आहेत कसबी, पण आहेत तरफाच गंजलेल्या !
कारण निसर्ग आपला बुरखा ठेवतो अनतिक्रमणीय,

ऐन दिवसाच्या उघड्या प्रकाशातही असतो रहस्यपूर्ण,
आणि तिथे चैतन्यशक्तीलाही नाही येत प्रवेश करता
तेथे कसे शिरणार तुमचे स्क्रू आणि लोखंडे.
इथे आहे हा सगळा सरंजाम, मी न स्पर्शिलेला,
वडिलार्जित माल, मला दिलेला तुरुंग बनविण्यासाठी,
ही चर्मपत्रे, काळवंडलेली आणि मळकटलेली
जिथून आहे वर उठत मेजावरील दिव्याचा भेसूर धूर.
रात्रंदिवस अशा लाभासाठी घाम गाळण्यापेक्षा
बरे होते जर उधळून टाकतो जे आहे थोडे स्वतःचे.
वारसा म्हणून मानवाला मिळालेल्या सर्व वस्तू
बनतात त्याच्या चैतन्यशक्तीच्या परिश्रमानंतरच.
जे नाही वापरता येत तो कचराच, जे येते
ते असते उडत्या क्षणाकडून मिळालेले पारितोषिक.
पण कोणती लोहचुंबकी वस्तू ओढते आहे माझी नजर!
ही कुपीच मोहवते मला, जणू निवबणाऱ्या
चंद्रदर्शनाप्रमाणे, जेव्हा अरण्यातील गहन वाटेवर
आपले विचारसुद्धा जातात भिजून रुपेरी चांदण्यात.
प्रणाम तुला, हे विलक्षण गुणसंपन्न चषका,
घेतो आता तुला खाली सादर दक्षतेने
तुझ्यामधून करतो सत्कार मानवी कलाकौशल्याचा.
तू आहेस अफूच्या फुलामधील मूर्तिमंत चैतन्य,
तू आहेस दारुण शक्तींचा क्षरणसिद्ध अर्क,
दाखव आता तुझ्या धन्याला ते तुझे सदय अंतःकरण :
तुला पाहून, तुला स्पर्शून, शमतो संघर्ष आणि दुःख.
मी ऐकतो आहे उघड्या दर्यावरील एक हाक,
माझ्या आत्म्याची भरती आहे लागली ओहोटू अधिकाधिक,
माझ्या पायापाशी आहे पसरले प्रकाशणारे काचेसारखे मैदान,
एक नवा दिवस आहे खुणवीत निराळ्या किनाऱ्याकडे.
जणू काय पंख पसरून एक अग्निरथ आहे येत
माझ्याजवळ. मी आहे तयार विमुक्त होण्यासाठी.
आकाश भेदून, नव्याने जन्मून, मी आकांक्षितो
विशुद्ध व्यवहाराच्या विश्वामधील माझे आरोहण.
हे उर्ध्वगामी जीवन, देवसदृश जन्माचा हा परमानंद.
कसा होईल आम्हाला प्राप्त, ज्यांना लागते किड्यांतून उगवावे!

तरीही ती हाक आहे सत्य : मी नाकारतो पृथ्वीचा सूर्य,
जातो सोडून निश्चयी मनाने तिचे लावण्य; आणि धीराने
उंचावतो नजर ते महाद्वार सताड उघडण्यासाठी
ज्याचा उंबरठा अजूनपर्यंत आहे माणसांनी भीतभीत ओलांडला.
आला आहे तो क्षण, स्वतःच्या प्राक्तनाचा नियंता बनून
माणसामधील ईश्वरी सामर्थ्य सिद्ध करण्याचा,
न खचण्याचा, काळया आणि दारुण अशा भुयारापुढे
वा कल्पनाशक्तीच्या सतत चालणाऱ्या त्या पीडेपुढे,
त्या नरकाच्या निरुंद आणि पेटत्या भिंतीला धडक देण्याचा,
आणि सामर्थ्यासह चालून जाण्याचा त्या भयप्रद दरवाजाकडे.
आहे घेतला आनंदी मनाने हे पाऊल टाकण्याचा निर्णय
स्वीकारला धोका मृत्यूहून अधिक, माझ्या सर्वस्वनाशाचा.
हे विशुद्ध स्फटिकाच्या पात्रा, तुझ्या मंजुषेतून उचलतो तुला,
त्या विश्रामस्थानापासून उतर खाली माझ्या मदतीला.
माझे झाले तुझ्या योग्यतेकडे फार काळ दुर्लक्ष,
मोठ्या सणावारी माझ्या वडिलांच्या स्नेह्यासोबत्यांना
तू होता घेतलास मोह; आणि मिळवलीस त्यांची प्रशंसा,
जेव्हा मिळायचा आवडता पेला प्रत्येकाला आळीपाळीने.
ते कलेचे अभिमानस्थान त्या किनारीवरील वीरकथा,
ते पिणाराचे अभीष्टचिंतन, त्यांना सर्वकाही छंदामधून सांगणारे,
तर मग उचल कप आणि टाक पिऊन शेवटच्या थेंबापर्यंत —
या सगळ्यामुळे आठवतात मला तारुण्यातील उभारीच्या त्या रात्री,
मी आता पुन्हा तुला नाही देणार मित्रांच्या हातात.
नको आहे मला आता ती त्यांची चतुर प्रशंसा,
कारण इथे आहे एक उद्दीपक संवेदन बुडवणारे,
एक मद्यपात्र गूढ अहिफेनीय देऊ शकणारे.
मीच बनवलेल्या या घोटाची उघड्या डोळ्यांनी करतो निवड
आणि पितो शेवटचे पेय, माझे सर्वस्व पणाला लावून
करीत अभीष्टचिंतन उगवत्या दिवसाच्या भयानक भवितव्यतेचे.

(पात्र ओठाला लावतो; घंटांचा आवाज व गूढ गंभीर असे वृंदगीत ऐकू येते.)

देवदूतांचा वृंद

घडले खिस्ताचे उत्थान ॥
पितृप्राप्त नियतीच्या द्वारा
ज्यांच्या नशिबी आली कारा
त्या हतबल मर्त्यांना सारा
झाला हर्ष महान् ॥

फाउस्ट

किती गहन हे गीत, कुठून येतो हा सुखद स्वर
ज्याने पाडला हात लुळा विषप्याला उचलणारा ?
काय घंटांच्या कंपायमान घणघणाटाने आहे पुकारला
ईस्टरच्या प्रार्थनेचा धीरगंभीर प्रारंभ,
आणि वृंदाने आनंदगीत गाऊन केली सुरुवात
पुन्हा उघडवायला देवदूतांकरवी अंधारलेले थडगे
पूर्वी घडलेल्या करारनाम्याची खूण म्हणून ?

स्त्रियांचा वृंद

लावून उट्या अन् गंधे
सानंद सेविले त्याला,
ठेविले प्रशांत ठिकाणी
स्नेहभाव अर्पण केला;
रेशमी घेऊनी वस्त्रे
देह तो कसा मढवियला,
हाय हाय नंतर कळले
त्राता तो सोडुनि गेला.

देवदूतांचा वृंद

खिस्ताचे घडले उत्थान ॥
डंख नसे या मरणा,
प्रीतीचा हा राणा
दुःखपूर्ण विश्वांना
जिंकुन बनतो आयुष्मान् ॥

फाउस्ट

सौम्य आणि समर्थ अशा स्वर्गीय ध्वनींनो
कशाला येता मला शोधीत, मातीत कोसळलेल्या ?
जा आणि गा तिथे, जिथे राहतात मृदु अंतःकरणे.
मी ऐकतो, पण श्रद्धेशिवाय, सर्वस्व गमावलेला;
आणि श्रद्धेजवळ असतात चमत्कार तिच्या लाडक्यासाठी;
नाही करणार मी या विश्वामध्ये शिरण्याचे धाडस,
उदात्त वस्तूंच्या या उगमस्थानामध्ये, या भव्य अशा संगीतात;

आणि तरीही हा ध्वनी घडवितो स्मरण आत्म्याच्या पूर्वसंकल्पाचे
लहानपणी केलेल्या, पुन्हा करतो मला जिवंत.
होता असाही काळ, जेव्हा सुमधूरसा स्पर्श करणारे
स्वर्गाचे चुंबन भेटायचे मला विश्रामदिनाच्या नीरवतेमध्ये.
तेव्हा घंटांच्या ध्वनीत होती भविष्यसूचक निर्भरता
आणि प्रत्येक प्रार्थना होती परमानंदाची तंद्री.
एक विलक्षण सुंदर उत्कटता, एक उत्कंठा
होती मला हाकलून नेत शेतात, वनात दूरवर भटकवण्यासाठी,
आणि जेव्हा हृदय व्हायचे मोकळेमोकळे, अश्रू यायचे जळत जळत,
तेव्हा असायचा मी दुःखातीत अवस्थेच्या उंबरठ्याजवळ.
हे संगीत मला शिकवते आहे बालपणातील आनंद
निरागसाचे गीत, वसंताचा हर्षोल्लास;
या अशा धीरगंभीर वेळी तारूण्याच्या विचारांनी
माझ्या शेवटच्या पावलात आणला बालसुलभ डळमळीतपणा.
हे सुमधुर स्वर्गीय संगीता, पुन्हा एकदा कर सुरुवात.
अश्रूंनी अंधावलेत माझे डोळे : पुन्हा बनलो आहे पृथ्वीचे बालक.

अनुयायांचा वृंद

थडग्यात पहुडलेला तो
जाहला फिरून जिवन्त,
भेटला दिवस भाग्याचा
मृत्यूचा झाला अंत.
स्वानंदे विकसत त्याने
मिळविली शक्ति सृजनाची.
आम्हि मात्र राहुन येथे
पाहतो वाट मरणाची.
सोडिले अम्हाला त्याने
झुरण्यात सरे इहलोक;
स्वामी तव परमानंद,
त्याचाच करितसू शोक.

देवदूतांचा वृंद

ख्रिस्ताचे घडले उत्थान
मृत्यूची आशा फसली;
तव बंदीतुन तुजला रे
प्रीतीने मुक्ती दिधली.
माना त्याला. स्तवन करा:

ठेवुन साक्षीच्यासाठी,
भोजनकाळी ज्या वेळी
गीत स्फुरे तुमच्या ओठी.
जो श्रमतो अन् प्रार्थियतो
जीवन प्रीतीने उजळी
निर्भय तो त्याला कळते
प्रभू असतो त्याच्या जवळी.

नगराच्या प्रवेशद्वाराबाहेर

(नाना प्रकारचे लोक फिरण्यासाठी बाहेर पडत आहेत)

काही कामशिके	तीच वाट सगळयात उत्तम असे तुम्ही का समजता.
इतर ,,	आम्ही चाललोत शिकाऱ्यांच्या सराईकडे, त्या टेकडीवरील.
पहिले बोलणारे	पण आम्हाला आहे जायचे त्या गिरणीकडे.
एक कामशिका	फेरी ह्यचकडे आपण जावे असे आपले माझे मत.
दुसरा ,,	त्यात कसली आली गंमत !
इतर ,,	आणि कुठे जाणार तुम्ही ?
तिसरा ,,	जिकडे सगळे तिकडे आम्ही !
चौथा ,,	ही चढण चढून जावे अशी दुर्गाश्रमात मिळते दारू अरे यार मजा येईल अशा आहेत पोरी मारू आणि सुरेख लाठी काठी, तोही खेळ दिसेल मग.
पाचवा ,,	देवाशपथ, तुझ्यापुढे नाही बाबा काही इलाज, दोनदा जाऊन सवरून पुन्हा तिसरीसाठी आहे खाज ! —ती जागा पाहूनसुद्धा माझ्या मनाला येते उबग.
मजुराची पोर	नाही बाई, घरी जाते, आता नाही थांबणार मी.
दुसऱ्या पोरी	त्या पॉप्लरच्या झाडापाशी तो भेटेल, देतो हमी.
पहिली पोर	मला कसलं त्याचं सुख, काही झालं तरी काय, तुझ्याबरोबर तो फिरतो, तुला खूष करीत असतो, कोणालाही उमगेल सारं त्याच्याबरोबर नाचतेस अशी या तुझ्या आनंदाचा काय संबंध माझ्यापाशी !

दुसऱ्या पोरी — अग तो काही एकटा नसेल, म्हणत होता तो आज,
त्याच्याबरोबर येणार आहे एक छोकरा ऐटबाज.

एक विद्यार्थी — अरे उभारीच्या या पोरी चालतात कशा झपाझप
हे गणित नाही चुकणार, चल दोस्ता चल आटपः
एक चिलीम तंबाखूची, आणि बेवडयाचा एक पेला
आणि नंतर झकास पोरगी—फक्त एवढे पुरे मला.

शहरी मुलगी — तो पाहाना, तो सुरेख मुलगा, आणि त्याचा तो सहाध्यायी.
मी तुला चक्क सांगते—हलकटपणाची कमाल ही—
सुसंस्कृत आणि शहाण्या मुलींना शोभून दिसणारे हे तरुण
या बसव्यांच्या मागे धावतात पाहा कसे नेम धरून!

दुसरा विद्यार्थी — (पहिल्या विद्यार्थ्याला उद्देशून)
घाई नको, आपल्या मागे आहेत दोन! जरा दमान,
आहेत कपडे ऐटबाज, वरच्या वर्गाचा वास छान,
एक आहे माझ्या ओळखीची, माझ्या शेजाऱ्याची मुलगी
त्या पोरीशी आहे केली, माझ्या हृदयाने फार सलगी.
त्या पाहा येताहेत शहाजोगपणाचे सोंग बडे!
पण शेवटी, सांगतो तुला, आपल्या बरोबर जातील पुढे.

पहिला विद्यार्थी — भल्या माणसा, नाही; त्या थंड्या प्रियाराधनाला आहे विटलेलो.
चल लौकर, आपली इतर पाखरे उडून जाण्यापूर्वी.
आठवडाभर झाडलोट करण्यात गुंतलेले हात
रविवारच्या दिवशी देतात आलिंगन फार प्रेमात.

एक शहरवासी — नाही हो निवडून आलेला हा नवा नगराध्यक्ष आहे फुकट,
आणि आता खुर्चीत बसल्यावर बिघडला अधिकच : मी म्हटलेच होते
मला सांगा, काय करतो आहे लेकाचा शहराच्यासाठी?
दिवसे दिवस लागली आहे शहराच्या वैभवाला उतरती कळा,
आणि आमच्यावर पडत आहे ताण अधिकाधिक,
फक्त एवढेच आहे निश्चित : आजच्यापेक्षा उद्या महाग.

एक भिकारी — (गाणे म्हणत)
बाबासाब, बाईसाब, तुम्ही दयावान
गाल किती लाल, तुमचे कपडे किती छान,

बघा माझी दशा, आणि कोणीतरी पावा
काहीतरी घाला मला, व्यथा थोडी दावा
नका माझे गाणे तुम्ही असे घालू वाया
गरीबांना देतो, त्याला देतो देवराया.
जेव्हा सणावारी सारे सुखामध्ये फार
तेव्हा ठरूदे तो माझा कमाईचा वार.

दु. शहरवासी रविवार आल्यावर किंवा अशा सणाच्या दिवशी
मला आवडतात युद्धाच्या गप्पा : मला आवडतात त्या बातम्या
जेव्हा तुर्कस्थानातील किंवा एखाद्या दूरच्या देशातील
असंतुष्ट लोक देतात पेटवून युद्धाचा वणवा.
तुम्ही असता खिडकीशी उभे, हातात पेला घेऊन,
असता पाहात नदीतून वाहणारी रंगीबेरंगी वाहतूक,
आणि नंतर, संध्याकाळ झाल्यावर, घरी जाताना करता विचार:
सुस्थीर शांततेमधील आपले जीवन किती चांगले.

ति. शहरवासी भल्या माणसा, मी सुद्धा आहे अगदी याच विचाराचा!
मी म्हणतो, तिकडे त्यांना डोकी फोडण्याचे असू दे स्वातंत्र्य;
हवे तरी सगळे जग वेड लागून होऊ दे उरफाटे,
पण इथे मात्र आपली परंपरा राहिली पाहिजे अगदी शाबूत.

एक म्हातारी (शहरी मुलींना)
नटल्या आहेत कशा! विशीचा वक्त आणि उसळतं रक्त!
कोणचा ग तरुण नाही भडकणार तुम्हाला पाहून?
पुरे झाले आढेवेढे!—मी ओळखते तुमच्या मनातलं,
आणि आहे मला तुमची इच्छा पुरविण्याचे सामर्थ्य.

शहरी मुलगी चल ग, अगाथा, असल्या चेटकिणीपासून चार पावलं दूर
चार चौघा समक्ष टाळशील हिला, शहाणी असलीस तर.
सेंट ॲन्ड्रूच्या आल्या रात्री अग हिनेच आगलं बोलावून
माझ्या भावी प्रियकराला, प्रत्यक्ष माझ्या डोळ्यांसमोर.

शहरी मुलगी अग मला सुद्धा दाखवलान माझा, एका स्फटिकाच्या गोलामध्ये
एक लष्करी–तरुण, आणि इतर शूर सैनिक.
त्याला आजूबाजूला असते शोधीत, त्याला धुंडते चारी दिशांना.
पण तो मला नाही सापडत आणि आहे झाले निराश.

सैनिक

बुरुजावरती करीत हल्ले
पाडुन टाकिन बाले किल्ले;
मानी नयनांच्या ज्या पोरी
प्रीतीशी करतील मुजोरी,
जिंकिन त्यांना होऊन गाझी
हीच महत्त्वाकांक्षा माझी.
साहस आहे बिकट परंतू
सुरेख बक्षिस—यात न किंतू.
ओरडोत या सर्व तुताऱ्या
शूरा आवाहन करणाऱ्या,
मोका येवो कुठे कशाचा
आनंदाचा वा मरणाचा,
जीवन रंगेले अन् छोटे !
चला रणांगण पुढती मोठे
बाला अथवा बालेकिल्ला
जिंका, दोन्ही, करून हल्ला.
साहस आहे बिकट परंतू
सुरेख बक्षिस——यात न किंतु.
मिळता त्याला अशी कमाई
सैनिक पुढती निघून जाई

(फाउस्ट व वॅग्नर प्रवेश करतात.)

फाउस्ट बर्फामधून विमुक्त होऊन तो निर्झर वाहतो आहे,
वसंताच्या संजीवक कटाक्षांनी स्पर्शित झालेला.
नदी आणि ओढेसुद्धा आहेत विसरली त्या बर्फाला,
त्या दरीचे हिरवे प्रियाराधन आहे आसुसलेले.
जीर्ण जर्जर हिवाळा आहे चालला कुथत कुथत
पुन्हा एकदा ओसाडलेल्या पर्वतराजीकडे,
तिथे माघार घेतल्यानंतर, अधिकाधिक थकलेल्या स्थितीत
आपल्या रोगट भयकंपित बोटांनी आहे पसरीत
नपुंसक बर्फ एप्रिल महिन्याच्या विविध विभ्रमावर.
या सूर्यापुढे त्या सफेदाने आहे घेतला काढता पाय
त्याने आहे केली जिवंत, विकास आणि उन्मेश यांच्यामधून,

आपण आणलेली रंगाची दुनिया.
पण अजूनही फुले आहेत कोशात पहुडलेली
म्हणून त्यांचे काम करवतो नटलेल्या माणसांकडून.
पाहा जरा मागे वळून, या इथून उंचावरून
प्रकाशात पहुडलेली ती नगरी.
त्या काळ्या भुयारी महाद्वारामधून
आहे वाहात बहुरंगी गर्दीचा एक महापूर.
प्रभूचे पुनरुत्थान साजरे करण्यासाठी
ते आहेत उघड्यावर हिंडत सूर्याच्या प्रकाशात,
कारण त्यांचेही आहे झालेले तसेच पुनरुत्थान
घाणेरड्या झोपड्यांमधून, कुबवणाऱ्या खोल्यांमधून
कुरूप भिंतींमधून पोटमाळ्यांच्या उदासीमधून
त्यांना राबवणाऱ्या व्यवसायामधून, संघामधून.
घुसमटवणाऱ्या रस्त्याकडून, चिरडणाऱ्या गर्दीकडून
अंधाऱ्या चर्चमधल्या निशब्दशा ओऱ्यामधून
ते सगळे येतात कोसळत प्रकाशाच्या रोखाने.
पाहा, कशी शेते आणि वावरे बोलावतात
उल्हसित जनसमूहाला आपल्या मार्गाकडे
आणि नदी कशी मिरवते आहे आपल्या वक्षस्थळावर;
तिथेच पोहतो नाचणारा काफिला, आणि तिथूनच
भरगच्च भरलेला शेवटचा पडाव जातो हाकारून.
ती दूरची डोंगरातील वाटसुद्धा आहे पाठवीत
पुन्हा आपल्याकडे रंगीत ठिपक्याचे सांकेतिक संदेश.
अगदी जवळच येते ऐकायला सारे खेडेगाव जागे होताना,
तेथे होणाऱ्या आनंदोत्सवामुळे गजबजून गेलेले.
इथे तरुण आणि वृद्ध आहेत रमले गाढ समाधानात :
इथे बनतो मी मनुष्य, सांगतो अधिकार मानवी स्वभावधर्मावर.

वॅग्नर आपल्याबरोबर फिरण्यामध्ये मला होतो नेहमीच आनंद
मला वाटतो सन्मान झाल्यासारखा, आणि मन होते संस्कारित,
पण, स्पष्ट सांगतो, मी नसती केली ही निवड,
कारण ही असली ग्राम्यता नाही होत मला सहन.
ही आरडाओरड, ही फिडलघाशी, हे ढोल पिटणे,
मला वाटते हे सगळे अगदी बेसुरे आणि अनुचित;

सैतानी प्राण्यांच्या हिडिस किंचाळण्याप्रमाणे ते ओरडतात,
आणि नंतर मग ते त्यालाच म्हणतात आनंद, म्हणतात गाणे.

(लिंबाच्या झाडाखाली शेतकरी गाताना व नाचताना दृष्टीस पडतात.)

गाणारा धनगरअण्णा घालुन आला पोषाख साठ्यातला
अंगरखा बारावंदांचा फुलाफुलांचा झुला,
म्हणाला नाच करावा भला.
लिंबाखाली घडली गर्दी मिडली किती माणसे,
नाचनाचली बेहोषीने असे लयीचे पिसे,

वृंद अन् जी र जी
जी र जी
फिडल् म्हणाले असे.

गाणारा लगबगिने तो शिरला मग हो नाचाच्या वर्तुळी,
सूर मारला त्याने, पडली कुणी सुंदरी बळी,
तसा तो मजबुत होता गडी.
ती सुंदर मुलगी या सलगीने गरकन मागे वळे,
' किती वेंधळा मेला ' म्हणुनी राग दावला बळे,

वृंद अन् जी र जी
जी र जी
काय खुळ्याला कळे.

गाणारा नाच रंगला, फेर भंगला, कमाल झाली खरी,
कुणी पकडली छाती, आणिक उजवी कोणी धरी,
ते झुलले त्यांचे झगे पाखरापरी.
लाल जाहले भले, त्यांची नसे किती तापली,
जरा थांबले दमछाटीला, तरी मिठी ना ढिली !

वृंद अन् जी र जी
जी र जी
कोपरे कुल्यावर टेकली.

गाणारा नकोस वागू समजुन माला तुझी जणु अस्तुरी,
जात घातकी पुरुषाची ती खेळ प्रीतिचा करी,

मुलींना जाणीव असते पुरी.
तरी तयाने कुस्करले तिज तसे चोरटेपणी,
लिंबाखाली चिंब जाहले हे गाण्याचे ध्वनी:

वृंद अन् जी र जी
जी र जी
फिडल् बोलले मनी !

म्हातारा शेतकरी अवं, आपल्यासारखी मोठी माणसं इकडं वळली
हेच आम्ही मानतो, महाराज, आमचं नशीब,
एवढी विद्वान माणसं तुम्ही, तरी आपण होऊन
आमच्यात येऊन अशा सणावारी असता मिसळत.
आता आमच्यासाठी घ्या एवढा दारूचा वाडगा,
आमच्या जवळचा सगळ्यात सरस माल.
तो घेतल्यावर देव तुम्हाला प्रत्येक थेंबागणीक
सुखाच्या आयुष्याला देईल एक एक दिवस.

फाउस्ट तुम्ही दिलेला प्रेमाचा पेला मी घेतो अतिशय आनंदाने,
आणि मानतो तुमचे आभार, आणि इच्छितो तुम्हाला दीर्घायुष्य.

(सगळे लोक घेर धरून समोवार जमतात)

म्हातारा शेतकरी हे चांगलं झालं बघा, तुम्ही आज आलात
जेव्हा समदी माणसं सुखात, समाधानात,
कारण महाराज तुम्ही असायचं नव्ह का
आम्हाला धरून ऐन दुष्काळात आणि रोगराईत,
इथे आहेत कैकशी माणसं अजून जिवंत
ज्यांना तापसरीच्या भयंकर पकडीतून काढलं बाहेर
तुमच्या वडिलांनी स्वतःच्या पुण्याईवर
ऐन साथीशी मुकाबला करून. आणि तुम्ही
त्या दिवसामधी होतात आपल्या ऐन उमेदीत,
लागण झालेल्या प्रत्येक घरामधी लावायचात वर्दी;
घराघरातून प्रेतं होती बाहेर निघत; पण तुम्ही
त्या सगळ्या ठिकाणापासून परत यायचेत सहीसलामत,
भोगलंत सारं, ज्याने होते माणसाची परीक्षा,
तुम्हीच होतात आमचा आधार, देवानं पाठवलेला

सर्व देव ठेवू दे त्यांना सशक्त, देवु दे सदिच्छा,
आणि त्यांना खूप जगू दे आमचा आधार म्हणून.

फाऊस्ट मला नव्हे, त्या वरच्यालाच करा अभिवादन
जो असतो सांभाळीत, शिकवीत, प्रेमाच्या रूपाने.

(वॅग्नरसह रस्त्यावरून पुढे चालू लागतो.)

वॅग्नर कशा भावना असतील उचंबळत तुमच्या हृदयामध्ये,
विस्मित झालेल्या जमावाने केलेला गौरव पाहताना !
धन्य आहे तो मानव जो मिळवतो हे बक्षीस
आपल्या प्रतिभेमुळे प्राप्त झालेल्या गुणांच्या सहाय्याने !
तो पिता आपल्या लहान मुलाला आहे घडवीत तुमचे दर्शन,
तुम्ही जाल तिकडे लोक उभे होतात आणि पाहातात.
सोत्सुक आश्चर्याने जातो झपाटून प्रत्येक जण,
थांबतो फिडलवाला, आणि नाचामध्ये पडतो खंड,
करतात सुस्वागत सर्व लोक आणि उडतात टोप्या हवेमध्ये.
आणखी जरा थोडे, मग टेकतील ते गुडघेच,
पवित्र परमेशाला आवाहन करणाऱ्या पुजाऱ्याप्रमाणे.

फाउस्ट ती पाहा वरच्या बाजूला फार उंच नसलेली दगडाची कपार
वाटचालीनंतरची निवांत विश्रांती लाभेल आपल्याला त्याच ठिकाणी.
या इथेच मी अनेकदा बसायचा एकटा, विचारमग्न अवस्थेत
करीत उपवास आणि प्रार्थना हृदयाच्या शुद्धीकरणासाठी.
आशेने आणि महान श्रद्धेने भारावलेल्या त्या स्थितीत
वाटायचे मला, मी घडवीन परमेश्वरी इच्छेकडून
या भडकलेल्या साथीचा शेवट,
माझे निश्वास, माझे अश्रु, माझी आत्मपीडा, या साधनांनी.
ह्या स्तुतीला आता आहे अर्थ उपहासाचा आणि निंदेचा.
जर तुला येईल माझ्या हृदयात डोकावून पाहाता
तर कळेल माझ्या वडिलांना किंवा मला काय अधिकार
या भोळ्याभाबड्या लोकांनी प्रशंसिलेले सद्गुण मिरवण्याचा ?
माझे वडील करायचे काम निरपवाद सचोटीने,
निसर्ग आणि गूढ विश्व यांच्याविषयी चालायचे चिंतन,
गाढे जिज्ञासू, आणि तसेच मनाचे प्रामाणिकही,
पण तरीही होते काहिसे चक्रम आणि आग्रही मताचे.

निवडक अशा समव्यवसायी लोकांच्या संगतीमध्ये
ते बसायचे कढया उकळवीत नक्तंचर मंडळीसाठी,
अगणीत गुप्त प्रकल्पाप्रमाणे, ते सद्गृहस्थ
निर्मित बसायचे अभद्र अर्काच्या भयानक वस्तू.
मग मीलनासाठी उत्सुक झालेल्या आरक्त सिंहाचा
घडायचा संयोग एका कमलिनीशी, भरपूर उकळलेल्या.
आणि दोघांचाही, नागड्या ज्योतीवर पोळले गेल्यावर,
व्हायचा पाठलाग एका रतिकुंजातून दुसऱ्या रतिकुंजापर्यंत.
आणि त्यानंतर त्यांना दिसायची भडक रंगामध्ये
सौंदर्याची सम्राज्ञी, त्यांच्या पेल्यामध्ये पकडली गेलेली.
असे असायचे त्यांचे वैद्यक ! हां, आता रोगी मरायचे,
पण त्यांना कोण विचारणार कोण बरा झाला ते.
या अशा जडीबुटींच्या सैतानी औषधांसह
आमचा सतत चालायचा संचार त्या डोंगरांतून आणि दऱ्यांतून.
आणि त्यामुळे घडायचा उच्छेद त्या साथीहूनही अधिक भयंकर.
या हातानीच मी आहे पाजले ते दारुण विष सहस्रावधी लोकांना;
ते पडले मृत्यूच्या मुखात आणि मी राहिलो मागे,
खुनी माणसांना स्तुती करून आशीर्वाद दिलेला ऐकण्यासाठी.

वॅग्नर पण आपल्या मनाचा का करता असा छळ ?
परंपरेने प्राप्त झालेल्या आपल्या व्यवसायामध्ये
पारंगत होण्यात प्रत्येक भल्या माणसाने
उचित तेच केले असेच पाहिजे समजले आपण.
वडिलांबरोबर सहकार्य करणे हे होते तुमचे कर्तव्य.
केलात सत्कार, त्यांनी तरुणपणी शिकविले त्याचा.
तुम्ही आपल्या उमेदीमध्ये जर शास्त्राची घडवलीत प्रगति,
तुमच्या मुलाचे पोचतील हात अधिक उच्चतर सत्याच्या पर्यंत.

फाउस्ट धन्य आहे त्या माणसाची जो अजूनही धरतो आशा
भय आणि संशय यांच्या या दर्यातून बाहेर पडू अशी !
जे नाही कुणालाही कळलेले, त्यानेच होऊ आपण शहाणे;
आणि जे आहे आपण जाणलेले, त्याच्यावाचून आपले चालू शकेल.
पण अशा या मधुर समाधानाचा दिवस उगवण्यापूर्वीच
घातकी दुर्भाग्याची सावली न पडू दे म्हणजे झाले.
ती पाहा, पालवीमध्ये पडलेल्या पायवाटेजवळील झगमग,

मावळत्या सूर्याने मुलामा दिलेल्या लहान लहान घरांची.
तेजाचा अधिपती आता आहे कलला पश्चिमेवर,
आहे मावळत घाईघाईने, आपल्या प्रदक्षिणेमध्ये
आहे शोधीत पलिकडचे नवजीवन, मलाही आहे
लागली तहान त्याच्या शोधात सहभागी होण्याची,
कधीही न थकणारे जमीन सोडलेले पंख पसरून.
मग दिसेल मला, न संपणाऱ्या संध्याप्रकाशात
हे सर्व जग माझ्या पायाशी पाळण्यात पहुडलेले,
नीरवतेत विरलेली प्रत्येक दरी, प्रकाशाने स्पर्शिलेले प्रत्येक शिखर
सोनेरी नद्यांमध्ये वाहात येणारे रुपेरी निर्झर.
मग पर्वतांनाही नाही येणार माझे देवसदृश उड्डाण थांबवता,
जंगली गिरिकुहरामुळे अथवा रानटी खडकाळ वाटेमुळे;
अहाहा, मग समुद्रही आपल्या उबदार प्रशांत उपसागरासह
करील उघडे आपले सौंदर्य विस्मय करणाऱ्या माझ्या दृष्टीपुढे.

आणि आता वाटतो शेवटी सूर्यदेव बुडालासा,
तरीही माझे हृदय आहे स्फुरत नवजागृत सामर्थ्याने,
अमर प्रकाशाचे पाझर पिण्याची आहे लागली मला ओढ,
आहे दिवस पुढे ठाकला आणि रात्र दडली कुठेतरी,
आहे स्वर्गमंडळ माझ्या डोक्यावर आणि खाली हेलावत्या लाटा :
हे एक सुंदर स्वप्न, पण हरवले मावळत्या सूर्याबरोबर.
बिचारा जीव, चैतन्यशक्तीने मिळवलेल्या या पंखांनी
नाही घडत त्याचे उड्डाण या मर्त्य मातीला ज्ञात असलेले :
आणि तरीही शाश्वत आणि दुर्दम्य अशा इच्छाशक्तीतील
आंतरिक प्रेरणा देते आपणाला उडण्याचा संदेश,
जेव्हा आकाशाच्या नीळवतीमध्ये अदृश्य होऊन
चंडोल पक्षी फेकतो गीताचे लसलसते तीर,
जेव्हा देवदारावरून, पर्वतातील वृक्षांवरून,
झेपावतात गरुड पसरल्या पंखांनी प्रदक्षिणा घालणारे,
आणि दूरवर उघड्या मैदानावरून, दूर दर्यापार
ढंगदार सारसपक्षी वळवतात पंख घराकडच्या वाटेला.

वॅग्नर माझेही मन काही वेळा चमत्कारिक कल्पनांनी जाते भरून,
पण तरीही नाही लागत या प्रकारची मला ओढ.
आपल्याला येतो लवकरच वीट राने आणि शेते पहाण्याचा.

मला नाही वाटत कधीही हेवा पक्ष्यांच्या पंखांचा, मला भासते
फक्त पुस्तकांची तेवढीच निकड, त्यांचे पानन्‌पान वाचून काढण्याची.
अहाहा, मधुर व्यासंगाचा आपला आनंद किती वेगळा असतो!
मग हिवाळ्या रात्री बनतात सुखावह, घोंघावणारे वारे असूनही
मग अवयवांना मिळते ऊब, जणू कसल्यातरी दिव्य समाधानाची,
कारण जेव्हा आपण उघडतो एखादा अमूल्य हस्तलिखित ग्रंथ
प्रत्यक्ष स्वर्गातलाच आनंद अवतरतो या पृथ्वीवर साकार होऊन.

फाउस्ट या एका वासनेनेच फक्त तुम्ही आहात सर्वस्वी झपाटलेले—
दुसऱ्या कशालाही तुमच्या विचारात नाही जागा.
पण माझ्या या एकाच छातीत राहात आहेत दोन आत्मे
आणि प्रत्येकाचा चालतो संघर्ष तेथील अधिसत्तेसाठी;
एकाला लागते प्रीतीच्याकरता विषयवासनेची हिरवट ओढ
आणि तो घेतो सेन्द्रीय अनुभवाच्या सुखद जगाला आपल्या मिठीत,
दुसरा असतो झुरत वर असलेल्या स्वर्गीय प्रदेशाकरता
आणि झिडकारतो ही तमोमयता उदात्त वैभवासाठी.
हे चैतन्यतत्त्वांनो! जर तुम्ही वावरत असाल या वातावरणात,
जर चालत असेल तुमची सत्ता या अंतरिक्षावर,
तर उतरा खाली त्या तुमच्या सोनेरी नभोनिवासातून,
आणि मला न्या सुंदर जीवनाकडे, वेगळ्या पुनर्जन्माकडे.
हां, जर माझ्याजवळ असता एखादा जादूचा अंगरखा,
दूर परक्या प्रदेशात मला उचलून नेण्याची शक्ति असलेला,
तर तो अंगरखा मी नसता बदलला राजवस्त्रासाठीही,
जरी त्यावर अभिषिक्त सम्राटाची विभूषणे असती तरी.

वॅग्नर नका, नका बोलावू त्या कुविख्यात घातकी गणाला
जो संध्याप्रकाशाच्या या कमानीवरती असतो तरंगत
वाईट गोष्टींचा आपला साठा सगळीकडे उधळण्यासाठी,
आणि बनवण्यासाठी मानवजातीकरता अज्ञात अशी हजारो संकटे.
मग उत्तरेकडून येतात उडत चावऱ्या दातांची ती पिशाच्चे,
आणि आपल्या तिरासारख्या जिभांनी टोचून छळतात तुम्हाला;
किंवा ती करतात पूर्वेकडून गर्दी, आणि तुम्हाला शोषून शोषून
करतात कोरडे, मारतात ताव तुमच्या फुफ्फुसावर.
जेव्हा भर दुपारी वाळवंटामधील पेटता उपद्रव होतो प्रकट
आणि भयंकराहून भयंकर असा करतो हल्ला तुमच्या मेंदूवर,

तेव्हा पश्चिमेकडील श्रमहारक सैन्य देते अभिवचन
पण सरतेशेवटी टाकते बुडवून सगळी शेतवाडी प्रचंड महापुरात.
या निशाचरांचे कान असतात फार तिखट, पापाकडे कललेले,
दाखवतात सेवावृत्ती, रचतात डाव आपल्या पराभवाचा,
घेतात आकार स्वर्गातून धाडलेल्या वस्तूंच्यासारखा
आणि उच्चारतात देवदूतांच्या जिभांनी फसवणारी असत्ये.
पण आता निघूयाच आपण; संध्यासमयाचा पसरला रंग,
गारठली हवा, ते रांगणारे धुक्याचे लोट लागले उठायला,
या अशा मावळतीच्या घटकेलाच घरच्या उबेचा लागतो वेध.
का आपण थांबलात का ? काय पाहाता आहा इतके निरखून ?
कोणाच्या दृश्याने तुम्हाला वेधले आहे अशा संध्याप्रकाशात ?

फाउस्ट ते काजळकाळे कुत्रे पाहिलेत का, भेदरून पळणारे,
त्या पिकामधून शेतातल्या खुंटातून ?

वॅग्नर ते उमगले होते
मला मघाशीच, पण नव्हते दिले त्याच्याकडे लक्ष.

फाउस्ट आता निरखून पहा, थोडे दक्षतेने, आणि मग सांगा
कोणच्या प्रकारचे तुम्हाला वाटते हे जनावर.

वॅग्नर वा हे तर
केसाळ जातीचे शिकारी कुत्रे, आहे आजुबाजूची
हुंगती वाट, आपल्या मालकाला शोधून काढण्यासाठी.

फाउस्ट पाहा कसे त्या चक्रीमार्गाने
ते येते दुरून आपल्याकडे, आपल्या भोवती घालीत प्रदक्षिणा
अधिकाधिक जवळून, जर मी असेन अजून शुद्धीवर —
त्याची वाट आहे रेखलेली अग्नीच्या जिभांनी.

वॅग्नर आचार्य, हा असावा कसला तरी आपला दृष्टिभ्रमः
मला तिथे दिसते आहे एक केसाळ कुत्रे.

फाउस्ट हा दिसतो जादूने रेखाटलेला एक फास,
एक जाळे भावी जीवनपथामध्ये पसरून ठेवलेले.

वॅग्नर माझी खात्री आहे, ते जिकडे तिकडे आहे शोधीत आपल्या मालकाला
आणि आहे दोघा परस्थांना त्याच्या ऐवजी पाहून गोंधळलेले.

फाउस्ट आहे वर्तुळ होत अधिकाधिक निरुंद, आणि आणीत त्याला जवळ

वॅग्नर एक कुत्रे ते, महाराज, ते नव्हे आहे कोणी पिशाच्च !
ते गुरगुरते, घोटाळते, व बसते मागच्या पायावर,
आणि हालवते आपले शेपूट : सारी सनातनी सारमेयवृत्ती !

फाउस्ट ए बेट्या, चल इकडे ये, चल आमच्याबरोबर !

वॅग्नर या जनावराजवळ आहे चळवळेपणा सगळा केसाळ कुत्र्याचा,
कारण तुम्ही थांबलात की ते सुद्धा थांबते तुमच्या अपेक्षेने,
आणि तुम्ही बोललात की तेही लागते उड्या मारायला.
पाहा पाळून : ते शिकू शकेल पक्षी पकडण्याचे चांगले कसब,
किंवा पाण्यामध्ये ठोकील उडी तुमच्या काठीसाठी.

फाउस्ट मित्रा आहे तुझेच बरोबर : ह्या चतुर चमत्कारिक निष्पत्तीचे
शिक्षण हेच आहे कारण, इथे नाही कसलाही जादुटोणा !

वॅग्नर जे कुत्रे ऐकते शिक्षकाचे आणि वागते त्याच्या इच्छेप्रमाणे,
ते घेऊ शकते शहाण्याचीसुद्धा जिंकून माया.
आणि याने तर मिळविली आहे तुमची मर्जी नुसत्या दृष्टीक्षेपाने :
एखाद्या विद्यार्थ्याप्रमाणे ते आहे आदराने पाहात विद्वान माणसांकडे.

[नगराच्या महाद्वारात ते प्रवेश करतात]

फाउस्टची अभ्यासिका (२)

[फाउस्ट प्रवेश करतो, पाठोपाठ कुत्रे येते.]

फाउस्ट   आहेत राहिली दूर माझ्यामागे शेते, काटेराने,
रात्रीच्या अंधारात, ध्रुवाच्या चांदणीखाली,
आणि आता एका पवित्र भीतीने आहे होत
या आत्म्यामधील विशुद्ध जाणीव पुन्हा जागृत.
रानटी वासनेपासून ही जाणीव आहे विमुक्त,
विकाराच्या ठिकाणी आहे वावरत आता माधुर्य.
आता भूतदयेचा आहे घडत हृदयाशी संवाद
आणि त्या हृदयामध्येच आहे बोलत प्रभूचे प्रेम.
ए बेट्या, खाली बस, का घासतोस दाराशी नाक
अरे अस्वस्थ प्राण्या ही जागा नव्हे भटकंती करण्याची.
ही घे, माझी उशी ! यापुढे नको भटकू
जणू हरवल्याप्रमाणे : बस जाऊन शेगडीच्या मागे.
बाहेर उघड्यावर दाखवलेच आहेस कुत्र्याचे कुळाचार
आणि केले आहेस टेकडीच्या माथ्यावर तुझे खेळ.
पण आता जर हवे असेल माझे आदरातिथ्य
तर खाली बस, बन पाहुणा शांत, स्वागतार्ह.
या इवल्याशा खोलीत पुन्हा एकदा
तेवतो दिवा प्रशांत, प्रसन्न.
आणि प्रकाशाचे स्थिर साम्राज्य
पसरते माझ्या अंतरंगात, मनात.
हृदय भेटते स्वतःच्या रुपाला, आणि सुस्पष्टसा
उठतो आवाज आशेचा, सद्बुद्धीचा.
पुन्हा जडते प्रेम जीवनाच्या जलाशयावर
ज्यातील निर्झरांचा घेत शोध आपणातील चैतन्य.
पुरे करा गुरगुरणे, अहो महाराज ! या कुत्र्याची
ही पिरपिर भासते विसंवादी पवित्र स्वरानंतर

ज्या स्वराबरोबर एकांतात राहणे हेच आवडते माझ्या आत्म्याला.
पण हेही खरेच, असेही आहेत पुष्कळ मानव प्राणी
जे गुरगुरतात आपल्या दृष्टीच्या टप्प्यापलिकडील वस्तूंवर
करतात चेष्टा या सौंदर्याची आणि सद्‌गुणीपणाची
आणि आपल्याला न कळलेल्या प्रत्येक गोष्टीची :
निदान सारमेयांनी अशा सज्जनापासून राहावे दूर.
अरेरे, विनम्र भावाने मी चालवले आहे शांतीचे आराधन
आणि तरीही नाही प्रकटत मधुर समाधान माझ्या अंतःकरणात.
काय इतक्या लवकर जातो आटून तो अंतःप्रवाह
आणि माणसाला लागते राहावे तळमळत तहानेने ?
हेच ते सत्य प्रदीर्घ अनुभवानंतर मला लाभलेले,
पण या यातनांचीही भरपाई करणारे असेल काहीतरी :
इथेच नाही का शिकत आपण अक्षर वस्तूंवर प्रेम करायला
आणि हृदयाला नाही का लागत ओढ साक्षात्काराची
ज्यातून उमटलेला उत्स्फूर्त आणि अद्‌भुत शब्द
लाभतो ऐकायला सुस्पष्ट स्वरूपात नव्या करारामध्ये.
आता या वेळी माझे मन आहे भारावले समर्पण वृत्तीने
वाटतो घ्यावा या पवित्र धर्मग्रंथाचा अर्थ समजून
साध्या आणि सरळ वृत्तीने, आणि ते सत्य
करावे भाषांतरीत माझ्या मायदेशाच्या लाडक्या बोलीमध्ये.

(ग्रंथ उघडून कामाला सुरुवात करतो.)

असे लिहिलेले आहे : ‘ प्रथम फक्त शब्द होता. ’
इथे थांबावे, सूचित आशयाचे चिंतन करण्यासाठी,
मला नाही पटत इतक्या उच्च स्थानी शब्दाला बसविलेले
मी पहातो नव्या पद्धतीने भाषांतर करून,
असे वाचावे, चैतन्य शक्तीच्या स्फूर्तीवर अवलंबून,
हा अर्थ : ‘ प्रथम फक्त विचार होता. ’
हाहि प्रारंभ पाहिजे तपासला नीट पुन्हा एकदा,
नाहीतर अर्थाला लागेल धक्का लेखणीच्या घाईमुळे.
काय विचारामुळेच घडते कालाचे सृजन व नियमन ?
सगळ्यात उत्तम ‘ प्रथम फक्त शक्ती होती. ’
पण तरीसुद्धा, लेखणीला बोटे सामील असूनही,

होते कसल्यातरी संशयाची जाणीव, मन घुटमळते,
निकडीच्या वेळी चैतन्यशक्तीचे लागते मार्गदर्शन,
आता असे लिहितो : ‘ प्रथम फक्त कर्म होते. ’
 ए कुत्र्या, जर माझ्या खोलीत असेल व्हायचे तुला भागीदार
थांबव तुझे ओरडणे, थांबव मेहेरबानी करून !
तू चालवला आहेस सर्वस्वी नाश माझ्या मनःशांतीचा.
नाही परवडणार मला असा सोबती आसमंतात,
मला वाटते, आपणा दोघांपैकी कुणीतरी एकाला लागणार जावे.
आता मी आहे, यजमान असल्यामुळे जायला नाखूष
पण तू मात्र, भल्या कुत्र्या, आहेस स्वतंत्र, तो पहा दरवाजा !
तरीपण—काय पहातो आहे हे माझ्या डोळ्यांनी !
काय निसर्गाजवळ उघड करण्यासाठी आहेत अशी रहस्ये ?
या कुत्र्याने आहे घेतला एक चमत्कारिक आकार
कोण बरे आहे हे–वेताळ की वास्तव ?
तो पहा चालला आहे वाढत शक्तीमध्ये,
नसते कोणतीही कुत्र्याची जात इतकी अवाढव्य.
कोणच्या भूताला मी दिला आहे इथे आसरा,
जे येत आहे माझ्या बाजूला गेंड्याच्या स्वरूपात
सुळयांनी भेडसावीत, आणि रोखित पेटणारे डोळे ?
अरे आले लक्षात आता तुझे स्वरूप !
नरकाच्या या असल्या कमअस्सल लेंढारावर
माझ्या पडेल चांगली उपयोगी ‘ सालोमनची गुरुकिल्ली. ’

भुतावळ (ओऱ्यांच्या आतून)

आत आहे कुणी एक अडकलेला, पकडलेला :
थांबा सारी बाहेरच, नका येऊ इथे;
पिंजऱ्यामध्ये जाळयामध्ये कुणी कोल्हा सापडलेला,
नरकामधली रानबिल्ली कापते आहे तिथे.
पण लक्षात ठेवा !
इकडे तिकडे उडा तुम्ही खाली वर जावा.
नीट जपून थोड्या वेळात चला सोडून त्याला.
वेताळांनो तुम्हीसुद्धा या रे मदतीला.
नका सोडू त्याला पिंजऱ्यात अडकलेला.
त्याने केली आहे आपली सेवा, आपण आहोत त्याचे ऋणाईत.

आणि यावेळी आपण त्याला पाहिजे सोडवले त्यांच्या बंधनातून.

फाउस्ट नरकातल्या या वस्तूला तोंड देण्यापूर्वी
प्रथम पाहिजे केला उच्चार चतुर्विध मंत्राचा.

अग्नितत्त्व राहील जळत खूप.
वायुतत्त्व होईल अदृश्यरूप,
जलतत्त्व स्वीकारील वहाण्याचा धर्म,
पृथ्वीतत्त्व करील गुलामाचे कर्म.

जे करतात दुर्लक्ष
दुष्प्राप्य ज्ञानाकडे
मूलतत्त्वांच्या प्रभावाकडे
त्याच्याकडून नाही शमणार
नरकामधले निशाचर

हे अग्निपिशाच्चा !
हो अदृश्य अग्नीच्या ज्वाळेत.
हे वायु पिशाच्चा !
बस जावून तारांच्या माळेत
हे जलपिशाच्चा !
फीर गरगर प्रवाहाच्या काठावर,
हे पृथ्वी पिशाच्चा, हे पृथ्वीपिशाच्चा,
तुझ्या मदतीचा हात पुढे कर.
चल, पुढे ये, हुकमाच्या बरोबर.

चारी मूलतत्त्वांपैकी कोणतेही एक
नाही संचारत या पशूमध्ये, पण पूर्वीसारखाच
हा विचकतो आपले दात, अगदी बेपर्वाईने, त्या जमिनीवरून
गूढ विद्येच्या प्रभावाचा स्पर्शही न होता.
अजूनही ऐकतील त्याचे कान,
माझ्या इच्छेपुढे वाकेल मान.

पहा या यंत्राकडे
ईश्वरी प्रतिकाकडे,
जर तू असलास
नरकाची वीण;
आणि कर, सैतानी संताना,

मस्तक लीन

आता तो पहा कसा विस्फारतो आणि फुरफुरतो !

नरकातल्या पदार्था,
कशाची ओळख
आहे थडकली तुझ्या पापदृष्टीवर.
काय दिसतो आहे तो अनंत,
अजन्मा, सनातन,
शब्दातीत आत्मा,
विश्वातून वाहाताना ?
काय दिसतो तो, ज्याला सुळी दिले त्यांनी अविचाराने ?

या मंत्राने दबलेला असून सुद्धा
तो दिसतो आहे विस्फारलेला, प्रस्फुरलेला.
नरकातल्या पाणघोड्यासारखा,
शेगडीच्या पाटीमागून तो आहे करीत आक्रमण
सगळ्या खोलीचे, भयानक मेघरूपाने
वर छपरापर्यंत. चल खाली उतर,
नरकाच्या पोरवळ्या ! बस, पायाजवळ !
मी प्रवर्तलेली ही शक्ती म्हणजे नव्हे आहे एक आभास :
टाकीन करून तुझी राख या माझ्या पवित्र ज्योतीने.
नको पाहू वाट त्या किरणाची
जो उद्‌भवतो त्रिरूपी नामातून, जातो पोखरीत जाळीत जाळीत.
नको पाहू वाट, सांगतो मी,
संपूर्ण आणि साद्यंत अशा माझ्या मंत्रोच्चरणाची.

मेफिस्टॉफलीझ (हळूहळू धुके नाहीसे होते आणि, प्रवासी पंडितासारखा पोशाख केलेला मेफिस्टॉफलीझ शेगडीमागून पुढे येतो.)

कशासाठी एवढा आरडाओरडा ? काय आहे महाराजांची इच्छा ?

फाउस्ट अस्से, हेच तत्त्व होते म्हणायचे पशूच्या आत !
एक फिरस्ता पंडित. आता आली हसायची वेळ !

मेफिस्टॉफलीझ आपल्या विद्वत्तेला मी देतो ही मानवंदना.
आणि करतो कबूल, आपण फोडलात चांगलाच घाम माझ्या अंगाला.

फाउस्ट काय आहे तुझे नाव ?

मेफिस्टॉफलीझ — हा प्रश्नहि आहे लहानसाच,
शब्दाला अत्यल्प किंमत देणाऱ्याकडून विचारला गेलेला!
अशा माणसाकडून, जो बाह्य रूपे आणि स्वप्ने यांना सोडून,
आहे गुंतला चिंतन करण्यात जीवनाच्या प्रगाढ स्वरूपाचे.

फाउस्ट — तुझ्यासारख्याच संशयित वाटणाऱ्या गृहस्थाचे स्वरूप
ओळखून काढण्यासाठी नामाभिधानाची होते मदत.
जसे 'विध्वंसकर्ता,' 'माश्यांचे महाराज,' 'असत्याचे अधिपती!,
असे म्हटल्यानंतर पडतो उमज अधिक स्पष्टपणे.
तर मग तू कोण आहेस?

मेफिस्टॉफलीझ — अशा एका शक्तीचा अंश
जिला हवे असते नुसते पाप, आणि तरीहि निर्मिते पुण्य.

फाउस्ट — कोणता अर्थ आहे दडलेला या कूट वाक्यामध्ये?

मेफिस्टॉफलीझ — मी आहे ते चैतन्यतत्त्व, जे जाते सतत नाकारीत.
आणि तेहि आहे यथायोग्यच, कारण जन्मलेली प्रत्येक वस्तू
असते नष्टप्राय होण्याच्या लायकीची, असते मूल्यहीन.
अर्थात जगाची निर्मितिक्षमताच बरी नष्ट केलेली;
एवढ्याकरताच पाप म्हणून मानली गेलेली प्रत्येक गोष्ट
मला वाटते माझ्या फायद्याची, आणि अधःपात, विनाश, दुर्वर्तन
यांच्या अस्तित्वावरच असते अवलंबून माझी चलती.

फाउस्ट — तू चैतन्याचा आहेस अंश, असा आहे तुझा दावा,
आणि तरीहि येतोस माझ्यापुढे सबंधशा स्वरूपात.

मेफिस्टॉफलीझ — विनम्रवृत्तीने
मी सांगतो आहे एक साधे सत्य, हवातर माणसाचा भ्रान्त आत्मा
बसू दे मानीत या लुटुपुटूच्या अशा जगालाच संपूर्ण संबंध :
मी आहे अंशाचाही अंश, जो होता एकदा सर्वस्वरूप,
एक अंश त्या रात्रीचा, प्रकाशाच्या त्या मातेचा.
—गर्विष्ठ प्रकाश, ज्याला हवी आहे सम्राटाची अधिसत्ता
त्या रात्रीच्या पुरातन राज्याहून अधिक वरचढ अशी;
तथापि त्याची धडपड व्यर्थ, त्याच्या नशिबी आहे चिकटणे
वस्तुगत रूपांना, करो बिचारा कितीहि परिश्रम.
त्याचा उद्‌भव आहे जडातूनच. तो जडालाच करतो सुरूप

तरीहि जडाकडूनच त्याला होत असतो प्रखर प्रत्यवाय,
असाच राहील तो, माझ्या मते, धावत स्वतःच्या विनाशस्थानाकडे,
आणि असाच जडाच्या बरोबर येईल वाटणीला सार्वत्रिक विनाश.

फाउस्ट आता तुझ्या मनातील भव्य योजना झाली आहे अगदी सुस्पष्ट
विराट असा संहार घडविणारी तुझी शक्ती ठरली अयशस्वी
आणि म्हणून करतो आहेस तोच उपद्व्याप लहान प्रमाणावर.

मेफिस्टॉफलीस आणि खरे म्हणजे, त्यानेहि होतो आहे लाभ अत्यल्पच.
संहारक शक्तींनाहि होत असतो सतत प्रतिकार एक प्रकारच्या
राठ पदार्थाकडून, आपले अस्तित्व सिद्ध करू पहाणाऱ्या.
करतो परिश्रम, काढतो वाट बिकट परिस्थितीतून,
परंतु नाही कधीहि पोचू शकत मी त्याच्या चामडीच्या आत,
अनेक धरणीकंप, वडवानल, महापूर मी आहे वापरून राहिलेला
आणि तरीहि निवांत समुद्र आणि धरणी आहेत जशीच्या तशी.
आणि तसेच मानव आणि पशू यांचे शापित लेंढार,
किती लक्षावधी मी आहेत टाकले पुरून या वीणेपैकी,
आणि तरीहि नाही घडला काहीहि परिणाम, अगदी एवढासुद्धा :
प्रत्येक अरुणोदयाबरोबर त्याचे रक्त असते शहारत ताज्या संवेदनेने.
असेच पुनःपुन्हा ! शेवटी निराशाच पडते हाती !
बीजांचा न संपणारा एक समुच्चय असतो प्रगटत
आप, पृथ्वी आणि वायु या आदितत्त्वांतून.
आर्द्रतेतून, शुष्कतेतून, उबेतून, आणि थंडीतून.
फक्त माझी अशी एक अग्निज्वाळा, ज्वाळेची शक्ती.
नाही दुसरे असे काहीहि ज्याला मी म्हणावे माझे.

फाउस्ट आणि म्हणून त्या सनातन सृजनशक्तीवर,
जी करीत असते आम्हाला विमुक्त आमच्या व्याधीपासून,
तू पाखडतोस आपला राग दुष्ट विकल्पापोटी
आणि व्यर्थच बसतोस वळत आपल्या हाताची घातकी मूठ.
आदिम गोंधळाच्या नपुंसक पुत्रा ! पुन्हा नव्याने कर विचार
आणि शोध याहून चांगले असे दुसरे काम.

मेफिस्टॉफलीस आपण उल्लेखिलेल्या ह्या गोष्टीकडे आम्ही देवू लवकरच लक्ष;

पण आता मिळेल का परवानगी मला निघून जाण्याची ?

फाउस्ट आता आहे तुला ओळखलेले, मग कशासाठी करतोस विचारणा !
तू येत जा स्वतःच्या इच्छेनुसार : आणि स्वतःच्या निर्गमनासाठी
कर वापर त्या दरवाजाचा; किंवा ही आहे खिडकीची चौकट,
किंवा कर आपले पर्यटन चुलीच्या डोक्यावरील धुराड्यामधून.

मेफिस्टॉफलीझ पाहिजे कबूल केले : या ठिकाणाहून निर्गमन करताना
मला आहे होत प्रत्यवाय एका अगदी बारिकशा गोष्टीकडून;
मी बोलतो आहे दरवाजावरील सैतान प्रतिबंधक यंत्राला उद्देशून.

फाउस्ट काय तुझी होते कुचंबणा त्या माझ्या पंचकोन यंत्रामुळे ?
जर त्याने होऊ शकतो तुला प्रतिबंध, तर सांग,
नरकाच्या संताना, प्रथम तरी कसा आलास तू खोलीमध्ये ?
आणि वेताळ असा कसा गेला पकडला, फसवला ?

मेफिस्टॉफलीझ आपली मेहरबानी, महाराज, ती आकृती आहे अपूर्ण,
कारण या इथे, बाहेरच्या अंगाचा हा कोन पुरा करताना,
पाहिलेत का आपण, आहे राहिलेली थोडीशी फट.

फाउस्ट असा काही वेळा निव्वळ नशीबाने घडतो लाभ
मला वाटते आता तुला लागणार राहावे माझ्या बंदीशाळेत,
योगायोगानेहि घडतो लाभ या गोष्टीचा पुरावा म्हणून.

मेफिस्टॉफलीझ ते कुत्रे आंधळेपणाने शिरले आत अगदी उड्या मारीत
आणि आता त्याच गोष्टीने घेतला आहे गंभीर आकार :
घरामध्ये अडकलेला सैतान आणि सुटकेसाठी नाही मार्ग.

फाउस्ट काय नाही चालणार खिडकीची चौकट ?

मेफिस्टॉफलीझ सगळ्या वेताळगणाला लागतो एक कायदा नेहमी पाळावा :
पूर्वी आलेल्या आपल्या वाटेनेच त्यांना नेहमी लागते परतावे.
तर राहातात ते स्वतंत्र, नाही तर पडतात न संपणाऱ्या बंदीत.

फाउस्ट एकूण नरकालाहि लागतात म्हणायची करावी विधेयके,
उत्तम, कारण कायद्यामुळेच माणूस करू शकतो करारमदार,

मग तो का न करावा तुझ्यासारख्या नरकातील सद्गृहस्थाशी ?

मेफिस्टॉफलीझ नरक ज्याचे वचन देऊ शकेल, त्याचा आस्वाद आपण खुशाल घ्या;
पत्ते आहेत अगोदर लावलेले असा नाही येणार खेळताना अनुभव.
पण हे असले करारमदार नाही घडून येत इतक्या सुलभतेने.
अनुकूल स्थळकाळ येताक्षणीच मी देतो तुम्हाला आश्वासन
यापुढील मसलतीचे, पण, महाराज, आता मात्र
करतो विनवणी : द्या अनुज्ञा आता आपली रजा घेण्याची.

फाउस्ट थांब, आणखी एक क्षणभर : माझे मन आहे आतुरले
भविष्यकाळाच्या पडद्यापलीकडील घटना जाणण्यासाठी.

मेफिस्टॉफलीझ नको, आता यावेळी मला जाऊ दे! पुन्हा लौकरच मी परतेन
आपल्या प्रश्नाची उत्तरे देण्यासाठी आपल्याला हवी तशी.

फाउस्ट तुला नरकामधून इथे आणण्यासाठी मी नव्हती घातलेली शीळ;
आणि स्वेच्छेने पाखरासारखा तू उतरलास या फासामध्ये,
ज्याला सैतान असेल सापडला, त्याने पाहिजे त्याला पकडून ठेवले,
दुसऱ्या खेपेला तो पकडला जाणे थोडे कठीणच.

मेफिस्टॉफलीझ जर आपली इतकी इच्छा असेल, तर मी आहे थांबायला तयार,
आपल्या संगतीसाठी, पण मात्र एका अटीवर
वेळ घालवण्यासाठी माझ्या इंद्रजालाला असावा वाव,
कृपावंत होऊन एवढी एकच द्यावी परवानगी.

फाउस्ट अवश्य पाहीन तुझे इंद्रजाल. माझी आहे पूर्ण परवानगी.
जर तुझ्याजवळ असलेली गोष्ट प्रकट होतानाही असेल सुखकारक.

मेफिस्टॉफलीझ हा एक तास, माझ्या मित्रा, तुझी इंद्रिये करील उत्तेजित
पूर्वी भोगलेल्या दुसऱ्या कोणत्याही सुखाहून जास्त,
मवाळ जीवनक्रमामध्ये निघून गेलेल्या सबंध वर्षापेक्षा.
छकडे निशाचर तुझ्याकरता जे गातील
तुझ्यासाठी सुंदर देखावे जे आणतील
ते असतील काही अधिक निव्वळ इंद्रजालाच्या रित्या आभासाहून.
तुझी रसना होईल तृप्त,
तुझे गंधेंद्रिय पावेल समाधान,

आणि तुझे सगळे सूक्ष्म भाव केले जातील पुरे उद्दीपीत.
मला नसते कधीच जरुरी मामुली तयारीची.
भेटतो आहोत अगदी योग्यवेळी : करा प्रारंभ मंत्रोच्चाराला,

पिशाच्चगण

उचला हे मंद घुंगट
घुमटासारखे, अंधारणारे;
आता गोड निळाई
सौम्य आणि प्रकाशमयी
तरंगू दे दृष्टीपुढे.
चकचकणारा आणि जिवंत
निळा रंग करील अंत
घुमटामधील छायांचा.
मेघचक्र विरेल सारे
हळूच थबकत त्याच्यामधून
लुकलुकताना दिसतील तारे.
सूर्यप्रकाश लागला दिसू
मंदमंद त्याचे हसू
आणि चारी दिशांमधून
झुलत झुलत भरून भरून,
स्वर्गामधल्या सुंदर मुली,
स्वप्नामध्ये भेटेल अशा
सौंदर्याची फाकीव उषा
समुद्रावर वाकतात खाली.
आणि हृदयामधली आग
जाते त्यांच्या मागोमाग.
इतके सुंदर त्यांचे रूप.
त्याने कुंज फुलतील खूप;
ज्यात वेडे प्रेमी अनेक
आपले आत्मे करतील एक.
हृदयामधले अमर फूल
याच सौंदर्याची भूल
घालून करते आपला नाच
वसंताचा होता जाच.

आता लागतील द्राक्षतंतू
एकमेकात पुरे गुंतू,
अन् द्राक्षांच्या ढिगांचा
भट्टीवरती पडेल भार
जांभळ्या जांभळ्या तेजाची
त्या घोसातून लागेल धार,
मग जाईल दारू वहात
उसळणाऱ्या प्रवाहातून,
आणि निळी रत्ने अनेक
चकमकतील त्याच्यातून,
तीच दारू जाईल वहात
डोंगरामधून वनाच्छादीत,
जाता जाता पाठोपाठ
सारे निर्झर आरक्तवीत.
आणि पक्षी पंखांची
करू लागतील फुलवाफुलव
आल्हादाची, आनंदाची
उडता उडता घेतील चव,
जातील तरंगत दूरवर,
उंच उंच, पुढे पुढे,
जिथे सूर्य असेल हसत
भाग्यवान द्वीपाकडे
जी द्विपे अशावेळी
असतात सुखात बुडालेली
प्रकाशाच्या पाळण्यामध्ये
गुडुप करून पहुडलेली.
आता पडतील कानावर
संगिताचे सुखद स्वर;
आणि गवताळ माळावरून
सरकू लागतील पुढेपुढे
नाचणाऱ्या आकृतींचे
लयबद्ध आराखडे
वियुक्तसे, प्रसन्नसे,
काही जातील उंच जागी

पोहण्यामधल्या आनंदात
काही बनतील सहभागी;
किंवा भरारी घेतल्यावर
हिंदोळतील हवेवर.
सौंदर्याचे नूतनीकरण
सगळे असतील साकारीत
आणि जातील आकाशात
ताऱ्याकडे हाकारीत.
मधुर आणि शालीन असे
त्याच्यामुळे होईल मन
आणि त्याच्यामुळे येईल
जीवनाला भरलेपण.

मेफिस्टॉफलीस तो झोपतो आहे, शाबास तुमची माझ्या बच्चांनो, फाकड्या पठ्ठ्यांनो
तुम्ही त्याला गुंगवून नेले आहे निद्रेच्या साम्राज्यात,
या संगीत कार्यक्रमासाठी स्वीकारा माझे हार्दिक आभार.
नरकाच्या स्वामीला बांधून ठेवणारा पहा हा शहाणा !
बुडवा त्याला स्वप्नांच्या सृष्टीत, करा मनोरंजन तुमच्या माकडचेष्टांनी,
टाका बुडवून अशा दर्यामध्ये जिथे येते कल्पनांना भरती.
आणि आता उंबरठ्यावरील इंद्रजाल भेदण्यासाठी
मला पुरे आहे उंदीरभाईचा एक दात.
नाही लागणार मला जरूरी लांबलचक मंत्रतंत्राची:
मी ऐकतो आहे एका घुशीची जवळच सुळसुळ, तीच करील काम.
माशा आणि बेडूक, ढेकूण आणि उवा,
घुशी आणि उंदीर, या सर्व प्राण्यांचा धनी
आहे करीत तुम्हाला आज्ञा पुढे सरसावण्याची
आणि दारावरील पवित्र प्रतीक बेफिकीरपणे कुरतडण्याची,
जिथे आहे त्याने माखलेले तेल तिथेतिथे.
एक घूस इतक्यातच आहे उडी मारून लागली कामाला;
आटप जलद आमचे काम ! तुझा स्वामी आहे पकडला गेला
त्या तेथील दूरच्या कोपऱ्यामध्ये, जिथे येतो टोकाचा बिंदू.
आणखी फक्त एक चावा, म्हणजे काम झालेच पुरे !
फाउस्ट साहेब, भोगा आता मधुर स्वप्ने, पुढच्या भेटीपर्यंत.

फाउस्ट (जागा होऊन)

काय आहे असा फसलो मी ! काय झाली विरून अदृश्य
निशाचर शक्तींनी निर्माण केलेली अप्रतिम दृश्ये;
काय माझा सैतान सुद्धा होता फक्त स्वप्नातला आभास,
आणि फक्त एक गरीब कुत्रेच आहे निसटून गेलेले !

फाउस्टची अभ्यासिका (३)

फाउस्ट मेफिस्टॉफलीझ

फाउस्ट कोण ठोठावतं आहे ? आत या !
कोण आणतं आहे हा व्यत्यय माझ्या विश्रांतीमध्ये ?

मेफिस्टॉफलीझ मीच आहे तो.

फाउस्ट आत ये !

मेफिस्टॉफलीझ मी असतो पहात वाट तिसऱ्या विनंतीची.

फाउस्ट मग, आत ये.

मेफिस्टॉफलीझ मला आवडते असलेच सुस्वागत !
आपला स्नेह झाला आहे प्रगत.
तुझीच उदासी घालवावी म्हणून
मी प्रगटलो शिलेदार बनून :
कोट असा भरलेला, लाल अंग, वर जर;
रेशमाचे भरतकाम पायघोळ डगल्यावर;
डोक्यावर पिसावाली टोपी ही अशी;
आणि कमरेला तलवार तिखटशी.
तुला माझा असा सल्ला; त्यात तुझेच हीत,
तुझ्याही पोशाखाची असू दे हीच रीत;
मग तू, अनुभवीत देवसदृश्य मुक्तता,
काढ हुडकून जीवनाच्या शक्यता.

फाउस्ट आमच्या या निरुंद वाटेवर गस्त घालणारे जीवनाचे दुःख
नाही येणार मला विसरता हा किंवा तो पोशाख घालून;
मी आहे फार वृद्ध नुसत्या क्रीडेमध्ये समाधान मानायला,
आणि वासनेच्या पीडेवाचून जगण्याच्या दृष्टीने फार तरुण.

कोणते समाधान देऊ शकते ही आपली उथळ दुनिया?
सर्वसंग परित्याग! माणसा, शीक परित्याग करायला!
हाच तो सर्व मंत्रातला शेवटचा महामंत्र,
जो दाखवील आपले सामर्थ्य आज ना उद्या;
हेच ते आपल्या सर्व स्वप्नात लपलेले संगीत,
आणि हाच तो प्रत्येक तासातला घोगरा आवाज.
आणि तरीहि उठल्याबरोबर प्रत्येक नव्या दिवसाचे दर्शन घेताना
मी थरकापतो आणि ढाळतो कडवट दुःखाश्रू,
उमजून मनाशी, त्या सूर्याच्या सर्व प्रदक्षिणेमध्ये
नाही दिसणार माझी स्वप्ने सत्यसृष्टीत आलेली, अगदी एकहि,
पाहून माझ्या आनंदाचे अंकूर खुरटून जाताना
संशयाच्या सावटामुळे, जाणीव झालेल्या मनातील हरळीमुळे,
पाहून एखाद्या उमद्या हृदयामधील सृजनाची उर्मी
पराभूत होताना जीवनामधील वेडावणाऱ्या काळज्यामुळे.
आणि जेव्हा वत्सल रात्र घालते पांघरुण अवघ्या पश्चिमेला
माझा अस्वस्थ आत्मा मागतो भीक उत्कट शांतीची;
असतो तरीहि पडलेला परित्यक्तसाच, कारण ती विश्रांतिहि
असते भंगलेली, मला दिसणाऱ्या स्वप्नातल्या ओसाडीने.
माझ्या हृदयाच्या सिंहासनावर बसलेला एक देव
करतो उत्स्फूर्त माझ्या अंतरातील दिव्य दृष्टीचे मूळस्रोत.
पण दुसरा, जो वापरतो माझे सामर्थ्य त्याच्या आज्ञेनुसार,
त्याच्यापाशी नसते सत्ता बाह्य वस्तूवर अंमल चालवणारी.
असे जीवनाने आहे शिकवले, या त्याच्या थकवणाऱ्या भारामुळे,
फक्त मृत्यूची वाट पहायला, करायला तिरस्कार आवडत्या प्रकाशाचा.

मेफिस्टॉफलीझ पण तरीहि अपरिचितसा मृत्यू दाराशी भेटल्यावर नसतो स्वागतार्ह!

फाउस्ट धन्य आहे तो माणूस, ज्याच्या वीर्यशाली भालप्रदेशावर
ऐन विजयाच्या उन्मादामध्येच मृत्यू घालतो रक्तांकित हार;
धन्य तो भावनिर्भर नर्तक, ज्याला दैवाकडून मिळते सवलत
मृत्यूला भेटण्याची आपल्या प्रेयसीच्या मिठीमध्ये असतानाच.
किती भले होईल, जर मला त्या भव्य शक्तीचे भेटेल सामर्थ्य
आणि बुडेल माझा आत्मा चिरंतन रात्रीमध्ये समाधिस्थ स्थितीत.

मेफिस्टॉफलीझ पण मध्यरात्रीच्या एका प्रहरी, फुकट दवडली गेली अशी एक संधी,
जेव्हा कुणीतरी ठेवली खाली एक कुपी, चव न घेताच!

फाउस्ट असल्या हेरगिरीनेच सर्वज्ञ बुद्धीला अवसान चढते वाटते ?

मेफिस्टॉफलीझ सर्वज्ञ ? छे, तो नव्हे मी, मी आहे फक्त बहुश्रुत.

फाउस्ट जर मला सुमधुर गीताच्या स्मृतिशेष प्रतिध्वनींनेच
असेल सोडवलेले गोंधळात पाडणाऱ्या आत्मिक चक्रव्यूहातून,
जर माझ्यामधून झंकारत गेलेली फसवी संस्मरणशक्ती
असेल छेडलेली माझ्या बाल्यामधील उरल्यासुरल्या अवशेषांनीच,
तर माझा शाप त्या सर्वांनाच–ज्यांनी आत्म्याला
केले मार्गदर्शन, कपटाने व विभ्रमाने ग्रासलेल्या स्थितीत,
ज्यांनी ज्यांनी ठेवले त्याला भयंकर बिळामध्ये
या अशा खुसखुशीत खुशामतीने भ्रांत बनवून.
हा माझा शाप त्या साऱ्या उदात्त हेतूंना
ज्यांच्या सहाय्याने मन घेते स्वतःला बांधून;
हा माझा शाप त्या आभासाच्या दुराग्रही देवतेला
जिच्यामुळे आपली पंचेन्द्रिये परस्परांमध्ये जातात मिसळून,
हा माझा शाप त्या फसव्या प्रतिष्ठेच्या मोहाला,
त्या कीर्तीला, जी शेवटी होत असते काळाला अमान्य,
अर्धांगी व अपत्य, नोकर व नांगर
या सर्व गोष्टी सुस्थिर समजणाऱ्या आपल्या जाणिवेला,
आणि माझा शाप त्या अभिमानाला, जो घडवतो
फाजील धाडसाची महान् कर्मे सुवर्णाच्या संचयासाठी,
आणि शाप सुवर्णाच्या हाताला जो असतो
करीत मांडामांड सुकोमल शय्येची सुखासीन भोगासाठी.
हा माझा शाप द्राक्षांच्या सौरभाला,
शाप प्रीतीच्या सुमधूर संगमोत्सवाला,
शाप आशेला, तिचीच बटीक्शी अशा श्रद्धेला,
आणि शाप सर्वांहूनहि अधिक या सहनशीलतेला.

निशाचरांचा वृंद (अदृश्य स्वरूपात) केवढे दुःख आणि निराशा !

आता तू केलेस नष्ट
अवघे सौंदर्याचे जग,
हवेमधून पडती खाली
लावण्याच्या ठिकऱ्या बघ !
अशी शक्ती तुझ्या हातात

निशाचर सुद्धा तिला भ्याले
तुझ्या दैवी शक्तीमुळे
सौंदर्याचे तुकडे झाले !
आम्ही दुःख करीत करीत
आहोत तेच तुकडे भरीत
अनंत अंशा ओसाडात !
हे पृथ्वीच्या प्रबळ पुत्रा
नाही पार्थीव तुझे कर
उठ दाखवीत आपले तेज
बांध आनंदाचे घर.
आपला आत्मा कर सबंध
कर त्याचे मंदिर पुरे
इंद्रियांच्या सौंदर्याचे
त्याच्यामधून वाहातील झरे.
उठ आणि सुरू कर
जीवनाचे नवे स्वर.

मेफिस्टॉफेलीझ

आहेत सर्व माझे
पाईक शेलके ते
चतुरा नि मुग्ध वाणी
ऐकून घे तयाते.
स्तविती अनंत ध्यासा
आनंद अन् कृतीला.
एकांत सोडुनी दे
पाहून घे जगाला.
या इंद्रियात जेथे
सुरक्त त्या सुखाचे
असते वाहोत तेथे
बोलाविती तुला ते.

जे दुःख गिधाडासारखे तोडते लचके तुझ्याच मनाचे
त्या तुझ्या रापणाऱ्या दुःखाशी चालणारा संवाद दे सोडून;
फक्त माणसांच्या संगतीतच लाभेल तुला विश्रांति,
आणि माणसांमध्येच तुझ्यातील मानव होईल प्रकट.
नाही यावरून मला आहे असे सुचवायचे

आम्ही आहोत तुला ढकलणार सामान्यांच्या कळपात.
मी नाही कोणी अद्वितीय अथवा सर्वोत्तम,
पण असलास माझ्या शब्दावर विश्वास ठेवणार
आणि असलास येणार माझ्याबरोबर, समान साध्यासाठी,
तर मी आहे तुझ्या सेवेसाठी सर्वस्वी तयार
ही अशी आहे माझी सूचना;
मी आत्ता आहे तयार तुझ्याबरोबर करार करायला :
ज्याची तहान तुला लागेल ते ते देईन मी,
त्या त्या प्रसंगातून पार पाडून तुला नेईन मी,
मी होईन तुझा साथी, मी असेन तुझा बंदा.

फाउस्ट आणि या सर्वाबद्दली काय लागेल मला द्यावे ?

मेफिस्टॉफलीझ काल सोडवू शकेल तो प्रश्न-घाई कशासाठी ?

फाउस्ट छे, छे, असला सैतान असतो अहंकेंद्रित,
तो देतो ते सहाय्य नसते दिलेले देवांच्यासाठी.
मांड तुझ्या अटी स्पष्ट स्वरूपात, अमुक अमुक :
असले नोकर घरात वावरणे असते धोक्याचे.

मेफिस्टॉफलीझ ठीक तर, इथे इहलोकी राहीन बनून तुझा सेवक
निरलसपणे तुझ्या यःकश्चितशा आज्ञेचे सुद्धा करीन पालन,
जर परलोकामध्ये पुन्हा आपली भेट झाल्यावर
तू देशील मला वचन माझ्यासाठी तसेच करण्याचे.

फाउस्ट मी नाही देत फारशी किंमत त्या परलोकाला;
प्रथम या जगाचा टाक करून विनाश, विध्वंस :
असे होईल तेव्हाच त्याची जागा भरण्यासाठी प्रकटले नवे जग.
पृथ्वीच्या मुळातूनच असतो उद्भवत माझा आनंद, माझी सुखे,
पृथ्वीचा सूर्यप्रकाशच पाहातो माझ्या हृदयातली दुःखे;
जर इहलोक सोडल्यानंतर ती असतील मला अंतरणार,
तर इतरांची कसली काळजी ? येऊ दे यायचे असेल ते ते.
मृत्यूनंतर आपण करू शकतो का द्वेष किंवा प्रेम,
किंवा दूरच्या त्या लोकामध्ये आपल्याला आढळते का
वस्तू खालच्या वस्तू वरच्या अशी जाणीव,
—या विषयाला आहेत मी माझे कान बंद केलेले.

मेफिस्टॉफलीझ नेमकी हीच वृत्ती पाहिजे असते या उपक्रमासाठी.
मी असाच येतो तुमच्याबरोबर, आपण बनवू या एक करारपत्र :
मी तुला घडवीन दर्शन कलांचे, सुखांचे, पूर्वी कोणत्याही
मर्त्य डोळ्यांना नसेल दिसले असे देईन काही.

फाउस्ट असे काय आहे, बिचाऱ्या सैताना, तुझ्याजवळ देण्यासारखे ?
तुझ्या जातकुळीने, समधर्मा समजून, कधी जाणले होते
उदात्त ध्येयवादाने भारल्या गेलेल्या माणसाच्या आत्म्याला ?
तुझी भाकर नाही करू शकत कधीही तृप्ती,
तुझे सोने असते जात सतत वितळून
पाऱ्याप्रमाणे, संग्राहकाच्या परिश्रमांना वेडावण्यासाठी;
तू दिलेली छटेल छोकरी माझ्या छातीशी करील लगट
पण तेही माझ्या शेजाऱ्याला डोळा घालून बोलावण्यासाठी.
असा आहे का तुझ्यापाशी खेळ, जो खेळतात फक्त गमावणारेच,
असे आहेत का प्रतिष्ठित ग्रह, ज्यांच्या प्रभावामुळे
पडतात स्वप्ने देवांना शोभणारी, फक्त शेवटी विरून जाण्यासाठी ?
तर मग दाखव मला वेचण्यापूर्वीच कुजणारी फळे,
किंवा झाडे प्रत्येक दिवशी पालवी बदलणारी.

मेफिस्टॉफलीझ या कार्याला मी डरण्याचे नाही आहे अल्पही कारण,
अशा ठेवणीतल्या गोष्टींचे दर्शन मी तुला घडवीन केव्हाही.
पण आता, माझ्या मित्रा, हा काल आहे परिपक्व
शांत अवस्थेत काही रुचकर सुखे आस्वादण्यासाठी.

फाउस्ट जर मी असेन शांत होणार सुखांच्या शय्येमुळे
तर तोच क्षण ठरू दे माझ्या जीवनातील शेवटचा !
जर मोहविणारी तुझी असत्ये शकली सुखवू,
आणि शमवू, माझ्या आत्म्याला स्वसंतुष्ट होइपर्यन्त
आणि जर त्यांच्यामुळे मी बनलो विषयांचा भक्त
तर खुशाल घे माझा आत्मा, कारण मला असेल मरण्याचीच इच्छा
आणि हीच आहे माझी पैज !

मेफिस्टॉफलीझ कबूल !

फाउस्ट आणि कबूल आहे मलाहि !
जर पळणाऱ्या त्या क्षणाला मी म्हटले

‘ थांब जरासा, इतका आहेस तू विलोभनीय, थांब जरासा ’
तर मला टाक बांधून तुझ्या प्राणान्तक साखळदण्डानी,
कारण असेन त्या दिवशी मीच नष्ट झालेला.
त्या दिवशी वाजणारी घंटा वाजेल माझ्यासाठीच;
तेव्हा होशील तू विमुक्त, तुझी सेवकवृत्ती जाईल संपून.
मात्र माझ्यासाठी थांबेल घड्याळ, विनाशाकडे ओढण्यासाठी,
आणि ती कालातीत रात्र लागेल उतरू माझ्या आत्म्यावर.

मेफिस्टॉफलीझ आणि हे सर्व राहील आपल्या स्मरणामध्ये, व्हा सावध !

फाउस्ट माझ्या अभिवचनाचा हा अर्थ आहे यथायोग्यच.
मी करीन म्हणतो, ते नसते वरवर म्हटलेले :
मी जिवंत असणे म्हणजेहि आहे गुलामीत राहाणे,
मग ती तुझी की दुसऱ्याची, याबद्दल कसली खंत ?

मेफिस्टॉफलीझ आज रात्री मी हजर असेन, आपल्या सेवेला, जेव्हा आपण
इतर पण्डितांबरोबर महाविद्यालयीन सहभोजनात व्हाल सहभागी.
पण—जीवन, किंवा मरण हेच पैजेवर लागले असल्यामुळे
मी आणीन आपल्या परवानगीने, आपल्या सहीसाठी दोन ओळी.

फाउस्ट अस्से, तुला पाहिजे पांढऱ्यावर काळे ? भल्या विद्वाना,
नाही का कळत एखादा माणूस आपला शब्द पाळू शकतो हे ?
काय एवढे नाही पुरेसे, मी बोललेला प्रत्येक शब्दच
टाकतो गुंफून माझे सगळे दिवस, देतो जाग निरंतर आठवणीची ?
बदलत्या महापुरांनी ही दुनियाहि जाते भंगून
आणि मला निबद्ध करण्यासाठी तू योजतोस छोटेसे प्रतिज्ञापत्र.
आणि तरीही असला दंडक—किंवा स्वप्न—पाहिजे मानले
आपल्या हृदयाने, तोच असतो इमल्याचा आधार.
धन्य तो मानव जो राखतो आपले ब्रीद लांछनावाचून
त्याचा त्याग नाही होत कधीही निष्फळ.
असे असले तरी, सहीशिक्का असलेले एखादे चर्मपत्र
हे असते भयंकर बुजगावणे अतिरथींना शरण आणणारे.
शब्द नाहिसा होतो, लेखणीमध्ये उतरत असतानाच,
आणि मग मेण व कातडे यांचाच अम्मल चालतो माणसांवर.

तेव्हा बोल, पापी निशाचरा, काय आहे तुझी इच्छा :
चामडे, पितळ की संगमरवर—कशावर आहे तुझी मर्जी ?
आणि बोल कशाने लिहू मी—कोरूने, पराने की कोरणीने ?
पहा किती देतो मी विकल्प : निवड आवडेल ते !

मेफिस्टॉफलीझ काय जरुरी तुझे वक्तृत्व इतके तापवायची
त्या बाबींची अतिशयोक्ती करून, निव्वळ अभिमानामुळे,
जर कोणताही कागदाचा तुकडा असू शकतो तितकाच चांगला :
मात्र सहीसाठी, आपण वापरूया थोडेसे रक्त.

फाउस्ट जर त्यामुळे लाभणार असेल तुला काही विशेष समाधान
तर मीही या तुझ्या मुखवट्यांच्या खेळात होईन सहभागी.

मेफिस्टॉफलीझ रक्त हा असतो एक अगदी अजब रस.

फाउस्ट मी करीन करारांचा भंग, नको बाळगू अशी भीती
कारण माझी सर्व शक्ती आहे सामावली माझ्या प्रतिज्ञेमध्ये,
आणि तिची पूर्ती करणे हाच राहील माझा ध्यास.
मी गेलो आहे मोठ्या आकांक्षामागून, स्वतःला खुषवीत, भाबडेपणाने,
पण खरोखर माझा दर्जा नाही आहे तुझ्याहून वरचा.
शक्तिमान् चैतन्याने लाथाडली माझी दुबळी निराशा,
आणि निसर्गाने त्याचे पवित्र दरवाजे माझ्यासाठी केले बंद.
माझ्या विचारांचे सूत आहे या अवहेलनेने तुटून गेलेले,
मी विटलो आहे, कधीपासून उठलो आहे या सगळ्या विद्वत्तेविरुद्ध :
तर मग चला आता टाकूया बुडवून जळत्या वासनेचे हे दुःख
वैषयिक सुखोपभोगाच्या मुलायम डोहात.
पडू देत बाहेर आता तुझे ते बुरखानशील चमत्कार
दाखवू देत किमया नागड्या अवस्थेत आमच्या नजरेला.
चला आता मारूया सूर पुढे धावणाऱ्या काळाच्या कल्लोळात
जाऊया हेलावत प्राप्त परिस्थितीच्या घसरत्या लाटेवरून.
आता कर पुढे दुःखाची किंवा सुखाची फुले,
मधुर विजयाचे ते विलोभन, किंवा निराशेचा तो उद्वेग;
अस्वस्थ करणारी अशी आंच हवीच असते माणसातील गतीतत्त्वाला.

मेफिस्टॉफलीझ तुला लाभेल धनदौलत, कुणाच्याही भीतीशिवाय किंवा कृपेशिवाय,
घे भोगून आपले विषयोपभोग प्रवासीवृत्तीने,
सगळ्यामधील विषयोत्सुक सौंदर्याची घे चव,
आणि भोगलेल्या या सुखांवर होत राहूदे तुझी भरभराट.
मी सांगतो, कर सुरवात; पण बुडी मार, नको राहू लाजून वरवर.

फाउस्ट तू नाही का ऐकलेस मला ? मी नाही मागितले सुख.
मी आहे चोखाळतो मार्ग संघर्षप्राप्त कडुशार लाभाचा,
प्रेमवेड्या विद्वेशाचा, दुःखाच्या बदलीमध्ये घेतलेल्या सजीवतेचा.
विद्वत्तेच्या जुलमी सत्तेपासून विमुक्त झालेले माझे हृदय
नाही यापुढे टाळणार आपत्ती, तर उचलील आपला वाटा
मानवतेच्या सगळ्या काही हालअपेष्टामधून,
राहील पोशीत स्वतःच्या आत्म्यामध्ये मानवाची व्यथा.
गाठील तळ मानवी ज्ञानाच्या खोलीचा, उंचीचा,
माझ्या आत्म्याभोवती पडेल पीळ मानवांच्या आत्म्यांचा,
चढवीन भार माझ्या आत्म्यावर त्यांच्या वैभवाचा, त्यांच्या विपत्तीचा.
होईन सहभागी त्यांच्याबरोबर मानवजातीच्या या नौकाभंगामध्ये.

मेफिस्टॉफलीझ ऐक माझे, मी आहे युगायुगातून भ्रमंती केलेला;
आणि हेच बेचव खाद्य आहे चघळीत वर्षानुवर्षे :
पाळण्यातल्यापासून तिरडीपर्यंतचा कोणताहि मर्त्य,
नाही पचवू शकत हा कडू लगदा; फक्त परमेश्वरच
ठेवू शकतो हा एकात्मतेचा असला भाव : शाश्वत प्रकाशाच्या
प्रखर स्रोतामध्ये तो पाहू शकतो प्रशांत असा एक संबंध,
पण आम्हाला तो नेत असतो खडतर अशा अंधाऱ्या मार्गावरून,
आणि भंगलेल्या तुमच्या दिवसामध्ये
असते उभी फक्त रात्र.

फाउस्ट आणि तरीसुद्धा मी घेतला आहे निश्चित निर्णय.

मेफिस्टॉफलीझ तर मग उत्तम
आणि तरीहि अशी एक भीती नाही अनाठायी—
कारण, काल अल्प कला अमाप—मला वाटते
कदाचित् तुम्हाला होईल त्रास विश्वासू मार्गदर्शक न मिळाल्याने.

महाशय, संगतीसाठी आपण निवडा एखादा कवीच,
आणि करू दे त्याला संचार कल्पनेच्या साम्राज्यात,
धुंडु दे त्याला उदात्त ज्ञानाची प्रत्येक उपशाखा,
आणु दे जमवून नावाजले जाणारे सगळे गुणविशेष
या आपल्या सुप्रसिद्ध डोक्यावर मोठेपणाचा मुकुट घालण्यासाठी :
सिंहाची छाती,
धावत्या हरणाचे ते चापल्य,
इटलीतील आग, ज्यातून वासनेच्या उडतात ठिणग्या,
उत्तरेकडील माणसाच्या मनाची सहनशक्ती.
तो शिकवू शकेल अनेक गुह्ये, त्यातील पहिले—
कसे करावे बेमालूम मिश्रण फसवणूक आणि औदार्य यांचे,
आणि एखाद्या विषयी माणसाला शोभेलशा आवेशाने
कसे आपण पडावे प्रेमामध्ये—पूर्वकल्पित संकल्पानुसार.
जर सेवेला मिळता असा कोणी ! लगेच करतो त्याची नेमणूक.
आणि त्याला असते संबोधले ' श्री विश्वमूर्ती ' अशा अभिधानाने.

फाउस्ट मग आहे मी कोण, समजा एखाद्या वक्री ग्रहाने
जर मानवाचा हा यशोमुकुट दिला ठेवून माझ्या आवाक्यापलीकडे
आणि वेडावले माझ्या इंद्रियांनी वांछित आनंदाला ?

मेफिस्टॉफलीझ तू असशील सरते शेवटी जसा आहेस तसाच:
घाल डोक्यावर कुरळ्या केसांचा ढंगदार टोप.
चढ पांडित्याच्या घोडेकाठ्यावर, मोठेपणाचा आव आणण्यासाठी;
पण तरीसुद्धा तू असशील एक प्राणी जसा आहेस तसाच.

फाउस्ट आहे उमजलो. वृथाच केली मी जमवाजमव मानवी संपत्तीची
ह्या सगळ्याची, मर्त्य मानवाला उपलब्ध होणाऱ्या:
आता आहे सरतेशेवटी मी काढले माझे मोजमाप,
केले आकलन माझ्या हृदयातील वांझ वाळवंटाचे,
मी नाही मला उंचावले बिचाऱ्या एखाद्या अंशानेसुद्धा
किंवा नाही थोडाहि गेलो अनंताच्या जवळ.

मेफिस्टॉफलीझ अहो महाशय, तुम्ही सुद्धा, मला वाटते
असता पहात सगळ्या गोष्टीकडे इतरेजनाप्रमाणेच;
पण आपण, काळजी करण्यात चतुर असणारानी,
पाहिजेत झेलली आपली सुखे ती हरपण्यापूर्वी.

भल्या माणसा ! जळूदे सगळे; हे हातपाय
हे डोके, ही पाठ—ही सर्व आहेत तुझीच;
आणि जीवन मधुर असताना जे असते आपणाला लाभत
तेच नेमके आपले नाही असा असतो चालत पुकार ?
पहा, सहा घोडे ठेवण्याची ऐपत असेल माझ्यापाशी
तर नसेना त्यांची शक्ती माझ्या मालकीची ?
खिलाडू शिलेदार या भूमिकेत मी राहातो सदाचा उधळत
जणू त्यांचे ते पाय असतात बनलेले माझेच अवयव.
मग ऊठ तर ! दे सोडून चिंतन या इथेच,
आणि माझ्याबरोबर कर सफर अवघ्या दुनियेची !
मी सांगतो तुला: तो तुझा रापणारा तत्त्वज्ञ
असतो जनावरासारखा फिरत वर्तुळाकार, वर्तुळाकार, वर्तुळाकार,
दुष्ट पिशाच्चाने फिरविल्याप्रमाणे, उजाड माळावर
थोडक्यात हुकलेल्या अगदी लगतच्या हिरव्या कुरणाजवळील.

फाउस्ट मग सांगा तर, कशी करायची आपण सुरवात.

मेफिस्टॉफलीझ निघा बाहेर, या माझ्या बरोबर !
का कवटाळता विद्वत्तेच्या या होतात्म्याला ?
त्या विद्यार्थ्यांना नाकासमोर चालवीत बसण्यापेक्षा
आपल्यापुढे आहेत मनसुबे अधिक उद्दीपक;
सोपवा ते काम आपल्या शेजारच्या पंडित पोट्यांकडे !
काय काथ्या कुटीत बसण्याचेच तप आहे तुम्ही अंगिकारलेले ?
आपल्या ज्ञानातील जे असते खरोखर मूल्यवान
ते नाही आपल्याला सांगता येत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना.
आणि नेमकी तशाच विद्यार्थ्यांची लागते आहे चाहूल, तिथे, बाहेर.

फाउस्ट छे, छे, माझा दरवाजा आज आहे त्याला बंद !

मेफिस्टॉफलीझ तो थांबला आहे खूप वेळ, नाकारावे म्हटल्यास.
बिचारा बच्चा, रिकाम्या हाताने कसे पाठवायचे त्याला परत ?
द्या मला तुमची टोपी आणि अंगरखा, अगदी झटकन्,
मी दाखवीन माझी चमक हा पोशाख घालून;
आणि तसे करताना राहीन विसंबून माझ्याच हुषारीवर.
एक अर्धी घटका—बस्, एवढीच लागणार मला,

आणि तितक्यात तुम्ही करा प्रवासाची तयारी शक्य त्या त्वरेने.

(फाउस्ट निघून जातो)

मेफिस्टॉफलीझ (फाउस्टच्या पायघोळ अंगरख्यात)

असो तू आता करशील हेटाळणी ज्ञान आणि शहाणपण याची;
ज्या सर्वश्रेष्ठ शक्तींच्यामुळेच मर्त्य मानवाचा होतो अभ्युदय.
असत्यांचा हा सम्राटच आता आहे तुझा उपदेशक,
तो आहे पुरवणार तुझ्यासाठी इंद्रजालाचे सगळे आभास.
आता आहे तो माझाच, अगदी कसल्याहि हरकतीशिवाय,
कारण नियतीनेच त्याच्या अंतःकरणात आहे घुसवली एक चेतना
जी झपाटल्यागत त्याला नेते हाकून पुढे पुढे, दम न घेता.
जिच्या कडेलोटक आणि अविचारी अशा आदेशाची
पडते झेप पृथ्वीवरच्या नैसर्गिक सुखांना आचवून पलिकडे.
त्याला आता पहा चांगलाच नाचवून दाखवतो मी,
रानटी जीवनाच्या चिखलाने बरबरटलेल्या विविध वाटांवरून,
घुसमटवून टाकणाऱ्या मूल्यविहीन कर्मांमधून.
त्याला उमगून येईल, घासाघीस करून ठेवलेला व्यवहार
शेवटी त्याला ठेवील अवाक, तळमळत, रुतलेला;
त्याच्या ओठापुढून जातील तरंगत सुग्रास पक्वान्ने
फक्त वेडावण्यासाठीच त्या त्याच्या अधाशी वासनेला.
वृथाच राहील तो ओरडत समाधानासाठी या दुरावस्थेत.
सैतानाचे हे सामर्थ्य तो मान्य करो अथवा न करो
त्याच्या विनाशाचा अटळ निर्णय आहे मिळालेला सरते शेवटी.

(एक विद्यार्थी प्रवेश करतो.)

विद्यार्थी नुकताच आलो इथे, आणि, आचार्य, तसाच थेट
आलो आपल्यापुढे, एक छात्र म्हणून
मोठ्या भक्तीभावाने अध्ययन करण्यासाठी आपल्या पायाशी,
ज्यांची कीर्ती आहे पसरली अवघ्या पृथ्वीतलावर.

मेफिस्टॉफलीझ झाला आहे माझा बहुमान सुप्रतिष्ठित शब्दातील या प्रशंसेने;

पण गृहस्था तुला दिसणारा हा माणूस आहे इतरांसारखाच:
काय केला आहेस असाच प्रयत्न पूर्वी दुसरीकडे.

विद्यार्थी मला पाहिजे आहे चांगले मार्गदर्शन, आणि म्हणून आलो आपल्याकडे,
मी आलो आहे साठवून हृदयात निश्चय व धैर्य
आणि आणली आहे माझ्याबरोबर पुरेशी गुरुदक्षिणाहि;
माझ्या आईने फार विनविले मी जाऊ नये म्हणून;
पण मला आहे आता आशा जाणण्यासारखे काही मिळण्याची.

मेफिस्टॉफलीझ फारच छान, तू आहेस आता उभा विद्वत्तेच्या प्रत्यक्ष मार्गावरच.

विद्यार्थी आणि तरी सुद्धा माझे अर्धे मन होते विचलित परत जाण्यासाठी;
तो भिंतींनी वेढलेला चौक, ते महाविद्यालयाचे अंधारे सभागृह,
तिथे झालेली आमची गर्दी, जागेसाठी चेंगराचेंगर करणारी;
या ठिकाणी नाही सापडणार एकहि वृक्ष, एवढीसुद्धा हिरवळ;
मी आपला असतो बसलेला पांडित्यप्रचुर सभागृहात,
श्रवणाला, दृष्टीला आणि संज्ञेला पारखा होऊन.

मेफिस्टॉफलीझ ती गोष्ट असते फक्त नुसत्या सरावाची.
कदाचित्, सुरवातीसुरवातीला बालकहि असेल स्तनाग्र नाकारीत,
पण लौकरच त्याला होते सुख आपली चिमुकली तहान शमवताना;
आणि असाच प्रत्येक दिवशी तुझाहि उत्साह जाईल बळावत
अत्यंत उपकारक अशा विद्येचे स्तनपान करताना.

विद्यार्थी किती धन्य होईल माझे मस्तक तिच्या हृदयावर विसावू शकले तर!
पण कसे तिला हुडकायचे ? गुरुजी, दाखवा मला मार्ग.

मेफिस्टॉफलीझ प्रथम हे सांग, माझे विचार समजून घेण्यापूर्वी,
कोणत्या ज्ञानशाखेची तू आहेस करणार निवड ?

विद्यार्थी माझ्या मनाने आहे ठरवले निसर्गाच्या आदितत्त्वांचे
मूल्य हुडकायचे, स्वर्गामधल्या आणि पृथ्वीवरील,
आणि विज्ञानाच्या प्रत्येक साधनाचे संशोधन करायचे,
माझ्या मनाचे संपूर्ण समाधान होईपर्यन्त.

मेफिस्टॉफलीझ अगदी उचित आणि यथायोग्य असा उपक्रम,
मात्र कर बाह्य व्यवधानापासून मनाचे रक्षण.

विद्यार्थी माझ्या अध्ययनातच असेल माझे हृदय व आत्मा.
पण तरीहि, मी कबूल करतो, मला आवडेल
उन्हाळयाच्या दिवसांत एखाद दुसरी चक्कर मारायला,
थोडासा वेळ सूर्यप्रकाशात स्नान करण्यासाठी.

मेफिस्टॉफलीझ बाबा, नको करू काळाचा दुरुपयोग: काळाची गती असते कल्पनातीत;
पण पद्धती शिकवते त्याचा कसा करावा काटकसरीने वापर.
म्हणून माझा हा पहिला सल्ला : कर अवगाहन,
पहिल्या प्रथम आपल्या महाविद्यालयीन तर्कपद्धतीचे;
त्यातील कठोरपणा तुझ्या मनाला घालील निर्बन्ध,
धार्मिक दंडाल्याच्या पाय ठेचणाऱ्या पादत्राणाप्रमाणे,
शिकवील त्याला बुद्धीच्या बरोबर कसे चालावे ते,
देईल सहजशिक्षण योग्य सदर्भात विचार करण्याचे,
अनिर्बंधपणे संचारणाऱ्या दलदलीतल्या दिव्याप्रमाणे
हवे तसे हवे तिथे न वावरू देण्याचे.
मग तुला येईल उमगून अध्ययन सुरू झाल्यावर
खाणे, पिणे, या सारख्या साहजिक प्रक्रिया
आणि कर्मे ही सुद्धा असतात अनिर्बंध,
असतात तीहि नियमित झालेली त्रैराशिकानुसार.
हे पाहिजे लक्षात घेतले, विचाराचे हे वस्त्रहि
असते एखाद्या विणकऱ्याने विणलेल्या अत्युत्तम सणंगाप्रमाणे:
नाही आदळत कधीहि थांबलेला अस्वस्थ धोटा,
असते धावत अदृश्य सुत एका टोकाकडून दुसऱ्या टोकाकडे,
पण एकाच पदयंत्राचे चालते नियंत्रण सगळ्या दोऱ्यावर,
आणि एकाच दणक्याबरोबर हजारो धाग्यांचे लागते लग्न.
म्हणूनच तत्त्वज्ञ सरसावतात पुढे
मुळापासूनच सर्व वस्तूंची होते सुरवात
ही गोष्ट निर्विवादपणे सिद्ध करण्यासाठी !
पहिली व दुसरी या गोष्टी निश्चित केल्यावर
येतो काढता तिसरी व चौथी या विषयीचा निश्चित निष्कर्ष,
आणि जर दुसरी नसेल, किंवा पहिली,
तर तिसरी किंवा चौथी नाही करता येत कधीहि निर्माण.
पंडित प्रशंसितात ही पद्धति, पकडतात घट्ट,
विणकऱ्याप्रमाणे, जरी त्याना नसते काही विशेषसे महत्त्व.

निश्चित स्वरूपात जिवंत वस्तूंचे वर्गीकरण करताना
आपण असतो त्यातून वगळीत जिवंत चैतन्यालाचः
आपल्या तळहातावर असतात हजर सर्व घटक
फक्त तिथे नसती सजीवतेचा दुवा, आपण वगळलेला.
ह्या गमतीच्या आत्मोपहासाला, पंडिती प्रबंधानुसार
रसायन शास्त्रज्ञ असतात म्हणत निसर्गगर्भ कायाकल्प.

विद्यार्थी माफी मागतो मी, पण मला नाही काहीहि समजले.

मेफिस्टॉफलीझ सुधार स्वतःला, मग लौकरच मी देऊ शकेन ते समजावून.
सुबुद्ध आज्ञापालनातूनच, क्रमाक्रमाने तू शिकू शकशील
सुव्यवस्था लावायला आणि तदनंतर वर्गीकरण करायला.

विद्यार्थी अहो, आचार्य, तुमचे ते बोलणे ऐकून वाटले मला भोवळल्यासारखे,
चक्कीच्या चाकाप्रमाणे ते फिरते आहे माझ्या डोक्यामध्ये.

मेफिस्टॉफलीझ आणि दुसरी गोष्ट, जी आहे सगळ्यात महत्त्वाची,
तू पाहिजेस पाडला फडशा त्या अतिविज्ञानाचा.
कोणत्या गोष्टी मानवी मेंदूशी नसतात जमण्यासारख्या
हे पाहिजे तू पाहिलेस अगदी स्वच्छपणे, गहन अवगाहनानंतर;
पण जमूद्यात अथवा न जमूद्यात, का करावी उगाच डोकेफोड ?
त्याच्या ऐवजी वापर एखादा अगडबंब शब्दप्रयोग.
पण तत्पूर्वी, अहो महाशय, एक चांगले अर्धे वर्ष
पाहिजे केला करून अभ्यास पद्धतिशास्त्राचा.
दैनिक कार्यक्रमामध्ये तुम्हाला लागतील ऐकावी व्याख्याने —
आणि त्यावेळी येऊदे दिसून आपला वक्तशीरपणा.
प्राध्यापकाला ऐकण्यापूर्वी असूदे चांगली तयारी केलेली,
अहो महाशय नका दुर्लक्षू कोणताही परिच्छेद !
आणि मग लवकरच तुम्हाला येईल कळून
प्राध्यापक नाही कधीही ढळत आपल्या पुस्तकापासून.
पण तरीहि, तुम्ही महाशय, ध्याच उतरून अक्षरन् अक्षर
जणू काय तो परमेश्वरच बोलत असल्याप्रमाणे.

विद्यार्थी मला गुरुजी एकच पाठ दुसऱ्यांदा सांगण्याची
नाही आवश्यकता : मी ओळखू शकतो त्याचे महत्त्व
कारण, आम्हाला मिळालेली लेखी स्वरूपातील कोणतीहि गोष्ट

असते आमचीच, बरोबर नेण्यासाठी, आपलीच म्हणण्यासाठी.

मेफिस्टॉफलीझ पण मित्रा, आता आहे आपल्याला निवडायची तुझी शाखा.

विद्यार्थी मला कायदेशास्त्र कितपत रुचेल याबद्दल आहे मीच साशंक.

मेफिस्टॉफलीझ मी समजू शकतो ही साशंकता.
जाणकार असूनहि, मी सुद्धा थबकेन थोडासा.
इतकी असतात त्याची ती विधेयके, ती कलमे, ते हक्क,
ही कायद्याची साथ पसरते, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणाकडे,
आणि एखाद्या हळूहळू पछाडणाऱ्या आनुवंशिक रोगापेक्षाहि
एका पिढीला दुसऱ्या पिढीशी टाकते जखडून.
मूळच्या अर्थाचा बनतो अनर्थ, दानधर्माची होते अडगळ,
आणि वकिलांनी ठरवलेल्या मुदतीबद्दल देवू लागतात नातवंडे शिव्या.
स्वातंत्र्यजन्य हक्कांचा, निसर्गप्रणीत कायद्यांचा,
या विद्वान मंडळींनी नसतो केलेला काडीमात्र विचार.

विद्यार्थी या विषयाबद्दल वाटतो द्वेष, हे तुमचे शब्द ऐकल्यावर,
किती धन्य आहेत ते विद्यार्थी जे येतात आपल्या दाराशी !
कदाचित् अध्यात्मशास्त्राचे असेल महत्त्व याहून अधिक ?

मेफिस्टॉफलीझ मला होईल फार दुःख जर तू गेलास चुकीच्या मार्गाने,
त्या ज्ञानक्षेत्राची निवड करणाऱ्या महत्त्वाकांक्षी मंडळींना
नाही उमगत वाटेतील खाचखळ्गे, फाजील आत्मविश्वासामुळे.
कडवेपणामध्ये असते असे काही द्रव्य लपलेले
त्यातील औषधीपासून त्यातील विष वेगळे काढणे जाते कठीण !
म्हणून आपला एकाच प्राध्यापकाला रहा कसा निरंतर चिकटून,
आणि गुरुमुखातील प्रत्येक शब्द मान शिरसावंद्य.
सारांश तू आपली सगळी भिस्त ठेव शब्दावर, आणि मित्रा,
मान शब्दांनाच तुझे आधारस्तंभ, म्हणजे आपोआपच
तू पोचशील निश्चिततेच्या महान् मंदिराप्रत सरतेशेवटी.

विद्यार्थी पण, आचार्य, असतो शब्दामध्ये काहीतरी अर्थ
हे असेल आपणासही कबूल.

मेफिस्टॉफलीझ वा अर्थातच, कबूल, कबूल.

पण नको बाळगू तो अर्थ अप्रिय ठरण्याची कसलीहि भीती;
कारण झाल्यास तुमच्या अर्थाला जडत्वाची बाधा
शब्दच येतात पुन्हा धावून तुम्हाला वाचवण्यासाठी :
त्या शब्दांची भरती केल्यास तेच लढतील तुमच्या लढाया
किंवा तुम्हाला पुरवतील एखादे विश्वात्मक तत्त्वज्ञान.
एवंच आपल्यासाठी शब्दच घेतील संप्रदायाची जागा,
ज्यांच्यामधील प्रत्येक अक्षरही असेल त्रिकालाबाधित.

विद्यार्थी माफ करा मला, प्रश्न विचारून आणखी आपला वेळ घेतल्याबद्दल
आणखी एवढी द्या सवलत एक प्रश्न आपल्यापुढे मांडायची :
समजा जर मी केली वैद्यकाची निवड, तर त्यावरील
मला पाहिजे आपले मत आणि सूचनाहि.
परमेश्वराला ठाऊक, कसा आहे घाबरतो मी या विषयांना,
तीन तोकड्याशा वर्षांमध्ये ते सगळे असतात कोंबायचे,
पुसट कल्पना दिलीत तरी सुद्धा तेवढ्याने मला दिसेल मार्ग

मेफिस्टॉफलीस (बाजूला)

आता पुरे झाला हा माझा प्राध्यापकी आव,
आता आली वेळ माझे असे काही खास सांगण्याची.
(मोठ्याने) हां वैद्यक ! त्यांत नाही दिसत कसलीच तकलीफ.
आपण करा अभ्यास मानवी जीवनाचा, आपल्या मर्जीप्रमाणे,
मग सरतेशेवटी लहानथोरांचे होवो काहीहि परमेश्वरी इच्छेनुसार;
व्यर्थ आहे हे परिभ्रमण शास्त्रांच्या शोधार्थ,
कारण होऊ शकते माणसांना ज्ञान मानवाच्या कुवतीनुसारच;
पण जो करतो प्रत्येक क्षणाचा उपयोग नफ्यासाठी
तोच पाहिजे आपण मानला जातिवंत मनुष्य.
आणि ज्याअर्थी तू आहेस आकर्षक बांध्याचा
त्या अर्थी आहे तुला अधिकार आगावूपणा करण्याचा.
अशाप्रकारे आत्मविश्वासाने ओतप्रोत भरल्यावर
तुला दिसेल सर्व लोकांचा तुझ्यावरती विश्वास बसलेला.
कसे असते बायकांना हाताळायचे, ते शीक, तेवढी काळजी घे,
कारण त्या सुकुमार जातीला
सतावीत असणाऱ्या सर्व दुःखावर आणि निःश्वासावर

इलाज करण्याचे एक हृदलेस्थान असते ठाऊक प्रत्येक डॉक्टराला.
शय्यासुलभ शिष्टाचाराने वाटतो विरंगुळा त्यांच्या हृदयाला,
आणि मग त्या असतात तुमच्याच उपचारासाठी, तुमच्या इच्छेनुसार
तुमच्या नावापुढील अक्षरांच्या माळेवरून पटते खात्री
तुम्ही बरोबरीच्या इतर लोकांहून वरचढ आहात अशी,
आणि म्हणून तुम्हाला लाभते त्यांच्या अनुग्रहाची उघडी शिकार
जिथे चोरपावलांनी पोहोचण्यासाठी इतर पुरुषांना लागतात वर्षे.
कसे करावे गोड स्पर्श तिच्या नाडीला, ते शीक,
आणि नंतर, पेटत्या डोळ्यांचा पण सभ्यसा चेहरा ठेवून,
कसे घालावे आपले हात त्या तिच्या निमुळत्या कमरेभोवती
तिचा पट्टा किती घट्ट आहे ते तपासण्यासाठी.

विद्यार्थी ह्याला आहे काही अर्थ! स्वतःचा मार्ग स्वतःला सापडणे
हे असते किती भाग्याचे.

मेफिस्टॉफलीझ सगळे सिद्धान्त, माझ्या मित्रा, असतात म्हातारे
पण जीवनानंदाचा सोनेरी वृक्ष असतो चिरतरुण.

विद्यार्थी गुरुजी, आपले शब्द मला भासतात एखाद्या स्वप्नासारखे.
अशी भेट पुन्हा घेण्याची आपण द्यावी मला परवानगी,
प्रज्ञानाच्या पायापाशी अधिक परिपूर्णपणे अध्ययन करण्यासाठी.

मेफिस्टॉफलीझ जे काही असेल माझ्यापाशी, ते आहे आपण घेण्याकरताच.

विद्यार्थी आले आहे माझ्या जिवावर हे निरोप घेणे,
एक एवढी कराच कृपा आपण माझ्यासाठी :
या माझ्या पुस्तकावरती आपण द्या आपले हस्ताक्षर.

मेफिस्टॉफलीझ अगदी आनंदाने.

(पुस्तक घेऊन त्यात लिहितो, आणि नंतर परत करतो.)

विद्यार्थी (वाचीत)

प्रतिदेवो भविष्यसि त्वं सदसद्ज्ञानभूषितः !

(पुस्तक भक्तिभावाने मिटतो, आणि नंतर समारंभपूर्वक निरोप घेतो.)

मेफिस्टॉफलीझ (एकांत स्थितीत)
चल माझ्या या सर्पबंधूने सांगितलेल्या म्हणी मागून
देवसदृश ज्ञानाच्या या स्वप्नातून तू उठशील
भीतिग्रस्त होण्यासाठी, जेव्हा तुझा प्रत्यक्ष आत्मा असेल थरकापत.

फाउस्ट (प्रवेश करीत) कोणच्या मार्गाने जायचे आपण ?

मेफिस्टॉफलीझ कोणच्याहि मार्गाने, तुला आवडेल अशा,
खुष्कीने वा दर्यावरुन, उच्च आणि नीच दोन्हीहि पहाण्यासाठी.
केवढ्या आनंदाने केवढा कल्पनातील लाभ लुटीत लुटीत,
तू भोगशील हे सगळे लोभस पापाचार.

फाउस्ट दाढी वाढवलेली, केस पिकलेले, असा मी; मला वाटते
नाही माझ्याजवळ उडी ठोकायला लागणारा उमदेपणा;
माझ्या यशाविषयी मी आहे आत्यंतिक साशंक,
मी आहे फारच उणा मधुर प्रियालापात.
इतर लोकांसमोर मला पुष्कळदा भरते कापरे,
आणि असा भांबावून जाऊन मी निश्चितच होणार अपेशी.

मेफिस्टॉफलीझ लौकरच होईल तुझ्यात सुधारणा, अस निश्चित,
एकदा तुझा धीर चेपल्यावर तू शिकशील जीवनाची कला.

फाउस्ट या प्रवासाचे कोणते साधन तू आहेस मनात योजलेले ?
कुठे आहे तुझा रथ, तुझे नोकर, तुझे घोडे ?

मेफिस्टॉफलीझ मित्रा, हा अंगरखा मी फक्त पसरण्याचा अवकाश
तो नेईल आपणा दोघाना आपल्या इच्छेनुसार हवाई मार्गावरून.
बरोबर घ्यायच्या सामानाविषयी नको करू फारशी चिंता
या असल्या धाडशी सफरीला नाही लागत सामान्य गरजा.
एक अग्निबाण मी आहे साठयात ठेवलेला आपणा दोघांना
पृथ्वीवरून उचलण्यासाठी, सामर्थ्यसंपन्न उंच परिभ्रमणासाठी.
आपले सामान थोडे असल्यामुळे आपण चढू अधिक जलदीने;
तुझ्या नवीन जीवनक्रमाबद्दल त्रिवार अभिनंदन !

लिपझिग्मधील आरबाखचे तळघर (गुत्ता)

मद्यपान समारंभ

फ्रॉश काय कोणालाच नको दारू ?
ही जागाच आहे एखाद्या भकास भोकासारखी.
आपला चेहेरा उदास करण्यात असतो सद्गुणीपणा
असे असावे तुमच्यापैकी काहींचे मत.
काय तुम्ही समजता आपणाला झिंगलेले, रंगलेले ?
तुमचे टोळके दिसते चमकदार बुरसलेल्या गवताप्रमाणे.

ब्रँडर तू तरी काय आहेस लेका ? नंबर एकचा बुरसट बाबू
ना एक अश्लील शब्द, ना कसली सैतानी लीला.

फ्रॉश (ब्रँडरच्या डोक्यावर मद्याचा प्याला रिकामा करतो.)
तर मग ही करतो झकासशी सुरवात.

ब्रँडर भंगोत तुझे डोळे !

फ्रॉश तुला मिळाले आहे, तूच मागितलेले; नव्हते अनपेक्षित.

सीबेल काय चेष्टेबद्दल लागलात भांडायला ?
या भांडखोरांची करा हकालपट्टी !
चला, मर्दानो, करा मोकळी आपली छाती
घ्या गाऊन, घ्या पिऊन, चला मर्दानो, चढवा आवाज,
ही ऽ, होला ऽ, हो ऽ !

अल्टमेयर ओसाडी पडो येऊन, आणा कोणीतरी कापसाचे बोळे
हा फोडतो आहे माझे कान, डुरकणाऱ्या बैलाप्रमाणे.

सीबेल जर छप्पर गेले हादरून
आणि पडले त्याच्याच डोक्यावर
तर समजा त्या गाणाऱ्याचा
बरोबर खर्जामध्ये लागला आहे स्वर.

फ्रॉश ऐका, ऐका! ज्याना नसेल हे आवडत त्याना हाकून द्या.
री ऽ टूरा ऽ ल – ए!

अल्टमेयर री ऽ – टूराल – उराल – ॲडी!

फ्रॉश सुरात लागले आहेत आपले गळे, मी सुचवतो करूया सुरवात.
(गातो) **पवित्र रोमन साम्राज्याचा**

कोण चालवी अस्थिपंजर?

ब्रँडर एक घामट गाणे! याला येते आहे राजकारणाची घाण.
एक नतद्रष्ट गाणे! माना आभार त्या परमेश्वराचे सतत प्रार्थनेमध्ये
रोमचे साम्राज्य ही आपली जबाबदारी नसल्याबद्दल.
मला नाही म्हणत कोणीहि ' राष्ट्राध्यक्ष ' ' कैसर '
याबद्दल मानतो गृहाचे आभार आणि समजतो स्वतःला शहाणा
तरी सुद्धा प्रत्येक हमल्याला हवीच असते स्वतःची कोनशिला,
म्हणून आपण आपला स्वतःचा निवडू या धर्मगुरू,
करू या त्याचा मानसन्मान आणि स्थापू या त्याला पीठावर—
ज्या गुणामुळे त्याला निवडायचा ते आहेतच तुम्हाला ठाउक

फ्रॉश (गात गात)

मार भरारी, मधुर बुलबुला, चुंबुन येइ नभास
आण प्रेयसीसाठी माझ्या प्रीतीचे निश्वास.

सीबेल मजाव प्रेमगीताना, कोण करतो त्या तुझ्या प्रेयसीची पर्वा!

फ्रॉश तरी सुद्धा मी गाणार तिच्या प्रीर्त विषयी, तिच्या चुंबनाविषयी.

(गातो) **काढ कडी; मी वाट पहातो, मध्यान्हीचा काल;**
काढ कडी, कबुतरा, तुझा हा दारापाशी लाल;
घाल कडी आता, पहाटे येईल मग जाता.

सीबेल गा गाणी, कर तुझ्या प्रेयसीचे स्तवन, मी देतो ही जांभई,
कारण झरळतोस तू जिच्याबद्दल तिला आहे मी भेटलेला :
त्या कबुतराला, माझ्या मताने, हवा सैतानच शय्यासोबतीसाठी
जो सोडून देइल तिला तिठ्यावर, उध्वस्त अवस्थेत,
किंवा हवा झिंगलेला बोकड, चेटकिणींच्या वार्षिक गोंधळामधील,
जो, तिने उच्चारलेल्या हळुवार ' शुभरजनी ' ला

दूर दौडून देईल प्रत्युत्तर फक्त बेबटण्याने.
तुझ्या लक्षात येईल, हाडामासाचा एखादा पोरगा या बाजारबसवीला
पडेल भलता नाजुक, पुरवील आम्हाला हसायची संधी.
नाही मिळणार तिला माझ्याकडून कसली प्रशंसा अथवा गौरवगीत.
काही मिळालेच, तर त्यामुळे जातील फुटून तिच्या खिडक्या.

ब्रँडर (टेबलावर हात मारून)

शांत व्हा, शांत व्हा! आता थोडा वेळ माझे ऐकून घ्या!
तुम्ही जाणता माझी अभिरुची, नेहमीच औचित्यपूर्ण अशी शैली;
आमच्या कंपूत आहे प्रियकरांचा बराच भरणा;
आणि त्यांच्याकडून मिळालेल्या हुकुमानुसार मी पाहिजे
म्हटले गीत खास त्यांच्याकरिता, तसलेच काहीतरी...
आणि तुम्हालाहि मिळेल त्यांत वृंदाच्या भूमिकेत ओरडायची संधी.

तळघरात एका उंदिर होता कुणी
खादाड भयंकर गुळमटखाऊ महा
अन् दोंद तयाचे वाढत गा शेवटी
त्या ल्यूथरइतके स्थूल जाहले पहा.
मग आचाऱ्याने गुटी विषाची दिली;
ती पिउन त्याची दुनिया संकोचली;
वाटले तयाला परन्तु तेव्हा कसे?
प्रीतीने झुरला जीव आपला असे.

वृंद प्रीतीने झुरला जीव आपला असे.

ब्रँडर तो धडपडला अन् खुळे किति धावला
डबक्यातिल साऱ्या पाणी किती प्यायला
अवघ्याच घराला कुरतडीत चालला
परि तरी न त्याचा जाळ शमे आतला
अन् हौदामध्ये कोसळला तो भला
मग उड्या मारता चेहरा झाला कसा?

वृंद प्रीतीने झुरता जीव होतसे तसा.

ब्रँडर होऊन पुरा तो जर्जर मग शेवटी
भर दिवसाढवळ्या पाकगृही पातला,
अन् धापा टाकित चुलीत झेपावुनी
बघवे न असे आचके देऊ लागला.
मग स्वैपाकी तो हसून वदला कसे
'ह्या मरतो आहे मरती जशी माणसे
प्रीतीने जेव्हा जीव झुरुन जातसे'

वृंद प्रीतीने जेव्हा जीव झुरुन जातसे.

सीबेल तुंदिल बदमाषानाच असतो आवडत असला खेळ!
बिचाऱ्या उंदरांना असे विषारी अन्न चारणे
हे आहे माझ्या मताने बेडर निर्लज्जपणाचे.

ब्रँडर केवढा वाटतो तुला आदर त्या उंदराबद्दल!

अल्टमेयर बिलबिलीत हृदयाच्या या प्राण्यामध्ये असती जमा,
पिटर पाँचसाहेब, जयाना टकल मोठे खूप,
आणिक जेव्हा मरून पडतो सुजलेला उंदीर
तेव्हा त्यातच दिसते त्याना आपुले प्रीय स्वरूप.

[फाउस्ट आणि मेफिस्टॉफलीझ प्रवेश करतात.]

मेफिस्टॉफलीझ मी आणतो आहे प्रथम तुला अशा एका ठिकाणी
जिथे दिसेल तुला आनंदोत्सवात रंगलेला समाज,
पहा किती संथ असू शकतो जीवनाचा प्रवाह
जेव्हा माणसे सबंध आठवडाच समजतात सणासारखा.
असतात अल्पबुद्ध, आणि तरीही सर्वस्वी स्वयंतुष्ट,
स्वतःच्या शेपटीची कळ काढीत बसणाऱ्या मांजराच्या पिलासारखी
त्या आपल्या इवल्या वर्तुळात ती वावरतात अगदी आत्मविश्वासाने,
आणि, गेल्या रात्रीची डोकेदुखी सोडल्यास
किंवा मालकाच्या खातेवहीतील आपल्या पतीचा अभाव वगळल्यास
ती असतात आपल्या स्थितीविषयी अत्यन्त समाधानी.

ब्रँडर हे दोघे आहेत प्रवासी, फार दूरहून इथे आलेले,

त्यांच्या पोषाखाची परकी तऱ्हाच सांगते तुम्हाला ते कोण आहेत ते.
ते आले आहेत आता या घटकेलाच, आपली पैज.

फ्रॉश तुझे आहे अगदी बरोबर : आपल्या लिपझिगची आहे ख्यातीच
एक लहानसे पॅरीस असल्याची, एक सामाजिक आकर्षण म्हणून.

सीबेल कोणच्या प्रकारचे हे लोक आहेत असे मानतोस तू ?

फ्रॉश ते सोपव तू माझ्याकडे, कारण एखादद्सऱ्या पेल्याबरोबरच
मी उकरून काढीन त्यांची गुपिते, अगदी शपथेवर.
मी काढीत असतो ती बाहेर पोरांच्या दातासारखी.
माझा अंदाज आहे, हे असावेत मोठ्या घराण्यातले.
त्यांनी प्रवेश केला तोच आढ्यतेने, किंचित तिरस्काराची छटा दाखवीत.

ब्रँडर ते दोघेही आहेत वैदू, याबद्दल डॉलरची पैज.

अल्टमेयर असतील कदाचित.

फ्रॉश नुसते पहा, किती झटकन् मी लावतो त्याचा छडा.

मेफिस्टॉफलीझ सैतान जवळ असतो, हे नाही येत त्यांच्या स्वप्नात
जरी त्याने त्यांची मानगुटी पकडून धरली तरी.

फाउस्ट नमस्ते, सद्गृहस्थ हो.

सीबेल नमस्कार आपल्यालाही.

(बाजूला, मेफिस्टॉफलीझकडे नजर टाकून)

त्या इसमाचा एक पाय दिसतो आहे जरासा लंगडा.

मेफिस्टॉफलीझ जर आम्ही आपल्या मंडळीत झालो सामील तर चालेल का ?
अशा दर्जेदार आणि आनंदी माणसांचा सहवास
वाटतो स्वागतार्ह, जरी दारू सामान्य असली तरी.

अल्टमेयर तुमची अभिरुची आहे निःसंशय फारच चोखंदळ.

फ्रॉश मला वाटते, तुम्ही असणार रिपाख सोडलेले बरेच उशीरा,

आणि संध्याकाळच्या जेवणासाठी असाल आलात हानसेनकडे ?

मेफिस्टॉफलीझ आज आम्ही त्याला बगल दिली, थांबण्याइतकी नव्हती सवड,
पण गेल्या खेपेला त्याच्याबरोबर मारल्या गप्पा, अगदी पोटभर.
होय खरंच, तो बोलला होता आपल्या एका चुलत भावाविषयी
आणि दिले होतेन आपले नमस्कार त्याला पोचवण्यासाठी.

(फ्रॉशला मुजरा करतो.)

अल्टमेयर (फ्रॉशला सूचक आवाजाने) हे आहे खास तुझ्यासाठी.

सीबेल हा माणूस आहे पुरा तयार.

फ्रॉश जरा थांबा रे, असा नकळत पकडतो याला.

मेफिस्टॉफलीझ काय करतो आहे मीच चूक, की खरोखरच ऐकले आम्ही
काही गाणेबजावणे, अगदी निवडकसा वृंद असलेले ?
हे असले भुयारी छप्पर उठवते प्रतिध्वनी अगदी स्पष्ट,
सुंदर वाटणाऱ्या प्रमाणबद्ध निनादासह.

फ्रॉश आपण दिसता आहा संगीतातले पंडित !

मेफिस्टॉफलीझ छे हो ! माझी इच्छाशक्तीच माझ्या कलेहून आहे सामर्थ्यशील.

अल्टमेयर ऐकवा आम्हाला एखादे गाणे !

मेफिस्टॉफलीझ अहो तुम्ही सांगाल तेवढी.

सीबेल मात्र आम्हाला ऐकवा काहीतरी नव्या पकडीचे.

मेफिस्टॉफलीझ तेवढे करीन मी, आम्ही परतलो नुकतेच स्पेनहून,
त्या मद्याच्या आणि गीतांच्या कमनीय भूमीतून.

(गातो) **जुन्या काळचा कोणी राजा**
एक लाडका त्याचा डास.

फ्रॉश घ्या ऐकून, अहो दोस्त ! हे ऐकलत काय ? एक डास !
झकास पाहुणा मिळाला संगतीला !

मेफिस्टॉफलीझ **जुन्या काळचा कोणी राजा**
एक लाडका त्याचा डास;

सगळ्याहुनही तोच जवळचा;
पुत्राहुनही प्यारा खास.
महाराजांची खुशी जाहली
हुकूम शिंप्याला झाला,
" मापाचे कर कपडे याच्या,
तुमान कर या बेट्याला."

ब्रँडर ध्या काळजी पुन्हा पुन्हा मापे तपासायची!
आणि शिंप्याला सांगा जरा डोके चालवायला,
कारण बिचाऱ्याला जर असेल बचावायची मान
तर बसेलशीच पाहिजे केली त्याने तुमान.

मेफिस्टॉफलीझ
असे रेशमी उंची कपडे
घालुन तो बच्चा नटला;
छातीवरती मान-फिती
अन् अलंकार पुष्कळ त्याला.
अधिकाराच्या महत्पदावर
बसला तो होऊन प्रधान;
नातेवाइक भिकार सारे
त्यांचाही मग चढला मान.
दरबाराचे और दृश्य हो!
शिलेदार आणिक ललना,
दासी आणिक राणी त्यातच,
चावु लागले सर्वांना.
खाजवण्याची मुभा न कोणा
अडु लागले शिष्टाचार,
परंतु आपण मुठीत पकडुन
करू बगलबच्चा तो ठार.

वृंद (मोठ्याने आरडाओरड करून)

परंतु आपण मुठीत पकडुन
करू बगलबच्चा तो ठार.

फ्रॉश जीते रहो पठ्ठे! नेमका हाच माल हवा असतो मला!

सीबेल करा सत्यानाश प्रत्येक डासाचा.

ब्रँडर टाका चिरडून तुमच्या नखामध्ये, उडवा चटणी !

अल्टमेयर हा स्वातंत्र्यासाठीः चला आणा दारू !

मेफिस्टॉफलीझ मित्रा, प्याला असता एक ग्लास स्वातंत्र्याच्या सत्कारासाठी
जर या ठिकाणची स्थानिक दारू नसती इतकी वाईट.

सीबेल देवाशपथ, असली कल्पना इथे न पसरवलीत तर उत्तम.

मेफिस्टॉफलीझ एकदम कबूल; या मालकाचा होईल अपमान ह्याला भितो मी,
नाहीतर दिले असते प्रत्येक पान्हुण्याला
आमच्या तळघरातले काहीतरी अत्युत्तम.

सीबेल वा, तसे असल्यास, मी म्हणेन मीच मागितले म्हणून.

फ्रॉश पण नाहीत पुरणार घुटके, मला नाही चालत नमुनेवजा :
चांगला पुरेपूर भरलेला ग्लास आवडेल आम्हाला.
कारण जर तुम्हाला पाहिजे असेल माझा अभिप्राय
तर त्याकरता तुम्हाला लागेल भरून टाकावी माझी अन्ननलिका.

अल्टमेयर (व्यंगार्थसूचक आवाजाने)

मला वाटते हे आले असावेत ऱ्हाइनलँडमधून.

मेफिस्टॉफलीझ द्या मला एक गिरमिट.

ब्रँडर ते कशासाठी ?
दरवाजाबाहेर तुमची स्वतःची पिंपे नाहीत ना ?

अल्टमेयर मालकाची हत्यारे आहेत पडलेली, खोलीच्या बाजूला.

मेफिस्टॉफलीझ (एक गिरमिट घेऊन, फ्रॉशला)
आता बोला, कोणत्या जातीची ? काय पाहिजे चमकणारी दारू ?

फ्रॉश म्हणता काय ? म्हणजे तुमच्याजवळ आहेत प्रकारही ?

मेफिस्टॉफलीझ मी देऊ शकेन तुम्हाला सर्व, जे जे असेल तुम्हाला आवडत.

अल्टमेयर (फ्रॉशला उद्देशून)

अरे वा, तुझ्या तोंडाला इतक्या लौकर पाणी सुटले का ?

फ्रॉश — छान, मी असेल करायची निवड, तर मी मात्र मागेन ऱ्हाईन :
आपल्या पितृभूमीच्या मादक नजराण्यातील पहिली मानकरीण.

मेफिस्टॉफलीझ — (फ्रॉश बसलेला असतो त्याच्या जवळच टेबलाच्या कडेला गिरमिटाने भोके पाडीत पाडीत)

आणा थोडे मेण गुड्या करण्यासाठी, करा जलदी !

अल्टमेयर — हा दिसतो आहे फक्त एक जादूचा प्रयोग.

मेफिस्टॉफलीझ — (ब्रँडरला) आणि तुमची ?

ब्रँडर — आपणाला बुवा पाहिजे शॅम्पेन,
आणि तीही असू द्या फसफसणारी, चमकणारी दारू,

(मेफिस्टॉफलीझ भोके पाडतो, तोपर्यंत त्यांच्यापैकीच कुणीतरी मेणाच्या गुड्या बनवतो आणि त्या आत बसवतो.)

ब्रँडर — परकी मालाला सदासर्वकाळ प्रतिबंध करणे नसते इष्ट;
अशा पुष्कळ चांगल्या गोष्टीसाठी लागेल पहावे परक्याकडेच
एखादा जर्मन असू शकतो सच्चा द्वेष्टा एखाद्या फ्रेंचाचा
पण करू शकतो खरेखुरे प्रेम त्याच्या दारूवर.

सीबेल — (मेफिस्टॉफलीझ त्याच्या टेबलाकडे यायला निघाल्यानंतर)

मी असतो आंबटसर दारूना नेहमी टाळीत
मी पसंत करतो साध्या दारूपेक्षा गोडसर मद्ये.

मेफिस्टॉफलीझ — फक्त तुम्ही बोलायचा अवकाश, आणि तुम्हाला मिळेल टोकेनहि.

अल्टमेयर — अहो महाशय आमच्या डोळ्याला भिडवा डोळा, आणि बोला :
ही आहे चालली बनवाबनवी की एखादी खुळचट चेष्टा.

मेफिस्टॉफलीझ — छे, छे, या अशा प्रतिष्ठित मंडळीमध्ये
ही असली विशोभित थट्टामस्करी ठरेल अस्थानी.
तेव्हा आता बोला तुम्हाला कोणची दारू पाहिजे तेवढेच,
आणि करतो मी कोशिश साहेब मजकुरांचे समाधान करण्याचा.

अल्टमेयर — मला नाही काही म्हणायचे हे समळे खरे असले तर.

(आता सगळी भोके पाडून झालेली असतात, आणि सगळ्या गुड्याही बसवलेल्या असतात.)

मेफिस्टॉफलीझ (चमत्कारिक अंगविक्षेप करून)

अंगुर येवात गोड द्राक्षांच्या वेलीवर
शिंगाची फांदी फुटे बकऱ्याच्या डोक्यावर;
रसाचेच मद्य बने, अन् अंगुर काष्ठाचे;
टेबल हे देइल हो मद्य आम्हाला साचे.
गूढ निसर्गाजवळी अद्‌भुतास काय उणे
त्या गुड्या काढा अन् प्या मदिरा मुक्तपणे.

सर्व (गुड्या काढतात, हवी असलेली दारू पेल्यामध्ये पडताना दिसते.)

अद्‌भुत्! अगदी कारंजीच, मग आता चालू द्या मनसोक्त!

मेफिस्टॉफलीझ माझ्या शुभेच्छा! मात्र नका थोडीहि सांडू.
(पुन्हा पुन्हा पिऊन घेतात.)

पुष्कळसे लोक (गात गात)

दारूसाठी आम्ही बनतो नरकातील असूर,
मद्य वाहता तेहि चाटू, करू न काहि कसूर
डुकराहुनही डुक्कर होउन घेउ सुखाचा ठाव,
पीतच राहू, जरी जाहला बर्फाचा वर्षाव.

मेफिस्टॉफलीझ हे आहेत झाले विमुक्त लोकसत्तात्मक ब्रह्मानंदात.

फाउस्ट चला, आता निघूया आपण, पुष्कळ झाले हे पाहिले तेवढे.

मेफिस्टॉफलीझ

कशास करिशी इतकी घाई
थांबलास जर थोडाफार
उत्कट, आकर्षक, पशुतेचा
घडेल तुजला साक्षात्कार.

(निष्काळजीपणाने सीबेल पिऊ लागतो, आणि काही दारू जमिनीवर सांडते; लगेच तिथून अग्नीची ज्वाळा निघते.)

सर्व आग, आग! धावा मदतीला! नरकातला जाळ!

मेफिस्टॉफलीझ हो शांत, हे अग्नितत्त्वा, हो शांत आणि संयमित,
(पिणाऱ्या मंडळींना)
विरेचन करणारी एक ठिणगी, शहाणपण येण्यापुरती.

सीबेल तरीपण तुला लागेल करावा याबद्दल पश्चात्ताप.
कोण समजतोस तू आम्हाला ? काय चालवला आहेस प्रकार ?

फ्रॉश लावतोच निकाल त्याच्या लीलांचा, वाटेल ते बोलला तरी.

अल्टमेअर आणि करतो या जागेतून त्याची हकालपट्टी.

सीबेल चल, बोल ! या आमच्या विश्रान्तिगृहात काय म्हणून करतोस जादूटोणा ?

मेफिस्टॉफलीझ ए गप्प, ए थेरड्या, बिअरच्या डब्या !

सीबेल ए खराट्या, काय माझ्याशी ही भाषा !
अपाय करून पुन्हा अपमान ?

ब्रँडर त्याला तसेच हवे ! ती बघ जुंपली मारामारी !

अल्टमेअर (टेबलाची गुडदी काढतो, आगीची धार बाहेर पडते.)
आग, आग !

सीबेल चालवा चाकू या बदमाषावर, जादूटोणा करणाऱ्या;
याची करा शिकार कोणीहि ! घाला घाव थेट काळजावर !

(चाकू काढून मेफिस्टॉफलीझवर चालून जातात.)

मेफिस्टॉफलीझ (गंभीर हावभाव करून)

पडेल दृग्भ्रम दृष्टीला, शब्दाला,
होईल अंधुक जाणीव, जग;
घडेल मनांचे दूरवर स्थलांतर.

(उभे राहून आश्चर्याने एकमेकाकडे पाहू लागतात.)

अल्टमेअर मी कुठे आहे ? हा कोणता सुंदरसा देश ?

फ्रॉश हे कुठले द्राक्षांचे मळे !

सीबेल हे कुठले हाताला येणारे द्राक्षांचे घोस.

ब्रँडर आणि इथे या पहा हिरव्या छपराच्याखाली
द्राक्षाच्या वेली दिसतात गेलेल्या भाराने ओथंबून.

(तो सीबेलला नाक धरून पकडतो, इतर सगळे एकमेकांना तसेच पकडून धरतात; आणि मग सगळेच चाकू उगारतात.)

मेफिस्टॉफलीस (पूर्वीप्रमाणेच गंभीरपणे)

डोळ्यावरचे पटल, विभ्रमा, दूर अता होउदे;
सैतानाचा विनोद त्याना ओळखता येउदे

(फाउस्टसह अदृश्य होतो. मग ती एकमेकांची पक्कड सोडतात.)

सीबेल काय म्हणायचे हे !

अल्टमेअर काय म्हणणार याला ?

फ्रॉश मला वाटते मी पकडले होते तुझे नाक.

ब्रँडर आणि मला वाटते मी पकडले होते या सीबेलचे.

अल्टमेअर एक प्रकारचा धक्काच मिळाला प्रत्येक अवयवातून.
द्या मला एखादी खुर्ची, माझे डोके आहे गरगरत.

फ्रॉश मला सांगा, या सगळ्याचा अर्थ तरी काय समजायचा ?

सीबेल कोठे गेला तो बदमाष ? जर सापडला माझ्या तावडीत
तर त्याला कळेल, त्याची वेळ भरली आहे म्हणून.

अल्टमेअर मला वाटते, मी पाहिले त्याला हॉलमधून गडगडत जाताना
एका पिंपावरून, आणि हवेतून रपेट करीत करीत;
माझे पाय झाले आहेत जड शिशासारखे, गेले आहेत जखडून,
आणि लागताआहेत ते जमीनीवरून ओढत न्यायला.

(टेबलाकडे वळून)

काय अजूनही असेल दारू वाहत त्या ठिकाणी !

सीबेल ते सगळे होते खोटे, एक आभास, एक बनवाबनवी.

फ्रॉश आणि तरीपण वाटले मात्र दारूच्यासारखेच, तितकेच मधुर.

ब्रँडर आणि आपण काय म्हणणार डोक्यावरच्या त्या घोसांना !

अल्टमेयर आणि आता कोण म्हणेल चमत्कार संपले म्हणून !

चेटकिणीची पाकशाळा

एका सखल चुलीमधील विस्तवावर एक अगडबंब कढयी ठेवलेली आहे, त्या मधून उठणाऱ्या वाफामध्ये अनेक चमत्कारिक आकृत्या दृग्गोचर होत आहेत. कढयीजवळ एक माकडीण बसलेली आहे आणि कढयी उतू जाऊ नये म्हणून ढवळते आहे. एक डरा पोरासहवर्तमान, चुलीशी शेक घेतो आहे. भिंती आणि छत या दोहोवरहि जादुटोण्याला लागणारे सामानसुमान टांगलेले आहे.

(फाउस्ट, मेफिस्टॉफलीझसह, प्रवेश करतो.)

फाउस्ट या असल्या चेटकी करणीचा माझ्या आत्म्याला येतो किळस !
हेच का ते तुझे आश्वासन, काय मी होईन निरामय
ह्या असल्या पिसाट खबदाडातील कुटिल मसलतीने,
जराग्रस्त थेरडीला साक्षात्कार घडलेल्या सत्याच्या सहाय्याने ?
किंवा होईल का माझे वय तीस उन्हाळ्यांनी याहून कमी
ह्या चेटकिणीना त्यांची ओंगळ घाण ढवळताना पाहिल्यामुळे ?
अरेरे, हेच का ते तुझ्या बुद्धिमत्तेचे शक्तिसर्वस्व
आणि सर्वोच्च शिखर ? काय होती माझी आशा इतकी अंध ?
काय निसर्गाजवळ एकही नाही अशी गुटी किंवा गुप्तौषधी
जी देऊ शकेल उदात्त मनाला अनुरूपसे समाधान.

मेफिस्टॉफलीझ तू मित्रा दाखवतोस अक्कल मी अपेक्षा केली तसलीच.
अगदी अवश्य असू शकतो तारुण्य प्राप्तीचाही एक कल्प,
पण आहे तो दडलेला दुसऱ्याच एका पुस्तकामध्ये,
अत्यंत अनोख्या अशा सत्यासाठी योजलेल्या प्रकरणांत.

फाउस्ट मग सांग मला !

मेफिस्टॉफलीझ ठीक, हा आहे तुला हवा असलेला निसर्गाचा कल्प
डॉक्टराशिवायचा, सुवर्णाशिवायचा, जादूटोण्याशिवायचा
मोकळ्या हवेतील जीवनाला कर एकदम प्रारंभ,

खड्डे खणायला, चर खोदायला, जमीन कसायला.
सामान्य जीवनक्रमामध्येच आपले स्वतःचे मान समाधान,
आणि आपल्या आहारामध्ये कर अंतर्भाव घरगुती पदार्थांचा,
रहा जनावराबरोबर, त्यांच्याच पातळीवर, घे खात्री करून
जिथे कापतोस तुझे पीक तिथे तुझेच हात पसरतात खत,
मित्रा एवढाच आहे तुझ्यापाशी निश्चित असा उपाय
ज्याने अगदी ऐशींव्या वर्षी तू रहाशील पूर्वीइतकाच तरुण.

फाउस्ट हे सगळेच आहे मला अपरिचितः मला वाटते
माझ्याजवळ नाही कुवत कुदळ चालवण्याची,
साध्या जीवनाशी समरस होणारे माझ्याजवळ नाही काहीही.

मेफिस्टॉफलीझ आणि नेमका तिथेच होत असतो चेटकिणींचा प्रवेश.

फाउस्ट काय अजून घोटाळतो आहेस या भिकारड्या थेरडीजवळ
काय तुला नाही गाळता येत स्वतःचे रसायन ?

मेफिस्टॉफलीझ चांगलाच धंदा ! म्हणजे तोपर्यंत पुढे ढकलायच्या
अत्यंत उत्कंठतेने मनाशी बाळगलेल्या हजारो योजना !
याला नाही पुरत नुसती कारागिरी आणि शास्त्रे :
याला हवा असतो प्रदीर्घ चिंतनाने व्यापलेला कालावधि.
हुशार असे एखादे पिशाच्च करू शकेल भट्टीचे निरीक्षण,
पण रसायन प्रभावी बनेल फक्त कालावधीमुळेच.
या मिश्रणासाठी लागणाऱ्या वस्तूंची नाही येणार तुला कल्पना.
ते बनविण्यासाठी वापरतात द्रव्ये अत्यंत विलक्षण.
सैतानाच्या शिकवणीमुळेच या कर्माची होते निष्पत्ती.
आणि तरीहि सैतानाला नाही चालत ते स्वतः करून.

(प्राण्यांकडे पाहून)

ही पहा चाकर मंडळी, काय झकास चतुष्पाद प्राणी,
तो हुजऱ्या व ती दासी बसली आहेत समोरासमोर.
(प्राण्यांना उद्देशून) तुमची मालकीण नसावी घरामध्ये असे दिसते आहे!

प्राणी गेली मद्योत्सवासाठी
सोडून घर
आणि या धुराड्यातून
चढली वर.

मेफिस्टॉफलीझ किती वेळ असते भटकत ती घराबाहेर ?

प्राणी आमचे पंजे उबू शकतील इतका वेळ.

मेफिस्टॉफलीझ या देखण्या जोडीबद्दल काय आहे तुझे मत ?

फाउस्ट किळसवाणी जनावरे, याना नाही मिळणार तोड.

मेफिस्टॉफलीझ मला आहे हे अमान्य, कारण असल्या संभाषणामधील
काही गुणविशेष माझ्या मनाला आहेत पटणारे.
(प्राण्यांना उद्देशून) शापग्रस्त बगलबच्चांनो—माझ्या माणकानो,
कोणचे रसायन आहे ढवळले जात तुमच्या डोलीने ?

प्राणी आम्ही आहोत आता शिजवीत भिकाऱ्यांची पेजकणेरी.

मेफिस्टॉफलीझ अर्धी दुनियाच आहे बनलेले त्याचे गिऱ्हाईक.

डरा (हांगलूचालन करीत मेफिस्टॉफलीझकडे येऊन)

फक्त फासा फेक;
त्याने होईल एक :
मिळेल पैसा खूप
जीवन आहे विरूप.
सोने मिळेल तर
मला काय कमी;
बनेन सभ्य साव
याची देतो हमी.

मेफिस्टॉफलीझ किती समाधानी होऊ शकेल हे माकड, लोभाकृष्ट,
जर त्याला मिळेल जगायला जुगारीवर, सोरटीवर.

(इकडे माकडाची पोरे एका मोठ्या गोळाशी खेळत असतात
आणि आता ती तो गोळ पुढे ढकलतात.)

डरा
ही पहा पृथ्वी कशी
फिरत असते सतत अशी,
सतत होते खाली वर.
डोके पोकळ, त्यातून तर

काचेसारखा येतो नाद,
केव्हा फुटेल, कुणास दाद.
आता इथे दावते चमक,
इथे दिसते पिवळीधमक.
आहो जिवंत गोष्ट खरी,
ऐक माझ्या बच्चा, तरी
घे काळजी जपून अस,
नाही पेक्षा भरतील दिवस.
ही माती गोलाकार
एके दिवशी भंगेल पार.

मेफिस्टॉफलीझ काय प्रयोजन या चाळणीचे ?

डरा (चाळण खाली काढीत)

ही चाळणी दावते राव
कोण चोर, कोण साव.

(माकडिणीकडे जातो आणि तिला त्या चाळणीतून पाहायला लावतो.)

पहा चाळणी मधून नारी
सांग कोण करतो चोरी !
वा, तुला लागलाच ठाव,
तरी नको त्याचे नाव !

मेफिस्टॉफलीझ (विस्तवाच्या जवळ जात)

आणि कसले आहे हे पात्र ?

माकडे हा दारुड्या किती अजाण,
याला नाही इतके ज्ञान,
कोणचे पात्र, कोणाची कढय !

मेफिस्टॉफलीझ हे बेमुर्वतखोर पशूनो !
निदान वागा काही आदबीने !

डरा उचल ती झाडणी आणि बस जावून बाकावर !

(मेफिस्टॉफलीझला बसण्याचा आग्रह करतं.)
(इकडे फाउस्ट आरशासमोर उभा राहिलेला असतो;
काही वेळा आरशाच्या जवळ जातो. काही वेळा त्याच्यापासून दूर सरतो.)

फाउस्ट आता कसा ठेवू मी विश्वास माझ्या डोळ्यावर ? कसले स्वर्गीय दृश्य
केले आहे इथे प्रतिबिंबित या इंद्रजालाने माझ्या अवलोकनासाठी.
हे प्रीतीदेवते, जा घेऊन मला पंखाच्या झेपेसरशी
त्या तिच्या लोभस पायऱ्याजवळ, तिच्या सहवासासाठी.
किती विलक्षण, ती होते लगेच अदृश्य जर चळली माझी दृष्टी
या एका ठिकाणावरून : जर केला धीर जवळ सरण्याचा
तर मला ती दिसते फक्त कसल्याशा धुक्यात लपलेली;
एका असामान्य, रुपवान अशा स्त्रीचे चित्र,
काय स्त्रीजवळ असू शकते असले लावण्य ?
आणि तिच्या तिथे पहुडलेल्या रसरशीत शरिरातून
काय उतरतो अवघा स्वर्ग माझा आत्मा कृतार्थ करण्यासाठी ?
काय पृथ्वीजवळ असतो अहेर इतका लावण्योत्कट, इतका अनोखा ?

मेफिस्टॉफलीझ अगदी निश्चित, कारण जेव्हा एखादा देव-सहा दिवस असतो खपत,
आणि शेवटी म्हणतो ' शाबास ' आणि थोपटतो स्वतःची पाठ,
तेव्हा तो घडलेला माल असलाच पाहिजे इतका खूपसूरत.
पण तुझे चालुदे आरामसे, कर निरीक्षण पोट भरेपर्यन्त :
मी लौकरच हुडकून काढीन एक सुंदरी, इतकीच मदालसा,
आणि करीन तुला समर्पण; धन्य आहे त्याचे भाग्य,
जो या अशा नवरीला वैवाहिक जीवनाचे देतो पाट.

(फाउस्ट तसाच आरशाकडे पहात रहातो, मेफिस्टॉफलीझ आपले अंग बाकड्यावर पसरून झाडणीशी खेळत खेळत आपले भाषण सुरू ठेवतो.)

या ठिकाणी मी आहे स्थानापन्न झालो सिंहासनारुढ राजासारखा,
आणि हा आहे माझा राजदंड--फक्त आहे मुकुटाची उणीव.

प्राणी (इकडे त्यांचे निरनिराळे चमत्कारिक अंगविक्षेप चाललेलेच असतात. आता कर्कशपणे आरडाओरडा करीत मेफिस्टॉफलीझसाठी ते एक मुकुट आणतात.)

आता एवढी कृपा फक्त
लावा घाम, लावा रक्त
आणि मगच घाला मुकुट.

(मुकुट बेंगरूळपणाने हालवू लागतात. तो खाली पडतो आणि त्याचे दोन तुकडे होतात. ते तुकडे घेऊन सगळे इकडे तिकडे उड्या मारू लागतात.)

झाले आहे सगळे करून !
आपण बोलू, पाहू दुरून
ऐकू, रचू यमके कूट —

फाउस्ट (आरशाकडे पहात)

माझ्या जाणिवेला येते भोवळ या अशा भव्योदात्त दर्शनामुळे.

मेफिस्टॉफलीज माझ्या मात्र वरच्या मजल्याची आहे परिस्थिती अधिक वाईट.

प्राणी
आपले नशीब असेल तर
लोकांवरती पाडील असर
धीर गंभीर आपले पद्य.

फाउस्ट (आरशाचा निर्देश करीत)

जळत्या विचारानी माझे हृदय आहे झाले अगदी घायाळ.
चल आपण निघूया येथून आणि जाऊया आपल्या मार्गाने.

मेफिस्टॉफलीज (प्राण्यांचा निर्देश करीत)

निदान एक गोष्ट झाली निष्पन्न : अगदी निश्चित
आजकालचे खरेखुरे कवी आहेत हेच.

[मध्यंतरी कढईकडे माकडिणीचे दुर्लक्ष झालेले असते, ती उकळून उतू जाते आणि तिच्यामधून एक मोठी ज्वाळा प्रज्वलित होऊन ती धुराड्यातून थेट वर जाते. त्या ज्वाळेमधूनच भयंकर किंचाळ्या देत चेटकीण खाली उतरते.]

चेटकीण आय ओय, मेले मेले !
नष्ट पशू, पापी साले,
तुमची कढयी पेटवून अशी
मालकिणीला जाळता कशी ?

[फाउस्ट आणि मेफिस्टॉफलीझ यांच्या
उपस्थितीची जाणीव होऊन]

काय इथे तुमचे काम ?
बोला तुम्ही कोण आहात ?
कसला करता इथे शोध ?
काय हेरता, चोरुन पहात ?
भोगाल क्लेश छातीफोडे
नरक भाजील तुमची हाडे.

[चेटकीण कढईत आपटते आणि त्यातल्या ज्वाला फाउस्ट,
मेफिस्टॉफलीझ व माकडे यांच्यावर उडवते.
माकडे मुळमुळु रडू लागतात]

मेफिस्टॉफलीझ [हातातली झाडणी उलटी धरतो आणि काचपात्रे व
इतर भांडी यांच्यावर दणादण तडाखे लगावतो.]

एका झटक्यात, एका फटक्यात
काचा फुटतात खळकन,
खिमा सांडतो फळकन;
मसणबसवे, पाहुन घे
मुके प्रहसन विलक्षण,
मी इकडे धरतो ताल
तू तिकडे गाणे म्हण.

[चेटकीण द्वेषाने आणि संतापाने मागे सरते.]

ए थेरडे, हाडाच्या गाठोड्या, काय तुला नाही ओळखत
तुझा अधिपती आणि मालक, तुझ्या डोळ्यासमोर उभा असलेला !
ए बुजगावण्या, कोण फिरवू शकेल माझा हुकूम

जो करू शकतो तुझा सत्यानाश, तुझा आणि तुझ्या माकडमेळ्याचा!
ही लालबंडी दिसून सवरूनही कसे नाही भरत तुला कापरे?
काय फुटले डोळे हे कोंबड्याचे पीस लक्षात न यायला?
केव्हा दिसतो का माझा चेहेरा मूलस्वरूप लपवताना?
की आता मी पाहिजे माझे अधिकारपद लिहिले कपाळावर?

चेटकीण महाराज, करा माफी, असा माझ्याकडून प्रमाद घडल्याबद्दल!
नाही लक्षात आल्या या खाणाखुणा; नाही दिसला पाशवी खूर,
आणि सांगा कुठे गेले ते तुमचे काळेकुट्ट डोंबकावळे?

मेफिस्टॉफलीझ ठीक, या वेळेपुरती शिष्टाचाराच्या तुझ्या उणीवेला
मिळेल माफी, कारण खरे बोलायचे म्हणजे,
आपण मागे भेटलो त्यानंतर झाली आहेत महान स्थित्यंतरे,
प्रत्येक पातळीवर समाज आहे फार सुधारलेला.
आणि आता संस्कृती आहे फार फैलावली, अगदी सैतानापर्यंत.
उत्तर प्रदेशाला भीतीने ग्रासणारे ते भूत झाले आहे आता अदृश्य
ती शिंगे, ते शेपूट, तो पंजा—ही झाली आहेत आता जुनीपुराणी
या खुराविषयी बोलायचे तर, तो नाही मला टाळता येत
पण माझ्या सामाजिक वर्तुळाची त्याच्यामुळे व्हायची अप्रतिष्ठा;
म्हणून आपला, अद्यावत पोशाखातल्या अनेक तरुणाप्रमाणे,
मी फुगवतो कृत्रिम भर घालून माझ्या पोटऱ्या.

चेटकीण मी बनले आहे आश्चर्याच्या धक्क्याने अगदी वेडीपिशी
पाहून या इथे, 'शिलेदार सैतान' माझ्या डोळ्यासमोर.

मेफिस्टॉफलीझ भले माऊली, कृपाकरून तेवढे ते नाव नको उच्चारू!

चेटकीण पण का बरे? त्याने नाही भरत कुणाला कापरे.

मेफिस्टॉफलीझ अगदी खरे, त्याचे झाले आहे जवळ जवळ परिकथेत रूपांतर,
आणि म्हणून मानवजातीला मात्र नाही झाला विशेषसा फायदा—
आहे बंदी पापांच्या जन्मदात्याला; पापे आहेतच.
म्हण मला माननीय उमराव, मग आपला धंदा ठरेल चांगला;
इतरासारखाच समज मला एक सरंजामदार,
नको घेऊ कसलाही संशय माझ्या अंगातील कुलीन रक्ताबद्दल,
हा पहा माझा चिन्हांकित सरंजाम,—अशी खूण असलेला!

[एक अभद्र असा हावभाव करतो.]

चेटकीण (हसत हसत)
बरोबर हीच ती बेपर्वाईदर्शक तुझी अस्सल जुनी शैली !
बदमाश आहेस तू खरोखर आणि बदमाश होतास सदान्‌कदा.

मेफिस्टॉफलीझ (फाउस्टला उद्देशून)

तुला मित्रा, माहिती व्हावे म्हणून आपले ठेवतो सुचवून
चेटकिणीना हाताळायची एकमेव पद्धत—ही अशी असते.

चेटकीण पण आता कळू द्या मला, कोणाचे काम आहे मनामध्ये ?

मेफिस्टॉफलीझ पाहिजे आहे एक पेला त्या तुझ्या सुप्रसिद्ध रसायनाचा,
त्या गुह्य उत्तेजक औषधाचा—मात्र असुदे चांगले मुरलेले.
असू दे बनलेले अत्यंत परिणामकारक कालगतीच्या प्रवाहामुळे.

चेटकीण वा, आनंदाने ! या इथेच आहे एक बाटली माझ्या कपाटात
ज्याच्यामधील एखादा घुटका मी स्वतःच घेते अधूनमधून;
विशेष म्हणजे या रसाचा दुर्गंध आहे नाहिसा झालेला,
मला होतो आहे विशेष आनंद हे रसायन देत असताना
(व्यंजनार्थक स्वराने) पण हा माणूस जर असेल पिगार माहितीशिवाय
तर तुला आहेच ठाऊक, तो नाही जगणार घटकाभरहि.

मेफिस्टॉफलीझ तो आहे माझा स्नेही, हे रसायन बरोबर जमेल त्याच्या तब्येतीशी.
तुझ्या पाकशाळेत पकणारे सर्व मी आहे त्याला बहाल केलेले.
मग आता काढ तुझे ते वर्तुळ, म्हण तुझा जादूचा मंत्र,
आणि दे त्या तुझ्या गुह्य रसायनाचा एक पेला.

[चेटकीण लोकविलक्षण अंगविक्षेप करून एक वर्तुळ रेखाटते आणि त्यामध्ये चमत्कारिक वस्तूंची मांडणी करते. इकडे पेले वाजू लागतात, आणि कढई गुणगुणू लागते व त्यातून संगीताचे स्वर निर्माण होतात. शेवटी चेटकीण एक महान ग्रंथ बाहेर काढते. टेबलासारखा उपयोग व्हावा म्हणून व बत्ती-वाल्याचे काम करण्यासाठी माकडांची वर्तुळाकार रचना करते; आणि फाउस्टला जवळ येण्यासाठी खूण करते.]

फाउस्ट (मेफिस्टॉफलीझला)

सांग आधी, असले विरूपाचे विपरीत प्रदर्शन हे कशासाठी,
चेटुक करणीची ही चर्पटपंजरी, हे पिसाट झपाटलेले परिभ्रमण ?

कारण मला आहे फारा दिवसापासून याची जाणीव आणि तिरस्कार
या अर्थहीन अशा गोष्टीच्या भाकड पांडित्यप्राचुर्याची.

मेफिस्टॉफलीस अरे, माणसा, हा एक तमाशा हसवण्यासाठी, गमतीसाठी.
कशासाटी बनतोस इतका शिष्ठ आणि गंभीर !
असले चेटुकमाटुक हा आहे वैद्याचा अधिकारच,
आपण दिलेल्या औषधाच्या प्रवाहाची खात्री करून घेण्यासाठी.
(तो आग्रहपूर्वक फाउस्टकडून वर्तुळ प्रवेश करवतो.)

चेटकीण [धीरगंभीर आघात देऊन ग्रंथ पढू लागते.]

घे आता याची समज
एक गुणून दहा कर,
दोन हातचे सोडून मग
बाकी तीन उरली तर
धन धावेल तुझ्यापाठी
चेटकिणीच्या शब्दासाठी
पाच आणि सहा घेऊन
चारांनी दे त्याना छेद
सात आणि आठ बनव
होणाऱ्याचा करून भेद.
नवामधून होईल एक
शून्यापोटी जिरतील दहा
आणि होईल चेटकिणीचा
एक वेळा एक पहा

फाउस्ट हे आहे एका भ्रमिष्ट थेरडीचे बरळणे.

मेफिस्टॉफलीस अजून आहे कितीतरी बाकी, आता पहाशील तू.
असेच आहे ग्रंथात लिहिलेले : मी ओळखू शकतो त्याची शैली.
वाचला आहे तो खूप वेळा, त्याचा अभ्यास ठरतो उपकारक;
कारण जर का एखाद्या ग्रंथाने दिले उडवून तर्काचे नियम,
त्याची गूढताच शहाणे नि मूर्ख अशा दोघांनाही बनवते दास.
मित्रा, नवकलेची आहे सुरवात फार पुरातन कालात,
आणि युगायुगातून, असोत सुसंस्कृत अथवा असंस्कृत,
माणसे आली आहेत ‘ तीन आणि एक व एक आणि तीन ’ करीत,

करीत आरोपण सत्याच्या बदली असल्या असत्याचे.
अशा रीतीने चालते शिक्षण आणि वटवट अगदी अप्रतिहत,
—मूर्खांच्या बाबतीत नाही संभवत प्रतिबंधाची शक्यता—
आणि जेव्हा लोकांच्या कानावर पडतो एखादा जडजंबाल शब्द,
तेव्हा त्यांना असते खात्रीच त्यात कुठेतरी अर्थ असणार अशी.

चेटकीण (पूर्वीचाच क्रम पुढे सुरू ठेवते.)

प्रज्ञानाच्या तेजापोटी
शक्ती आहे अचाट मोठी
दुनियेपासून आहे दडून.
सत्य आहे त्याच्यासाठी
ज्याचे मन कोरी पाटी
न बोलावता येते पुढून.

फाउस्ट कशी बरळते आहे जुन्या मांत्रिकाप्रमाणे !
या तिच्या अर्थहीन बडबडीने लागले आहे डोके गरगरायला !
अवध्या निरक्कलतेचा राक्षसी गीतवृंद
आहे सामावलेला या आवाजामध्ये !

मेफिस्टॉफलीझ दुराराध्य सिबिले, पुरे आहे हे एवढे:
दे आता ते रसायन, आणि तो माल देत असताना
दे सढळ हाताने, असू दे पेला काठोकाठ भरलेला.
नाही पिणार माझा मित्र तुझ्या कसबामधून निपजलेला नाश,
कारण या इथे आहे आपल्या समोर एक आत्मा सखोल व्यासंगी,
ज्याने घेतला आहे अनेक पेयांच्या सामर्थ्याचा अंदाज.

(चेटकीण मोठ्या समारंभाने ते मद्य एका पेल्यामध्ये ओतते.
फाउस्ट पेला ओठाजवळ नेतो, त्याबरोबर पेल्यातून एक
निस्तेज अशी ज्योत वर येते.)

मेफिस्टॉफलीझ गड्या, चल टाक ते गट्ट करून, नको घुटमळू !
त्या पेयामुळे तुझ्या शरीरातून उल्हासाचे स्फुरेल कारंजे.
वा ! स्वतःला समजतोस प्रत्यक्ष सैतानाचा सवंगडी
आणि तरीही डरतोस असल्या ज्योतीच्या फुरफुरण्याला !

(चेटकीण वर्तुळ नाहिसे करते, फाउस्ट त्याच्या बाहेर पडतो.)

मेफिस्टॉफलीझ ऊठ आणि पळ येथून! नाही चालणार विश्रांती घेऊन.

चेटकीण आणि, महाशय, या पेयामुळे आपला होऊ दे खूप फायदा!

मेफिस्टॉफलीझ (चेटकिणीला उद्देशून)
आणि जर का असेल काही मागणे मागायचे
कर नुसता त्याचा उल्लेख पिशाच्चोत्सवाच्या रात्री.

चेटकीण आता हे घे एक लोकगीत : हे गात जा,
मग मिळेल तुला शाश्वती अद्‌भुत प्रभावाची.

मेफिस्टॉफलीझ नको देऊ तिकडे लक्ष, फक्त चल माझ्या मागून :
अगदी दर्दरून घाम फुटणे—ही आहे पहिली निकड,
तसे झाल्याने हे द्रव्य जाईल फिरवले दौडत्या वेगाने
संपूर्ण शरिरातून, आतून बाहेरून, हृदयातून व मनातून;
आणि मग मी शिकवीन तुला उपयोग उमरावी आरामाचा
आणि लौकरच तुला उमजेल थरथरत्या सुखसंवेदनांतून,
कसा मदनदेव तुझ्या मनामध्ये उठवतो विचार स्त्रीजातीविषयी.

फाउस्ट मला जाऊ दे, मी उभा होतो त्या आरशाजवळ
ते तिचे राजस लावण्य पुन्हा पाहाण्यासाठी.

मेफिस्टॉफलीझ नको, नको, स्त्री जातीचा तो परमादर्श,
लौकरच आहे तुझ्या डोळ्याचे फेडणार पारणे सदेह होऊन.
(बाजूला) अरे बच्चा, ते रसायन तुझ्या पोटात पोचण्याचा अवकाश,
इथून तिथून प्रत्येक पोरगीच तुला वाटणार ट्रॉयची हेलन.

एक रस्ता

प्रथम फाउस्ट, नंतर त्याच्यापुढून मार्गेरिटा जाताना दिसते.

फाउस्ट — घे माझ्या बाहूचा आधार, रूपसुंदर कुलांगने, मिळू दे मान
तुझ्या घरापर्यंत तुला सोबत करण्याचा, हरकत नसेल तर.

मार्गेरिटा — मी नाही आहे कुणी कुलांगना, किंवा नाही आहे कुणी रूपसुंदरी
आणि, महाराज, मला नको आहे कुणाची सोबतही. [जाते]

फाउस्ट — परमेश्वर साक्ष, ह्या कुमारिकेजवळ आहे सौंदर्य केवळ असामान्य :
मी नाही पाहिली अजून मुलगी इतकी लावण्यलाघव
सद्‌गुणीपणाची आणि कर्तव्यबुद्धीची इतकी शान असलेली,
आणि तरीसुद्धा जिच्यात आहे तल्लख विनोदाची इतकी रग.
तिच्या गालीचा मऊसर तजेला, तिच्या ओठावरचा तो रक्तिमा,
ही अशीच चमकत राहील माझ्या डोळ्यांपुढे कल्पांतानंतरही.
कारण तिने आहे, जाता जाताच, उठवला ठसा माझ्या आत्म्यावर
आपल्या रूपाचा. स्निग्ध डोळ्यामुळे, विनम्र नजरेमुळे;
आणि जेव्हा तिने दिले मला ते असे अल्पाक्षरात उत्तर
त्या वेळी ती दिसत होती भुलवत्या यौवनाची मूर्तिमंत प्रतिमाच.

[मेफिस्टॉफलीझ प्रवेश करतो.]

ऐक! जा आणि जिंक तिचे मन माझ्यासाठी, त्या मुलीचे.

मेफिस्टॉफलीझ — मुलगी — कोणती मुलगी?

फाउस्ट — जी आत्ताच गेली इथून.

मेफिस्टॉफलीझ — हां ती?

ती गेली होती आत्ताच उपाध्याकडे, पश्चात्ताप करीत,

पापनिवेदन करण्यासाठी; केलेत परिमार्जन वट्टात सगळ्यांचे.
मी आपला ऐकत होतो तिच्या नकळत, आडोशाला राहून,
मी ओळखतो तिला, ती आहे एक अगदी अजाण पोर :
पापाशिवायच ती मुलगी राहाते हजर पापनिवेदनाच्या विधीला
आणि तिच्यावर नाही चालत सैतानाची सत्ता.

फाउस्ट वाटेल ते असले तरी, ती पाहिजे पुन्हा झाली चौदा वर्षांची.

मेफिस्टॉफलीझ ही भाषा शोभेल स्वैराचारी होऊ पाहाणाऱ्या तरुण पोराला,
ज्याला वाटत असतो स्वतःचा हक्क प्रत्येक फुलाफुलावर,
कसलीहि शालीनता किंवा कोणतेहि सन्माननीय नाव
त्याला नसते आवाक्यापलिकडचे, खुडण्यासाठी, खरडण्यासाठी;
महाशय, असे असले तरी, नेहमीच शक्य नसते तसे करणे.

फाउस्ट अहो, शक्यतामार्तंड, मला वाचवा या तुमच्या
म्हणींच्या सरबत्तीपासून, नैतिक नियमांवरील दुर्धर प्रवचनापासून.
वळतो आता थेट मुद्याकडे, सांगतो तुला अगदी स्पष्ट,
आज ह्या रात्रीच जर तिचे सुकुमार लावण्य
नाही विसावले माझ्या बाहूंच्या प्रगाढ आलिंगनात,
तर बाराचा ठोका पडल्याबरोबर आपला करार येईल संपुष्टात.

मेफिस्टॉफलीझ अशा घटनेसाठी कायकाय लागते याचा विचार करा :
एक पंधरवडा, ही तर आहे कमीतकमी मुदत,
योग्य वेळ आणि योग्य ठिकाण यांच्या जुळवणीसाठी.

फाउस्ट दे आणून ती मुलगी आणि प्रभुकृपेचे सात तास,
मग मी नाही मागणार सैतानाकडे त्याचे साहाय्य
ह्या एवढ्याशा चिमुरड्या पोरीचा विरोध शमविण्यासाठी.

मेफिस्टॉफलीझ इतक्या अल्पावधीत अगदी पॅरिसच्या लंपटाची बरोबरी !
पण मी मात्र देईन सल्ला अधिक चिम्या अशा धोरणाचा
काय हशील आहे आपले सुख हे असे झटकन् हिसकून घेण्यात ?
अरे बाबा, तेच सुख वाटेल कितीतरी अधिक अद्भुतरम्य
जर प्रथम तू करशील नाजुकसा चाळा, करशील तयारी
आपल्या प्रेयसीची त्या प्रीतीच्या बाहुल्या नाचवून,

करशील स्पर्शक्रीडा, त्या तुमच्या कादंबऱ्यांतील पोळाप्रमाणे,
महानुभाव इटालियनांच्या शिरस्त्याला अनुसरून.

फाउस्ट काय आहे त्याची गरज या माझ्या हृदयातील भुकेपुढे ?

मेफिस्टॉफलीझ आता महाराज, ऐकून घ्या माझे, विनोद सोडून देऊ,
मी तुम्हाला एकदान्‌कदाचे ठेवतो सांगून, सुस्वरूप मुलगी
ही नसते कधीहि मिळवायची अशी एका झटक्यात.
जलदी केल्यामुळे असते शक्यता तिला गमावून बसण्याची,
उलट एखादा कोमलसा डावपेच जातो करून आपले काम.

फाउस्ट आण माझ्यासाठी एखादी वस्तू त्या माझ्या परीच्या घरट्यातून,
अथवा चल मलाच घेऊन त्या माझ्या राजहंसीच्या निवासाजवळ!
आण माझ्यासाठी तिच्या वक्षावर रुळलेला शेला,
अथवा घेऊन ये तिचा कमरपट्टा प्रीतीच्या स्वप्नसृष्टीसाठी.

मेफिस्टॉफलीझ तुझ्या कामवासनेचा कसाकसा करतो मी पाठपुरावा
केवढ्या निष्ठेने, किती हिरीरीने, हे सिद्ध करण्यासाठी
मी लौकरच करीन मार्गदर्शन या तुझ्या उत्सुक पावलांचे
आणि आजच्या आज तू टाकशील तिच्या खोलीमध्ये.

फाउस्ट आणि ती मला दिसेल का ? – मला मिळेल का ?

मेफिस्टॉफलीझ नाही, भल्या माणसा,
ती आहे गेली भेटायला एका ग्रामस्थाला,
मध्यंतरी तुला मिळतील काही गोड घटिका तिथे घालवायला,
तिच्या वातावरणात श्वासोच्छ्वास करायला, अगदी ओतप्रोत,
आणि मनामध्ये विचार घोळवायला प्रेयसीच्या उपभोगाचे.

फाउस्ट आपण आताच निघू शकतो का ?

मेफिस्टॉफलीझ आताच होईल फार लवकर.

फाउस्ट ठेव तयार एक नजराणा, द्रव्यप्राप्त, उत्तमातला उत्तम.

[जातो]

मेफिस्टॉफलीझ नजराणे, आणि इतक्यात ? हा जिंकणार, अगदी निःसंशय !
मला माहीत आहेत अशी कितीतरी सुरेख ठिकाणे
जिथे आहे पुरलेले द्रव्य पुरातन कालापासून;
मी जातो आता तिकडेच आणि करतो खाणाखुणांची पहाणी.

सायंकाळ

एक नीटनेटकी लहानशी खोली

मार्गरिटा [वेणी घालून केस बांधू लागते.]

कोण होता तो—किती छान होईल मला कळलं तर—
ज्याने आज मला थांबवलं आणि जो बोलला माझ्याशी.
इतका उमदेपणा होता भरलेला त्याच्या वागण्यात
आणि असा काही और होता त्याचा रुबाब
मला खात्री आहे तो असला पाहिजे थोरामोठ्या कुळातला.
मला दिसलं ते त्याच्या चेहऱ्यावर, त्याच्या वागणुकीत—
नाहीतर त्याला कधीच झालं नसतं तसं धैर्य. [जाते]

मेफिस्टॉफलीझ हलक्या पावलाने शीर आत आणि वाग सभ्यतेला धरून.

फाउस्ट [क्षणभर शांत राहून]
मला आता राहू दे एकटेच : आपण भेटू नंतर.

मेफिस्टॉफलीझ [आसपास निरखून पहात]

सर्वच मुली नसतात ठेवीत आपल्या वस्तू इतक्या नीटनेटक्या.

[जातो]

फाउस्ट असो सुस्वागत तुझे संधिप्रकाशा, वीण तुझे ते
रेशमी जाळे या साध्यासुध्या घरगुती मंदिरामध्ये,
आणि आपण माझ्या हृदयासाठी मधुरकटु दुःख
भावी प्रीतीच्या दवभंगुर आशेवर जिवंत राहाणारे.
इथे नीरवता आहे वाहात प्रत्येक जागृत इंद्रियामधून,
वादळी जीवनापासून अगदी दूर, इथे आहे शांतीचे वास्तव्य

आणि गरिबीचे, निष्पापीपणाची श्रीमंती मिरविणाऱ्या;
या एवढ्या लहानशा कोठडीत सामावले आहे संपूर्ण सुख !

[बिछान्याजवळच्या कातडी आरामखुर्चीत आपले अंग झुकावून देतो.]

कर माझ्या शरीराचा स्वीकार; ह्या तुझ्या स्नेहपूर्ण हातांनी
आहेत झेलल्या पिढ्यांमागून पिढ्या, सुखामध्ये वा दुःखामध्ये;
घरगुती सुखांच्या या पितृसिंहासनाभोवती असेल पडला
कितीदा गराडा आनंदात बागडणाऱ्या त्या पोराबाळांचा;
आणि कदाचित् नाताळचा नजराणा आजोबाकडून घेताना
इथेच केली असेल तिने मानवंदना, हसली असेल आनंदाने,
आणि बालकाच्या गुऱ्या गालांनी तिने असेल पाहिले वर,
त्यांचा जीर्ण हात आपल्या कोवळ्या ओठापर्यंत उचलण्यासाठी.
लाडके पोरी, तुझा आत्मा करतो प्रवेश माझ्या अंतःकरणात,
मला जाणवते तुझी श्रीमंती, सुव्यवस्थेत रमणारे तुझे मन,
जे, गृहकलेमध्ये निपुण असलेल्या एखाद्या देवतेप्रमाणे,
आणते माधुर्य तुझ्या घरामध्ये, स्त्री-सुलभ स्वाभिमानाचे,
घालते टेबलावर नितळ कापड, पसरते वाळू घरामधल्या जमिनीवर;
अशी आहे दैवी शक्ती त्या तुझ्या कोमल हातांमध्ये,
तुझ्या झोपडीमध्ये आहे सामावला एक पवित्रसा स्वर्गाचा भाग.
आणि इथे ! (बिछान्याचा एक पडदा बाजूला ओढतो.)
मी थरकापतो आहे माझ्या आनंदामुळे, सोडतो आहे निःश्वास
उरलेला वेळ स्वप्नामध्ये रमविण्याच्या मधुर वासनेमुळे :
इथेच निसर्गाने केला निर्माण स्वप्नांचा रांधा, ज्याच्यामधून
झाली प्रकट एक देवता या जगामध्ये;
इथेच पहुडले होते ते बालक, शांत आणि निरामय अवस्थेत,
उबवीत आपले इवलेसे वक्षस्थल जीवनाच्या प्रवाहाने;
आणि इथेच, करून गुंफण अनाकलनीय शक्तींची,
हळुवारपणे मिळाला आकार त्या तिच्या दैवी मुद्रेला.
आणि महाशय : काय आहे तुमचा हेतु, तुमचे लक्ष्य ?
कशी भारावून धडधडते आहे ही माझी दगाळलेली छाती !
काय चालले आहे हे आपले ? आहे पवित्र आपले अंतःकरण ?
बिचाऱ्या फाउस्टा, मला आता नाही येत तुला ओळखायलाही !
आणि कसले आहे जादूने भरलेले हे वातावरण ?

माझा विचार होता फक्त विषयवासनेचा पाठपुरावा करण्याचा,
आणि आता आहे मी झुरत विशुद्ध प्रीतीच्या परमानंदासाठी :
काय आम्हाला असते खेळवीत वातावरणाचे प्रत्येक निश्वसित !
आणि जर का ती आली, याच क्षणाला, याच जागेमध्ये,
तुझ्या पापी वासनेबद्दल कसा होशील तू खिन्नछिन्न ?
उपटसुंभ लंपट जाईल खुरटून, धरील लपवून आपले तोंड
आणि पडेल तिच्या पायाशी, शरमेने विरघळून.

मेफिस्टॉफलीझ [प्रवेश करीत]

चल आटप ! ती वळली आहे गल्लीच्या कोपऱ्यावरून !

फाउस्ट एकदम दूर ! नाही कधीहि मी येणार पुन्हा या इथे !

मेफिस्टॉफलीझ हा घे एक करंडक, आहे चांगल्यापैकी आणि वजनशीर,
मी आहे तो मिळवलेला खाजगी वर्गणीतून,
आटप लौकर, तो ठेवून दे तिच्या पेटीमध्ये.
यात आहे माल, तिचे डोके फिरवीलसा, सांगतो शपथेवर;
कारण जरी मी होते हे दागिने भरले करंडकात
दुसऱ्याच पोरीला जिंकण्याचा विचार करत असताना,
तरी शेवटी पोरगी ती पोरगीच, आणि सुंदर तेही सुंदरच.

फाउस्ट देऊ, की नको देऊ ?

मेफिस्टॉफलीझ का उभा असा आणि पहातोस काय ?
कदाचित् ही दौलत तुला असेल स्वतःजवळ ठेवून द्यायची !
तसे असल्यास माझे परिश्रम आणि फुरसतीचा सगळा वेळ
फुकट दवडणाऱ्या तुझ्या लहरीपणाला घाल लगाम.
आणि कर अधिक संयमित तुझा द्रव्यलोभ !
मला वाटते, तू नसावास लोभाने झपाटलेला :
मी देतो आहे मेंदूला ताण, आणि खाजवतो आहे माझे डोके–

[दागिन्याच्या पेटीत करंडक ठेवतो आणि तिला कुलूप लावतो.]

नीघ येथून, चल जलदी कर !—
मी धडपडतो तुझी कामना आणि नड समजून घेण्याकरिता
तुझ्यासाठी एखाद्या सुंदर मुलीचे मन जिंकावे म्हणून,
आणि तू आपला त्या तिथे रहातोस उभा
जणू हातात एखाद्या व्याख्यानाची टिपणे असल्यासारखा,
आहेस खरा अगदी अस्सल प्राध्यापकी आडगा;
असा काही दिसतोस भारावलेला, वाटेल एखाद्याला
पदार्थविज्ञान आणि अतिविज्ञान ही आहेत
झाली सजीव या तुझ्या प्रत्यक्ष नाकासमोरच.
चला निघा आता ! (जातात)

मार्गरिटा (दिवा घेऊन प्रवेश करते.)

किती वाटतं इथे कोंदट, किती आहे उकडत इथं !

(खिडकी उघडून टाकते.)

पण तरीहि घराच्याबाहेर नाही वाटलं इतकं गरम.
किती चमत्कारिक, मला वाटतं आहे कसलं तरी भय –
मला वाटतं आहे, माझी आई घरी यावीशी.
मी आहे एक भेदरट भोळसट पोर;
या असल्या खुळचट भीतीने लागले कापायला.

[गाणे म्हणत म्हणत आपले कपडे उतरू लागते.]

थूल देशिचा कोणी राजा
प्रीत तयाची अमर खरी;
भेट देउनी सुवर्ण पेला
प्रिया पोचली देवघरी.
त्या पेल्यावर जीव तयाचा
इतरांना नच अर्थ उरे
उचलुन घेता तोच मुखाशी
नयनि वाहती अश्रु-झरे.

मृत्युकाल आल्यावर त्याने
हिशोब दौलतिचा केला
सर्व दिले धन वारसास पण
दिला न सोन्याचा पेला.
अन् राजाने सरदारांना
दिली मेजवानी जंगी
दरबाराच्या सभामंडपी
दुर्गावर सागरसंगी
उभा राहिला राजा प्राशित
जीवनसंध्येची लाली
आणि फेकिला पवित्र पेला
सागरात त्याने खाली.
दिसला तो त्याला पडताना
समुद्रात बुडतानाही
अन् नेत्रातिल प्रकाश सरला
पुन्हा न प्याला तो काही:

(कपडे ठेवण्यासाठी पेटी उघडते आणि करंडक दृष्टीस पडतो.)

हा इतका सुरेख करंडक कसा आला माझ्या पेटीत ?
कुलुप लावल्याचं आठवतं मला अगदी चांगलं.
अद्‌भुतच म्हणायचं; काय असेल बरं या करंडकात ?
कदाचित् हा असेल इथे ठेवलेला गहाण म्हणून
कुणाला तरी माझ्या आईने दिलेल्या कर्जाबद्दल.
इथेच लोंबते आहे फितीला बांधलेली एक किल्ली :
उघडतेच मी, लावते निकाल या गौडबंगालाचा.
अग बाई !
किती मोहक आहेत या वस्तू ! डोळे दिपवणाऱ्या
इतक्या सुंदर वस्तू नव्हत्या पाहिल्या मी स्वप्नातहि !
ही रत्ने दिसतील शोभून फक्त एखाद्या
अमीराच्या पत्नीला, शोकदार मंडळीत वावरत असताना.
कसा बरं दिसेल हा हार माझ्या अंगावर ?
कोणाची असतील ही,

ही रत्ने इतकी तेजस्वी, इतकी अनोखी.

(काही रत्ने अंगावर घालते, आणि नंतर आरशापाशी जाते.)

ही कर्णभूषणं, किती छान होतं माझी असती तर!
त्यांच्यामुळे सगळा नूरच पालटतो एकदम.
कारण पुरुषांनासुद्धा वाटत असतं फार बरं
एखाद्या बिचाऱ्या गरीब मुलीला तरुण आणि सुंदर म्हणताना;
अर्थात् त्यापासून नसतं होत काहीही निष्पन्न--
आम्हाला लागते सहन करावी दयेने केलेली असली स्तुती.
सोन्याचाच मोह
असतो पडत
सगळ्यांच्या हृदयाला : नशीबच फुटकं आम्हा गरीबांचं.

एक फेरफटका

विचारमग्न अवस्थेत फाउस्ट येरझारा घालीत आहे;
मेफिस्टॉफलीझ त्याला गाठतो.

मेफिस्टॉफलीझ
तिरस्कृत प्रीतीचा, नरकातल्या वडवाग्नीचा,
आणि त्याहूनही
भयंकर शापांचा
नुसता भडिमार!

फाउस्ट
झालं आहे तरी काय तुला? आणि कशासाठी ही उग्र मुद्रा?
मी अजून तुझा कधीहि नव्हता पाहिला असला चेहरा.

मेफिस्टॉफलीझ
मला हवे आहे सैतान एकदम मला नेईल तर,
पण फक्त अडचण अशी, तो आहे मी स्वतःच.

फाउस्ट
हे काय नाटक म्हणायचे, की फिरले आहे तुझे डोके?
वेड्याची भूमिकाच तुझ्या वृत्तीशी आहे जमणारी.

मेफिस्टॉफलीझ
जी रत्ने मिळायची मार्गरिटाला, ती सगळी
आहेत पडली एका म्हातारड्या भिक्षुकाच्या खिशांत!
त्या सगळ्या वस्तू पडल्या तिच्या आईच्या नजरेला
आणि तिची सदसद्विवेकबुद्धी सापडली एका गुप्त वादळात :
तिच्या आईला आहे कसब नुसत्या वासाने भानगडी हुडकण्याचे.
तिचे ते हुंगणारे नाकाड असते नेहमीच प्रार्थनापुस्तकात घुसलेले;
एखादी गोष्ट आहे पवित्र किंवा अपवित्र
हे पाहाण्यासाठी ती घेईल वास सामानासुमानाचा.
अर्थात् त्या आपल्या जवाहराचा तिने घेतला फक्त वास
आणि लगेच केले निदान धुरकाऱ्यावरून पापाचे.

'अग पोरी' ती केकाटली 'विश्वास ठेव, कुमार्गाचे धन
करील आत्मनाश, आणि बिघडवील तुझे स्वास्थ्य.
ही रत्ने जाऊ देत अर्पिली आदिमाता मेरीला
आणि स्वर्गातून ती धाडील अमृत आपणासाठी.'
बिचारी मुलगी हसली ओठ मुरडून काहीशा अनिच्छेने.
तिला वाटले अगदी अयोग्य अशी नजराण्याची चिकित्सा करणे.
शिवाय, तिला वाटले इतका उदार अंतःकरणाचा दाता
नाही असू शकणार देव न मानणारा किंवा दुराचरणी.
पण लौकरच आईने बोलावले एका धर्माधिकाऱ्याला
आणि ही सगळी कथा त्याला सांगितली;
त्याने हेरले कशाने पोळीवर तूप पडेल ते.
तो बोलता झाला, 'माझे मुली, जीवनाकडे नेणाऱ्या
निरुंद वाटेवर तू दाखवते आहेस योग्य मनोवृत्ती.
कारण मोहावर मात करणाऱ्यालाच मिळतो मोक्ष.
फक्त धर्मपीठ पचवू शकते सुवर्ण आणि भूमी
आणि त्याला या गोष्टीचे नाही होत कधीहि अजीर्ण,
कारण वाममार्गाने झालेला धनलाभ आत्मसात् करण्यासाठी
आवश्यक असणारी चांगली पचनशक्ती असते धर्मपीठाजवळ."

फाउस्ट आणि हे वचन पडते लागू दुसऱ्या लोकांनाही,
उदाहरणार्थ, एखाद्या राजाला, एखाद्या ज्यूला.

मेफिस्टॉफलीझ त्याने धुऊन नेली सारी कर्णभूषणे, बांगड्या, आंगठ्या,
जशा न्याव्या एखाद्या बाईने बाजारातल्या वस्तू;
आणि निघण्यापूर्वी मानलेन शांतपणे त्यांचे आभार.
जणू त्यांनी एखादी मामुली गोष्ट दिल्याप्रमाणे,
दिलेन आश्वासन भविष्यकाळामधील स्वर्गीय आनंदाचे,
आणि सोडलेन त्यांना आध्यात्मिकतेच्या उन्नत अवस्थेमध्ये.

फाउस्ट आणि मार्गरिटा?

मेफिस्टॉफलीझ बसली आहे अस्वस्थ मनोवृत्तीत,
तिला नाही सोडवत मोह किंवा रागावता येत,
करते स्वप्नरंजन करंडकाच्या अंतरंगातील सुवर्ण संग्रहाविषयी,
आणि त्याहूनही, करंडक देणाऱ्या त्या माणसाविषयी.

फाउस्ट माझी प्राणप्रिया चिंताग्रस्त व्हावी याचेच होते आहे मला दुःख.
जा, आण माझ्यासाठी दुसरी रत्ने, अगदी नवी आणि तेजस्वी,
ती पहिली काहीच नव्हती, विशेष अशी फुशारकी मारण्यासारखी.

मेफिस्टॉफलीझ अगदीच क्षुल्लक, खेळातली वाटावीत आमच्या महाराजांना !

फाउस्ट या प्रकरणात मी सांगतो तशीच जा करांत योजना
जा भेट तिच्या शेजारणीला, घे काळजी सभ्यतेने वागण्याची,
नको करू सैतानासारखा पाणचट पचपचीतपणा,
जा आता, आण शोधून माझ्यासाटी दुसरा करंडक.

मेफिस्टॉफलीझ माननीय महाराज, आपल्या अनुज्ञेप्रमाणे करतो उड्डाण.

(फाउस्ट जातो.)

प्रीतीने झपाटलेल्या या मूर्खाला सगळे हवे इच्छेप्रमाणे घडायला:
पाहिजेत फुंकराने गेले उडून तारांगणातील ग्रहगोल,
आपल्या प्रेयसीचा अधिक गमतीने वेळ जावा म्हणून

शेजारणीचे घर

मर्था [एकांतात] देवा परमेश्वरा, कर माफी माझ्या मालकांना,
झाले आहेत परदेशात पसार घरदार सोडून,
त्यांना मिळतं सारं समाधान माझा छळ करण्यात,
मला एकटीला सोडून जाण्यात, इथे तरटावर.
तरी बरा आहे देव साक्षी, नाही कधी दिलं उलटं उत्तर,
जिवापरतं केलं प्रेम, आणि आता बसले आहे त्यांना गमावून.

(रडू लागते.)

काय म्हणायचं मला, कदाचित् बिचारा नसेल जिवंतही–
किती बरं होतं त्याच्या मृत्यूचा दाखला मिळता तर!

मार्गरिटा अहो मर्थाबाई!

मर्था काय ग झालं, पोरी?

मार्गरिटा मी भीतीने आहे गळून गेले, मी सापडले आहे एका भोवऱ्यात.
दुसरा करंडक झाला आहे माझ्याकडे उपस्थित,
एबनीच्या लाकडाचा, लपवून ठेवलेला माझ्या पेटीमध्ये,
आणि त्या पहिल्या करंडकात होत्या त्याहूनही कितीतरी पटीने
अधिक अप्रतिम आहेत वस्तू या करंडकामधील.

मर्था मुलीने आईला अशा गोष्टीविषयी न सांगणे हेच उत्तम.
नाहीतर जायचे हेहि धर्माधिकाऱ्याकडे पहिल्याच्या पाठोपाठ.

मार्गरिटा पण पाहा ना, एकदा नुसतं पहा त्याच्याकडे, हं पहाना!

मर्था चिमुरडे आहेस चांगलीच नशिबाची!

मार्गरिटा सगळं फुकट ग, मला ते घालून नाही बाहेर जाता येत,
नाही जाता येत मला शहरात किंवा प्रार्थनेसाठी.

मर्था तू आपली अशी येत जा वरचेवर माझ्याकडे,
इथेच कर चांगला नट्टापट्टा–कुणी पाहात नाही सवरत नाही–
आणि मग तूं इथे चालून पाहा या आरशासमोर,
अग त्यामध्ये आहे आनंद आपणा दोघींनाही.
आणि अधूनमधून सणावारी, सुटीच्या दिवशी,
तू घालित जा ते दागदागिने, एकामागून एक,
कानातली मोत्ये, गळ्यातला हार, : तुझ्या आईपासून
आपण ठेवू ते लपवून, किंवा एखादी सांगू भाकडकथा.

मार्गरिटा कोणाचा असेल बरं तो हात, करंडक ठेवणारा ?
कशानं तरी मला भासते ही घटना भयसूचक असावीशी.

(दारावर थाप पडते.)

अगबाई, आई की काय ? पहा बरं, कोण आहे दाराशी ?

मर्था (पडद्यामधून पाहात)

कोणीतरी गृहस्थ, मी अजून कधीहि न पाहिलेला.
आत या ना !

मेफिस्टॉफलीझ बाईसाहेब, मी मानतो आपले आभार.
आहे दिलगीर कामामध्ये व्यत्यय आणल्याबद्दल, मला आहे–

[मार्गरिटाच्या उपस्थितीमुळे काहीसा खजिल झाल्यासारखा दिसतो.]

मला आहे काही बोलायचं मर्था श्वर्टलीनशी.

मर्था मीच ती. काय आहे आपलं काम ?

मेफिस्टॉफलीझ आपण त्याच आहात, एवढं पुरे मला :
आपण दिसता आहात थोरामोठ्यांच्या सहवासात.

माफी करा मला, त्रास दिल्याबद्दल,
पुन्हा केव्हा तरी येईन आपल्याकडे.

मर्था (मोठ्या आवाजात)

एकेक ऐकावं ते निघतं पहिल्याहून विलक्षण!
हा मानतो तुला कुणातरी थोरामोठ्याची लेक!

मार्गारिटा मी बिचारी आहे नुसती एक गरीब मुलगी :
या गृहस्थांना असावी सवय खूप स्तुती करण्याची.
ही रत्नं आणि अलंकार नाही आहेत माझे स्वतःचे.

मेफिस्टॉफलीझ तसं नाही म्हटलं मी नुसत्या अलंकारांमुळे :
तिची आहे अशी शान, अशी काही तेजस्वी नजर,
तिच्या आसपास जरा रेंगाळायला मिळाले तरीसुद्धा
कुणाही पुरुषाला वाटला पाहिजे तो आनंद.

मर्था बोला आता, कोणत्या कामासाठी आपण इथे आलात?

मेफिस्टॉफलीझ मी हवी होती, आणायला तुमच्यासाठी अधिक चांगली बातमी
तथापि मला नाही धरणार तुम्ही जबाबदार एवढीच आशा—
आपले मालक आहेत वारले. आणल्या आहेत त्यांच्या सदिच्छा.

मर्था वारले, अशक्य! प्रत्यक्ष माझ्या जिवाचे धनी! हाय रे दैवा!
माझे मालक वारले! सावरा कुणीतरी, बेशुद्ध पडणार मी.

मार्गारिटा अहो शेजीबाई, या निराशेला द्या तोंड मन घट्ट करून.

मेफिस्टॉफलीझ आणि ध्या ऐकून मी सांगतो ती दुर्धर घटना.

मार्गारिटा म्हणून नको बाई कधी प्रेम बसायला—दुःख भोगण्यासाठी.
माझा प्रियकर असा मेला तर माझी छातीच जाईल फुटून.

मेफिस्टॉफलीझ प्रत्येक सुखाबरोबर आणते दुःख—तेच जीवन.

मर्था सांगा मला त्यांचा अंत कसा झाला ते.

मेफिस्टॉफलीझ भले पतिव्रते, आम्ही त्याला पुरलं पादुआमध्ये
त्याचे थडगे आहे बांधलेले संत अंतोनीच्या परिसरामध्ये.
पवित्र भूमीवर इष्ट संस्कारांनी पुनीत होऊन

तो आहे घेत निवांतपणे अनंत काळची अंतिम विश्रांती.

मर्था आणखी नाही का काही आणलंत, काही स्मृतिचिन्ह ?

मेफिस्टॉफलीझ हो, त्याची आहे एक विनंती — आपल्या श्राद्धासाठी
तीनशे प्रार्थना घडवून आणण्याचा गंभीर आदेश,
बस एवढंच, दुसरे नाही काहीही माझ्याजवळ.

मर्था म्हणजे ! नाही आणलीत शकुनाची दिडकीही ? एखादी अंगठीसुद्धा,
जी सापडते कोणाही कामगाराजवळ बोचक्याच्या तळाशी
जी असते त्याने जपलेली कुठेही हिंडताफिरताना,
जी राखण्यासाठी तो प्रसंगविशेषी मागतो भीक, राहातो उपाशी

मेफिस्टॉफलीझ बाईसाहेब, मला किती वाटतं वाईट असं सांगताना,
पण खरं म्हणजे तो नव्हता उधळमाधळ करणारांपैकी,
तो होता त्याच्याच पापांनी संत्रस्त झालेला.
हो, आणि त्याहूनही त्याला छळले त्याच्या कमनशिबाने.

मार्गरिटा असली दुःखे दुर्दैवी माणसाच्याच येतात वाट्याला !
मी करीत जाईन त्याचे स्मरण माझ्या प्रार्थनेमध्ये.

मेफिस्टॉफलीझ सुंदर पोरी, तुझ्यासारख्या मोहक मुलीने
खरं म्हणजे पाहिजे केला विवाहाचा विचार.

मार्गरिटा विवाहाचा विचार ? छे, नाही बाई आणखी कित्येक वर्षे.

मेफिस्टॉफलीझ पती नको म्हणतेस ? मग ठेवून दे एखादा प्रियकर :
अशा अल्लडिकेचे लाड करणे, प्रेम करायला तिला शिकवणे,
हा असतो परमेश्वराने पाठविलेला मधुर नजराणा.

मार्गरिटा अहो महाशय, असले प्रकार नाही बसत आमच्या रीतिरिवाजात.

मेफिस्टॉफलीझ रिवाज असो अथवा नसो, असं घडतं एवढं निश्चित.

मर्था कृपा करून सांगा सर्व, सर्व उरलंसुरलं.

मेफिस्टॉफलीझ मीच होतो त्याच्या जवळ त्याच्या अंतकाळी
होता पडलेला गलिच्छ बिछान्यावर कुजलेल्या गवताच्या;

नव्हता उकिरड्यावर; एखाद्या खिश्चनाचा
असा व्हावा तसाच झाला त्याचा अंत; आणि बोलला
व्यथित झाल्याचे सदसद्‌विवेकबुद्धीवरील पापांच्या राशीमुळे.
म्हणाला रडताना, "किती येते किळस मला स्वतःची
पत्नीला, धंद्याला, आणि घरदाराला सोडून दिल्याबद्दल.
तेच मारते मला, ते पापच ज्याने आहे मी खंतावलेलो
जर फक्त ती करती मला क्षमा, मी मरण्यापूर्वी!"

मर्था (रडत रडत) माझे मालक! मी अगोदरच केली आहे त्यांना क्षमा.

मेफिस्टॉफलीझ "मीच जबाबदार" तो म्हणायचा "पण तीही त्याहूनही जास्त."

मर्था अगदी खोटं! आणि तेही मृत्यूच्या दाराशी!
अशा खोट्यानं दिलेनी तोंड मृत्यूच्या घटकेला!

मेफिस्टॉफलीझ त्याच्या संबंधात मला काही समजत असेल तर,
तो होता अधिकाधिक भरकटला पैलतीरी पोचण्यापूर्वी.
तो म्हणाला, "नव्हती मिळाली मला संधी मजा लुटायची,
प्रथम झाली मला मुलंबाळं, नंतर मिळविली त्यांची भाकरी,
भाकरी म्हणतो तेव्हा घ्यायचा त्याचा व्यापक अर्थ—
माझ्या कुटुंबाकडून नाही लाभलं कसलं स्वातंत्र्य, कसलं समाधान."

मर्था आणि हे मी इतकं उत्कट प्रेम केलं असतानाही.
इतक्या खस्ता सतत रात्रंदिवस खाऊन सवरूनही!

मेफिस्टॉफलीझ तसं नव्हे, हृदयात होती तुमची आठवण.
तो म्हणाला "जेव्हा माल्टा झालं दृष्टीपार
मी केली आर्त प्रार्थना माझ्या पत्नीसाठी, माझ्या मुलांसाठी
आणि परमेश्वरानेही त्या प्रार्थनेला दिला प्रतिसाद. :
भर दर्यामध्ये आमच्या गलबताने केला पाठलाग तुर्की जहाजाचा
आणि त्यावर मिळाला आम्हांला सुलतानाचा खजिना,
मग गेली वाटली बक्षिसे साहसीपणाबद्दल;
आणि मलाही योग्य असा माझ्या वाटणीचा
मिळाला हिस्सा—म्हणजे मिळाली चांगली दौलतच."

मर्था ती कोणती ? कुठे आहे ती ? आहे पुरलेली ? दूर दडवलेली ?

मेफिस्टॉफलीझ तिची झाली वाऱ्यावर वरात, आता कोण सांगू शकणार ?
त्याच्यावरती बसली मर्जी नेपल्समधील एका सुंदरीची,
जेव्हा अशा एकाकी अवस्थेत तो पडला तिच्या दृष्टीला;
आणि त्याच्यावर आपल्या प्रीतीची तिने केली अशी खैरात,
अगदी मृत्यूच्या दिवसापर्यंत त्याला होते ते आठवत.

मर्था नादान ! आपल्या मुलांना, आपल्या बायकोला असं लुबाडणारा !
दुस्थितीने सुद्धा नाही सुधारली त्याची दुर्बुद्धी.
किंवा केले त्याला परावृत्त आयुष्यातल्या लज्जास्पद मार्गापासून.

मेफिस्टॉफलीझ किती खरं आहे ? नेमका त्यामुळेच आहे मेलेला.
स्पष्टच बोलतो, जर मी असतो तुमच्या परिस्थितीत
मी पाळतो विधवेला शोभणारे सुतक वर्षभर
आणि नंतर लागतो शोधायला दुसरा जोडीदार.

मर्था या पहिल्यासारखा दुसरा सापडणं फारच कठीण,
अख्ख्या दुनियेत नाही सापडणार त्याच्या तोडीचा.
इतका गोडाभाबडा नसेल मिळाला कुणाही बाईला.
फक्त लागला त्याला नाद भयंकर भटकंतीचा,
परदेशी बायांचा आणि शिवाय परदेशामधील दारूचा,
आणि त्याबरोबरच जडले व्यसन दुर्दैवी फाशांचे.

मेफिस्टॉफलीझ ठीक ठीक तेही ठरते शेवटी चांगले
जर त्यामुळे होता कानाडोळा तुमच्या दुर्वर्तनाकडे.
उभयपक्षी सैल निर्बंध, हाच असतो माझा सल्ला :
अशा अटीवर, वा, मीसुद्धा करीन प्रियाराधन,
तुझ्यासाठी घेईन आंगठी, आणि देईन एकनिष्ठेचे वचन.

मर्था मला, महाशय, आहे खात्री तुम्ही बोलता फक्त थट्टेमध्ये !

मेफिस्टॉफलीझ (बाजूला) हा आहे खड्डा टाकलेला,
आता इथून माघार घेणे हेच सर्वोत्तम
आणि तीही यांहून अधिक निष्कर्ष निघण्यापूर्वी.
ही लावील सैतानालासुद्धा वचन पाळायला.

(मार्गेरिटाला उद्देशून मृदू आवाजात)

ए अल्लडिके, तुझं हृदय नाही का हेलावलं ?

मार्गेरिटा काय अर्थ आपल्या बोलण्याचा ?

मेफिस्टॉफलीझ (बाजूला) बिचारी लोभस अजाण पोर !
नमस्ते बाईसाहेब !

मार्गेरिटा नमस्कार !

मर्था थांबा, तुम्ही आणाल का

मला हवा असलेला तो पुरावा ? त्याला कुठे पुरलं,
याचा दाखला, केव्हा मेला, कसा मेला या गोष्टींचा ?
मला आवडतात सगळ्या गोष्टी कायद्यानुसार करायला,
आणि वाचायला शनिवारच्या वृत्तपत्रात छापून आल्यानंतर.

मेफिस्टॉफलीझ तुम्हांला लागतील दोन साक्षीदार या प्रकरणामध्ये;
मग सत्य वावरू शकेल उजळ माथ्याने,
आणि दैववशात आहे माझ्यापाशी एक जानी दोस्त,
जो कोर्टामध्ये राहील हजर तुमच्या बाजूने.
मला वाटते तुम्हाला चालेल त्याला आणले तरी

मर्था आणाच त्यांना, कृपा करून !

मेफिस्टॉफलीझ आणि असेल का त्या ठिकाणी ही तरुण कुलवंताची कन्याही
तोही आहे उमदा तरुण, खूप हिंडलाफिरलेला.
आणि कुलांगनांना कसं सुखवावं हे आहे त्याला ठाऊक.

मार्गेरिटा मी होईन लाजून चूर, बसतील डोळे जमिनीशी खिळून.

मेफिस्टॉफलीझ काय जरूरी तुम्हाला लाजण्याची, तो प्रत्यक्ष सम्राट असला तरी.

मर्था मग ठरलं आज रात्रीच त्या माझ्या लहानशा बागेत,
घराच्या मागे, आपण वाट पाहू या उद्याहरर्यांची.

एक रस्ता

फाउस्ट व मेफिस्टॉफलीझ यांची गाठ पडते.

फाउस्ट — कसं काय ? काय बातमी ? यश मिळण्याची कितपत शक्यता ?

मेफिस्टॉफलीझ — अरे वा, आपल्याला बुवा आवडतो प्रियकर असाच आसुसलेला;
ती पोरगी होणार तुझी, एका आठवड्यामध्ये, किंवा त्यापूर्वीही,
आज रात्रीच ती तुझ्या पडेल नजरेला शेजारच्या मर्थाकडे;
माझ्या मताने ती बाई आहे अगदी खास घडवलेली
कुंटणखाना चालविण्यासाठी किंवा जिप्सीचा धंदा करण्यासाठी.

फाउस्ट — फार छान !

मेफिस्टॉफलीझ — पण माझ्याकडून आणि तुझ्याकडून तिची आहे काही अपेक्षा ?—

फाउस्ट — उपकाराला असतो हक्क परतफेडीची अपेक्षा ठेवण्याचा.

मेफिस्टॉफलीझ — आपण आहे फक्त एवढे निश्चितपणे सिद्ध करायचे—
तिचा नवरा, तिचा मालक आहे पुरलेला
पादुआ शहरातील पवित्र भूमीमध्ये, थोड्याच दिवसांपूर्वी.

फाउस्ट — केवढा मोठा तुझा धोरणीपणा ! मग आता निघू या प्रवासाला

मेफिस्टॉफलीझ — पवित्र पोरकटपणा !—अनावश्यक परिश्रम :
आपण घ्यायची एक शपथ आणि बाकी करायची थापाथापी !

फाउस्ट — जर असेल हीच कमाल तुझ्या कर्तृत्वाची
तर तुझी लाडकी योजना समज कोसळली म्हणून.

मेफिस्टॉफलीझ — सद्‌गुणाच्या अवतारा ! ही दिसते आहे सुधारण्याची सुरुवात !
काय हे आहे पहिलेच प्रकरण तुझ्या जीवनातील,

	ज्याच्या संदर्भात तू देतो आहेस खोटी साक्ष ? थोडक्यात म्हणजे, तू नव्हतास का पूर्वी बडबडकास विद्वान कुक्कुटोजीप्रमाणे त्या परमेश्वराविषयी, त्या विश्वात्मक जटिल प्रश्नाविषयी, त्या मानवाविषयी, त्याच्या विचाराविषयी, त्याच्या स्वप्नांविषयी, नाही का केलीस व्याख्यांची पोपटपंची अगदी रंगून जाऊन शब्दांच्या आतषबाजीसह, बेधडक छातीने ? आणि आता पाहा लक्षपूर्वक : खरे बोलायचे तर तुला त्याविषयी तेव्हा होते एवढेच कळलेले जेवढे आता आहे श्रीयुत श्वर्टलीनच्या अंतिम विश्रामस्थानाविषयी.
फाउस्ट	आहे तो अजून शाबूत तार्किकामधला जुना मिथ्यावादी !
मेफिस्टॉफलीझ	मला आश्चर्य वाटतं ! कर प्रयत्न आपलं डोकं थंड ठेवण्याचा, उद्याच नाही का तू करणार आहेस आपली शिकस्त प्रतिष्ठेच्या नावाने बिचाऱ्या ग्रेशनला फशी पाडण्यासाठी ? नाही का काढणार तू साक्ष प्रीतीच्या अंतरात्म्याची ?
फाउस्ट	आणि तीही या माझ्या हृदयाच्या हृदयापासून.
मेफिस्टॉफलीझ	तू अर्थातच घेशील शपथ प्रीतीमधील चिरंतन एकनिष्ठेची, प्रीतीमधील खास एकमेव अनिवार्य ओढीची : केवढा चमत्कार, किती अद्‌भुते या हृदयातून पडतात बाहेर !
फाउस्ट	पुरे वटवट ! एवढे निश्चित ! – जर माझ्या मनात, उठत असला असा कल्लोळ, असा महापूर, अशी ज्वाळा, की ज्यामुळे सतत शोधूनही नाही सापडत, त्या अनुभवाचे गहनगूढ नाव; जर अनुरूप उदात्त शब्दांचा वेध घेण्यासाठी सर्वस्व समर्पून पृथ्वी धुंडाळल्यावरही पुन्हा ऐकावे लागत असेल तेच प्रत्युत्तर — मी पेटतो आहे, मी पेटतो आहे, कल्पांतापर्यंत : तर काय हा समजायचा रिता मिथ्यावाद आणि फक्त कसली तरी सैतानी लीला ?
मेफिस्टॉफलीझ	माझा अंदाज किती बरोबर !

फाउस्ट एवढे लक्षात ठेव, कृपा करून,
आणि मग नको श्रमवू माझा आवाज, माझी फुफ्फुसे :
जो घोळवतो एकच गाणे आपल्या जिभेवर
तोच शेवटी होतो विजयी.
म्हणून चल आता, मी विटलो आहे असल्या वटवटीला,
आलो आहे तुला शरण, केवळ अगदी अगतिक झाल्यामुळेच.

मर्थाच्या बागेमध्ये

फाउस्ट, मार्गरिटा.

मार्गरिटा मला वाटतं, आपण करता आहा माझ्यावर अनुग्रह,
आणि लाजता आहा माझ्या अज्ञानाला इच्छा नसूनही;
कारण सरावासरावाने शालीन पांथस्थही होतात तरबेज
अगदी चालचलाऊ अशा गोष्टीमधून आनंद मिळविण्यात.
इतका अनुभव गाठीशी असलेल्या कोणाही माणसाला
माझं बाळबोध बोलणं वाटत असणार अगदीच अर्थहीन.

फाउस्ट तुझा एक शब्द, एक दृष्टिक्षेप मला आहे अधिक मोलाचा
अख्ख्या पृथ्वीच्या सगळ्या शहाणपणाहून.

(तिच्या हाताचे चुंबन घेतो.)

मार्गरिटा हे हो काय भलतंच! कसं घेववतं तुम्हाला चुंबन माझ्या हाताचं!
किती कुरूप आहे तो, किती खरबरीत!
इतकं असतं मला घासायचं, पुसायचं, सारवायचं,
आणि तरी ते आईला वाटत असतं नेहमी थोडंच.

मर्था. मेफिस्टॉफलीझ.

मर्था तुमचे हे प्रवास कधीच संपायचे नाहीत म्हणता तुम्ही!

मेफिस्टॉफलीझ होय! कामासाठी जावं लागतं, आणि कर्तव्य म्हणून :
हे ठिकाण सोडावे लागणार या गोष्टीची जाणीव झाल्यावर
विसावणाऱ्या सुंदर शहरात राहात असतानाही वाटते उदास.

मर्था असल्या गोष्टी जातात निभावून आपण तरुण असताना :
अशी जगभर भ्रमन्ती करणे हे तेव्हा वाटते शोभायचे.

पण चारी दिवस नसतात सारखे, येतो आपत्काल,
मग एकट्यानेच लागते सरपटावे आपल्या थडग्याकडे,
एक ताठरलेला वृद्ध ब्रह्मचारी म्हणून—ते असतं अगदी असह्य.

मेफिस्टॉफलीझ येते शिसारी असल्या दुर्घटनेच्या नुसत्या विचारानेही.

मर्था तर मग घ्यावी काळजी आपण फार उशीर होण्यापूर्वी !

फाउस्ट. मार्गेरिटा.

मार्गेरिटा इतकी नैसर्गिक दिसते आहे तुमची सौजन्यशीलता,
आणि म्हणतात ना, दृष्टीच्या आड ते मनाच्या पल्याड
शिवाय तुम्हांला जरूर लाभणार कितीतरी मैत्रिणी
माझ्यापेक्षा कित्ती अधिक हुषार असलेल्या.

फाउस्ट अग माझ्यावर ठेव विश्वास, हुषारी समजतात ना
ती पुष्कळदा असते अहंता आणि ढोंग.

मार्गेरिटा असं कसं म्हणता ?

फाउस्ट मी म्हणतो, एकनिष्ठ माणसांना
नसते उमगत आपल्या निष्पापीपणाचे पवित्र्य मूल्य;
तरीही असतात साधी प्रीती आणि लीनता ही उदात्तच
निसर्गशक्तीच्या उदार सदयतेची सुमधुर प्रसादचिन्हे—

मार्गेरिटा क्षणभर तरी होऊ दे माझी आपणाला आठवण,
आपली आठवण काढीत राहण्यासाठी मला आहे पुष्कळ फुरसत.

फाउस्ट मग पुष्कळदा एकटीच असतेस तर ?

मार्गेरिटा हो, असते. मी करते कबूल
आमचं घरदार आहे छोटंसच,
पण तरीसुद्धा पुष्कळ असतं करायचं सवरायचं,
आमच्या घरी नसते मोलकरीण : स्वैपाकपाणी, झाडलोट,
शिवणं टिपणं, वाढणं सवरणं. हेच होते मला पुरेपुरेसे.
या नित्याच्या बारिकसारिक गोष्टींमध्ये
माझी आई म्हणजे आहे एक आदर्शच.
खरं म्हणजे

ती आहे भयंकर काटेकोर.
खर्च कमी करणं जरूर असतं असंच नव्हे काही.
आम्हाला परवडेल इतर लोकांपेक्षा अधिक चांगलं रहाणं.
माझ्या वडिलांनी ठेवला आहे बराच पैसाअडका,
ठेवलं आहे घरदार आणि बागबगीचा, शहराच्या नजीकच.
तरीही आजकाल माझं जीवन असतं एकाकीच :
माझा भाऊ आहे सैनिक, तो आहे आता परदेशात;
माझी छोटी बहीण—वारली बिचारी, दैव आमचं.
तिच्यासाठी मी खाल्ल्या खूप खस्ता,
आजही असत्या खाल्ल्या तिच्याकरता अगदी आनंदानं
इतकी होती ती पोर माझी लाडकी.

फाउस्ट तुझ्यासारखी ती असली तर असेल अगदी परीच.

मार्गेरिटा मीच केलं तिचं संगोपन, आणि तिचाही माझ्यावरती होता जीव.
माझ्या वडिलांच्या मृत्यूनंतर त्या पोरीचा झाला जन्म;
निराशेवरती होती तरंगत आईबद्दलची माझी आशा
इतकी होती ती आजारी, इतकी जर्जर आणि निराधार.
महिन्यानूमहिने शुश्रूषा केल्यावर ती हळूहळू लागली सुधारू,
पण त्या भयंकर तापामुळे ती झाली इतकी अशक्त,
त्या जिवाला अंगावर पाजीन हा विचारही होता अशक्य,
आणि म्हणूनच मला लागले या जिवाचे संगोपन करावे
पाजून दूधपाणी, जागून रात्रंदिवस,
माझ्या मांडीवर अशी सुखवायची, वाटायची माझीच,
आणि उचलल्यावर खुषीत येऊन मला राहायची अशी बिलगून;
खेळकर स्वभावामुळे तिने लौकरच घेतले बाळसे सुद्धा.

फाउस्ट तुला मिळत होता एक विशुद्ध मानवी आनंद.

मार्गेरिटा आणि तरीसुद्धा मला बोचत होते पुष्कळ काळज्याकाटे :
रात्रीच्या वेळी तिचा छोटा पाळणा मी ठेवायची
माझ्या बिछान्याजवळ, ती चळवळली किंवा कुरकुरली
की व्हायची झोपेतून जागी
आणि तिचे दूधपाणी केल्यावर तिला घ्यायची माझ्या कुशीत;

किंवा ती रडायला लागली की लागायचं मला उठायला,
उचलून घेऊन तिला थोपटायला,
आणि फिरवायला एवढ्याशा खोलीमध्ये रडणं थांबेपर्यंत;
आणि तरीसुद्धा अगदी उजाडताच पडायची बाहेर
जड डोळ्यांनी धुण्याची पाटी घेऊन.
आणि त्याशिवाय असायची घरकामे किंवा बाजारहाट :
असल्या काबाडकष्टानंतर
नाही राहात माणसाची मनोवृत्ती नेहमीच उल्हासी.
आणि तरीही असल्या श्रमांमुळे
स्वतःचे अन्न लागते रुचकर, वाटतो आपल्यावर अनुग्रह झाल्यासारखा,
वाटते कृतार्थता विश्रांती मिळाल्यावर.

मर्था. मेफिस्टॉफलीझ.

मर्था आम्हा बिचाऱ्या बायकांना असतो हा एक उद्योग :
तुमच्यासारख्या अशा ब्रह्मचाऱ्यांना मार्गावर आणणं.

मेफिस्टॉफलीझ मग खरोखरच कोणा तरी तुमच्यासारख्या बाईनं
मेहेरबानी करून पाहिजे दाखवलं मी कुठे चुकतो ते.

मर्था पण काय हो, तुमचं मन कधीच नव्हतं गुंतलं कुण्या प्रेयसीमध्ये,
तुमच्या जीवनात खास स्थान असलेल्या दुसऱ्या कुणामध्ये ?

मेफिस्टॉफलीझ अशी म्हण आहे, घरदाराच्या अन् पत्नीच्या अपुल्या प्रेमापुढती
नाही सोने, नाही माती, नाही कसली कीर्ती.

मर्था प्रण तुम्हांला नाही का वाटत स्त्रीसंग हवाहवासा ?

मेफिस्टॉफलीझ माणसांची संगत असते सुखावह हे आहे मला उमगलेलं.

मर्था अहो, मी आपणाला असं विचारते, तुम्हाला कधीच का
जाणवली नाही हृदयातली कळ गंभीर स्वरूपात ?

मेफिस्टॉफलीझ मला गंभीरपणे जाणवलं आहे, स्त्रियांच्या उपस्थितीत
धट्टेने बोलणं हे नेहमीच चूक असतं असं.

मर्था तुम्ही घेतलात चुकीचा अर्थ !

मेफिस्टॉफलीझ मागतो माफी
निदान नाही मी घेतलेला चुकीचा अर्थ तुमच्या सौजन्याचा

फाउस्ट. मार्गेरिटा

फाउस्ट अस्सं, पूर्वी आपण भेटलो होतो हे होतं तुझ्या लक्षात
आणि तुझ्या फाटकाशी आल्यावर तू होतंस मला ओळखलंहि.

मार्गेरिटा ओळखलंत सगळं माझ्या डोळ्यावरून, लवलेल्या नजरेवरून

फाउस्ट तू करशील का मला क्षमा त्या माझ्या स्वैर वर्तनाबद्दल ?
माझ्या स्वतःच्या त्या उद्धटपणाचं मला स्वतःलाच वाटलं आश्चर्य,
चर्चेच्या दारापुढं तशी एकदम तुझी गाठ घेणं !

मार्गेरिटा मी लाजलाजले. कारण हे सगळं मला होतं अगदी नवीनच.
नव्हतं कुणाला माझ्याविषयी वाईट बोलण्यासारखं, आणि तरीही
असा धीर होतो याचा अर्थच माझं वागणं वाटलं स्वैर
मला वाटलं, त्याना दिसला काहीतरी उठवळपणा
आणि तेवढ्यावरून त्यांनी एकदम धरलं गृहीत
अशी ही उठवळ मुलगी त्याना देऊ शकेल सगळं हवं ते.
आणि तरीही, नाही नाकारीत, खळबळली भावना
तुमच्या बाजूने आर्जव करणारी—नाही उमगलं कसं झालं ते—
आणि त्या वेळी माझ्यावरच मी होते खूप रागावले
तुमचा त्याहूनही अधिक राग मला न आल्याबद्दल.

फाउस्ट माझे लाडके !

मार्गेरिटा थांबा हं ! (एक 'मार्गेरीट' चे फूल तोडते आणि त्याच्या पाकळ्या काढू लागते.)

फाउस्ट काय करतेस ग ? पाकळ्यांची माळी ?

मार्गेरिटा फक्त आपला एक खेळ !

फाउस्ट पण कसला ?

मार्गेरिटा तुम्हाला वाटेल तो खुळेपणा,
आणि हसाल मला (पाकळ्या काढता काढता गुणगुणू लागते)

फाउस्ट काय गुणगुणते आहेस ?

मार्गेरिटा माझ्यावरती त्याची प्रीती––माझ्यावर ना त्याची प्रीती

फाउस्ट अग देवभोळे ?

मार्गेरिटा माझ्यावर ना त्याची प्रीती, माझ्यावर ना त्याची प्रीती.
माझ्यावरती त्याची प्रीती !

फाउस्ट होय, गोड लडिवाळे, स्वर्गीय देवताच
आता आहेत बोलत तुझ्याशी फुलांच्या जिभांनी :
होणारही असंच, त्याची प्रीती आहे तुझ्यावरच. खोल, खूप खोल,
असा अर्थ आहे शोधीत तुझ्या हृदयातून एक उत्तर.

मार्गेरिटा कशी लागले आहे मी कापायला.

फाउस्ट कशाला निश्वास, कशाला कापायचं ! पहा एकदा माझ्या डोळ्यांकडे
आणि त्यांनाच, किंवा या माझ्या हाताच्या स्पर्शाला,
बोलू दे तुझ्याशी मानवी भाषेच्या पलिकडील गोष्टीविषयी.
प्रीती... ...आपल्या स्वत्वाचे संपूर्ण समर्पण,
न संपणाऱ्या निगूढ परमानंदाची यथार्थ जाणीव !
अनंताची सहचारिणी, अथांग, निगूढ,
ही नाही कधीहि संपणारी–निराशा हेच सर्वस्व असल्याशिवाय !
नाही; तरीही नाही ती संपणारी.

(मार्गेरिटा त्याचा घट्ट हात धरते, नंतर आपणहून सोडवून घेते. आणि तिथून पळून जाते. फाउस्ट क्षणभर विचार करतो. आणि नंतर तिच्या पाठोपाठ निघून जातो.)

मर्था (प्रवेश करीत) लागली आहे रात्र व्हायला.

मेफिस्टॉफलीझ होय, आणि आम्हाला पाहिजे निघायलाही.

मर्था अगदी आनंदानं मी म्हटलं असतं राहा म्हणून,
पण असल्या दुष्ट गावामध्ये उठतात गावगप्पा,
वाटेल तुम्हाला त्यांना दिवसभर नसतो दुसरा कसलाही उद्योग
आपल्या शेजाऱ्यांच्या सर्व हालचालींवर पहारा करण्याशिवाय,
चोरून ऐकण्याशिवाय, अफवा उठविण्याशिवाय :

आपण आपलं वागत असावं कितीही जपून,
तरीपण आपले ते बोलणारच जे बोलायचे ते.
कुठे गेली ती आपली तरुण जोडी ?

मेफिस्टॉफलीझ करता आहेत उनाडपणा, फिरता आहेत फुलपाखरासारखी.

मर्था त्याचा दिसतो आहे तिच्याकडे कल.

मेफिस्टॉफलीझ आणि तेवढाच तिचाही त्याच्याकडे, उमगेलच तुम्हाला,
ही आहे या जगाची जुनीच परंपरा.

एक वसंतमंदीर

मार्गारिटा धावत धावत आत शिरते, हळूच दारामागे लपून राहते, आणि ओठावर बोट धरून दाराच्या फटीतून बाहेर पाहाते.

मार्गारिटा आलेच वाटते.

फाउस्ट ए सटवे, काय मला अशी छळतेस ! आता कशी सापडलीस तावडीत (तिचं चुंबन घेतो.)

मार्गारिटा (परत त्याचं चुंबन घेऊन) किती आवडता मला, किती प्रेम आहे माझं तुमच्यावर.

फाउस्ट कोण आहे ते तिकडे ?

मेफिस्टॉफलीझ एक मित्र.

फाउस्ट एक पशू !

मेफिस्टॉफलीझ झाली आहे आता वेळ तुम्ही दोघांनी दूर सरण्याची.

मर्था (प्रवेश करीत) होय महाशय, झाला उशीरच.

फाउस्ट मी येऊ का तुझ्या बरोबर, तुझ्या वाटेनं ?

मार्गारिटा आई आहे ना, ती...आता जाते मी !

फाउस्ट मग मीहि घेतो निरोप नमस्ते.

मर्था नमस्कार, नका लावू वाट पहायला.

मार्गारिटा पुन्हा लौकर परत येण्याची, पुन्हा लौकरच्या भेटीसाठीची ?

(फाउस्ट आणि मेफिस्टॉफलीझ जातात.)

परमेश्वरा, काय सापडणार असल्या माणसाला
आपल्या मनात पुन्हापुन्हा घोळण्यासारखं !
मी पोर राहिले खिळुन, जीभ बांधल्यासारखी,
नाही सुचलं दुसरं काही ' हो ' म्हणण्याशिवाय.
नाही समजत, काय असेल त्याला दिसलं
माझ्यासारख्या एका गरीब गावंढळ मुलीमध्ये.

अरण्य आणि गुहा

फाउस्ट (एकान्तात) समर्थ निशाचरा, मला लाभले आहे सर्व काही!
सर्व दिले आहेस मी सांगितलेले, उगाच नव्हता तू वळवलास
माझ्या बाजूला तुझा चेहरा त्या अग्नीमधून,
आणि उधळलेस निसर्गाचे वैभव माझ्या उपभोगासाठी,
दिलेस सामर्थ्य ते झेलण्याचे, त्याला भोगण्याचे.
माझा संबंध नव्हता गोंधळलेल्या भावहीन भेटीसारखा :
शिकवलेस मला त्याच्यामधील गूढ अंतरंगाचे निरीक्षण करायला,
शिकवलेस शोधायला, एखाद्या स्नेह्याच्या हृदयात शिरावे तसे,
मी पाहिले अशा प्रकारे सर्व प्राणिमात्राच्या एकूण परिवाराकडे,
शिकलो ओळखायला माझेच सहोदर, या आकाशामधील
या जलप्रवाहातील आणि अशा निःशब्द वनराईमधील.
किंवा जेव्हा उद्दाम झंजावात टाकायचा पेचून त्या अरण्याला
आणि राक्षसी देवदार वृक्ष लागायचे कोसळायला आसमंतात असलेल्या
झाडांच्या डोक्यावर, लागायचे भरडायला खांद्या आणि खोडे,
आणि हादरायचा अवघा पर्वत त्या दणक्याने, त्या धक्क्याने,
तू वळवायचास माझी पावले निवारा असलेल्या एखाद्या गुहेकडे,
जिथे घडायची मला भेट माझ्या आत्म्याची, माझ्या चित्शक्तीमधील
अद्भुताच्या अंतरंगाचा जिथे यायचा प्रगट प्रत्यय.
आता या माझ्या जागृत आत्म्यावर आहे उगवला
स्नेहल चंद्र, पवित्र आणि प्रशांत स्वरूपात, आता आहेत
तिथे तरंगत चकमकत्या कड्यामधून, दंवस्नात रानामधून,
विस्मृत जगातल्या निस्तेज सावल्यांचे अनेक आभास
वैचारिक उग्रतेला आल्हादमय बनवण्यासाठी.

मला आहे आता उमगले, बिचाऱ्या मानव जातीला
आहे अप्राप्य पूर्णत्व असलेली कोणतीही गोष्ट तू बहाल केलेला
हा परमानंद, देवांच्या बरोबरीला मला नेऊ पाहाणारा,

जखडतो मला या साथिदाराशी : आहे प्राक्तनात
त्याच्या मदतीवर अवलंबून राहाणे; त्याच्या उद्धटपणापुढे
लागते पत्करावी मला स्वतःची लाचार मानहानी
माझ्याच दृष्टीसमोर; त्या त्याच्या छद्मी शब्दांमध्ये
असते सामर्थ्य तू दिलेल्या आनंदाच्या वरदानात विरजण घालण्याचे.
असा जळत असतो माझ्या छातीमध्ये तो जाळ त्याने पेटवलेला,
मी राहातो सतत भुकावलेला त्या एका लावण्यमय रूपासाठी,
असतो अडमडत वासनेच्या साहाय्याने तृप्तीकडे जाण्यासाठी,
आणि नंतर तृप्त झाल्यावरहि असतो झुरत पुन्हा वासनेकरता.

मेफिस्टॉफलीझ कशासाठी चालवता, महाशय, हा असला नीरस जीवनक्रम ?
त्याच त्या जुन्या दृश्यामधून नाही लाभत कुणाला आनंद
असल्या गोष्टी पाहून टाकणे
हे निःसंशय असते चांगलेच;
पण नंतर आपण पाहिजे सटकले कसल्यातरी नव्याखुन्या नाविन्याकडे.

फाउस्ट मला वाटते, तू करावेसे दुसरे काहीतरी अधिक चांगले
या माझ्या विश्रांतीच्या वेळात मला असा त्रास देण्यापेक्षा.

मेफिस्टॉफलीझ ठीक आहे, चालू दे विश्रांती. मी ठोकतो माझा रामराम,
खरं म्हणजे मी खूष आहे अशी संधी मिळाल्याबद्दल :
तुझ्यासारख्या वेड्या आणि कृतघ्न आडग्याचे
समाधान करणे हे आहे महाकर्म कठीण.
आहे एक चांगलेच झेंगट, करतो कबूल.
आपण कितीहि करावे श्रम, नाही कळणार
त्याला कशाने सुख होते ते : कृतज्ञतेची कोणतीही खूण
नाही दिसणार महाशयांच्या चेहऱ्यावर.

फाउस्ट वा, काय पद्धत आहे, : प्रथम आपल्या सैतानी चाळ्यांनी
करणार बेजार आणि नंतर वर ठेवणार आभारांची अपेक्षा.

मेफिस्टॉफलीझ अरे पृथ्वीच्या भिकारड्या संताना, कसा केला असतास
तू प्रयोग जीवन जगण्याचा माझ्या मदतीशिवाय ?
तुझ्या कल्पकतेला जखडून टाकणाऱ्या त्या तुझ्या

सर्व बेचैन गोंधळलेल्या धडपडीतून
कशाने झालास तू विमुक्त असे वाटते तुला ?
महाराज, मला वाटते, माझ्या मदतीशिवाय
तुम्ही यावेळपर्यंत जाता सोडून पृथ्वीचा गोल.
आणि आता तुम्ही देता आहात गुहांना भेट
अशी एकस्याने, निवडता वसतिस्थान चिंतनशील घुबडायचे,
बसता आहात शेवाळात बुळबुळीत दगडावर,
आणि घेता आहात शोषून अन्नखाद्य एखाद्या बेडकाप्रमाणे.
एखाद्या व्रतस्थाला शोभेलशी करमणूक !
तुझ्या सांगाड्यात अजूनही आहे पंडिताचा आत्मा.

फाउस्ट कसे होणार तुला आकलन या निसर्गाच्या निर्जन प्रदेशामधून
उचंबळून वाहाणाऱ्या ताज्या आणि जिवंत निर्झरांचे,
आणि जरी असती कल्पना त्यातून मिळणाऱ्या मनःशांतीची
तरी तुझ्या सैतानी लीलानी करतास तिचा केव्हाच विनाश.

मेफिस्टॉफलीस केवढा उदात्त आणि अपार्थिव हा आनंद !
असे अंधारात आणि दंवामध्ये पडून राहाणे डोंगरमाथ्यावर,
आणि रात्री असे आकाशाला धरणे मिठीत
असे फुगून जाणे उच्च प्रकारच्या दैवी बेहोशीने,
पृथ्वीवरील प्रक्षुब्ध असलेल्या गूढ भाग्याचा असा वेध घेणे,
आणि देणे असे दृढालिंगन विश्वसृजनाच्या सहा दिवसांना,
असे भोगणे, देव–जाणे–कोणता तो आनंद व अभिमान,
आणि गाठणे सर्वव्यापी प्रीतीचा परमानंदमय प्रवाहः
मग हा तुझा पृथ्वीपुत्र, असा स्वस्थितीच्या अतीत होऊन
घेणार अनुभव आपल्या उदात्त नवनिर्मित अंतर्ज्ञानाचा—

(एक अश्लील अंगविक्षेप करतो.)

पण शेवटी कोणत्या फलप्राप्तीस्तव—कशाला बोलावे ?

फाउस्ट धिक्कार असो तुझा !

मेफिस्टॉफलीस ठीक, आता आहेस सापडलास पेचात

म्हणूनच वापरतोस धिक्कार करण्याचा नैतिक हक्क,
कारण ज्या वस्तू वाचून विशुद्ध हृदयांना नाही जगता येत
त्या वस्तूंची नावे मात्र कधी पडता नयेत विशुद्ध कानावर !
मित्रा, शांत हो, जरा घेऊया आपण नरमाईने:
बोल स्वतःशी खुशाल खोटे सोयिस्कर असले तर
पण नाही ते करता येत, सदा सर्वकाळ.
आधीच दिसते तुझी घसरती सुरू झालेली
ही घसरती अशीच चालली तर, संशय, विवंचना,
आणि शेवटी वेडेपणसुद्धा हळूहळू होतील दृग्गोचर.
हे पुरे झाले ! ती तुझी लाडकी आहे तिथे बसलेली
विमनस्क अवस्थेत. तिला नाही लाभत समाधान.
नाही येत तुझी प्रतिमा मनातून हालवायला;
कारण एवढेच, ती करते तुझ्यावर प्रेम निराशेला भिडणारे.

प्रथम आली तुझ्या प्रीतीची अनिवार्य लाट
जसा यावा प्रवाहाला पूर, बर्फ वितळल्यावर;
तो लोंढा तू वाहवलास तिच्या आत्म्यावरून,
पण आता मात्र, असं दिसतं; नदी आहे लागली आटायला.
एक सुचवू का, आता महाराजांनी सोडावा विचार
जंगलात बसून हे भव्योदात्त सोंग वटविण्याचा,
आणि आपल्या या किल्ल्यातून खाली उतरून
करावी पूर्ती त्या बिचारीच्या मर्कटप्रीतीची.
ती कंठते आहे प्रत्येक दिवस मोठ्या कष्टाने
तिचे चिमणे तोंड

असते तिच्या खिडकीशी खिळलेले; ठेव विश्वास,
तिथेच दिसली ती मलाहि, फक्त आकाशाकडे टक लावून बसलेली,
एकाच ठिकाणी खिळून राहिलेली
'मी पक्षी असते तर'.

जुन्या गाण्याची ही ओळ
पडायची कानावर तिच्या दुःखाला वेढावण्यासाठी
नगराच्या तटावरून पुढे सरकणारे ढग पाहाताना.
ही एवढी ओळ सोडल्यास बाकी तिचे गाणे होते निःश्वासाचेच,
आणि असंहि उघड दिसत होतं
ती असावी वरचेवर रडत

आणि नंतर मग ती कमनशिबी पोर करायची प्रयत्न
पुन्हा एकदा हसण्याचा
प्रेमाच्या भरात, मृत्यूच्या दारात.

फाउस्ट तू आहेस एक काळसर्प !

मेफिस्टॉफलीझ (बाजूला) कबूल,—हे विष प्रभावी ठरल्यास !

फाउस्ट पापी खलपुरुषा, जा आपल्या शापदग्ध वाटेने,
नको करू तू साहस त्या लावण्यवतीचे नाव उच्चारण्याचेही,
माझं हृदय पेटलेलं असताना त्या तिच्या लाघवी शरिराचं
दर्शन घेण्याचा असला मोह नको पाडू माझ्या आत्म्याला.

मेफिस्टॉफलीझ मग दुसरा मार्ग कोणता ? तिला वाटतं तू पळालास
आणि मलाही लागेल म्हणावं थोड्याफार अंशानं ते सत्यच.

फाउस्ट नाही, मी अजूनही आहे तिच्याच जवळ : घरी असो, बाहेर असो,
मी नाही तिला विसरलेलो. माझं प्रेम आहे अनंत.
मला वाटते प्रत्यक्ष परमेश्वराच्या देहाची असूया
जेव्हा त्याला होतो स्पर्श त्या तिच्या नाजुक ओठांचा.

मेफिस्टॉफलीझ बोललास बरोबर माझ्या मित्रा ! मलाही वाटायचा तुझा हेवा
गुलाबात घुसणाऱ्या त्या तुझ्या जुळ्या जोडीबद्दल.

फाउस्ट ए पोरीपुरव्या, चल चालता हो !

मेफिस्टॉफलीझ कर अधिक्षेप ! मी राहीन फक्त हसत,
ज्या देवाने घातले जन्माला पोरी आणि पोरगे
तो आपले ते महान कर्म नाही सोडीत अर्धवट अवस्थेत;
करतो उपलब्ध त्यांना आवश्यक अनुकूल संधीही.
कशाला कण्हतोस आणि वाजवतोस प्रीतीची मृत्युघंटा ?
खरं म्हणजे तू धरावास आपल्या प्रियतमेच्या खोलीचा रस्ता
इथे एखादं थडगं शोधण्याऐवजी.

फाउस्ट काय अर्थ तिच्या उरोभागावरील त्या निर्भरतेला ?
काय अर्थ तिच्या वक्षावर माझ्या हृदयाला विश्रांती लाभली तरी ?
मी आहे तिचा सर्वनाश एवढं नाही का मला समजत ?

मी, एक निर्वासित, एक भटक्या घरदार नसलेला,
एक नरराक्षस, ज्याच्यापुढे असते फक्त एवढेच लक्ष्य :
एखाद्या आंधळ्या धबधब्याप्रमाणे खडक रगडीत
घ्यायची धाव अधाशीपणाने अंधारमय गर्तेकडे.
किती होती ती आनंदी विषयवासनेचा स्पर्श होण्यापूर्वी,
तिची इंद्रिये होती एखाद्या अर्धजागृत अर्भकाप्रमाणे;
आल्प्समधील लहानसे शेत आणि झोपडीचे एक छप्पर
यांच्यामध्येच होतं सामावलं तिचं प्रेमळ पवित्र जग.
आणि मला मात्र, माझ्या कपाळावरील परमेश्वरी शापामुळे,
नव्हते समाधान,
त्या खडकांना पकडीत धरण्यामध्ये, त्यांना नमवण्यामध्ये,
आणि त्यांना भेदून टाकण्यामध्ये;
मला हवा होता आणखी तिच्या निष्पापतेचा बळी
मला हवी होती नरकात सोडण्यासाठी तिची आहुती.
हे सैताना, कर मदत या वेदनेचा अंत करण्यासाठी.
असेल घडायचे तेच घडू दे, फक्त जलदीने.
तिची नियती आता कोसळू दे माझ्या माथ्यावर
नेऊ दे ओढून तिला माझ्यासह एकाच विनाशाकडे.

मेफिस्टॉफलीस होय, ती लागते आहे पुन्हा कामाला, उकळायला, पेटायला!
हे पढतमूर्खा, चल आत आणि कर तिचं सांत्वन!
नको करू स्वतःला जमा त्या लोकांमध्ये
ज्यांना वाटत असते कल्पांत घटिका जवळ आल्यासारखी,
जर त्याना नाही उमगली त्यांच्या नाकासमोरची वाट.
लाभो दीर्घायुष्य त्या तरुणाला, जो जगतो आपल्या कलानुसार—
आणि तुझा तर सैतानगिरी करण्यामध्ये आहे हातखंडा.
गळ्या शपथ नसेल दुसरी कोणतीही गोष्ट इतकी किळसवाणी
निराशेने पछाडलेल्या अशा एखाद्या असहाय सैतानाएवढी.

मा र्ग रि टा ची खो ली

एकटीच बसून चरख्यावर सूत कातते.

बसले हरवुन माझी शांती,
हृदय जाहले विषण्याला,
शांती अंतरली कायमची
अंतरली शांती मजला.
त्याच्यावाचुन जगणे म्हणजे
उरला केवळ वनवास.
डोळे व्हावे अंधुक ज्याने
अशीच ही कटुता खास.
विवेकाकडे नेइल मजला
वाट अशी ना मजपुढती;
पिसाटशा या फक्त कल्पना
मनात शिरती, फडफडती.
बसले हरवुन माझी शांती,
हृदय जाहले विषण्याला,
शांती अंतरली कायमची
अंतरली शांती मजला.
दिवसा रात्री फक्त तयाची
वाट इथे पाहत बसते,
त्याच्यासाठी सोडुनिया घर
मी वेडी भटकत फिरते.
झोक तयाचा, त्याची शैली,
त्याचा तो उमदा ढंग,
ओठ तयाचे ते हसरे अन्
डोळ्यातिल मिष्किल रंग !
शब्दांचा तो नाद तयाच्या,

तो मध, तो परमानंद;
स्पर्श तयाच्या हाताचा अन्
ते त्याचे चुंबन धुंद.
  बसले हरवुन माझी शांती
हृदय जाहले विषण्याला,
शांती अंतरली कायमची
अंतरली शांती मजला.
  वक्षस्थल माझे निर्भरते,
हृदयाला लागे ध्यास :
त्याला स्पर्शुन अन् आलिंगुन
करण्यास्तव आपुला खास.
  आणिक वाटे चुंबुन त्याला
कळस सुखावर चढवावा,
चुंबनवर्षावात तयाच्या
जीव आपला बुडवावा.

मर्थाची बाग

मार्गरिटा. फाउस्ट.

मार्गरिटा हेन्रिक, मला हवं तुझं वचन.

फाउस्ट लाडके, हे घे माझं वचन, माझ्या एकनिष्ठेचं.

मार्गरिटा आता सांग, तुझी आहे का धर्मावर श्रद्धा ?
मला कळतं, तू आहेस फार चांगला, फार दयाळू,
पण वाटतं तू नसावास देत महत्त्व धार्मिक विधींना.

फाउस्ट अग राहू दे ग ! माझं प्रेम खरं वाटतं ना ?
प्रेमातल्या माणसांसाठी मी सोशीन मृत्यूच्या यातना,
नाही करणार कुणाला वंचित त्याच्या पंथापासून, त्याच्या धर्मापासून.

मार्गरिटा पण एवढं नसतं पुरेसं : असायला हवी ईश्वरावर श्रद्धा.

फाउस्ट अगदी हवीच ?

मार्गरिटा होय हवीच—माफ कर या हट्टाबद्दल.
तू मानतोस का पवित्र ख्रिस्तानुप्रवेशाला ?

फाउस्ट मी मानतो का ? होय मानतो.

मार्गरिटा पण नव्हे सश्रद्ध मनाने, आंतरिक निकडीने.
नाहीस जात कधी उपासनेला, नाहीस उच्चारीत आपल्या धर्माशा.
तुझा आहे का ईश्वरावर विश्वास ?

फाउस्ट अग लाडके, कोण सांगू शकेल
छातीठोकपणाने विश्वास आहे म्हणून ?
विचार कुणालाही —

विचार साधूला, विचार भिक्षुकाला–आणि तुला येईल उमगून
विचारल्यानंतर मिळणारे उत्तर
असते चेष्टेसारखे.

मार्गेरिटा मग तुझा विश्वास नाही तर ?

फाउस्ट अग पोरी, तसं नव्हे ग, नको करून घेऊ तसा गैरसमज.
कारण, त्याच्या नामाचा उच्चार करून
त्याच दमात कोण सांगू शकेल
स्वतःच्या श्रद्धेचे अचुक स्वरूप !
कुठे आहे तो माणूस
थोडीफार साक्षात्काराची भावना अनुभवलेला
जो करू शकेल असे धाडस—त्याला फक्त आभास समजण्याचे.
जो आहे सर्वांचा आधार
सर्वाला कवटाळणारा
तोच नाही का आहे सावरीत
तुला, मला आणि स्वतःलाही ?
नाही उंचावत स्वर्गाचा घुमट आपल्या डोक्यावर ?
नाही सावरीत पृथ्वी आपणाला खालून खंबीरपणाने ?
कालातीत नक्षत्रांचे स्नेहार्द डोळे नाही का भेटत आपल्या नजरेला ?
असते का हे अगदीच अर्थहीन असे एकमेकांच्या डोळ्यांत डोकावणे ?
नाही का जीवन आहे संचारत
तुझ्या डोक्याभवती, तुझ्या हृदयाभोवती,
विणीत जाळे कालातीत किमयांचे
दृश्य नि अदृश्य, अगदी तुझ्या या कुशीमध्येही ?
जाऊदे भरून त्यांच्या अस्तित्वाने तुझे हृदय, तुझे उदार हृदय,
आणि जेव्हा त्या परमानंदात जाईल विरघळून तुझे अस्तित्व
तेव्हा मग दे त्याला कोणतेही नाव तुझ्या इच्छेप्रमाणे—
म्हण त्याला तुझा आनंद, तुझे प्रेम, तुझे अंतःकरण, तुझा परमेश्वर.
मला मात्र नाही गवसत एकही नाव
त्याला देण्यासारखे : भावना हेच असते सर्वस्व.
नावे म्हणजे असतात फक्त ध्वनी आणि धूर,
स्वर्गीय प्रकाशाला अभ्रांकित करणारी.

मार्गेरिटा हे सगळं आहे उत्तम आणि यथायोग्यच;

आमचे धर्मोपदेशक असंच काहीसं म्हणतात नेहमी,
फक्त त्यांचे शब्द असतात जरासे निराळे.

फाउस्ट या पृथ्वीतलावर
अनेक हृदयांतून जाते झंकारत हीच जाणीव :
फक्त प्रत्येकाचा मार्ग वेगळा, भाषा वेगळी; मग मानणार का
तू सदोष माझं समर्पण अधार्मिक समजून ?

मार्गरिटा मी आता जे ऐकते
ते वाटतं सगळं बरोबर, जर असते मी अनुकूल,
पण काहीतरी मला खटकतं आणि वाटते भयंकर भीती
तुझ्या अंतःकरणात ख्रिस्तच नसेलशी.

फाउस्ट अग पोरी !

मार्गरिटा कसं सांगू मी, माझं मन होतं ग्रस्त
असल्या संगतीमध्ये तुला पाहिल्यामुळे ?

फाउस्ट म्हणजे कसं ?

मार्गरिटा तुझ्या संगतीतल्या त्या माणसामुळे
माझे मन जाते भरून अपरंपार भयाने.
या जन्मात अजूनपर्यंत दुसऱ्या कशानेही मी नव्हते
अशी भेदरल्ये; त्या माणसाच्या भयानक चेहऱ्याइतकी.

फाउस्ट लाडके, नको मानू कसलीही भीती.

मार्गरिटा नाही हो, माझं रक्त जातं थिजून तो जवळ असला की.
मला आहे माणसांची आवड, वाटनं त्यांचं भलं व्हावंसं,
इतकी तुझ्यासाठी असते आतुर, कसं सांगू मी शब्दांनी,
पण त्याची दृष्टीभेट होताच वाटते पापाने पछाडल्यासारखे.
आणि त्याहूनहि, मला वाटतो तो कुणीतरी सोंग घेतलेला.
चुकत असले तर, मी परमेश्वराची मागते क्षमा.

फाउस्ट या जगामध्ये विक्षिप्त माणसांचा अंतर्भाव असायचाच.

मार्गरिटा मी नाही राहू शकणार या असल्या माणसाच्या संगतीमध्ये.
त्या तिथे माझ्या दरवाजाजवळ, घरामध्ये पाउल टाकताच
तो पाहातो आपल्या आसपास वेडीवाकडी तोंडे वेंगाडून

आणि कडवट रागाच्या आविर्भावाने.
उमगेल, कुणालाही त्याला नाही कशाची क्षिती; असं आहे
स्पष्ट लिहिलेलं त्याच्या कपाळावर, कोरलेल्या लेखाप्रमाणे :
हा माणूस नाही करणार कसलंही प्रेम कोणत्याही जीवन्मात्रावर.
किती असते मी सुखावलेली तुझ्या बाहूंवर कळलेली असताना,
शरणसुलभ, समर्पणशील, प्रेमविव्हल आणि उबावलेली
पण नंतर तो दिसला की होतो संकोच माझ्या हृदयाचा.

फाउस्ट लाडके, किती सहजासहजी तू होतेस भयाच्या आधीन.

मार्गारिटा त्याचा होतो माझ्यावर परिणाम विषारी तीराप्रमाणे,
त्याच्या आगमनाने, किंवा तो पहात असला की,
तुझ्यावरील प्रेम सुद्धा वाटू लागते नाहिसं झाल्यासारखं.
शिवाय, तो आसपास असताना मला नाही प्रार्थना सुचत !
हीच भीती टाकते खाऊन माझ्या हृदयाला.
हेन्री, तशीच होते तुझीही अवस्था, मला समजतं ते.

फाउस्ट ही आहे फक्त नावड.

मार्गारिटा मला गेलं पाहिजे.

फाउस्ट दे मला एक घटिका पवित्र प्रीतीच्या तीरावर विसावणारी,
मी पूजिलेल्या त्या वक्षस्थलाला आलिंगन देण्यासाठी,
हृदयापाशी हृदय भिडवून आत्म्यामध्ये आत्मा मिसळण्यासाठी.

मार्गारिटा जर असते एकटीच झोपत
तर तुला सापडता दरवाजा उघडा राहिलेला
आजच्याच रात्री !
पण आईची झोप असते इतकी हलकी,
आणि आपलं चोरटं प्रेम आलं उघडकीला
तर तीच ठरेल माझी शेवटची घटिका.

फाउस्ट मग, लाडके, समज आपली काळजी सरली म्हणून.
ही घे लहानशी कुपी, सोड तुझ्या आईच्या कपामध्ये
हिच्यातील द्रवलेसे तीन थेंब,
आणि मग तिच्या झोपेवर होईल सील मुलायम स्वप्नांचे

मार्गारिटा काय नाही मी करणार सख्या तुझ्यासाठी !
पण समजूना यानं तिला नाही होणार कसलाही त्रास !

फाउस्ट अग पोरी, मी तुला देईन का कधी भलताच सल्ला ?

मार्गेरिटा अरे हेन्रिक, तुझ्या दृष्टीतून, तुझ्या स्पर्शातून
काही विलक्षण शिरतं माझ्यामध्ये, माझ्या इच्छेवर मात करणारं
मी तुझ्यासाठी अगोदरच आहे इतकं केलेलं
आता नाही काहीही शिल्लक पूर्ती करण्यासारखं.

(जाते)

मेफिस्टॉफलीझ (प्रवेश करीत)

गेलं वाटतं तुझं मर्कट ?

फाउस्ट काय अजूनही आहेस पाळतीवर ?

मेफिस्टॉफलीझ होय अर्थातच, इकडून जाताना पडलं सर्व माझ्या कानावर
आणि झालो मी स्तिमित.
या आमच्या विद्वान माणसावरील प्रश्नांच्या भडिमाराने;
पंडित महाशय, करतो आशा आपण परीक्षा उतरलात अशी.
मुलींना नेहमीच असतो काही विलक्षण रस
भोळ्याभाबड्या जुन्या धर्ममताचा आदर राखण्यामध्ये;
या बाबतीत जर त्याने वाकवली स्वतःची पुरुषी मान
तर मग त्या समजतात तो आदराने त्यांचे स्वतःचेही करील आज्ञापालन.

फाउस्ट अरे राक्षसा, काय तुझ्या भंगलेल्या डोळ्यांना
नाही उमगत तिचा एकनिष्ठ प्रेमार्त आत्मा व्यथित झालेला
आपल्या प्रियकराजवळ आपली धर्मश्रद्धा न आढळल्याने,
ज्या श्रद्धेमुळे तिला लाभते
चैतन्याच्या जिवंत श्वसनाचे संपूर्ण आश्वासन,
आणि जिचा अभाव असल्यामुळे संशयांच्या कळपात
तिला दिसतो आपला प्रियकर मृत्यूकडे चाललेला.

मेफिस्टॉफलीझ विषयातीत विषयांधा, तुला आहे खेळवीत बसलेली
एक एवढीशी उठवळ पोरटी आपल्या इच्छेप्रमाणे.

फाउस्ट आग आणि उकिरडा यांच्या कमअस्सल संताना !

मेफिस्टॉफलीझ आणि तिच्या शरीरात तरी काय दिसते दुसरे द्रव्य!
मी दिसता तिचे मन जाते भरून-कशाने ते तिलाही नाही कळत!
माझ्यात येतो तिला वास एका दुष्टात्म्याचा, अनंत पापांचा,
आणि तिला माझ्या बडबडीत जाणवते म्हणे गुह्य शक्ति,
न जाणो, प्रत्यक्ष सैतानच बोलत असल्यासारखी,
आणि आता आज रात्री —!

फाउस्ट काय तुला त्याच्याशी कर्तव्य!—

मेफिस्टॉफलीझ त्यांत सुद्धा आहे मिळणार मला माझ्या सुखाचा हिस्सा!

वि हि री व र

(मार्गेरिटा आणि लिस्बेथ, घागरी घेऊन)

लिस्बेथ — काही ऐकलंस तू बार्बाराबद्दल ?

मार्गेरिटा — नाही बाई एक शब्दहि:
ठाऊक आहे ना, मी क्वचितच बाहेर जाते-येते.

लिस्बेथ — चांगलाच मूर्खपणा करून बसली ती, ती चिमणी,
आणि सिबिल म्हणाली मला चांगलीच घसरली म्हणून.
तिथे आता हलणार पाळणा.

मार्गेरिटा — कसा काय ग ?

लिस्बेथ — तसंच आहे लफडं छान !
खातापिताना ती पोसते एकाऐवजी दोन प्राण !

मार्गेरिटा — अगबाई !

लिस्बेथ — सरते शेवटी तिला मिळालं योग्य प्रायश्चित्त,
महिन्यान् महिने ती त्याला नाही सोडायची आपल्या दृष्टीआड.
काय तिची उमरावी घमेंड,
काय हिंडणंसवरणं, काय स्वैरसंचार,
हवं असायचं प्रत्येक ठिकाणी पहिलं असायला,
जत्रा असो, नाच असो, हवं असायचं सारखं चमकायला,
बडदास्त ठेवण्यासाठी लागायची दारू आणि मेवामिठाई,
आणि स्वीकारायची त्याचे नजराणे, बदफैली मेली,
नव्हती लाजहि इतकं सगळं स्वत:कडे ओढायला.
आणि नंतर गळ्यात गळा घालून चालायच्या शृंगारचेष्टा;
शेवटी आमची अल्लड कलिका गेली अगदी पार बिघडून.

मार्गेरिटा — गरीब बिचारी !

लिस्बेथ एवढंच म्हणतेस तू !
इकडे असायचो आम्ही मुली सारा दिवस सूत कातीत,
सारी रात्र आमच्या आयांची आमच्यावर असायची कडक नजर,
आणि तिकडे ही आपली असायची लुटीत मजा प्रियकराबरोबर
बगिच्यातल्या बाकावर, किंवा पोर्चखाली किंवा आडरस्त्यावर.
त्यांचं बोलणं किती चालायचं याला नव्हता काही ताळतंत्र.
आता करू दे तिला पश्चात्ताप, या थराला गोष्टी आल्यावर,
आणि राहु दे देवळात उभी पतितेसारखी पांढऱ्या कपड्यामध्ये.

मार्गारिटा पण निश्चितच तो स्वीकारील तिला पत्नी म्हणून.

लिस्बेथ आणि ठरेल एक महामूर्ख ! अगदी अशक्य.
त्याच्यासारख्या छकड्या पोराच्या असतात दुसऱ्या अनेक प्रेयसी
आणि शिवाय तो आहे नाहिसा झालेला.

मार्गारिटा हे झालं फार वाइट

लिस्बेथ जरी तिला तो मिळाला तरी आम्ही तिला छळणारच :
पोरे घेणार तिच्या डोक्यावरील हार हिसकावून
आणि आम्हीही पसरणार कस्ले तिच्या दारापुढे.

(जाते)

मार्गारिटा (एकटीच) केवढ्या मोठ्या अगडबंब गोष्टी मी बोलायची
बिचाऱ्या एखाद्या गरीब पोरीचं पाउल घसरलं की !
इतरांच्या पापावर कोरडे ओढताना
माझ्या जिभेला पडायची वाण परखड शब्दांची.
काळं दिसणारं मी करायची अधिकच काळं,
शब्दच नाहीत पुरेसे काळे असं वाटायचं;
स्वतःच्या नशिबाला द्यायची धन्यवाद, मोठा आव आणून
आणि आता तेच दूषण, तेच पाप आले वाट्याला.
आणि तरीही, हे परमेश्वरा, ज्याने झाले मी प्रवृत्त
तसं करण्यासाठी, ते होतं इतकं गोड, इतकं सत्य.

तटबंदीमधील एक मंदीर

[कोनाड्यामध्ये डॉलॉरसामातेची एक प्रतिमा, जवळच फुलांनी भरलेली पात्रे.]

मार्गरिटा तुझ्या माथ्यावर आहे शोभत मुकुट दुःखाचा,
पाहा खाली वळून
कृपाळू दृष्टीने
मला बुडवणाऱ्या माझ्या दुःखाकडे.

भेदरलेल्या अंतःकरणाने,
वेदनांच्या वलयातून,
पाहते आहेस तू तुझ्या पुत्राचा मृत्यु.
तुझ्या पुत्रासाठी आणि तुझ्यासाठी
तुझी मुद्रा, तुझे निश्वास,
करतात आवाहन वर वळून पित्याच्या सिंहासनाला.

कोण जाणणार
विपत्तीच्या वेदना
हाडाहाडातून व्यथा निर्मिणाऱ्या !
थरथरत असताना, भयग्रस्त स्थितीमध्ये,
मी केलेल्या त्या प्रार्थना,
फक्त आहेत तुलाच समजलेल्या, संत डॉलॉरसे.

आणि आता कुठेही गेले तरी
मी अशीच जळणार दुःखामध्ये,
राहाणार धगधगत माझी व्यथा माझ्या अंतःकरणात.
बावरते एकटीने भीतीच्याबरोबर,
वाहातात डोळ्यातून अश्रूंचे लोट,

वाहातात अश्रू हृदयाला भेदणारे.

त्या खिडकीमधील फुलांच्या कुंड्या
माझ्याच अश्रूंनी होत्या ओलावलेल्या.
मीच ओणवलें तिथे प्रातःकाली
तुझ्या पुजेसाठी फुले वेचण्याकरता.

आणि तितक्यातच झाला सूर्योदय,
गेला उधळून खोलीमध्ये सुवर्ण;
मी मात्र होते दुःखात बुडालेली,
विपत्तीत रुतलेली, माझ्याच बिछान्यावर.

सोडव मला या मरणप्राय क्लेशापासून
या लोकलज्जेपासून, या कटुतेपासून!
तुझ्या माथ्यावर आहे शोभत मुकुट दुःखाचा,
पाहा खाली वळून;
ही विपत्तीतील माझी प्रार्थना
घे ऐकून सदय अंतःकरणाने.

रा त्र

[ग्रेशेनच्या दाराजवळील रस्ता]

व्हॅलंटाईन
मोठमोठ्याने बढाया मारणाऱ्या चंडोल सवंगड्यांच्या
बैठकीमध्ये मी लुटली आहे खूप मजा,
प्रत्येकच प्यायचा आपल्या आवडत्या पोरीच्या नावानं,
ग्लास भरताना करायचा उल्लेख तिच्या शीलाचा;
मग मी आपला माझ्या कोपरावर भार टाकून
शांत आणि नितांत आत्मविश्वासाने
बसायचा ऐकत, त्यांचे बरळणे, त्यांची उठावणी,
मग हसतहसत फिरवायचा हात स्वतःच्या दाढीवरून
आणि म्हणायचा, भरलेला ग्लास हातात घेऊन,
" जितक्या जिभा तितक्या चवी, पण निदान या देशामध्ये
माझ्या लाडक्या ग्रेटेलसारखी नाही सापडणार
दुसरी मुलगी, इतकी सुंदर, इतकी गोड;
कुणाची लायकी माझ्या बहिणीचे जोडे पुसण्याची ? "
" छान, छान ! " ते आसपासचे ग्लास किणकिणायचे,
आणि म्हणायचे पुष्कळ लोक ' खरे आहेत त्याचे शब्द;
म्हणायचे दुसरे ' ती आहे स्त्रीजातीचे एक अभिमानस्थान '
आणि व्हायची बढाया मारणारांची तोंडे बंद.
आणि आता—हव्या तर उपटाव्या आपल्याच झिंज्या,
करावा हवा तर मेंदूचा चेंदामेंदा आपणच निराशेने—
सगळ्यांना मिळतो वक्रोक्तीमधून वेडावण्याचा आनंद,
प्रत्येक बदमाष पाहतो माझ्याकडे अधिक्षेपक नजरेने.
आणि मी मात्र एखाद्या अपराध्याप्रमाणे अशा वेळी
ती त्यांच्या स्वैर शब्दांमुळे बसल्या जागीच राहतो पेटत;
आणि जरी त्या सर्वांची टाळकी फोडण्यासाठी असलो अधीर
तरी त्यांचे ते शब्द खोटे म्हणण्याची नसते हिंमत.
कोण येतो हा इकडे रात्रीच्या अंधारातून असा चोरटेपणाने ?

असावे दोघे, माझा अंदाज बरोबर असल्यास.
जर हा का तोच असला, तर काय, करतो वारच,
तो नाही आता जात जिवंत परत या ठिकाणाहून.

फाउस्ट. मेफिस्टॉफलीझ

फाउस्ट
कसा फुरफुरतो आजच्या रात्री पलिकडच्या खिडकीतून
देवापुढील दिवा, पहारा करणारी अस्थीर ज्योत;
आणि अंधारामुळे भयभीत झालेल्या गाभाऱ्यामधील
मंद प्रकाशाप्रमाणेच मला सुद्धा आहे भासत
माझाही आत्मा दाट अंधाराच्या पकडीत सापडल्यासारखा.

मेफिस्टॉफलीझ
आणि मला वाटते फेरफटका करणाऱ्या एखाद्या बोक्यासारखे,
जेव्हा प्रीतीचा कंटाळा येऊन तो चढतो चुलीच्या धुराड्यावर
आणि त्याचा अंधुक आकार पडतो दृष्टीला भिंतीवरून जाताना,
मी असतो गाजवीत माझा एक प्रकारचा नैतिक हक्कच
लहानसहान चोऱ्यांमधून, बारिकसारिक प्रणयचेष्टांमधून—
मग महाशय, माझ्या अंगागांतून जातो झंकारत
त्या आमच्या अद्‌भुत भुतोत्सवाच्या रात्रीचा उन्माद.
आजपासून दोन दिवसांनी आपणाला आहे जागर करायचा
ज्याच्यामध्ये होईल आपण गमावलेल्या निद्रेची पुरेपूर भरपाई.

फाउस्ट
मग निश्चितच तो खजिना होणार आता लवकर प्रकट :
नाही का उमगत त्याची प्रभा आपल्यामागून येताना ?

मेफिस्टॉफलीझ
त्या आनंदाचा तू होशील लौकरच धनी; तुला मिळणार
पेटी उचलायला, तो अद्‌भुत नजराणा असलेली.
जेव्हा नुकतीच मी पाहिली तेव्हा होती ती भरलेली
सोन्याच्या मोहोरांनी टाकसाळीतून आलेल्या.

फाउस्ट
म्हणजे त्यामध्ये नाही वाटते, एखादे रत्न, एखादी अंगठी,
माझ्या प्रियतमेला खुशीत आणील असे काहीतरी.

मेफिस्टॉफलीझ
मला वाटतं तसंही काहीतरी त्यांत पाहिल्यासारखं —
एक मोत्याचा सर पुरावा त्या कामासाठी.

फाउस्ट
अगदी झकास. कारण नाही मला आवडत कुठेही जायला
एखादा नजराणा बहाल करण्याची तयारी असल्याशिवाय.

मेफिस्टॉफलीझ काही वेळा विमुक्त वृत्तीचा एखादा गृहस्थ
लुटू शकतो आपला आनंद किंमत मोजल्याशिवाय;
आणि तरीही, चमकत्या ताऱ्यांनी आकाश भरल्यावर
मी तुझ्याकरता येईन घेऊन एक अस्सल कलाकृतीचा नमुना.
एवढंच काय, मी गाईन एक गाणं बोधामृतानं भरलेलं
त्या तिच्या भोळसट हृदयाची फसगत करण्यासाठी.

(गातो)

गोडे पोरी सांग मला
या इथे पहाटेला
का ग बाई उभी अशी
प्रियकराच्या दारापाशी.
तो घेइल कुवार आत,
पण सांगतो एक बात,
जेव्हा ठेवील बाहेर पाय
नसशील कुवार हाय हाय.
नीट सारा विचार कर!
काय सगळं झालंच तर?
गरीब पोरी जाता जाता
मग करतो सलाम आता.
नको आपली पहिली प्रीती
कधी देऊ चोराहाती.
तोवर जावू लपवून धर,
चढू दे अंगठी बोटावर.

व्हॅलंटाईन कोणाच्या चारित्र्यावर उडवतो आहेस हे शिंतोडे?
होइल सत्यानाश, हे उंदीरपकड्या, नरकातून निपजलेल्या.
जाऊ दे सैतानाकडे ते तुझे पापी वाद्य
आणि पाठोपाठ तो शाहीरही.

मेफिस्टॉफलीझ केवढे दुर्दैव! ही वीणा आता आहे सर्वस्वी फुटलेली!

व्हॅलंटाईन आणि पाठोपाठ फोडणार आहे तुझे डोकेही.

मेफिस्टॉफलीझ अहो पंडितराज, धीर धरा ना, नका जाऊ असे घाबरून,
राहा घट्ट मला बिलगून, नाही तुम्हाला कसलाहि धोका.

— चल अगार तो तुझ्या हातातला उलथा
तू कर आपला हल्ला, मी करतो माझा बचाव.

व्हॅलंटाईन कर बचाव ह्यापासून !

मेफिस्टॉफलीझ का नाही !

व्हॅलंटाईन आणि ह्यापासून.

मेफिस्टॉफलीझ अगदी बरोबर.

व्हॅलंटाईन मला वाटतं प्रत्यक्ष सैतानच आहे उतरलेला या युद्धामध्ये !
कसला अम्मल होतो माझ्यावर ? माझा हातच पडतो लुळा.

मेफिस्टॉफलिझ कर वार अगदी मर्मस्थानी !

व्हॅलंटाईन देवा परमेश्वरा !

मेफिस्टॉफलीझ आता माणसाळलं हे कुत्रं.
चल लौकर
भल्या माणसा, आता करू या आपण जादू अदृश्य होण्याची !
इथे आता लौकरच उडणार खुनाची धमाल.
मी जाणतो या पोलिसांशी कसे वागायचे ते.
पण कोर्टामध्ये करतात आवाहन मला अडवणाऱ्या एका नावाला.

मर्था (वरून) अहो शेजाऱ्यांनो, धावा हो धावा !

मार्गारिटा (खिडकीशी) अहो, कुणीतरी दिवा आणा हो !

मर्था इथे झाली काही आरडाओरड आणि मारामारी.

एक आवाज (जमलेल्या समूहातून)
इथे कोणीतरी आहे पडलेला, जवळजवळ मेल्यासारखा.

मर्था (बाहेर येऊन)
कोणत्या वाटेने गेले पळून ते खून करणारे ?

मार्गारिटा हा कोण इथे पडलेला ?

एक आवाज आहे तुझ्या आईचा लेक.

मार्गारिटा देवा परमेश्वरा, अगदी अशक्य !

व्हॅलंटाईन मी आहे मरणाच्या दारात, सोपे आहे हे बोलायला,
आणि करायला त्याहूनही सोपे.

नका राहू माझ्या सभोवताली भयभीत मुद्रांनी
आणि बायांनो आवरा हुंदके, जरा जवळ या
आणि ऐका हे माझे शेवटचे शब्द.

(त्याच्या सभोवती जमा होतात.)

ए ग्रेटेल, तू आहेस इतकी तरुण, इतकी गोड,
तरी देखील हवी होतीस अधिक शहाणी अधिक सूज्ञ,
नको होतीस अशी घसरायला मूर्ख पोरीप्रमाणे.
आणि खाजगीपणे तुला सांगतो त्याहूनहि जास्त,
सांगतो तुला, तू आहेस एक रांड.
तेव्हा आता तू तसलाच कर धंदा !

मार्गरिटा अरे दादा ! अरे देवा ! माझ्यासंबंधात हा शब्द !

व्हॅलंटाईन त्या देवाला या प्रकरणापासून ठेवू बाहेर.
आता आहे गोष्ट घडलेली, दुःख होतं असं म्हणताना,
आता त्यातूनच जितकं निघेल तितकं पाहायचं.
तू आहेस केलेली सुरुवात गुप्तपणाने एकाच्या बरोबर,
पण लौकरच इतरांना सुद्धा या मौजेचा येणार वास;
मग चालणार तुझ्या भानगडी अनेक पुरुषांबरोबर
आणि शेवटी तू लाभणार अख्ख्या शहराला.
नवे पाप अगदी सुरवातीला असते वाटत
संपूर्ण सुरक्षित, चोरटेपणाने मिळणाऱ्या आनंदामुळे,
मग स्वतःच्या कानाडोळ्यांवर घेते ओढून
एक पांघरूण आणि दडते रात्रीच्या पडद्यामागे,
शेवटी जेव्हा येतात विचार त्याला मारण्याचे
तेव्हा असते ते बनलेले निर्लज्ज बेडर,
लागते वावरायला उघडपणाने दिवसाच्या प्रकाशात
पूर्वीपेक्षा अधिक देखणे बनलेले नसूनही;
जितके होते त्याचे स्वरूप अधिक कुरूप
तितके अधिक ते मांडते आपले प्रदर्शन.
हे बोलताना मला दिसतो तुझा भविष्य,
तो दिवस, जेव्हा सर्व प्रामाणिक नागरिक
एखाद्या रोगग्रस्त प्रेतापासून दूर जावे तसे,

हे बाजारबसवे, तुझ्यापासून सरतील दूर, शिसारी येऊन,
तेव्हा तुझे हृदय लागेल आतल्याआत चरकायला
खिन्न नजरेने पाहाणाऱ्या डोळयाशी डोळा भिडवताना,
तेव्हा नसतील सोन्याच्या साखळया तुझ्या अंगावर,
नाही मिळणार तुला जायला वेदीच्या आसपास.
नाही येणार तलम कापडाचा दुपट्टा घेऊन
तुला मिरवता शहाजोगपणाने, नृत्याच्या समारंभात.
तू त्या वेळी असशील आपणाला लपवून घेतलेले
भिकारी, पंगू, आणि रोगजर्जर अशा लोकांमध्ये.
क्षमा करणे हे असणार शेवटी ईश्वराधीन,
पण इहलोकी होईल उध्वस्त तुझे जिणे या दुष्कीर्तीने.

मर्था कर याचना त्या देवाजवळ स्वतःच्या उद्धारास्तव
नको वापरू शेवटचा श्वास शिव्याशाप देण्यासाठी.

व्हॅलंटाईन ए कुंटिणीचा धंदा करणाऱ्या स्त्रीलिंगी मर्कटा !
जर पोचेल माझा हात त्या तुझ्या सुकलेल्या सोंगापर्यंत
तर माझ्या सर्व पापांचा परिहार करणारी
मला लाभेल माझ्या मनाजोगती ईश्वरी कृपा.

मार्गरिटा अरे दादा, किती यातना या !

व्हॅलंटाईन सांगतो तुला, आवर आपला हा आक्रोश
जे हा स्वतःच्या शीलापासून तोडलंस स्वतःला
तेव्हाच खुपलास तू खंजीर माझ्या हृदयामध्ये:
आता चाललो मी मृत्यूच्या पवित्र झोपेकडे
प्रामाणिक सैनिकाप्रमाणे; तसाच स्वीकारो मला परमेश्वरहि.

देवळातील मध्यभाग

ऑर्गन आणि वृंद यांच्यासह उपासना सुरू आहे. मार्गरिटा भक्तगणामध्ये गुडघे टेकलेल्या अवस्थेत. तिच्यामागे एक निशाचर.

निशाचर हाय, ग्रेशेन, किती होतीस वेगळी मुलगी
जेव्हा आपल्या निष्पाप पावलांनी
या वेदीजवळ इथे आलीस
आणि आपल्या जीर्ण झालेल्या इवल्याशा पुस्तकातून
लागलीस पुटपुटायला आपल्या प्रार्थना
अर्धवट बालिश अशा आविर्भावात
आणि अर्धवट भक्तीच्या भावनेने.
ग्रेशेन !

काय आहे आता अवस्था तुझ्या विचारांची ?
किती आहे खोल दडलेली तुझ्या हृदयात
अतिक्रमणाची जाणीव ?
कशाला करतेस ही प्रार्थना ' आईच्या आत्म्यासाठी,
जिला आहे तुझ्या हातानी पाठवले झोपायला अनंत दुःखामध्ये ?
बोल, कुणाचे सांडले हे रक्त तुझ्या दारापाशी ?
आणि तुझ्या हृदयाच्या खाली
कशाची आहे ही हालचाल, हे एवढ्यातच कोण लागले
तळमळ करायला, तुझ्या आणि स्वतःविषयीच्या भावी भयाने ?

मार्गरिटा किती भयंकर ! किती भयंकर !
जर फक्त मला येईल ही जाणीव नाहीशी करायला
जी असते घिरट्या घालीत सदासर्वकाळ
माझ्या इच्छेविरुद्ध मला निर्खंदीत.

वृंद तो भयकारक दिन क्रोधाचा
दाह करिल या चराचराचा. (ऑर्गनचे संगीत)

निशाचर आता गावलीस तू तावडीत त्या क्रोधाच्या !
त्या तुताऱ्या लागल्या वाजायला,
ती थडगी लागली हादरायला,
आता तुझा तो आत्मा
घेणार आहे वेगळा आकार,
थंडगार मातीपासून
ज्वालेमधील वेदनांचा
नव्याने जन्मलेल्या अन् थरकापणाऱ्या.

मार्गेरिटा किती बरे होते मी इथून जाऊ शकते तर!
हे ऑर्गन टाकते भारावून,
टाकते दडपून माझा श्वास,
माझे हृदय विरघळते आतल्याआत
जाते हरवून संगिताच्या महापुरात.

वृंद घेइल न्यायाधिश न्यायासन
तेव्हा उघडी पडतिल पापे;
नुरेल काही शिक्षेवाचुन.

मार्गेरिटा मला वाटते गळून गेल्यासारखे
हे प्रत्यक्ष स्तंभ सुद्धा
माझ्याभोवती घालतात गराडा,
आणि घुमटाचे हे छप्पर
येते खाली कोसळत कोसळत
अहो, घाला हो थोडा वारा!

निशाचर काय करतेस लपवण्याचा विचार? नाही पाप आणि बेअब्रू
कधी कोणाला लपवता येत.
करतेस भाषा प्रकाशाची, वाऱ्याची,
पतित पापिणी!

वृंद मी तर पापी! काय वदू मी?
कोणा संता करु आवाहन?
भयमुक्त जिथे क्वचितच सज्जन.

निशाचर पापमुक्त लोक आहेत वळवीत
आपली तोंडे दूर तुझ्यापासून.
शुद्ध हृदयाचे लोक थरकापतात
तुझ्याजवळ हात आणायलाही,
हाय हाय, पापिणी!

वृंद मी तर पापी! काय वदू मी?

मार्गारिटा अहो, शेजीबाई, द्या हो औषधाची कुपी. (बेशुद्ध होते.)

वा ल प र्गी ची रा त्र

['मे' दिनाची सायंकाळ]

हार्झच्या पर्वतराजीवर.
फाउस्ट. मेफिस्टॉफलीझ

मेफिस्टॉफलीझ हवा आहे का तुम्हाला झाडू, हवेमधून उडत जाण्यासाठी?
की आपला आणू एखादा क्रूर अवलादीचा भयानक बकरा.
आपण काटलेला हा रस्ता अजून आहे ठिकाणापासून दूर.

फाउस्ट ताजातवाना असताना मला आवडतो अगदी हाच चालण्याचा वेग,
आणि अशा वेळी मला हवी असते फक्त माझी शिसव्याची काठी.
काय फायदा अधिक जवळचा रस्ता काढण्यामध्ये?
मला आवडते वाट शोधायला राक्षसी दरीच्या अशा चक्रव्यूहातून,
आणि चढायला अशा कड्यांवरून, ज्यांच्या भव्योदात्त
उंचीपासून कोसळतात प्रवाह एकसारखे रूपेरी झेपीने.
अशा सौंदर्यामुळे लाभते लज्जत प्रवासामधील दिवसांना.
वसंत ऋतूने आहे अगोदरच केलेला संचार भूर्ज वृक्षांतून,
आणि संध्या आहे थरथरत मृदुल कंपनाने गंभीर देवदारामधे;
मग आपल्याही अवयवांमधून का नाही संचारणार नवजीवन?

मेफिस्टॉफलीझ माझ्यामध्ये, स्पष्ट बोलायचे तर, नाही घडत असला चमत्कार.
मला भासते माझ्यामध्ये फक्त हिवाळ्याचे साम्राज्य असल्यासारखे,
करते अपेक्षा या ठिकाणी धुके आणि हिमवर्षाव होण्याची.
कसा रुग्णीपणाने चालला आहे चंद्र आकाशातून
अर्धवट बिंबाचा, आणि लालसर मंद प्रकाशाचा,
त्याचे तेज आहे निवृत्त, आहे कठीण आपल्याला चालणे
या अशा अंधाऱ्या खडकांतून आणि वृक्षांतून बिनधोकपणाने.

म्हणून आता त्याच्याऐवजी मी बोलावतो एक पिशाच्चपोत.
तो पहा दिसतो तिथे! आपण महाशय, या इकडे!
आता अधिक चांगल्या कामी तुमचा प्रकाश होई रुजू.
आम्ही आहो चढत डोंगर; कृपा करून चला आमच्यापुढे.

पिशाच्चपोत अगदी आदरपूर्वक; धरतो आशा यशस्वी होण्याची
आणि माझा जातिवंत नाचरेपणा आटोक्यात ठेवण्याची,
मात्र रिवाजानुसार आमचा मार्ग असतो नागमोडी.

मेफिस्टॉफलीझ असं! करता नक्कल मानवी प्राण्याच्या क्रीडाकौशल्याची!
अहो महाशय, चला सरळपणे सैतानाच्या नावानं,
नाहीतर मुळातच तुमची मेणबत्ती टाकीन फुंकरून.

पिशाच्चपोत आपल्या धन्याची ओळख दाखवणे आहे अनिवार्यच,
आणि स्वखुशीने संतोष देण्याची करीन पराकाष्ठा,
पण लक्षात ठेवा,—ही पर्वतराजी आहे भुताटलेली,
आणि जरी ह्या पिशाच्चपोताने केले मार्गदर्शन
तरी नाही त्याला देता येणार पूर्णतेचे आश्वासन.

फाउस्ट, मेफिस्टॉफलीझ, पिशाच्चपोत (प्रतिसंवादी चर्या)
आता दिसतो आपला मार्ग पुढे जाताना
या चेटकामधून आणि स्वप्नामधून,
फुरफुरत्या मार्गदर्शका, आता दाखव आपली करामत
या अमर्याद उदास प्रदेशातून
आम्हाला जलदीने झेपावून नेताना.
हे पहा, आहे धावत स्तंभरूप अरण्य
वृक्षांवर वृक्ष असे आभासामध्ये झुकांड्या खाणारे
हे पर्वतकडे, चक्राकार फिरताना मुजरा करणारे,
निरुंद दरीमध्ये गर्जना करणारे नाकेले खडक,
ऐका त्यांचे ते गुरगुरणे, ते घोराख्यान!
हे खडकांमधून आणि कुरणांतून खाली कोसळणारे
त्या निर्झरांचे आणि नद्यांचे अधोमुख प्रवाह.
की आहेत ही गीतेच! स्वप्नामध्ये गुंजारव करणारी!
की आहेत या लहरी प्रेमिकांच्या उन्मेषांच्या!
की आहेत हे बोल स्वर्गातल्या उषेचे!
ते सर्वस्व, ज्याच्याकरिता असतो आसुसलेले आणि हपापलेले!

परततो प्रतिध्वनी होऊन सामर्थ्यवान,
घडवतो प्रचीती पुरातन वास्तवाची,
उहू ! शुहू ! येतात तरंगत
ही आक्रंदने, घुबडांची, हुमणांची,
मैनेच्या बरोबरच : ती आहेत होत जागृत.
कोण रांगतात त्या झुडुपांमध्ये
पोटावर सरपटणारे सरड्यासारखे प्राणी ?
आणि पाळकांडे, चमत्कारिक सर्पासारखी,
होतात प्रकट खडकातून, रेवटाळीतून,
होतात प्रकट या जंगलामध्ये आपणाला भिववण्यासाठी,
अचानक पकडण्यासाठी आपल्या जाळ्यामध्ये;
गाठाळ कर्कवृक्ष आपल्याला अडकवण्यासाठी
ठेवतात गुंतवून बहुमूलांचे पदर.
भयानक वाटचाल ! आणि जथ्याजथ्यांनी
दन्ताळ प्राणी आहेत पळत पलटणी उभारून
काळे आणि गोरे, शेवाळातून आणि झाडोऱ्यातून;
आणि टाकतात काजवे रंगवून सगळे वातावरण,
घनदाट समुदायामुळे करतात उपलब्ध
पिसाट सोबती आमच्या मार्गदर्शनासाठी.
नाही, सांगा अगोदर आपल्या वाटेवरच
आपण उभे आहो की आहो आपण चाललेले ?
सगळे आहे गिरगिरत, तरंगत, आणि नर्तनशील,
कडे आणि अरण्ये, चेहेऱ्यांनी भरलेली,
आहेत वेडावीत. उडते वडवाग्नी
पसरतात सगळीकडे, बसवतात दहशत.

मेफिस्टॉफलीस घे पकड माझ्या कोटाची आणि राहा धरून घट्ट !
आपण आता आहो पोहोचलो मोक्याच्या ठिकाणी,
जिथे पर्वतावर लागतात दिसायला
त्याच्यातून चमकणाऱ्या मेमनच्या अग्निज्वाळा.

फाउस्ट चमकतात आता दऱ्या आणि कडे
वेगळ्याच पहाटेमध्ये, भयसूचक प्रकाश
पसरतो भेसूरपणे काळ्या गर्तेवरती,
आणि आणतो भगदाडे उजेडात खूप खालीपर्यंत.

आहे पाझरत प्रकाशाची झलक धुक्याच्या पडद्यामधून,
स्तंभीभूत ढगामधून, पिंजलेल्या बाष्पामधून,
इकडे होते ती टोकदार निमुळत्या गळपट्ट्यासारखी,
तिकडे येते वर उफाळून एखाद्या प्रवाहाप्रमाणे;
प्रकाशाचे धागे, जाळ्यांची गुंफण करीत,
आपल्या सोनेरी नसा पसरतात दर्यांच्या अंतरंगातून,
सरतेशेवटी, डोंगरांच्या वक्रतेमुळे पुजावले गेल्यावर,
अलग झालेले ते प्रकाशतंतू पुन्हा जातात एकरूप होऊन,
आता हातापाशीच येतो बहरून ठिणग्यांचा फुलोरा
सोनेरी वाळूच्या उधळलेल्या अग्निकणासारखा,
आणि अहाहा, आता ही अवाढव्य स्वरूपाची
पहाडी तटबंदी दिसते सर्वस्वी धगधगून पेटल्यासारखी.

मेफिस्टॉफलीझ मेमन महाराजांच्या औदार्यामुळेच त्यांचा राजवाडा
आहे बुडालेला या महोत्सवाच्या प्रकाशवैभवामध्ये.
द्या आपल्या नशिबाला दुवा असले दृश्य पहायला मिळाल्याबद्दल;
आणि आता मला लागते त्यांच्या चंगीभंगी पाहुण्यांची चाहूल.

फाउस्ट किती भीषणपणे हे वादळ घालते झडप, सोडते फूत्कार,
आणि केवढ्याने मारते धडक माझ्या मानेवर, माझ्या खांद्यावर.

मेफिस्टॉफलीझ बिलग कड्याच्या म्हाताऱ्या बरगड्यांना! रहा चिकटून प्रचंड धोंडींना!
नाहीपेक्षा ते देईल तुला ढकलून खोल विव्हरामध्ये;
आता रात्रीने आहे घेतला धुक्याचा घुंगट.
ऐक जंगलामधील कोसळल्याचा आवाज!
भयभीत घुबडे आहेत झेपावत आणि किंचाळत,
हिरवी वनराजी जाते झोडपली वादळाच्या चाबकाने,
स्तंभतुल्य महाकाय जातात दुभंगून आणि कोसळून,
जिथे वादळाचा आहे चालला विनाशक विध्वंस.
मुळे आणि खोडे आहेत ओरडत आणि पिळवटत
या अरण्याच्या अपार आक्रंदनाबरोबर.
या बंडामध्ये जातो कोसळून झाडांचा विस्तार, सगळे जाते
घुसळले वेड्याप्रमाणे, मोडते किंवा होते जमिनदोस्त;
जातात आक्रंदत निर्दयवृत्तीने वादळाचे आसूड
या अराजकाने भरलेल्या खिंडीमधून.

पडतात शिखरावरील बोलण्याचे आवाज तुझ्या कानावर
आता वाटतात दुरून आल्यासारखे, आता जवळून,
पर्वताच्या रांगेमधून लागतात वाहू
जादूचे मंत्र, वेडावून टाकणारे आणि विलक्षण.

खेटकिणींचा वृंद आता आहोत आम्ही खेटकिणी चाललो ब्रॉकनकडे,
शेतातले खुंट आहेत सोनेरी आणि धान्य आहे हिरवेगार,
येतो दृष्टीपथात या उत्सवामध्ये रंगलेला जथा,
आणि युरिॲनस घेईल अध्यक्षपद या समारंभाचे.
आहे चालली आमची मंडळी दरीवरून तरंगत,
दुर्गंध येणाऱ्या म्हाताऱ्या बोकडावरील पादणाऱ्या खेटकिणींसह.

एक आवाज आता येत आहे माननीय बॉबो,
गरोदर डुकरिणीवर स्वार होत्साती.

वृंद मग सन्मानार्ह असेल त्याचा होऊ दे सन्मान :
या बॉबोबाई आणि जथ्याचे करा संचालन !
मातृत्व आलेल्या चिवट हाडाच्या म्हाताऱ्या डुकरिणीवरून
ती चालवील हुकमत खेटकिणीवर, नरकातल्या भुतावळीवर.

एक आवाज कोणत्या रस्त्याने आलात तुम्ही ?

दुसरा आवाज इल्सेनस्टोनच्या बाजूने.
येता येता डोकावले घुबडाकडे, एकांतामध्ये अंड्यावर बसलेल्या.
सांगते तुम्हाला, त्याने वटारले
एवढाले डोळे विस्मय वाटल्यामुळे.

एक आवाज नरकात जा तुम्ही ! काय आहे तुम्हाला जरुरी
या एवढ्या वेगाने दौडण्याची ?

दुसरा आवाज पहा, मला आला वीट हिच्या हेंगाड स्वारीचा !
केल्यान जखमा माझ्या अंगावर
आणि काढलेन माझे रक्त !

खेटकिणींचा वृंद हा रस्ता आहे लांब, हा रस्ता आहे रुंद,
कुठून येतो हा लोंढा, पिसाटपणे, लोळण घेत ?
पण झाडू टोचू शकेल, आणि चिमटा बोचू शकेल,
मग गर्भाशय जाईल फुटून आणि गर्भ गुदमरेल.

जादुगारांचा अर्धवृंद — आपण चालतो घराकडे जाणाऱ्या गोगलगाईसारखे,
बाया गेल्या खूप आपल्यापुढे, आपण राहिलो अगदी पिछाडीला,
कारण, जर पापामध्ये तुम्ही मांडलीत स्पर्धा त्यांच्याशी
तर बायका सुरवातीलाच असतील तुमच्यापुढे हजार फुटावर.

दुसरा अर्धवृंद — आपण बाबा हे सगळे करू सहन अगदी बिनतक्रार :
जरी बायकांनी आपणा सर्वांना टाकले मागे
तरी त्यांना काय उपयोग त्या त्यांच्या हजार फुटांचा ?
एका चांगल्या उडीसरशीच पुरुष टाकतो त्यांना गाठून !

एक आवाज — (वरून येणारा) चला आमच्या बरोबर, चला फेल्सेनमिअरहून !

अनेक आवाज — (खालून येणारे)
जर लाभेल आम्हाला प्रवेश त्या तुमच्या अद्‌भुत लोकामध्ये !
जरी टाकली आम्ही धुऊन घाण अंगावरील,
तरी आम्ही राहाणार अशीच, रोगजर्जर, अपत्यहीन.

दुहेरी वृंद — वारे आहेत आता मंदावलेले, तारे आहेत झाले निस्तेज,
खिन्न चंद्राने आहे घेतला आपला घुंगट.
आणि चेटकिणींचा चेकाळलेला वृंद
आहे उडवीत हजारो ठिणग्या वाहत्या विस्तवाच्या.

अनेक आवाज — (खालून येणारे) थांबा, थांबा ! आहे मज्जाव पुढे जाण्याला !

एक आवाज — (वरून येणारा) कोण मारते ही हाक अंधाऱ्या भुयारातून ?

एक आवाज — (खालून येणारा)
अहो न्या हो मला तुमच्या बरोबर, न्या हो कृपा करून !
हाच रस्ता मी चढतो आहे गेली तीन शतके
आणि तरीही मी नाही गाठू शकलो जादूचे शिखर,
नाही सापडले मला अजूनहि माझे जातभाई, माझे नातेवाईक.

दुहेरी वृंद — झाडू नेऊ शकेल, काठी पेलू शकेल.
असते तशी शक्ती चुलीतल्या चिमट्याजवळ आणि बोकडाजवळ;
आणि ज्याला नाही साधणार आज उत्थापन
त्याचा होईल दारुण दुःस्थितीत कायमचा अधःपात.

दुय्यम चेटकीण — (खालच्या बाजूने) मी लंगडत्ये, मेला आहे काळच अरिष्ट,

आणि जातात सगळीच माझ्यापुढे या चढणीवर,
घरी येते माझ्या वाट्याला भीती व अस्वस्थता
आणि भंगले ते, इथेही नसते त्याहून वेगळे.

चेटकिणींचा वृंद इथे आहे एक मलम जर तुमचा धीर खचला तर,
आणि करतील शिडाचे काम, फडके व चिंध्या.
पुरेल वाहन या द्रोणाचे तुमच्या उड्डाणासाठी :
जी नाही उडणार आज ती जाणार निश्चित नरकात !

दुहेरी वृंद या शिखराभवती पर्यटन करताना
प्रथम आपण घुसळू जमीन आणि नंतर टाकू भरून,
त्याने ब्रॉकनची सगळी पर्वतराजी
जाईल बुडून चेटकांच्या भाऊगर्दीत.

(त्या खाली उतरतात)

मेफिस्टॉफलीझ इथे आहे चालली ढकलाढकल, गोधळगुंडा, गिचमडगर्दी.
खडखडाट, फडफडाट, पिळवटणे, मिरमिरणे, बडबडणे
डागणाऱ्या ठिणग्या, आणि दुर्गंध, आणि धावपळ,
—ही आहे अस्सल निर्मिती चेटकिणीच्या अवलादीची !
रहा लगतसा, नाहीपेक्षा दुरावू. महाशय घ्या काळजी !
तुम्ही आत्ता कोठे आहा ?

फाउस्ट हा इथे.

मेफिस्टॉफलीझ इतके दूर स्वतःच्या मार्गापासून ?
मग पाहिजे मी वापरली ही माझी संरक्षक शक्ती.
द्या रस्ता ! येता आहेत होलांड महाशय. द्या रस्ता.
आता पंडितराज, नाही योग्य एक क्षणही इथे थांबणे !
धर घट्ट माझा अंगरखा, अदृश्य होऊन होऊ या स्वतंत्र.
हा स्वैराचार माझ्यासारख्यालाही वाटतो असह्य.
शिवाय पलीकडची ती झाळ आहे चकमकत चमत्कारिक प्रकाशाने,
चल जाऊ आपण चोरपावलांनी त्या गूढाजवळ :
दड झुडपामध्ये, मग आपण नाही पडणार कुणाच्या दृष्टीला.

फाउस्ट मग हो पुढे, हेकट आणि खरखरमुंड्या निशाचरा,
तू चोखाळलेली ही योजना दिसते फारच अकलहुषारीची :
एकांतावरचे आपले प्रेम घनिष्ठ करण्यासाठीच
आपण आज चढतो आहो ब्रॉकन पर्वतावर वालपर्गीच्या रात्री.

मेफिस्टॉफलीझ त्या पहा, झाडाझुडपांतील उल्हासमय प्रकाशज्योती,
तिथे जमले आहे एक लहानसे गुलहौशी मंडळ;
आणि एकांताची वाढते मौज माणसांच्या सहवासाने.

फाउस्ट तरी सुद्धा मला आवडेल पठारावर जाणे,
जिथून उठतात धगधगत्या अग्निज्वाला, धुराची चक्रे.
सगळ्या मंडळीवर चालतो अंमल त्या सैतानाचा;
आणि निश्चितच तिथे उकलणार पुष्कळशी कोडी.

मेफिस्टॉफलीझ आणि पुष्कळ नवी कोडी येणार अस्तित्वात, तितकीच गोंधळविणारी.
ऐक माझं, तो जगाचा वेडा व्यवहार राहू दे तिकडेच,
इकडे आपण निवांत सुरक्षितता अनुभवीत असताना.
हे आहे एक अगदी सर्वमान्य सत्य :
मोठ्या विश्वातूनच आपण निर्मितो लहान विश्वेही.
मला, महाशय, उमगतात चेटकिणी नंग्या, तरण्याबांड,
आणि म्हाताऱ्या शहाणपणा करून रूप लपवणाऱ्या.
दाखवा सौजन्य आपल्या डोळ्याचे आणि जिभेचे.
थोड्या त्रासात भरपूर मौज,—त्याची कशासाठी वाटावी रुखरुख ?
आता आहे येत ऐकायला अनेक वाद्यांचा संमिश्रध्वनी,
भयानक गोंगाट, पण परंपरेला मान्य असलेला!
चला महाशय, माझ्याबरोबर! उच्चार होताच होईल कृतीही,
मी स्वतः पुढाकार घेऊन दाखवीन तुम्हाला सर्व गंमत,
त्याच्या मोबदल्यात मला लाभावी तुमची कृतज्ञता.
काय आहे तुमचं मत ? हा नाही क्षुद्रसा प्रदेश.
वळव वरती तुझे डोळे! केवढे अवाढव्य हे दृश्य :
त्या गर्तेभोवती आता दिसताहेत शेकडो जाळ.
आहे चाललेले बडबडणे, नाचणे, गाळणे, पिणे आणि शृंगारचेष्टा.
करशील मान्य, या दृश्याला नाही मिळणार दुसरीकडे तोड.

फाउस्ट पण जेव्हा या रंगोत्सवात तू घडवशील आपला प्रवेश
तेव्हा दिसशील कोणच्या भूमिकेमध्ये—जादूगाराच्या की सैतानाच्या ?

मेफिस्टॉफलीझ जरी असला माझा परिपाठ गुप्त वेषात संचार करण्याचा
तरी अशा उत्सवाच्या दिवशी लागतो दाखवावा आपला हुद्दा.
माझा दर्जा सिद्ध करण्यासाठी नसते मला फितीची जरुरी,
येथील लोक करतात सत्कार बिनगेळाच्या खुराचा.

ती पाहिलीस पलीकडची गोगलगाय माझ्याकडे सरपटणारी !
रापीत जाणाऱ्या संवेदनाक्षम चेहेऱ्यामुळे तिला आहे
आधीच लागला माझ्या गहन सम्राटपणाचा वास :
मला नाही चालणार स्वतःला लपवून ठेवून माझ्या प्रजेपासून.
चल आता, त्या सगळ्या जाळाजवळून करू फेरफटका :
मी होतो एक कुंटणवाला, तू हो एक प्रेमिक.

(विझणाऱ्या निखाऱ्याजवळ बसून असलेल्या लोकांना उद्देशून)

अहो म्हातारबुवा, असे एकटे का, या अंधारात ?
त्यापेक्षा चला तिकडे
जिथे दिसतो अनिर्बंध आनंद;
खरे म्हणजे तुम्ही सापडायचे त्या तिकडेच,
असायचा जमलेला तरुणांचा घोळका तुमच्या आसपास.
घरी असताना
मिळतो तुम्हाला भरपूर निवांतपणा.

सेनापती ही राष्ट्रे ना ! कोण ठेवील त्यांच्यावर विश्वास ?
हवी तेवढी करा सेवा, नाही होणार कधीहि चीज.
ही जनता म्हणजे असते अगदी स्त्रियांसारखीच,
ती करते उदंड प्रेम फक्त तरुणांवर.

मंत्री मी खंतावतो परंपरेपासून आपण ढळलो म्हणून.
आपले पूर्वज निश्चितच होते आपल्याहून शहाणे;
जेव्हा मंत्र्यांचा शब्द म्हणजेच होता कायदा
तेव्हाच निःसंशय येथे होते नांदत सुवर्णयुग.

नफेबाज आणि आम्हीही नव्हतो मागे अक्कल हुषारीमध्ये,
पोचलो आघाडीला बऱ्या वाईटाची क्षिती न बाळगता.
आणि आमचे हे स्थान अढळ आहे असे वाटताच
आता सगळे लागले गरगरायला आणि कोसळायला.

लेखक तुम्ही सांगा, कोणाला हवे आजकाल वाचायला
ज्यात अर्थाचा अंशहि सापडतो असे पुस्तक !
तरुण पिढीच्या वागणुकीबद्दल नको बोलायलाच,
नाही पाहिली ती कधीही इतकी उद्धट आणि अहंमन्य.

मेफिस्टॉफलीझ (एकदम म्हातारपणाचा संचार होऊन)

ही माझी ब्रॉकनची फेरी ठरणार शेवटचीच,
वाटतो त्यामुळे देशाचा अंतकाळ समीप आल्यासारखा;
आणि माझा दारूचा बुधला पोचला तळाशी,
वाटते त्यामुळे सगळे विश्वही घसरतीला लागल्यासारखे.

फेरीवाली चेटकीण अहो बाबासाहेब, नका जाऊ मला डावलून
माझ्या मालावर नजर टाकल्याशिवाय.
माझ्या टोपलीत आहेत पुष्कळ असामान्य वस्तू
चोखंदळ वृत्तीचे समाधान करणाऱ्या;
माझा साठा आहे मोठा इतर दुकानांहून,
आणि विशेष म्हणजे, माझ्या दुकानात
नाही आढळणार एकही वस्तू जिने नाही घातलेली भर
सांसारिक अरिष्टांमध्ये आणि पापकर्मामध्ये.
नाही सापडणार एकही खंजीर, रक्ताने न माखलेला;
नाही आढळणार एकही पेला, ज्याच्यात नव्हता प्राणघातक रस
होतकरू जीवनाची एखादी कळी अकाली खुरटवणारा;
एकही मोती, एखाद्या कुमारिकेला शीलभ्रष्ट न केलेले;
एकही तलवार, देशद्रोह्याच्या दगेखोरीची सेवा न बजावलेली,
किंवा एखाद्या समर्थ प्रतिस्पर्धाच्या पाठीत न घुसलेली.

मेफिस्टॉफलीझ अहो आजीबाई, तुमचा माल आता आहे झाला जुनापुराणा;
काळ असतो सतत गतीशील, आणि जुने बनते निकामी.
आता काढा नव्या टूमी विक्रेत्याच्या गळाला लावण्यासाठी,
कारण नाविन्यच असते जिंकीत प्रत्येक माणसाला.

फाउस्ट हा आहे अगदी अस्सल चेटकिणींचा मीलनोत्सव.
वाटते भीती आपली जाणीव आणि विचार स्थानभ्रष्ट होण्याची.

मेफिस्टॉफलीझ भोवळणारा हा समूह आहे झेपावत शिखराच्या दिशेने; -
नेतो ढकलीत आपल्याबरोबर, त्यालाच ढकलण्याची इच्छा असूनही.

फाउस्ट पण आहे ही कोण इकडे येणारी ?

मेफिस्टॉफलीझ ही लिलीथ.

फाउस्ट कोण म्हणालास ?

मेफिस्टॉफलीस अरे ती
त्या ॲडॅमची पहिली पत्नी, एकदा लक्ष्यपूर्वक पहा तिच्याकडे,
त्या लिलीथकडे, तिच्या भयसूचक मोहक केशकलापाकडे.
रहा जपून या तिच्या एकुलत्या प्रसाधनापासून;
कारण, रंगेल तरुण, त्या पाशामध्ये एकदा सापडल्यानंतर,
नाही पडत सुखरूप बाहेर तिच्या शृंगारचेष्टांतून.

फाउस्ट एका वाकलेल्या थेरडीच्या बरोबर दिसते दुसरी तरुण चेटकीण :
त्या नाचल्या बेभान बेहोषीत, हवी असावी थोडी विश्रांती.

मेफिस्टॉफलीस आज इथे नाही मिळणार कुणाला विश्रांती,
झाली सुरुवात दुसऱ्या नाचाची, चल हो गर्दीमध्ये सामील.

फाउस्ट (तरुण चेटकिणीबरोबर नाच करताना)
एके दिवशी असेच काही स्वप्न मला बघ पडले,
कुण्या सफरचंदाच्या तरुवर मन माझे हे जडले;
दोन सफरचंदे चकमकती दिसली मज त्यावरती,
चढलो त्यावर भूक लागली वाढाया मग भलती.

सुंदर चेटकीण स्वर्गामध्ये प्रथम जेधवा फळे प्रकट ती झाली
तेव्हापासुन तुझ्या मनाला भूक तयांची पडली.
आणि आता कबूल करते, धगधगत्या हृदयाने,
माझ्या बागेमधे वाढती सफरचंद अभिमाने.

मेफिस्टॉफलीस (म्हाताऱ्या चेटकिणीशी नाच करताना)

एके दिवशी असे काहीसे स्वप्न मला बघ पडले,
कृषिविद्येच्या विषयामधुनी वाह्यातपणे स्फुरले.
एक भयानक चीर उमगली मजला झाडावरती
होती रुंद जरी ती तरिही मज बेताची होती.

म्हातारी चेटकीण अत्यादरपूर्वक मी आता करिते सलाम त्यांना
बिनगेळाचा खूर जयांचा त्या या महाराजांना,
त्यांनी आता पुढे करावा बळकट बांबू जाड
आणि न भ्यावे मुळीच असले पाहुनी हे भगदाड.

सर रुनिक रंप दळभद्रया अवलादी, झाली वाटते पुन्हा सुरुवात तुमच्या लीलांना !
किती वेळा निर्विवादपणे आम्ही आहे सिद्ध केलेले

कोणत्याही चैतन्यशक्तीला नाही वावरता येत सामान्य पातळीवर !
आणि तरीसुद्धा करता धाडस मर्त्य माणसासारखा नाच करण्याचे !

सुंदर चेटकीण (नाच करता करता)

काय करतो हा माणूस आमच्या उत्सवामध्ये ?

फाउस्ट आपलं नशीब ! हा माणूस असतो उपस्थित प्रत्येक ठिकाणी.
दुसरी नाचतात, पण शेवटी बक्षिसे देणारा असतो हाच,
तुम्ही घेतलेली प्रत्येक गिरकी बनेल याच्या टीकेचा विषय :
त्याच्या शब्दाशिवाय जर झाला एखादा पदन्यास,
तर समजा तो पदन्यास झालाच नाही असे,
जर आपण पुढे सरसावलो तर होतो त्याचा तळतळाट;
पण आपला हा टीकाकार जशी फिरवील आपली गिरणी,
तसेच तुम्ही फिरलात चक्राकार, विफल नृत्यामध्ये,
तर दिसेल तुमच्या नृत्यात त्याला लालित्य आणि समज.
आणि विशेषतः जर केलात आवर्जून उल्लेख त्याच्या प्रभावाचा.

सर रुनिक रंप काय औद्धत्य ! या पिशाच्चांचा दिसतो बेत येथेच थांबण्याचा !
व्हा चालती, तुमचे आहे मी स्पष्टीकरण करून टाकलेले.
कसल्याही विधिनियमांची नाही भीती या सैतानसंघाला !
आमचे तत्त्वज्ञान पार डावलून टेगेल अजून भुताटलेले !
किती दिवसांपासून मी श्रमतो या वेडाचा निचरा व्हावा म्हणून,
आणि तरीहि ते आहे चिकटून बसलेले, निव्वळ उद्धटपणाने.

सुंदर चेटकीण मग थांबव आपली वटवट : ऐकली पुष्कळ.

सर रुनिक रंप मी तुम्हाला सांगतो सरळ, तुम्हाला आणि तुमच्या पंथाला,
मी नाही करणार सहन चैतन्यशक्तीची दादागिरी;
नाही येत माझ्या आत्म्याला अंमल गाजवता असल्या गोष्टीवर.

(नाच सुरू राहतो)

आजच्या पुरते माझे बेत आहेत बारगळलेले;
पण तरीसुद्धा मी जाणार चेटकिणीमागोमाग,
आणि माझ्या शेवटच्या क्षणापर्यंत धरणार आहे एकच उमेद :

सगळ्या सैतानांना आणि कवींना शरण आणण्याची.

मेफिस्टॉफलीझ तो आता आहे बसत एका डबक्यामध्ये, विरंगुळा म्हणून,
कारण त्याच्या या पद्धतीमुळे तो आहे पुष्कळ सुधारलेला;
आणि त्याच्या पार्श्वभागाला जळवा लागल्या की
त्याचे आभास आणि अक्कल ही दोन्हीही होतात नाहीशी.

(नृत्य थांबवलेल्या फाउस्टला उद्देशून)

का दिलीस तू सोडून ती नाचणारी मोहक पोरगी,
या रात्रीच्या जोडीदारीमधील ते मधुरतम पारितोषिक.

फाउस्ट ती होती गात खडी,
तोच मारली बाहेर उडी,
तिच्या ओठामधून एका लहानशा किरमिजी उंदराने.

मेफिस्टॉफलीझ क्षुल्लक गोष्ट! तुझ्या ओठाला शोभले असते असे दुरावणे
तो उंदीर म्हातारा असता तर. नको दुःखाची बतावणी,
किंवा आणू प्रवचनाचे अवसान,
या असल्या आसुसलेल्या रात्री,
जेव्हा आपण जातो शरण प्रीतीच्या भुलावणीला.

फाउस्ट आणि मग मला दिसली—

मेफिस्टाफलिझ कोण दिसली ?

फाउस्ट अरे मेफिस्टो, दिसत नाही का
ती तुला एक मुलगी, अगदी एकटी, निस्तेज, सुंदर !
ती पहा हळू हळू आहे वळत आणि करीत दुःखपूर्ण पदन्यास,
आणि, शिवाशपथ, मला वाटतं मी पाहातो
तिथे माझ्या डोळ्यासमोर ती माझी लाडकी ग्रेशेन.

मेफिस्टॉफलीझ जा विसरून, नाही काही भले होणार तसल्या विचारांनी.
हे आहे एक चेटुककर्म, एक आभास, अगदी निर्जीव;
त्याचे दर्शन असते कमनशिबाचे, भयाने भरलेले,
त्याच्या हिमप्राय कटाक्षाबरोबर पाहाणाराचे रक्त जाते गोठून,
आणि शेवटी दगडी मृत्यू जातो पसरत सगळ्या अवयवांमधून—
मेडुसासंबंधी तू असणार पूर्वी वाचलेले.

फाउस्ट बरोबर, बरोबर, हे डोळे आहेत प्रेताप्रमाणेच,
कुणाही हाताने न मिटलेले, न सुखविलेले.

हाच मोहक उबदार उरोभाग, ग्रेशनने समर्पिलेला,
ह्याच लाडक्या कोमल रूपामधून मी लुटला माझा आनंद.

मेफिस्टॉफलीझ मूर्ख भ्रमिष्टा, हे आहे एक चेटुककर्म,
दिसते प्रत्येकाला तिच्यामध्ये आपल्या अंतःकरणातील प्रेयसीचे रूप.

फाउस्ट किती आमुसलेले हे प्रेम, केवढा उद्रेक, केवढे दुःख!
नाही देणार मला हालायला ही तिची झपाटणारी दृष्टी;
त्या तिच्या मोहक गळ्याभोवती चमत्कारिकपणे स्पष्टता आलेली
दिसते आहे एकुलती एक तांबडी दोरी
सुरीच्या धारेइतक्या बारीक धाग्याची.

मेफिस्टॉफलीझ आहे बरोबर, आता येतो तो तपशील माझ्याही लक्षात.
मधून मधून स्वतःच्या कडेवर ती घेते स्वतःचे मुंडके,
शूर परस्यूअसच्या एका वारासरशी तुटून पडलेले.
पण अजूनही, मला वाटते, तू आहेस आभासावर आसक्त;
असे असल्यास चल माझ्याबरोबर पलीकडच्या टेकडीवर,
व्हिएन्नामध्येही नाही सापडणार असली करमणूक,
फसत नसेन तर, मला तिथे उमगते आहे एक नाट्यगृह.
कसला आहे प्रयोग चाललेला ?

नाट्यसेवक आम्ही सध्या बसवीत असलेल्या एका वस्तूचा,
ते आहे एक नाविन्य, त्याच प्रकारातील सातव्या क्रमांकाचे,
एका चोखंदळ अशा मनाचे एक सृजन.
इथल्या लोकांना आवडते नाट्यसप्तक
आणि, महाराज, सगळे नट आहेत हौशीच.
मेहेरबानानी करावी माफी, अदृश्य झालो तर :
एक हौशी नट म्हणून मी ओढतो इथले पडदे.

मेफिस्टॉफलीझ ब्लॉक्सबर्गवरील या सगळ्या वेडेचारांमध्ये
तुम्हा हौशांना सापडते स्वतःचे खास क्षेत्र.

वालपर्गीच्या रात्रीचे एक स्वप्न

किंवा ऑबेरान व टिटॅनिया यांच्या
विवाहाचा सुवर्णमहोत्सव.
एक गीतात्मक मध्यरंग.

प्रयोगाधिकारी

घ्या विश्रांती, मिडिंगच्या सुपुत्रांनो
आमच्या कथेसाठी एवढीच खरी
दृश्ये आहेत आम्हाला आवश्यक :
पुरातन पर्वत व धुक्याची दरी

अग्रदूत

विवाहाला सुवर्णमहोत्सवासाठी
पन्नास वर्षे लागतात पूर्ण;
पण भांडण मिटल्यानंतर
त्याच आनंदात असते सुवर्ण.

ऑबेरान

चैतन्यशक्तींनो, जवळपास असलात तर,
व्हा उपस्थित समारंभाच्या स्थानी
या प्रीतीच्या नव्या राज्याभिषेकात
पुन्हा भेटताहेत राजा व राणी.

पक

आला पक, दाखवित लगबग
आपले नृत्यामधील कसब बडे
त्याच्या मागोमाग शेकडो नर्तक
आता आनंदाने सरतात पुढे.

एरिअल

एरिअल पाडतो गाण्यांचा पाऊस
अद्‌भुत सुमधूर त्याची वीणा,
विदुषकाबरोबरच, त्याचे संगीत
करते आवाहन सुंदर स्त्रियांना.

ऑबेरान — सूख शोधणाऱ्या विवाहित जोडप्यांनो,
या उदाहरणावरून शिका काही,
आहे प्रीतीचे रहस्य एवढेच :
खऱ्या मीलनासाठी पाहिजे दुही.

टिटॅनिया — तो दुर्मुखला असला, ती त्रिथरली असली,
तर दोघांनाही उचला दांडगाईने;
धाडा दुर्मुखलेला ध्रुवावरील बर्फाकडे,
आणि तिला दाखवा विषुववृत्ताची रणे

वाद्यवृंदाचा संघोष — (तारस्वराने)

माशीचे नाकाड, चिलटाचे शिंग,
आणि त्यांचेच दुसरे भाईबंद,
गवतातील रातकिडा, लव्हाळ्यातील बेडूक,
यातच सामावतो आमचा गायकवृंद.

एकेरी वाद्य — गातो सुमधूर आता सनईवाला,
एका बुडबुड्याचा वापरतो भाता;
ऐका त्याचे ते बसक्या नाकाखालील,
गाणे: स्नेकीऽऽस्निकीऽऽस्नाता.

बीजकोशातील भूत — ह्या इवल्या जिवाला इवलालेसे पंख,
कोळ्यासारखे पाय आणि बेडकासारखे धोंद;
प्राण्यांमध्ये नसली तरी निदान मग त्याची
लहानसे गीत म्हणून होईल नक्की नोंद.

एक खुजे जोडपे — दाखवाल दवात आणि गुलाबात.
लंबी उडी नि ठुमकी चाल,
किती मुरडलात ठुमकलात तरी
पाय कसे काय उंच न्याल ?

जिज्ञासू प्रवाशी — या वनामध्ये पडते स्वप्न,
असेल झिंगलेले किंवा शुद्धीतले
काय भेटणार माझ्या भाग्याने
देव ऑबेरान छद्मी वेषातले ?

एक सनातनी — नसला पंजा, नसले पुच्छ,

जरी त्याच्याजवळ काहीहि नसले,
तरी ग्रीसमधील देवतांप्रमाणे,
याला पाहिजे सैतानच म्हटले.

उत्तरेकडील कलावंत माझ्या सध्याच्या चित्रात नसेल
रेखाचित्राहून वरचे तंत्र,
पण आता सफरीवर जाऊन
त्या इटलीकडून शिकेन मंत्र.

एक शुद्धिवादी ही छद्मक्रीडा लागली व्हायला
अधिक वाचाळ, अधिक अश्लील.
फक्त दोघीच लावतात पावडर
मला दिसणाऱ्या चेटकिणींमधील.

तरुण चेटकीण उतार व्हाताच्या प्रौढ स्त्रियांना
लागतात पावडरी, झगेही खूप;
पण बकऱ्यावर नागव्याने बसून
मीच दाखवते मादक स्वरूप.

प्रौढ तरण्या छाकटीशी स्पर्धा करताना
आमचे सद्वर्तन आम्हाला अडते,
पाहीनच आता थोड्याच दिवसामध्ये
तुझे हे रूप कसे कसे सडते.

वृंदसंचालक माशीच्या नाकाडांनो, चिलटाच्या शिंगांनो,
अशा गोड नागडीला नका मानू भक्ष्य;
रानामधल्या किड्यांनो, उन्हाळ्यातल्या बेडकांनो,
कृपा करून असू द्या तालाकडे लक्ष्य.

पवनकुक्कुट (एका बाजूला वळून)

येथली मंडळी रंगेल बहुरंगी.
आल्या नवऱ्यामुली नातेवाईक घेऊन
आणि विवाहेच्छू आहेत आलेले
उत्कट अपेक्षा मनामध्ये ठेवून

पवनकुक्कुट (दुसऱ्या दिशेला वळून)

जर स्वतः दुभंगून पृथ्वीच्या पृष्ठभागाने

हा सर्व हैदोस गिळला नाही तर
मला लागेल घ्यावा नरकाचा आश्रय
आणि गाठावे सैतानाचे घर.

झेनिया घेऊन आमचे भाले तीक्ष्ण
आम्ही कीटक उडत येतो;
सैतान आमचा पिता म्हणून
सेवेसाठी हजर होतो.

हेनिंग्ज पहा आले त्यांचे थवे
चावा घेण्यात सहज शूर;
म्हणतील नव्हता हेतू दुष्ट
आणि नव्हते हृदय क्रूर.

म्यूजागिटीझ या चेटकिणींच्या टोळीत राहाण्यात
माझा आत्मा रमतो खरा;
त्या वाग्देवींची सेवा करण्यापेक्षा
यांच्याच बरोबर संबंध बरा.

युगकवी सीदेवाँ वागा माझ्यासारखे, जोडा सन्मित्र,
मग कोण ठरणार आपल्याहून मोठा;
त्या जर्मनीच्या पार्नेससप्रमाणेच
नसतो ब्लॉक्सबर्गवर जागेला तोटा.

जिज्ञासू प्रवासी तो पलिकडे कोण अहंमन्य
ज्याच्या पावलांत घमेंड खास,
त्याचे नाक आहे काढीत
इथे कुणातरी जेजुइटाचा वास.

बगळा संथ वळ्यामध्ये पागणे ठीक,
पण भोवऱ्यामध्ये मजा खरी;
म्हणूनच आमचे धार्मिक आत्मे
या सैतानाच्या जमतात घरी.

एक पृथ्वीपुत्र धार्मिक माणसांना सगळी साधने
वाटत असतात सारखीच पवित्र,

आणि म्हणूनच त्यांचा धर्म
या ब्लॉक्सबर्गवर घालतो छत्र.

नर्तक फुटणार पंख नव्या वृंदाला,
येतो ऐकायला दूरचा ढोल;
छे ! छे ! हा तर लव्हाळी पक्षी,
त्याचाच खिन्न नीरस बोल.

नृत्यनाट्य संयोजक येतात लठ्ठ, येतात पतले,
नर्तकासारखे हालवीत पाय,
आपल्या खुंट्या हालतात कशा
याची कल्पना त्यांना काय.

फिडलवाला या चांडाळचमू फोडतील मेजवान्या
तरीही ठेवतील खुनावर डोळा;
आरफ्यूसच्या वीणेने वळलेले पशू
येथील सनयांमुळे होतील गोळा.

एक दुराग्रही गर्जोत टीकाकार, घालोत वाद,
जाउदेत माझे कानही फुटून,
तरी म्हणणार मी—सैतान असतोच,
माहीतर वेताळ येणार कुठून.

एक दार्शनिक या कल्पनासुद्धा करतात दमदाटी
आणि मनावर मारतात ठोके,
माझे सर्व विचार म्हणजेच मी असेन
तर मग फिरले माझेच डोके.

एक वास्तववादी या अस्तित्वशास्त्राने लागेल वेड,
आहे त्रासजनक त्याचे जंजाळ;
माझा दृष्टीकोन, माझा पाया,
नव्हता कधीही इतका ढिसाळ.

एक गूढवादी मी आनंदाने मिसळतो मेळाव्यात
त्यांच्या उत्सवात सहभागी होऊन,
करतो सिद्ध देवतांचे अस्तित्व
या वेताळांचाच अभ्यास करून.

एक संशयवादी त्यांना वाटते लाभेल खजिना,

घाण उकरून मिळेल सोने.
'वेताळ' 'बेताल' साधते यमक,
तेवढे करतो आनंदाने.

वृन्दसंचालक
कर्कश रानकिड्या, लव्हाळ्यातल्या बेडका,
तुम्ही म्हणजेच हौशी गायक,
माशीच्या शिंगा, पुशीच्या तुताऱ्ये,
तुमची आरडाओरड भीतीदायक.

शहाणे
करमणूक करणारी आमची फौज,
सान्स सॉसीचे आम्हीच आदर्श.
आमचे पाय निकामी असले तरी,
डोक्यावर चालण्यात आम्हाला हर्ष.

अडाणी
आमचेही होते दिवस पक्वान्ने खाण्याचे,
पण परमेच्छेपुढे करणार काय,
आता आहेत आमचे जोडे फाटलेले,
आणि धावता आहेत अनवाणी पाय.

पिशाच्चपोत
आम्ही पुढे येतो दलदलीच्या प्रदेशातून,
तुम्हाला दाखविण्यासाठी बुद्धीचे चमत्कार,
पण उमगते नाचामध्ये शिरल्यावर,
सवाई फाकडे म्हणून आम्हीच चमकणार.

कोसळता तारा
मी तळपतो ताऱ्यांच्या तेजामध्ये
आणि ज्वलंतसा कोसळतो जगावर.
पण आता आहे गवतामध्ये पडलेलो;
मला उभा करा माझ्या पायांवर.

भारी मल्ल
आम्हाला वाट द्या, आम्ही येतो आहो!
गवताला पाडणारे अवाढव्य वीर;
आम्ही सिद्ध करू, चैतन्यशक्तींनाही
असते भक्कम व विपूल शरीर.

पक
आईची डरकाळी ऐकून हत्तीसुद्धा
नसतील उठवीत एवढ्याने आवाज,
पण सवंगड्यांनो, सर्वोत्तम पकच
दिसतो भरदार सर्वांहून आज.

एरिअल तुम्हाला दिलेत का निसर्गाने पंख,
जे फक्त जातात पसरले आत्म्याकडून ?
चला तर एरिअलच्या गाण्यामागोमाग
गुलाबी वाऱ्यावरून, गुलाबी डोंगरावरून.

वृन्दवाद्ये (खालच्या स्वरात)

ढग पांगता आहेत, धुके हटते आहे,
अरुणोदयात न्हालेले, एकरूप संथ.
निश्वास वाऱ्याचे पानातून, वेतातून.
आणि होतो आहे कथेचा अंत.

उजाड दिवस, उघड्या प्रदेशातील

फाउस्ट, मेफिस्टॉफलीझ.

फाउस्ट या दुर्भाग्यात आणि निराशेच्या या गर्तेमध्ये! इतके दिवस पृथ्वीवर भटकणारा एक दुर्दैवी जीव आणि आता पिंजऱ्यात अडकणारा! तुरुंगात खितपत पडलेला एक मोहक प्राण, एक आत्मा सर्वाहून दुःखी, घोर यातनांमधील एक खुनी! शेवटी सगळ्याचा हाच परिपाक ना?

दगलबाज आणि अधमाधम निशाचरा, हे सर्व तू ठेवलेस लपवून माझ्यापासून. आणि आता तू माझ्यापुढे असशील खडा, पाहाशील टवकारून सैतानी क्रोधाने, तुझे दुष्ट डोळे फिरवशील गरगरा, असशील खडा आणि करशील माझा उपमर्द त्या तुझ्या असह्य उपस्थितीने? एक बंदिनी, न संपणाऱ्या यातना भोगणारी पापमय निशाचरांच्या आणि निर्घृण छिद्रान्वेशी माणसांच्या हवाली केलेली. आणि हे सर्व घडत असताना, नादान विषयोपभोगांची गुंगी देऊन तू मला बनवलेस निष्क्रिय, तिच्यावर कोसळणाऱ्या दारुण विपत्तींना माझ्यापासून ठेवलेस लपवून, आणि तिला दिलेस सोडून सर्वनाशाच्या वाटेवर, एकाकी आणि असह्य अवस्थेत.

मेफिस्टॉफलीझ ती काही पहिलीच नव्हे बरं.

फाउस्ट नरकातल्या कुत्र्या! तिरस्करणीय राक्षसा! हे अनादि व अनंत चैतन्या, इकडे वळव तुझी दृष्टी आणि कर या सर्पाचे पुन्हा एकदा कुत्र्यात रूपांतर, ज्या स्वरूपातच तो माझ्यापुढे रात्रीच्या वेळी आला उड्या मारीत, एका निष्पाप वाटसरूच्या पायापुढे आला रांगत रांगत आणि बसला तो पहुडल्यावर खांद्यांच्या बाजूला पाय रोवून. पुन्हा एकदा कर त्याचा बदल त्याच्या त्या आवडत्या रूपामध्ये; मग घाणीतून तो माझ्यापुढे येईल लोळत आपल्या पोटावर आणि मी देईन उडवून त्या हलकट प्राण्याला माझ्या लाथेने.

म्हणे नव्हे ही पहिलीच ! ज्याचा तळ नाही लागणार मानवी आत्म्याला इतके सखोल हे दुःख, हे दुर्भाग्य; अनेक अभागी आहेत रुतलेले यातनांच्या या दलदलीमध्ये. त्या चिरंतन दयाघनाच्या दृष्टीला पहिल्या बळीने भोगलेल्या यातनाच का दिसू नये पुढील सर्वांच्या पापाचे क्षालन ? या एकाच आत्म्याच्या व्यथेनेही जाते पिळवटून माझे हृदय आणि तू मात्र हसतोस थंडपणाने हजारो लोकांचे दुर्भाग्य पाहूनही !

मेफिस्टॉफलीझ इथेच आपण येऊन पोचतो प्रज्ञेच्या परिसीमेजवळ—म्हणजे अशा ठिकाणी, जिथे ही मानवी बुद्धी ठरते कुचकामी. जर तुला हा मार्ग नव्हता झेपण्यासारखा तर मग कशाला केलेस माझ्या स्वाधीन आपले सर्वस्व. काय आहेस काढणार पळ भोवळ येण्याची शक्यता असल्यामुळे ? काय आम्ही आलो होतो तुझी वाट काढीत की तूच आपण होऊन लागलास आमच्यापाठी ?

फाउस्ट नको करकरावू ते तुझे अधाशी दात माझ्याकडे पाहून ! मला येतो आहे तुझा किळस.

सर्वश्रेष्ठ चैतन्या, तुझाच चेहरा आहे मला लाभलेला, तुला आहे ज्ञान माझ्या हृदयाचे, माझ्या आत्म्याचे; काय म्हणून मी जखडलो जावा या अशा नादान साथिदाराशी, जो माजतो फक्त दुष्कर्मावर आणि मानतो विनाशात आनंद ?

मेफिस्टॉफलीझ तुझं संपलं का ?

फाउस्ट मी सांगतो, तिला वाचव; नाहीपेक्षा तुला ते जाईल कठीण, कोसळेल तुझ्यावर युगायुगांना पुरून उरणारा महाभयंकर शाप.

मेफिस्टॉफलीझ त्या पापनिर्दालकाने बांधलेले बंध सोडून टाकणे किंवा त्याने एकदा अठकवलेला कोयंडा काढणे, हे नाही माझ्या अधिकारात. तू म्हणतोस, तिला वाचव ! कुणी पाठवले तिला विनाशाकडे, मी की तू ? (फाउस्ट आत्यंतिक निराशेने स्वतःच्या आसपास पाहू लागतो) काय वाटते तुला आपण करावा वज्राचा उपयोग ? सुदैवाने ती शक्ती नाही लाभलेली तुझ्यासारख्या दुर्दैवी मर्त्यांना. आपल्याला अडवणाऱ्या अश्राप जिवाला चिरडून टाकणे, एवढीच आहे स्वतःच्या अडचणीवर मात करणारी तुझ्याजवळची जुलमी शक्ती.

फाउस्ट चल मला तिच्याकडे घेऊन ! झालीच पाहिजे ती विमुक्त.

मेफिस्टॉफलीझ आणि मग ज्या संकटाअधीन तू स्वतःला करून घेशील त्याचे काय ? लक्षात ठेव, तुझ्या हाताने सांडलेल्या रक्ताबद्दल या शहरामध्ये अजूनही आहे सुरू आरडाओरड. खून झालेल्या त्या ठिकाणावर अजूनही संचारता आहेत सूड घेणारी क्रूर पिशाच्चे, पाहातात वाट खुनी माणूस परत येण्याची.

फाउस्ट करतोस साहस हे तू मला सांगण्याचे ! हे राक्षसा, तुझ्या डोक्यावर कोसळेल पाप साऱ्या दुनियेचा खून केल्याचे, विनाश घडविल्याचे. सांगतो तुला, चल मला घेऊन ती असेल तिथे, आणि कर तिला विमुक्त !

मेफिस्टॉफलीझ मी होईन तुझा मार्गदर्शक, आणि ऐक मी काय करू शकेन ते. काय माझ्यापाशी आहे शक्ती सगळी स्वर्गातील व पृथ्वीवरील ? तिच्या तुरुंगाधिकाऱ्याची सर्व इंद्रिये मी टाकतो करून अभ्राच्छादित. देतो तुला किल्ल्यांचा ताबा, आणि तिला आणतो तुझ्यापुढे मानवी बाहूंच्या सामर्थ्याच्या जोरावर. मी राहीन टेहेळणी करीत, घोडे आहेत तयार केलेले, आणि शकेन तुला तिथे नेऊ; हे आहे माझ्या ताकतीतले.

फाउस्ट मग ऊठ, चल एकदम.

रात्र, उघड्या प्रदेशातील

फाउस्ट व मेफिस्टॉफलीझ, काळ्या घोड्यावर स्वार होऊन बेफामपणे दौडत आहेत.

फाउस्ट — कोणत्या वस्तू ते विणताहेत वधस्तंभाच्या टेकडीवर ?

मेफिस्टॉफलीझ — काय रचतात, काय करतात, हे नसते कुणाला ज्ञात.

फाउस्ट — उतरतात, चढतात, वाकतात, वळतात.

मेफिस्टॉफलीझ — चेटकिणींचा एक संघ.

फाउस्ट — करतात हवन, घालतात अभिषेक.

मेफिस्टॉफलीझ — चल पुढे, टाच मारून.

तु रुं ग

फाउस्ट (लोखंडी दरवाजापुढे, किल्ल्या आणि पोत घेऊन)

माझा आत्मा आहे कण्हत चिरविस्मृत दुःखाने
मी थरारतो प्राणघातक दुर्भाग्याच्या या ओझ्यापुढे.
इथे आहे तिला ठेवलेली, या बुरसलेल्या दगडांच्या मागे,
आणि अश्राप आंधळी वासना हाच काय तो तिचा गुन्हा.
तू कचरतोस या ठिकाणी तिला शोधताना,
तू डरतोस तिच्या डोळ्याशी डोळा भिडवायला !
नको विलंब ! नाही तर मृत्यू स्वतःचा संकल्प करील परिपूर्ण.

(कुलुपाला हात घालतो. आतून गाण्याचा आवाज येतो.)

मार्गरिटा (आतून) बदफैली माझ्या आईने
मला मारले केला खून,
शगावून बदमाष पित्याने
मला टाकले फस्त करून.
चिमण्याशा माझ्या बहिणीने
ठेविपली पण खूप लपून
माझी हाडे एकूण सगळी
थंड ठिकाणी फार जपून.
अन् बनल्यावर एक पाखरू
आता ऐकियला मी नाद :
दूर दूरवर उडण्यासाठी
रानामधुनी आली साद.

फाउस्ट (दाराचे कुलूप काढीत)

नसेल आले तिच्या स्वप्नातही, तिचा प्रियकर तिच्याच दरवाजाशी
आहे ऐकत सळसळणारे हे गवत, खळखळणाऱ्या या बेड्या.

(तो आत जातो)

मार्गेरिटा (स्वतःच्या गवती बिछान्यावर भीतीने अर्धवट बसती होऊन)
हाय, हाय, ते आलेच ! आला जवळ माझ्या मृत्यूचा भीषण क्षण.

फाउस्ट मी आलो तुला मुक्त करण्यासाठी. लाडके, बोल हलक्या आवाजात !

मार्गेरिटा काय नाही तुम्हाला दया ? आहेत ना तुम्हाला माणसांचेच डोळे ?

फाउस्ट लाडके, अशा ओरडण्यानं त्या अधिकाऱ्यांना करशील जागं.

(तिला मुक्त करण्यासाठी तो तिच्या बेड्यांना हात घालतो;
ती गुडघे टेकते)

मार्गेरिटा अरे मांगा, कशी झाले मी स्वाधीन तुझ्या शक्तीच्या ?
कुणाचा आहे हा अधिकार देहांताचा हुकूम सोडणारा ?
काय मला नेणार ओढून या अशा मध्यरात्रीच्या वेळी ?
दया करा हो, मला जगू द्या !
आता लौकरच होणार सकाळ, मग वाजणार ती घंटा
माझा शेवटचा जिवंत श्वास ओढून नेणारा, (ती उभी राहते)
आणि मी इतकी तरुण, इतकी इतकी तरुण असताना.
आणि होते मी सुरेखही, त्यानेच ओढवला माझा मृत्यू.
इतका जवळ असायचा प्रियकर, तोही आता गेला सोडून.
माझी फुलं गेली कुस्करली, माझे हार गेले तुडवले.
माझ्यावर पडलेले तुझे हात, किती निबर, किती दणकट.
नको करू माझ्यावर जबरदस्ती, तुझं कधी वाईट केलं का ?
म्हणून म्हणते घे ऐकून ही माझी एवढी विनवणी.
उभ्या आयुष्यात मी तुला पूर्वी कधी नाही पाहिलंही.

फाउस्ट व्हा शांत, माझ्या अश्रूंनो, नाहीतर खचेन मी भ्याडाप्रमाणे.

मार्गेरिटा मी आता आहे तुमचीच संरक्षण नसलेली.
प्रथम मला एकदा पाजू दे माझ्या बाळाला.
सबंध रात्रभर मी होते त्या अश्राप जिवाला संभाळीत.
ते त्यांनी नेलं माझ्याजवळून, निव्वळ दुष्टपणानं,
आणि उद्धटपणानं म्हणतात कसे मीच आहे त्याला मारलेलं,

आणि माझं हे दुर्भाग्य आता असंच रहाणार वाढत.
लोक करतात मला विषय आपल्या क्रूर उद्धट गीताचा.
पूर्वी यायचं मला गाणं असाच काहीसा शेवट असलेलं.
कोणी दिली त्यांना परवानगी हा अर्थ त्यातून काढण्याची ?

फाउस्ट (गुडघे टेकून)

हा तुझा लाडका मित्र तुझ्या पायापाशी टेकतो गुडघे
त्या दुर्भाग्याच्या बेडया तोडण्यासाठी.

मार्गरिटा (त्याच्याच बाजूला गुडघे टेकून)

होय की, चल आपण टेकूया गुडघे आणि करूया संतांचे आराधन!
आहे उंबरठा करीत चकमक, आहे झगमगत,
आणि त्या भरीव पायऱ्यांमधून
आहे उसंडत नरकाची उकळी,
आहे सैतान जवळ आलेला,
हा किंचाळणारा, उग्रभीषण,
आणि हिडिसवाणा
नरकाचा काठ उघडा करण्यासाठी.

फाउस्ट (मोठया आवाजात) ग्रेशेन ! ग्रेशेन !

मार्गरिटा (कक्षपूर्वक ऐकत)

तो आवाज होता अगदी माझ्या प्रियकराचा.
(ती उडी मारून उभी राहाते आणि बेडया गळून पडतात.)
कुठे असेल तो ? मी ऐकली त्याचीच हाक,
आणि झाले मी विमुक्त, माझ्या बेडया आहेत गळलेल्या.
मी त्याला घेईन मिठीमध्ये, नाही कोणी अडवणार मला,
मी राहीन मला विसावून त्याच्या छातीवरती.
'ग्रेशेन' अशी त्यानेच मला मारली हाक, राहिला उभा
माझ्या दाराशी नरकासारख्या या कळकळाटात, या आरडाओरडीत;
या कोलाहलाचा, सैतानी तिरस्काराचा, भेद करून
माझ्या प्रियकराचा गोड आवाज आला माझ्यापर्यंत.

फाउस्ट मीच आहे तो.

मार्गरिटा तो तूच आहेस ! सांग, सांग पुन्हा एकदा !

(त्याला आलिंगन देते.)

होय, तोच हा ! आता माझी झाली सुटका या दुःखापासून.
कसलं भय अंधार कोठडीचं, कुठे आहेत त्यांच्या बेड्या ?
माझ्या जिवलगा, तूच तो, तूच आलास मला वाचविण्यासाठी
आणि आहे मी वाचलेली.
आणि आता पुन्हा एकदा मला दिसतो तो रस्ता माझ्या डोळ्यांसमोर,
तो रस्ता, जिथे झाली ती आपली पहिली भेट,
दिसते आहे ती बाग फुलांनी खिदळणारी, ते प्रवेशद्वार,
जिथे मर्था आणि मी पाहायची वाट तुझ्या येण्याची.

फाउस्ट चल, चल माझ्याबरोबर !

मार्गरिटा अरे, इथेच थांब थोडा वेळ !
तू असलास माझ्याजवळ म्हणजे मला होतं सुख असं रेंगाळण्यातही.

फाउस्ट कर घाई !
आहे धोका विलंब करण्यामध्ये !
एवढीच आहे आपल्याला आशा.
ही हुकली तर उरेल फक्त पश्चात्ताप.

मार्गरिटा असं काय करायचं बरं, माझ्या लाडक्या ? हल्ली चुंबन नसतं वाटतं ?
एवढासा काल, रोडावला चंद्र एका कृष्णपक्षातून,
आणि प्रीतीचं ते चुंबन गेलास विसरून इतक्या लौकर ?
तुझ्या छातीशी मिडलेली असतानाही असं का बरं वाटतं भय,
एके काळी हेच शब्द, हाच तुझा लाडका दृष्टिक्षेप,
माझ्या आत्म्याला होती नेत वेगळ्या जगामध्ये,
आणि घ्यायचास माझं चुंबन मला बुडले असं वाटेपर्यंत.
घे आता माझं चुंबन,
नाहीतर घेईन मीच तुझं.
हाय, हाय ! तुझे ओठ आहेत थंडगार
आणि निःशब्द !

काय झालं हे आपल्या एकनिष्ठ प्रीतीचं ?
कुणी आणलं हे असलं अरिष्ट माझ्यावर ?

(त्याच्यापासून दूर सरते)

फाउस्ट चल लाडके, चल माझ्यामागून ! धर हिंमत;
आणि तुला देईन प्रेम याहून हजारपटीनं.
पण लाडके चल माझ्या मागून, घाल मला एवढीच भिक्षा.

मार्गरिटा आणि खरंच का तोच तू ? असू शकेल का हे सत्य ?

फाउस्ट तोच मी. चल लाडके !

मार्गरिटा तूच केलीस माझी मुक्तता या शृंखलांतून,
अगदी तूच मला धरलंस तुझ्या हृदयाशी;
कसं नाही तुला वाटत भय माझ्याबद्दल ?
की सोडवलेल्या या प्राण्याला तू अजून नाहीस ओळखलेलं ?

फाउस्ट तसं नाही ग, तू चल बरं !
रात्र आहे पहाटेने मंदावलेली, गर्द सावल्या आहेत पळालेल्या.

मार्गरिटा माझी आई आहे मेलेली माझ्याच हातांनी.
आहे मेलेलं माझं बाळ, मीच बुडवलेलं.
नव्हतं त्याला इथे पाठवलेलं आमचं होण्यासाठी ?
आणि तुझंहि—तूच तो, जरी वाटलं हे चमत्कारिक,
पाहा, हे नव्हे एखादं स्वप्न.
हा तुझाच लाडका हात—अगबाई, पण कसा आहे माखलेला !
चल, आधी टाक पुसून ! मला वाटतं,
ते आहे रक्ताने ओलावलेला.
अरे देवा ! काय भलतं करून बसलास ?
मी तुझ्यापुढे पसरते पदर,
लपव माझ्यापासून ही तुझ्या खंजिराची दटावणी.

फाउस्ट जा विसरून तो भूतकाल ! केवढी भये उठतील त्याच्यामधून ?
लाडके, करणार भग्न तू माझं हृदय !

मार्गेरिटा नाही रे, मीच आहे जाणार मरून, पण तू पाहिजेस जगलं.
घे ऐकून मी केलेला हिशोब थडग्यांचा,
जी लागतील तुला बनवावी.
अगदी उद्याच बनव लाडक्या ती काळजीपूर्वक,
माझ्या आईसाठी असू दे स्थळ सर्वोत उत्तमसे,
आणि त्यानंतर माझ्या भावाला दे ठेवून तिच्याच शेजारी,
ठेव मला
थोड्याशा अंतरावर जरा अलगसं—मात्र नको फार दूरही—
आणि दे माझ्या बाळाला ठेवून माझ्या उजव्या स्तनाजवळ :
माझ्या बरोबर विश्रांती घेणारं नाही आहे दुसरं कोणीही.
मी शिरायची तुझ्या कुशीमध्ये आता हरपलेल्या त्या दिवसांत.
ते सुख, तो आनंद होता स्वप्नात पुन्हा भोगण्यासारखा.
नाही दिसणार तो आनंद या सत्यसृष्टीत पुन्हा आलेला;
जणू काही तू ठेवलंस मला बाहेर तुझ्या हृदयातून आणि मनातून,
अशी करते चमत्कारिक धडपड तुझ्यामध्ये येण्याची.
आणि तरीही आहेस माझ्या समोर, इतका चांगला, इतका प्रेमळ.

फाउस्ट जर हृदयामध्ये तुला दिसत असेल तुझा प्रियकर जवळ असलेला
तर चल मग, कोणचे धाडस असेल आपल्याला न झेपण्यासारखे ?

मार्गेरिटा जायचं या इथून ?

फाउस्ट त्या स्वातंत्र्याकडे.

मार्गेरिटा जर तिकडे असेल बांधलेलं माझं थडगं,
आणि असेल जागता पहारा तिथे मृत्यूचा,
तर तिकडे मी जाईन अंतकाळच्या झोपेसाठी,
एरवी नाही मी उचलणार एकही पाऊल;
आणि म्हणून
तू निघतोस ना आता जाण्यासाठी ?—
हेन्रिक, अरे लाडक्या, जर मला येता येतं तर !

फाउस्ट फक्त धीर कर ! आहे काढलेली दरवाजाची कडी.

मार्गरिटा मला इथेच पाहिजे राहिलं, माझी आशा आहे संपलेली.
काय उपयोग पळून गेल्ये तरी ? ते आहेत दबा धरून बसलेले,
ते जीवन ठरेल असह्य, स्वतःच्या भाकरीसाठी भीक मागणारं,
अधिकच असह्य, आत्मा पापामुळे भीतीग्रस्त असताना.
ती वणवण दूरच्या प्रदेशातून, स्नेह्यासोबत्यांशिवाय;
आणि तरीही सरतेशेवटी ते पकडणारच.

फाउस्ट मी नाही तरीही देणार तुला अंतर.

मार्गरिटा घाई कर, घाई कर,
वाचव तुझे मूल!
ओढ्याकाठून खाली जा
जिथे आहे पूल.
पहा,
त्या रानाच्या डावीकडे,
दिसत होती जिथे
कठडा आणि फळी,
त्याच डबक्यात, तिथे,
फडफडणाऱ्या हातांनी
ते शोधते काठाला;
दे लौकर तुझा हात,
वाचव, वाचव त्याला.

फाउस्ट लाडके कर शांत स्वतःला.
टाक फक्त एक पाऊल आणि होशील तू भयमुक्त.

मार्गरिटा डोंगराच्या पलीकडे आणि या इथून दूर कुठेतरी
जर आपण असतो निसटलेली, नाहिशी झालेली!
माझी आई आहे बसलेली पलीकडच्या दगडावर.
आणि बर्फाचा निश्वास आहे माझ्या केसांमध्ये.
माझी आई आहे बसलेली पलीकडच्या दगडावर,
आहे हलवीत आपले डोके, स्वतःच्या निराशेने,
ती नाही हालवीत मान मला बोलवण्यासाठी,
तिचे डोके हालते हळूहळू, आणि अवजडपणे,

इतकी गाढ आहे झोपलेली, ती नाही उठणार कधीही.
ती झोपली आपल्या वासनेसाठी
आणि लुटला आपण केवढा अपार आनंद,
केवढ्या परमानंदात झालो होतो आपण सहभागी.

फाउस्ट आता धाडसच
इथे ठरणार विनवणीहून परिणामकारक.
तुला दिसतील माझे बाहू माझ्या बोलण्याहून समर्थ असलेले.

मार्गेरिटा नाही जाणार सामर्थ्याला शरण ! सोड माझा नाद !
नको येऊ तू माझ्याजवळ खुनी हातांनी,
माझ्या प्रीतीचं हे सर्वस्व तुला दिल्यानंतर.

फाउस्ट माझ्या प्राणप्रिये, आता लागला आहे दिवस उजाडायला.

मार्गेरिटा दिवस, होय, तोच दिसतो; तो शेवटचा भयंकर दिवस लागला उजाडायला
खरं म्हणजे हा असायचा माझा विवाहदिन.
तू होतास ग्रेशेनच्या खोलीत हे नको कुणाला सांगू.
माझी मंगलमाला होती ओवलेली दुःखाच्या धाग्यांनी,
तसाच पडला होता दैवाचा फासा.
आपण दोघंही पुन्हा येऊ परत एकत्र,
मात्र नाही पुन्हा कधीही नाचाच्या प्रसंगामध्ये.
निःशब्द पावलावर चालणाऱ्या सैन्याचा पडतो गराडा माझ्या भोवताली
नाही सामावत या फौजा
गल्ल्यांमध्ये, चौकांमध्ये, आणि रस्त्यांमध्ये,
आहे मृत्युदंड मोडला गेलेला, गुन्ह्याची घंटा आहे घणघणलेली,
ते आहेत मला पकडू लागले, मला बांधू लागले,
मी आहे एकटीच उभी या वधस्तंभावर,
सगळा समुदाय आहे पाहात वर टवकारून,
प्रत्येक माणसाला वाटते आहे तीक्ष्ण धार जवळ आल्यासारखी,
जणू काही माझा गळा हाच प्रत्येकाचा गळा असल्याप्रमाणे;
आहे लखलखत तीक्ष्ण पोलाद.
सगळे जग बनते मुके एखाद्या दगडाप्रमाणे.

फाउस्ट मी जन्मालाच आलो नसतो तर!

मेफिस्टॉफलीझ (बाहेर प्रविष्ट होऊन)
जर थांबलात तर संपलात तुम्ही दोघंही.
आहे उजाडलं हे तुम्हाला दिसत नाही का ?
निघा एकदम !
अजून बसता तुम्ही बरळत आणि बडबडत.
आणि इकडे माझे घोडे आहेत थरथरत, निथळत घामाने.
विलंब कशासाठी ?
प्रभात होते अधिकाधिक प्रखर.

मार्गारिटा हा कोण पापी प्राणी आहे उमटला या जमिनीमधून ?
तो, बापरे, तोच नव्हे ना ? — नका आणू त्याला माझ्यापुढे
पवित्र भूमीवर त्याला नसतो कसलाही हक्क,
त्याला हवा आहे माझा आत्मा छळणूक करण्यासाठी
तो आहे पाहात वाट माझ्या मृत्यूची.

फाउस्ट नाही, तू आहेस राहणार जिवंत.

मार्गारिटा थरकापणारा माझा आत्मा मी देते परमेश्वराच्या हातात.

मेफिस्टॉफलीझ (फाउस्टला) नीघ, नाहीपेक्षा सोडतो तुला तिच्या
शोकांतिकेत सहभागी होण्यासाठी.

मार्गारिटा मी, परमेश्वरा, आहे तुझीच; कर उद्धार, कर रक्षण !
हे परमपित्या, माझी काळजी असू दे आता तुझ्या देवदूतांना.
असू दे पहारा स्वर्गीय सेनेचा माझ्या भोवताली.
हेन्रिक, मला तुझी भीती वाटते रे.

मेफिस्टॉफलीझ तिचा मृत्यू आला आहे.

एक आवाज (वरून येणारा) तिचा उद्धार झाला आहे.

मेफिस्टॉफलीझ (फाउस्टला उद्देशून) ये माझ्याकडे !

(फाउस्टसह अदृश्य होतो)

आवाज (आतून येणारा व हळूहळू विरून जाणारा) हेन्रिक ! हेन्रिक !